म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५८५
१८५६
REFBK-0008877

# बर्फाच्या दुनियेंत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८७८ वि: निबंध
क्रमांक १५८५ नों दि: ३०।८।६५

सौ. चारुशीला गुप्ते

प्रकाशन क्रमांक
१३[illegible]

REFBK-0008877

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४

मूल्य ३ रुपये

प्रकाशक :
ग. पां. परचुरे
ग. पां. परचुरे
प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

आवृत्ति पहिली
दि. १५।१०।१९५६

सर्वाधिकार
सौ. चारुशीला गुप्ते
यांचे स्वाधीन

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे
प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस
३९३ सी, शिवाजी रोड
कोल्हापूर.

अ.क्र. ३८८८८
११०१८६५
वा. शा.
निबंध
१५८५
[library stamp] द. क्र. ८८७७

## दोन शब्द

पुस्तकाची प्रस्तावना लिहायला विशिष्ट प्रकारचा अधिकार अंगीं असावा लागतो अशी सर्वसामान्य समजूत आहे. ती खोटी नाहीं. त्या त्या विषयांतील तज्ज्ञतेमुळें हा अधिकार प्राप्त होत असतो. पण तज्ज्ञतेच्या अधिकाराप्रमाणें इतरहि अनेक प्रकारचे अधिकार असूं शकतात. उदाहरणार्थ, केवळ केंस पिकल्यामुळें वृद्धांना प्राप्त होणारा तरुणांना उपदेश करण्याचा हक्क ! एखाद्या लग्नामध्यें अविवाहित वृद्ध देखील वधूवरांना '××पुत्रा सौभाग्यवती भव' (फुल्यांच्या जागीं एक, द्वि, त्रि, पंच वगैरेपैकीं आर्थिक दृष्टीनें परवडेल तो शब्द घालणें सद्य:स्थितींत अधिक इष्ट ! पूर्वीचा अष्ट शब्द आतां फार जुना झाला !) असा आशीर्वाद देतोच कीं नाहीं ? तसें पाहिलें तर त्याला संसारांतलीं सुखदुःखें आणि खांचखळगे कुठें ठाऊक असतात ? तो आयुष्यांतल्या सर्वांत कठिण अशा या परीक्षेला कधींच न बसलेला विद्यार्थी असतो. पण वयामुळें तो हा आशीर्वाद देऊं शकतो.

प्रा. सौ. चारुशीला गुप्ते यांच्या या प्रवासवर्णनपर पुस्तकाला प्रास्ताविक म्हणून दोन शब्द लिहितांना वडीलकीचा हा अधिकार माझ्याकडे आहेच. पण त्याशिवाय दुसराहि एक अधिकार आहे. आपल्या पुराणांत भक्तीइतकीच विरोधभक्तिहि मोठी मानली आहे. प्रवासाच्या बाबतींत ती माझ्या ठिकाणीं अगदीं पूर्णत्वानें वास करीत आहे. महाराष्ट्रीय लेखकांत सर्वांत कमी प्रवास

केलेल्या माणसाला पारितोषिक द्यायचें उद्या कुणीं ठरविलें, ( सत्कार, अभिनंदन, विक्रम, पारितोषिक वगैरे बाबतींत आपल्याकडे सध्यां जी अहमहमिका चालू आहे, ती पाहतां हें अशक्य नाहीं ! ) तर बहुधा तें मलाच मिळेल ! सावंतवाडी ते नानेली ( अंतर सात मैल ), सावंतवाडी ते शिरोडें ( अंतर पंधरा मैल ), शिरोडें ते पणशी ( अंतर तीस मैल ) असे प्रवास मीं पायीं केले आहेत. आगगाडीनें थोडासा कामापुरता पुण्या-मुंबईच्या किंवा इंदूर-नागपूरच्या बाजूला आलों गेलों आहें. पण प्रवासाचा खराखुरा अर्थ लक्षांत घेतला, तर मी शुद्ध घरकोंबडा आहें.

पण याचा अर्थ प्रवासाविषयीं मला आवड नाहीं अथवा त्याच्यापासून मिळणारे अनेकविध आनंद मला कळत नाहींत असा नाहीं. पण तो दगदगीवांचून मिळाला तरच मला हवा असतो. असा प्रवास–अगदीं मजेंत, घरीं आरामखुर्चीत बसून, घरगुती चहाचे घुटके घेत घेत–करतां येतो असा माझा अनुभव आहे. याच पद्धतीनें लहानपणीं पावगींच्याबरोबर मी विलायतेला गेलों आहें आणि तिथल्या अग्निरथविश्रामस्थानावर थांबलों आहें; विद्यार्थीदशेंत गोविंद चिमणाजी भाट्यांच्याबरोबर मीं असेंच हरिद्वारच्या गंगेंत स्नान केलें आहे आणि काश्मीरच्या नंदनवनांत भटकलों आहें. गेल्या वीस पंचवीस वर्षांत काणेकर, कालेलकर, रा. भि. जोशी, गंगाधर गाडगीळ, महादेवशास्त्री जोशी या रसिक साहित्यिकांबरोबर आणि त्यांच्याचसारख्या अनेक जिज्ञासु व रसिक मंडळींच्या सोबतीनें मी स्वदेशांत ठिकठिकाणीं फिरलों आहें. पाश्चात्य लेखकांबरोबर परदेशांतहि पुष्कळ जाऊन आलों आहें. अगदीं आफ्रिकेंत सुद्धां !

सौ. चारुशीलाबाईंचें ' बर्फाच्या दुनियेंत ' हें पुस्तक मीं मोठ्या आवडीनें वाचलें तें याच कारणामुळें. प्रवासवर्णनकाराची भूमिका अधिकांत अधिक जवळ कुणाला असेल तर ती लघुनिबंधकाराला. सौ. चारुशीलाबाईंनीं कांहीं चांगले लघुनिबंध लिहिले आहेत. ( ज्यांनीं त्यांचा ' पारिजातक ' वाचला आहे त्यांना त्यांच्या या गुणाची कल्पना येईल ) किंबहुना त्यांच्या मनाची ठेवण विविध गोष्टींत रस घेणारी असल्यामुळें–स्वैंपाकघरांतल्या षड्रसयुक्त साहित्यापासून कॉलेजांतल्या नवरसयुक्त साहित्यापर्यंत सर्वच विषयांत–त्यांची

चांगली गति आहे. त्यांचीं हीं प्रवासवर्णनपर पत्रें मनोरंजक आणि बोधप्रद उतरलीं आहेत. त्यांची लेखनशैली प्रसन्न आहे. त्यांच्या पत्रांतून अधूनमधून आढळणारा विनोदाचा शिडकाव आल्हादक वाटतो. व्यक्ति असोत, दृश्यें असोत अथवा संस्था असोत, त्यांचा परिचय त्या थोडक्यांत पण स्पष्ट रीतीनें करून देतात. त्यामुळें हीं पत्रें वाचतांना आपण एखादें पुस्तक वाचत आहों असें वाटण्याऐवजीं आपण लेखिकेशीं मोकळेपणानें गप्पागोष्टी करीत आहों आणि त्या करतां करतां आपल्या प्रवासांतले विविध अनुभव लेखिका मनोरंजक रीतीनें आपल्याला सांगत आहे, असें वाचकांना वाटेल.

सौ. चारुशीलाबाई हे अनुभव ज्या शैलीनें सांगतात, तिच्यांत काव्य आणि विनोद या दोन्हींना स्थान असल्यामुळें ते अधिकच आकर्षक वाटतात. पृ. २ वरलें वर जाणाऱ्या विमानाचें त्यांनीं एकाच वाक्यांत केलेलें वर्णन पाहा—'दाणे टिपीत जाणाऱ्या एखाद्या ऐटबाज कबुतराप्रमाणें तें थोडा वेळ तुरुतुरु भुईसरपटत चाललें; व नंतर भुर्रकन् आकाशांत उडालें.' पृ. १९ वरलें मॉस्कोच्या विमानतळावर बर्फवृष्टीनें केलेलें स्वागत त्या अशा रीतीनें वर्णन करतात—'हवेंत एकदम बदल झाला होता. केशरी प्रकाशकिरणें अंतर्धान पावून आकाशांत मेघांची गर्दी उडाली होती. इतक्यांत आमच्यावर मोगरीच्या कळ्यांप्रमाणें दिसणाऱ्या गारांचा वर्षाव सुरू झाला. मला रघुवंशांतील एका प्रसंगाची स्मृति झाली. इंदुमतीच्या स्वयंवरास जाणाऱ्या अज राजावर नगरांतील सुवासिनींनीं पांढऱ्याशुभ्र लाह्यांचा वर्षाव केला होता. मॉस्कोच्या वेशीवर निसर्गानें आमच्या या पहिल्याच सांस्कृतिक महिला शिष्टमंडळाचें हें स्वागतच केलें म्हणावयाचें!'

या सर्व पत्रांत विनोदकण ठिकठिकाणीं विखुरले आहेत. लेखिकेचें 'गुप्ते' हें महाराष्ट्रीय आडनांव बंगाली 'गुप्ता'सारखें वाटणें या गोष्टीपासून गीतगायनाच्या स्पर्धेत 'चल चल रे नवजवान' हें फिल्मी गाणें म्हणून आणि तो 'नवजवान' मदतीला येत नाहीं असें पाहून आमच्या भारतीय भगिनींनीं 'रघुपति राघव राजाराम'चा आश्रय करणें या प्रसंगापर्यंत हरतऱ्हेच्या सात्त्विक मजेदार गंमती या पत्रांत आढळतात.

सौ. चारुशीलाबाई साध्यासुध्या अनुभवांतला विनोद जसा टिपून घेतात, तशीच त्यांतून त्यांच्या विचारांनाहि चालना मिळते. त्यांचीं पुढील वाक्यांसारखीं वाक्यें हें पुस्तक वाचून संपविल्यावर सुद्धां वाचकांच्या मनांत तरंगत राहतील—उ० 'विमान जसजसें आकाशांत उंचावत जातें तसतसें आकाशाची विशालता व मानवी सृष्टीची क्षुद्रता यांची मन तुलना करूं लागतें; व माणसाचा स्वतःच्या कर्तृत्वाविषयींचा सारा अहंकार गळून जातो.' (पृ. ४) 'मनुष्य किती परंपराप्रिय आहे. कविसंकेताप्रमाणें, साऱ्या सौंदर्याचें वरदान वसंताला मिळालें आहे हें खरें; पण त्याबरोबरच वर्षाकालाचें उदार वैभव किंवा हेमंताचें करुणखिन्न सौंदर्य तितकेंच लोभस आहे याकडे आपलें दुर्लक्ष होतें. नाहीं का?' (पृ. १९)

या प्रवासवर्णनपर पत्रांत कुशल लघुनिबंधकाराचे अनेक गुण आहेत असें मीं कां म्हटलें आहे, हें या उदाहरणांवरून उघड होईल. पण सौ. चारुशीलाबाईच्या या पत्रांचें स्वरूप दुहेरी आहे. त्यांना जसा साहित्यगुणांचा सुगंध लागला आहे, त्याप्रमाणें विचारकणांचे सुवर्णहि त्यांत समाविष्ट झाले आहेत. हे विचारकण मुद्दाम गंभीरपणें कांहीं भाग लिहून त्यांत लेखिकेनें पेरले आहेत असें नाहीं. पण या प्रवासांत रसिक आणि चौकस दृष्टीनें सौ. चारुशीलाबाईनीं अनेक गोष्टी पाहिल्या आहेत आणि त्यांचा या पत्रांत प्रेरक पद्धतीनें उल्लेख केला आहे. हीं पत्रें वाचून संपविल्यावर न कळत परदेशांत झालेल्या नानाप्रकारच्या प्रगतीचें चित्र आपल्या डोळ्यांपुढें उभें राहतें. गेल्या शतकांत आपण पुष्कळ बडबड आणि गडबड करायला शिकलों असलों तरी पायापासून शिखरापर्यंत जीवनाची नवी उभारणी करण्याचें काम आपल्याकडे किती कमी प्रमाणांत झालें आहे हें पाहायचें असेल, तर या पत्रांतून रशियांतील स्त्रीजीवन, विद्यार्थीजीवन आणि इतर प्रकारचें जीवन यांच्याविषयीं जी माहिती आली आहे तिचा घटकाभर विचार केला तरी पुरें होईल. 'आपल्यापुढं कामांचे डोंगर पडले आहेत' असें जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वी गांधीजींचे गुरु भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले यांनीं उद्गार काढले होते. ते उद्गार आजहि तितकेच सार्थ आहेत. ध्येयाची निश्चिति, ती करण्याकरतां लागणारा अखंड, चौफेर व्यासंग व दीर्घ चिंतन,

ती निश्चिति झाल्यानंतर इष्ट कार्याकरितां जरूर तो त्याग करण्याची मानसिक तयारी, इत्यादि गोष्टींत योजनापूर्वक आपण थोडीं ना थोडीं पावलें टाकूं तरच असलीं प्रवासवर्णनें लिहिणारांचे श्रम सफल झाले असें म्हणतां येईल.

सौ. चारुशीलाबाईंना लेखणीची व वाणीची अशा दोन्ही देणग्या मिळाल्या आहेत. त्यांचा लोकसेवेच्या कामीं चांगला उपयोग होवो, असें मी मनःपूर्वक इच्छितों; आणि ग्रंथकर्तृत्वाच्या क्षेत्रांत या पुस्तकाच्या रूपानें सुरू होणारा त्यांचा संचार दीर्घकाळ चालो व तो सर्वांना आनंददायक होवो, असा वडीलकीच्या नात्यानें आशीर्वाद देतों.

कोल्हापूर<br>
५–१०–५६

वि. स. खांडेकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3८८०८ वि: निबंध
क्रमांक ९५०५ नों: दि: ५।११।६५
८८०८

# बर्फाच्या दुनियेंत

## पत्र पहिलें

रोमच्या मार्गावर
दिनांक २४ एप्रिल १९५४

प्रिय शांता,

तुला कबूल केल्याप्रमाणें हें पत्र मी विमानांतच लिहीत आहें. या प्रवासांत जरी तूं प्रत्यक्ष माझ्याबरोबर नाहींस तथापि प्रत्येक ठिकाणाहून सविस्तर पत्र लिहून त्या सर्व स्थळांचें साक्षात् चित्र मी तुझ्या डोळ्यांसमोर उभें करणार आहें. पाहूंया माझा प्रयत्न कुठवर सिद्धीला जातो तें !

आम्ही आज सुमारें १०-३० वाजतां सांताक्रुझ विमानतळावर आलों. काव्यगायनाच्या कार्यक्रमामुळें तूं येऊं शकली नाहींस. तुझी अनुपस्थिति मला फार जाणवली. मात्र रात्रींची वेळ असूनहि अनेक मित्रमंडळी निरोप देण्यासाठीं येथें आधींच जमलेली दिसली. वेळांत वेळ काढून आचार्य अत्रे मला निरोप देण्यासाठीं आले होते. साडेअकराच्या सुमारास आम्हांला विमानाकडे जाण्याची सूचना देण्यांत आली. तेथें जमलेल्या साऱ्या प्रियजनांचा निरोप घेऊन आम्ही जड पावलानें ज्या वेळीं विमानाच्या दिशेनें जाऊं लागलों त्या वेळीं हर्षविषादाच्या परस्पर भावनांनीं आमचीं मनें भारावलीं होतीं. पोलादी पडद्याआडचा प्रदेश प्रत्यक्ष नजरेस पडणार म्हणून हर्षभरित होणारें माझें मन माझ्या छोट्या प्रणयाला व श्री. गुप्त्यांना कांहीं दिवस एकटेच मागें ठेवून जावें लागणार आहे, या कल्पनेनें क्षणोक्षणीं व्याकुळ होत होतें.

आमच्या ह्या विमानाचें नांव आहे 'मराठा प्रिन्सेस.' आंतरराष्ट्रीय भारत विमान कंपनीची ही कन्यका मोठी सोज्वळ पण डौलदार दिसते. आमच्या या शिष्टमंडळांत आम्ही एकंदर पंधराजणी आहोंत. आमच्यापैकीं दोघी पहिल्या वर्गानें प्रवास करणार आहेत. त्या तेथें जाऊन बसल्या. आम्ही बाकी सर्वजणी प्रवासी वर्गांत जाऊन बसलों. मीं झरोक्याजवळची जागा पकडली व त्यांतून बाहेर पाहूं लागलें. परंतु सर्वत्र अस्पष्ट दिसत होतें. आमच्या शिष्टमंडळाखेरीज इतर प्रवासी कोण आहेत हें पहाण्यासाठीं मी सहज मागें वळून पहातें तोंच विमान हलूं लागलें. दाणे टिपीत जाणाऱ्या एखाद्या ऐटबाज कबुतराप्रमाणें तें थोडा वेळ तुरुतुरु भुईसरपटत चाललें; व नंतर भुर्कन् आकाशांत उडालें. विमानतळावरील मंडळी अस्पष्ट दिसूं लागली. दिव्याचा प्रकाश अंधुक होऊं लागला आणि थोड्याच वेळांत मुंबई दृष्टिपथाच्या पलीकडे गेली. आकाशांत लुकलुकणाऱ्या चांदण्या अन् अंधकाराचें आवरण याखेरीज दुसरें कांहींच दिसेनासें झालें. या शिष्ट-मंडळांतील इतर भगिनींचा व माझा फारसा परिचय नाहीं. ज्यांचा आहे त्या पहिल्या वर्गांत बसल्या आहेत. एक प्रकारचें अनोळखी वातावरण व प्रियजनांचा वियोग यामुळें माझें मन खिन्नतेनें पेंगळून गेलें आहे. मधून मधून जवळ येऊन गप्पा मारणाऱ्या या हंसतमुख एअर होस्टेसमुळें माझी बरीच करमणूक झाली आहे.

आमचें विमान गॅसोलिनच्या पुरवठ्यासाठीं कराचीला थांबणार आहे. कराची म्हटल्याबरोबर फाळणीचा, सारा दुर्दैवी इतिहास माझ्या नजरेसमोर तरळूं लागला आणि मन शहारून निघालें! दीडच्या सुमारास विमान खालीं झेपावूं लागलें. विमान खालीं उतरतें तेव्हां त्यांतून प्रथमच प्रवास करणाऱ्यांची पुष्कळ त्रेधा उडते. कधीं कधीं आसनाला असलेला चामड्याचा पट्टा नीट बांधला गेला नाहीं तर शेजारच्या माणसाच्या अंगावर कोलमडून पडावें लागतें व मग गंमतीदार प्रसंग निर्माण होतात.

आम्ही कराची विमानतळावर उतरण्यासाठीं उठलों. तोंच आमच्या होस्टेसनें आमचे आच्छादन–आंगरखे ( Overcoats ) आमच्यापुढें केले. परंतु हा 'अंगापेक्षां बोंगा' फार जड असतो. त्यामुळें तो घेण्याचें आभार-

पूर्वक नाकारून आम्ही शिडी उतरून खालीं आलों. तेथें पाकिस्तानी कस्टम अधिकाऱ्यांनीं आमचे पासपोर्ट तपासले व आम्हांला पुढें जाऊं दिलें. आतां मात्र आम्हांला येथील कडक थंडी चांगलीच जाणवूं लागली व ओव्हरकोट न घेतल्याबद्दल पश्चात्ताप होऊं लागला. साड्यांचे पदर नीट लपेटून आम्ही झपाझप चालत मुख्य इमारत गांठली. मुख्य दरवाजाजवळ उभ्या असलेल्या अधिकाऱ्यांनीं आमच्याकडे साशंकतेनें पाहून एकवार आमचे पासपोर्ट तपासले. पाकिस्तानच्या राजधानीचें हें विमानतळ अतिशय व्यवस्थित असेल अशी माझी प्रथम समजूत होती. परंतु प्रत्यक्षांत आम्हांला सारेंच वातावरण गबाळग्रंथी व अव्यवस्थित दिसलें. विशेषतः पाश्चात्य देशांतील मीं जीं अनेक विमानतळें पाहिलीं आहेत, त्यांतील स्वच्छता, नीटनेटकेपणा व सौंदर्यदृष्टि यांचा येथें मागमूसही दिसून येत नाहीं. ठिकठिकाणीं लुंगी लावलेले कित्येक पाकिस्तानी बसले होते. त्यांचे कपडे मळकट व चेहरे धुरकट दिसून येत होते. त्याचप्रमाणें अधिकाराच्या तोऱ्यांत इकडे तिकडे हिंडणारे कांहीं सरकारी अधिकारी आम्हांला तेथें आढळले.

साधारणतः अडीच वाजतां आमच्या विमानानें कराची पोर्ट सोडलें व यंत्राच्या घरघराटाच्या तालांत तें पुढील मार्ग आक्रमूं लागलें. लौकरच त्यानें आकाशांतून अरबस्तानाचा वेध घ्यावयास सुरवात केली. अरबस्तानावरून जात असतांना आरबी भाषेंतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टींतील अनेक प्रसंगांची मला आठवण झाली. आकाशांतून उडत जाणारा जादूचा गालिचा व आमचें विमान याची माझें मन नकळतच तुलना करूं लागलें अन् मला हंसूं आलें.

आतां फक्त साडेपांच वाजले आहेत. परंतु बाहेर चक्क उजाडलें आहे. वाळवंटांतील उष्णतेची जाणीवहि होऊं लागली आहे. झरोक्यांतून पिवळ्या वाळूच्या लांबलचक पट्ट्याखेरीज एखादें झुडुप देखील मला दिसत नाहीं. मधून मधून एखाद दुसरा सर्पाकृति रस्ता मात्र दिसतो.

दिनांक २५ एप्रिल १९५४

साताच्या सुमारास आम्ही कैरोनजीक येऊं लागलों. विमानांतून कैरो शहराची रचना मोठी मजेदार दिसते. नाना आकाराचीं टुमदार घरें व त्या-

सभोंवतींच्या लहान लहान बागा नेत्रांना आल्हाद देतात खऱ्या; परंतु आकाशांतून हा सारा देखावा एखाद्या बाहुलीच्या घरासारखा छोटा दिसतो! विमान जसजसें आकाशांत उंचावत जातें तसतसें आकाशाची विशालता व मानवी सृष्टीची क्षुद्रता यांची, मन तुलना करूं लागते; व माणसाचा स्वतःच्या कर्तृत्वाविषयींचा सारा अहंकार गळून पडतो. कैरोला विमान पोहोंचण्यापूर्वी पिरॅमिड्स व स्फिंक्सच्या अस्पष्ट आकृती मला ओझरत्या पाहावयास मिळाल्या. दुरून का होईना, त्या प्राचीन कलाकृतींचा तो प्रचंड पसारा पाहून माझें मन अनेक प्रकारच्या संमिश्र भावनांनीं उचंबळून आलें.

आम्ही बरोबर सात वाजतां कैरोच्या विमानतळावर पोहोंचलों. विमानतळावर असलेल्या उपाहारगृहांत आम्हांला न्याहरी घ्यावयाची होती. उपाहारगृहाचा जिना चढून जात असतां जिन्याच्या बाजूला असणाऱ्या छोट्या दुकानांतून इजिप्तमधील कलाकुसरीचे अनेक नमुने व स्मृतिचिन्हें विकावयास मांडलेलीं आढळलीं. परंतु त्यांच्या किंमती जबरदस्त होत्या. उपाहारगृहांत पायघोळ अंगरखा व 'अगाल' म्हणजे अरबी पागोटें घातलेले कांहीं प्रवासीहि दिसून येत होते. हें उपाहारगृह अतिशय स्वच्छ व सुव्यवस्थित आहे. येथील नोकरांचा पोषाख म्हटला म्हणजे पाश्चात्य पद्धतीचा सूट व वर टरबूश किंवा फेज टोपी! मात्र हे नोकर आपल्या कामांत फार वाकबगार व आतिथ्यशील वाटतात. त्यांना इंग्रजी भाषा सफाईदारपणें बोलतां येत नाहीं. आम्हांला पाहून एक नोकर चटकन् पुढें झाला व म्हणाला, 'सलाम आलेकुम.' मीं तात्काळ प्रत्युत्तर दिलें 'वस्सलाम आलेकुम.' आपली भाषा या परदेशी भगिनीस समजत आहे या कल्पनेनें त्याला फार समाधान वाटलें. ही इजिप्शियन न्याहरी आम्हांला अतिशय आवडली. प्रथम मोसंबीचा ताजा रस, नंतर अंडीं व मांसाचा एखादा खमंग पदार्थ व सरतेशेवटीं चहा किंवा कॉफी. या लोकांची कॉफी फार चवदार बनवलेली असते. मात्र त्यांना चहा नीटपणें साधत नाहीं असें त्यांच्या चहाच्या चवीवरून वाटतें. न्याहरी संपल्यानंतर तेथील छोट्या दुकानांतून चित्रपत्रें विकत घेऊन तीं आम्हीं हिंदुस्थानला पाठवून दिलीं.

नऊच्या सुमारास आम्ही कैरोहून निघालों. आज हवा फार चांगली

पडली आहे. सूर्याचीं पिवळींधमक किरणें सर्वत्र पसरलीं आहेत. त्यांतून आमचें विमान झपाझपा मार्ग काटीत आहे. विमानांतून दिसणाऱ्या दूरवर पसरलेल्या पर्वताच्या श्रेणींमधून हिरव्या पिवळया गवताच्या मैदानाच्या चौकटी डोकावीत आहेत.

आमच्या विमानांत लंडनला जाणारी एक बारा तेरा वर्षांची इंग्रज मुलगी आहे. मीं तिची ओळख करून घेतली. इतक्या लहान वयांत एवढा लांबचा प्रवास ती एकटीच करीत आहे हें पाहून मला तिच्याबद्दल अतिशय कौतुक वाटलें. आमच्या मुलांच्या ठिकाणीं ही धिटाई कां नसावी? या मुलीच्या चेहऱ्यावर बावरल्याचें चिन्ह बिलकूल दिसून येत नाहीं. एखाद्या सराईत प्रौढ माणसाप्रमाणें ती आपले सारे व्यवहार उरकते. तिच्याबरोबर गप्पा मारण्यांत माझा बराच वेळ गेला.

हळूं हळूं विमान इटलीजवळ येऊं लागलें आहे. विमानांतून इटली देशांतील सृष्टिसौंदर्याचा अद्‌भुतरम्य देखावा दिसत आहे. दूरवर पसरलेल्या बर्फाच्छादित पर्वताच्या रांगा दिसूं लागल्या आहेत. त्यांच्या माथ्यावरील शुभ्र हिमाचे थर सूर्यप्रकाशांत रत्नासारखे चमकत आहेत. मधून मधून नीलवर्ण जलांचे प्रवाह ठिपक्याप्रमाणें शोभत आहेत. आतां थोड्याच वेळांत आम्ही रोमला पोहोंचणार. कित्येक काळपर्यंत साऱ्या जगाला दिपवणाऱ्या रोमन संस्कृतीचे अवशेष–रोममधील प्रासादांचीं तीं उत्तुंग शिखरें आतां दृग्गोचर होऊं लागलीं आहेत. थोड्याच दिवसांपूर्वी मी रोमला येऊन गेलें असल्यामुळें, मला तो परिचित देखावा पाहून, पुनःप्रत्ययाच्या आनंदाची अनुभूति मिळत आहे.

रोमच्या विमानतळावर आम्ही दुपारीं अडीच वाजतां पोहोंचलों. आमची रंगीत वेशभूषा पाहून इटालियन लोकांना गंमत वाटली; व ते आमच्याकडे सारखे पाहूं लागले. या लोकांच्या ठिकाणीं एक प्रकारची निःसंकोच वृत्ति आहे. गाणें, नाचणें व मौज करणें हा त्यांच्या व्यक्तित्वाचा एक स्वतंत्र आविष्कार आहे. मात्र ते अगदीं गबाळे व दरिद्री दिसतात. विशेषतः दुसऱ्या महायुद्धानें त्यांना अगदीं धुळीस मिळविलें आहे. येथें येणाऱ्या परदेशी प्रवाशांना फसविण्यांत हे लोक तरबेज आहेत. त्यांचे बरेच स्वभावविशेष आपल्या हिंदुस्थानांतील लोकांच्या स्वभावविशेषाबरोबर मिळतेजुळते आहेत.

आमच्या स्वागताला रशियन वकिलातींतून कांहीं मंडळी आली होती. त्यांनीं आमचें स्वागत करून आम्हांला पुष्पगुच्छ अर्पण केले.

आमचे पासपोर्ट रीतसर तपासण्यांत आले. माझ्या इटलीच्या 'व्हिसा' संबंधीं थोडी चूक झाली असल्यामुळें मोठाच घोटाळा झाला. माझा पासपोर्ट तपासणारा इटालियन अधिकारी मोठा हट्टवादी होता. त्याला मीं पुष्कळ प्रकारें सांगून पाहिलें, पण तो आपला हेका सोडीना व मला रोममध्यें प्रवेश करण्यास परवानगी देईना. नवीन 'व्हिसा' काढावयाचा खरा; परंतु रविवार असल्यामुळें तें शक्य नव्हतें. शेवटीं आपल्या वकिलातींत मीं टेलिफोन केला तेव्हां श्री. वाजपेयी तेथें आले व त्यांच्या मध्यस्थीमुळें मला तात्पुरता 'व्हिसा' मिळून साडेसहाच्या सुमारास गांवांत जावयास मिळालें. इतर प्रतिनिधी अगोदर तेथें पोहोंचल्या होत्या व माझी वाट पहात होत्या.

आम्ही ज्या हॉटेलांत राहिलों आहोंत त्याचें नांव 'नोव्हा रोमा'—नवें रोम. या हॉटेलची इमारत भव्य आहे. आधुनिक सुखसोईनें सज्ज असलेलें हें हॉटेल भरवस्तींत असल्यामुळें प्रवाशांनीं नेहमींच गजबजलेलें असतें. माझ्या खोलीचा नंबर तेरा आहे. तेरा नंबर हा इतरांच्या दृष्टीनें अशुभ असला तरी मला तो फार आवडतो. कारण माझ्या जीवनांतील साऱ्या महत्त्वपूर्ण घटना तेरा तारखेस घडल्या आहेत.

रात्रीं जेवणाच्या दालनांत जेव्हां आम्ही सर्वजणी जमलों तेव्हां एकमेकींचा परिचय करून घेण्याची योग्य संधि मिळाली. जेवण साधेंच होतें. त्यांत मॅकरोनीचा प्रामुख्यानें अंतर्भाव झाला होता. जेवणानंतर आम्ही थोडे पाय मोकळे करण्यासाठीं बाहेर पडलों. आज येथील हवा अतिशयच सुखकारक आहे. थंडी बेताचीच आहे. रस्त्याच्या दुतर्फा रेस्टॉरंटस् असून लोक पद-पथावर खुर्च्या टाकून निरनिराळीं पेयें घेत बसले होते. हॉटेलपासून नजीकच एक कारंजा आहे. त्याच्यावर सर्व बाजूंनीं रंगीबेरंगी प्रकाशकिरण टाकले असल्यामुळें, त्यांतून उडणाऱ्या पाण्याच्या फवाऱ्याला अवर्णनीय शोभा प्राप्त झाली होती. रोममध्यें असे कारंजे व फवारे जिकडे तिकडे आढळून येतात. अशा फवाऱ्यांत एक 'लिरा' टाकणाऱ्या प्रवाशाला पुन्हां एकवार रोमला यावयास मिळतें, अशी एक इटालियन लोकांमध्यें भोळसर समजूत आहे.

मी फेब्रुवारींत येथें आलें होतें. परंतु कारंजांत लिरा टाकलेली नसूनही मला पुन्हां ताबडतोब रोम पहाण्याचा योग आला. आतां आज मात्र मीं त्यांत एक 'लिरा' टाकली. कारण रशियांत परत येते वेळीं मला येथें यावयाचें आहे. तुझ्या नांवानें एक टाकूं का ?

रात्र बरीच झाली आहे. प्रवासाच्या दगदगीमुळें झोंपहि येऊं लागली आहे. शिवाय उद्यां सकाळीं आम्हांला साडेसातच्या गाडीनें व्हिएन्नाला जावयाचें आहे. तेव्हां आतां मी हें पत्र पुरें करतें. उद्यां पुन्हां मी तुला पत्र लिहीन.

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र दुसरें

नोव्हा रोमा
दिनांक २६ एप्रिल १९५४

प्रिय शांता,

नुकताच घड्याळाचा साडेपांचचा गजर झाला अन् माझा प्रातःचहा घेऊन येणाऱ्या वेटरनें माझ्या खोलीच्या दारावर टक्टक् केली. मला जाग आली आहे खरी; परंतु हवा इतकी मजेदार आहे कीं, गुलाबी थंडीमुळें हें उबदार पांघरूण अंगावर आणखी ओढून घ्यावेंसें वाटत आहे. पण माणूस संवयीचा गुलाम असतो असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं ! या वेळींच रोज चहाचा पहिला कप पिण्याची संवय असल्यामुळें हा गरमागरम चहा माझें मन आकर्षण करीत आहे. शिवाय झोंपेच्या मोहांत निदान आज तरी

मला जास्त वेळ गुंगून राहतां येणें शक्य नाहीं. कारण आज साडेआठच्या रॅपिडोनें आम्हांला व्हिएन्नाला जावयाचें आहे. तेव्हां साडेसातपर्यंत स्नान वगैरे आटोपून मला तयार व्हावयास हवेंच ! एवढें मात्र खरें कीं, हा चहा आला नसता तर दहा पंधरा मिनिटें आणखी एखादी साखरझोंप काढली असती. पण हा बेटा वेटर त्याला सांगितल्याप्रमाणें बरोबर पहांटे साडेपांचला चहा घेऊन आला. एका मिनिटाचीहि चूकभूल नाहीं ! खरोखर पाश्चात्य देशांतील हा वक्तशीरपणा आपण शिकावयास हवा !

चहाच्या गरम कपांतून निघणाऱ्या वाफेच्या वलयांकडे पहात पहातच या चार ओळी मीं तुला लिहावयास घेतल्या आहेत. उरलेलें पत्र आगगाडींत पुरें करीन.

माझ्या खोलीच्या या मोठ्या खिडकीला लावलेल्या झिरझिरीत फिकट पिवळ्या रंगाच्या पडद्यांतून मला रमणीय देखावा दिसत आहे. धुक्याच्या धूसर आवरणांतून नुकतीच कुठें प्रकाशाची चाहूल ऐकायला येऊं लागली आहे. कुठून तरी अनोळखी फुलांचा सूक्ष्म पण उग्र गंध आसपास दरवळत आहे. रात्रभर जागता पहारा केलेल्या शहरांतील दिव्यांचा प्रकाश अंधुक होऊं लागला आहे. मधून मधून पावाच्या व दुधाच्या बाटल्यांच्या हातगाड्यांची रेटारेटी कानांवर पडत आहे. रात्रभर नाट्यगृहांतून वा यामिनीगृहांतून नाचरंग करणारे हे इटालियन स्त्रीपुरुष मात्र सूर्यवंशी दिसत नाहींत ! कारण रात्रभर जागरण करूनहि एवढ्या पहांटे आपले ओव्हरकोट अंगावर चढवून ते झपाझप आपआपल्या उद्योगधंद्याला चालले आहेत. तथापि या तुरळक रहदारीखेरीज बाकी सर्वत्र निस्तब्धता आहे.

माझ्या टेबलावरचा टेलिफोन खणखणूं लागला आहे. बहुतेक श्रीमती कमलादेवींकडून लवकर तयार होण्यासंबंधींची पहिली सूचना आली असावी; आतां हें पत्र अर्धेंच ठेवावयास हवें. मी मग लिहीन.

## रॅपिडो

आम्ही सर्वजणी बरोबर सात वाजतां तयार होऊन खालीं आलों. ब्रेकफास्ट रूममध्यें आमचा चहापानाचा समारंभ आटोपल्यावर आम्ही स्टेशन-

वर जावयास निघालों. रोमचें हें सेन्ट्रल स्टेशन 'नोव्हा रोमा' हॉटेलपासून दोन तीन मिनिटांच्याच रस्त्यावर असल्यामुळें आम्ही पायींच तिकडे जावयास निघालों. आमच्याकडे सकौतुक पाहणारे अनेक इटालियन स्त्रीपुरुष रस्त्यावरील पदपथावर उभे राहिले होते. आमचें सामान हातगाडीवरून मागून येत होतें. या सेन्ट्रल स्टेशनची भव्यता पाहिल्यावर आपला बोरीबंदर स्टेशन-बद्दलचा सारा अभिमान गळून जातो. या स्टेशनला सुमारें पन्नास प्लॅटफॉर्म असून हें जगांतील पांचव्या नंबरचें स्टेशन म्हणून गणलें जातें. आपल्या स्टेशनवर दिसून येणारा केरकचरा किंवा धूळ येथें बिलकूल दिसून येत नाहीं. सगळीकडे आरशाप्रमाणें चक्क आहे. ही स्वच्छता राखण्याची प्रत्येक मनुष्य आपआपल्या परीनें पराकाष्ठा करीत असलेला दिसून येतो. नागरिकांचीं खरीं कर्तव्यें या मंडळींना पूर्णपणें माहीत आहेत.

आम्ही ज्या गाडीनें जाणार होतों ती दहा नंबरच्या प्लॅटफॉर्मवर आमची वाट पहात उभीच होती. आम्हीं सबंध डबा घेतला आहे. या डब्यांत एकंदर आठ केबिन असून त्यांत दोन दोन माणसांची सोय आहे. पहिल्या वर्गाचा डबा असल्यामुळें तेथें रेडिओ, लेखनासाठीं टेबल लॅंप, रात्रीं ठेवण्यासाठीं दिवा व तोंड धुण्यासाठीं वॉश्–बेसिन आहे. 'स्लीपर' डबा असल्यामुळें उबदार पांघरुणें व उशा गिरद्याहि आहेत. केबिनच्या समोर येण्याजाण्यासाठीं एक लांबलचक घळ ( कॉरिडॉर ) आहे. प्रत्येक डब्यांतून प्रवाशाला मदत देण्यासाठीं रेल्वेचा एक मनुष्य असतो. अंथरुणें घालण्यापासून तें चहा, खाणें वगैरे देण्यापर्यंतच्या प्रवाशांच्या सर्व सर्व सुखसोईकडे त्याला लक्ष द्यावयाचें असतें. आमच्या ह्या साहाय्यकाचें नांव आहे 'रोमिओ.' त्याच्या नांवाला शेक्सपियरनें केवढें अमर केलें आहे याची कदाचित् बिचाऱ्याला कल्पनाहि नसेल ! वीस-बावीस वर्षांचा तरतरीत तरुण आहे हा ! तो आपलें काम अतिशय व्यवस्थितपणें करतो. शिवाय त्याला मोडकेंतोडकें इंग्रजीहि येत असल्यामुळें आम्हांला भाषेची अडचण भासत नाहीं.

माझ्या केबिनमध्यें लखनौच्या सौ. अलजहीर आहेत. त्यांचे यजमान मंत्रिपदावर आहेत. खानदानांतल्या असल्यामुळें त्यांना जरासुद्धां दगदग सहन होत नाहीं. तथापि लहानपणापासून श्रीमंतींत वाढूनहि त्या अतिशय

साध्या व निगर्वी आहेत. पन्नाशी उलटली आहे, पण त्यांच्या ठिकाणीं विनोदवृत्ति खूप आहे, त्यामुळें माझी बरीच करमणूक होत आहे. मात्र त्या झोंपेच्या भोक्त्या आहेत. त्यांना हालवून जागें करावयाचें म्हणजे एक दिव्यच आहे!

आमची गाडी धापा टाकीत टाकीत खूप वेगानें मार्ग काटीत आहे. आम्ही आतां इटलींतील रम्य प्रदेशांतून चाललों आहोंत. 'हेमंत' संपण्याचा सुमार आहे. वसंताच्या आगमनाच्या जाणिवेनें पृथ्वीच्या अंगावर हिरवे रोमांच उभारूं लागले आहेत. हेमंताच्या अवकृपेमुळें वैराण झालेल्या वृक्षावर नवी नव्हाळ डोकावते आहे. मधून मधून द्राक्षें, संत्रें व सफरचंद यांच्या बागा धावत्या गाडींतून ओझरत्या दिसत आहेत. छोट्या मोठ्या घरांनीं नटलेल्या गांवांचीं नीटस दृश्यें डोळ्याला आल्हाद देत आहेत. इटली म्हणजे एक रंगीत दुनिया आहे! या देशाचें सारें निसर्गसौंदर्य टिपून घ्यायला तुझ्यासारखी कवयित्री येथें यावयास हवी! माझ्या ठिकाणीं तें सामर्थ्य नाहीं!

आतां साडेअकरा वाजले असून गाडी अरिझो नांवाच्या स्टेशनांत प्रवेश करीत आहे. दुरून आम्हांला गांव दिसत आहे. परंतु तें पाहून येण्याची शक्यता नाहीं. हें गांव एका टेकडीच्या उतरणीवर वसलें असून, तें इटालियन कवि फ्रॅन्सिको पेट्रेसा याची जन्मभूमि म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचें छोटें घर पहाण्यासाठीं पुष्कळ प्रवासी येथें येतात. याखेरीज बाराव्या, तेराव्या व चौदाव्या शतकांतील इतिहासप्रसिद्ध देवळें व प्रासाद हेंहि या गांवचें मोठें आकर्षण आहे. स्टेशन फारसें मोठें नाहीं. तथापि, व्यवस्थित मांडणीमुळें तें टाकटीक दिसतें. उतारूंची गडबड, घाई, चाय गरमचा गोंधळ, असलीं परिचित दृश्यें येथें दिसून येत नाहींत.

सुमारें दीड वाजतां आम्ही प्रसिद्ध फ्लॉरेन्स स्टेशनवर पोहोंचलों. या गांवाला इटलीच्या संस्कृतीचें व कलेचें मायघर म्हणतात. इथल्या प्रदेशाला निसर्गसौंदर्याची एक आगळीच पार्श्वभूमि आहे.

आमच्या पोटांत भुकेनें कावळे ओरडत होते. आगगाडींत लंच मिळत नव्हती. फक्त पाव, रोटी व कोरा चहा मिळत होता. तेव्हां स्टेशनवर विकावयास आलेलीं लंच पाकिटें आम्हीं विकत घेतलीं व त्यावरच दुपारच्या

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
... ३ ८ ८ ५ ८ वि: ...
नों: दि: ...



जेवणाचा समारंभ आटोपला. ही लंच पाकिटांची पद्धत आपल्याकडे सुरू व्हावयास हवी. या पाकिटांतून दोन सँडविच, मांसाचा कटलेट, केक व सफरचंद होते. तेथले लोक जेवतांना पाणी पीत नसल्यामुळें टेबल वाईनची एक छोटी बाटलीहि या पाकिटाबरोबर मिळते. हे पदार्थ खाण्याचा सराव नसल्यामुळें आमच्यापैकीं शाकाहारी भगिनींना मात्र अतिशय त्रास झाला.

फ्लॉरेन्सनंतर आमची गाडी डोंगराळ प्रदेशांतून जाऊं लागली. साडेतीन चारच्या सुमारास ती ॲपिनाईन पर्वताच्या पायथ्याशीं वसलेल्या बोलोग्ना नांवाच्या गांवाला पोंचली. या शहराला विद्येचें माहेरघर म्हणतात. कारण युरोप खंडांतील अतिप्राचीन विद्यापीठ येथें आहे. हा भाग सुपीक असल्यामुळें या गांवाला La Grassa म्हणजे The Fat असेंहि गंमतीनें म्हणतात. इटलींतील हीं सारीं प्रसिद्ध गांवें पहाण्याची मला फार इच्छा आहे. परंतु रशियाला जाऊन येईपर्यंत मला ती आंवरली पाहिजे.

संध्याकाळीं साडेसात वाजतां आम्ही व्हेनिसला पोंचलों. व्हेनिस शहराचे भाग एकमेकांबरोबर कालव्यानें जोडलेले आहेत. आतां संध्याकाळ झाली आहे. धुकें नसल्यामुळें वातावरण प्रसन्न व शांत दिसत आहे. पाण्याच्या प्रवाहावर गंडोलामध्यें बसून पुष्कळ रसिक मंडळी नौकाविहाराचें सुख अनुभवीत आहेत.

व्हेनिस शहराची कलाकुसरीच्या कामाबद्दलची जी ख्याति मीं ऐकली होती, तिचा प्रत्यक्ष अनुभव स्टेशनवर विकावयास आलेल्या रंगीबेरंगी गवताच्या व काचेच्या अनेक सुबक व छोट्या वस्तूंकडे पाहून मला आला. या गवताचे विविध इंद्रधनुष्यी रंग हे नैसर्गिकच असतात ही त्यांतली गंमत आहे ! मला छोट्या वस्तू जमविण्याचा छंद असल्यामुळें, मीं तेथें दोन तीन स्मृतिचिन्हें विकत घेतलीं आहेत. आमची गाडी स्टेशनमध्यें बराच वेळ थांबली असल्यामुळें आम्ही चहा, ब्रेड वगैरे घेऊन आमच्या रात्रींच्या जेवणाची निरवानिरव केली व त्यानंतर थोड्या वेळांत गाडीनें व्हेनिस शहर सोडलें.

कांहीं वेळ आमच्या गप्पागोष्टी झाल्यावर रात्रीं दहाच्या सुमारास आम्ही झोंपलों. रात्रीं दोन अडीचच्या सुमारास कसल्या तरी आवाजानें मला जाग

आली. पहातें तों आमच्या केबिनच्या दारावर खूप धक्के बसूं लागले होते. मीं चटकन् उठून दरवाजा उघडला. तों बाहेर एक धिप्पाड ऑस्ट्रियन अधिकारी पासपोर्ट तपासण्यासाठीं उभा होता. कारण आमची गाडी ऑस्ट्रियन सरहद्दीवरील ब्रेनिरो नांवाच्या स्टेशनवर उभी होती. तो अधिकारी आमचे पासपोर्ट घेऊन ते तपासण्यासाठीं गेला. इतक्यांत आमच्यापैकीं एक प्रतिनिधि शांताबाई यांच्याजवळ ऑस्ट्रियाचा ' व्हिसा ' नाहीं हें लक्षांत येऊन त्यानें तिला गाडींतून खालीं उतरण्यास सांगितलें. त्याला इंग्रजी भाषा चांगली येत नव्हती. आमच्या शिष्टमंडळाच्या नेत्या कमलादेवी चटोपाध्याय यांनीं पुष्कळ शिष्टाई केली. तथापि तो उद्दाम व हट्टी अधिकारी ऐकेना. रात्रींच्या वेळीं त्या सरहद्दीवरील एका लहानशा स्टेशनांत एकट्या दुकट्या स्त्रीनें उतरून काय करायचें, हा एक मोठा प्रश्न आमच्यापुढें येऊन पडला. त्यांतून तिला जर्मन भाषाहि समजत नव्हती. परंतु हा पेंचप्रसंग त्या भगिनीनें मोठ्या धैर्यानें सोडविला. ती धिटाईनें तडक खालीं उतरली. स्वातंत्र्ययुद्धांत भारतीय स्त्रियांनीं जी भूमिका स्वीकारली होती तिच्यामुळें आज आम्हां भारतीय स्त्रियांमध्यें एक वेगळेंच धाडस व आत्मविश्वास निर्माण झाला आहे याचें हें एक उत्तम उदाहरण म्हटलें पाहिजे.

या अप्रिय प्रसंगामुळें आम्ही सर्वजणी खिन्न झालों होतों. पुढील स्टेशनवर सौ. वाडियांनीं खालीं उतरून ऑस्ट्रियांतील आपल्या वकिलातीला निकडीचा टेलिग्राम केला व वस्तुस्थिति कळविली. सौ. वाडिया यांची प्रकृति आधींच तोळामासा ! त्यांतून या सर्व गोंधळामुळें त्या फार अस्वस्थ झाल्या व गाडीकडे धांवत येत असतां पाय घसरून पडल्या आणि त्यांच्या पायाला थोडीशी इजा झाली.

दि. २७ एप्रिल १९५४

सकाळीं सात वाजतां मी उठलें. माझ्या आधींच कांहीं भगिनी उठल्या होत्या व त्यांच्यामध्यें आदल्या रात्रींच्या विलक्षण घटनेबद्दल रसभरित चर्चा चालली होती. त्यांत भाग न घेतां मी घळींत उभी राहून बाहेरची शोभा पाहूं लागलें.

आतां आमची गाडी ऑस्ट्रियांतील ज्या डोंगराळ भागांतून चालली होती, तो भाग पाईन वृक्षांच्या जंगलांनीं भरलेला होता. हवाहि कुंद व ढगाळ असून हिमवृष्टि होत होती. पांढऱ्या शुभ्र बर्फानें नखशिखांत न्हाऊन निघालेल्या त्या वृक्षांकडे व खडकांकडे पाहून मला वाटलें कीं, जणूं काय त्यांनीं साबणाचा फेसच अंगाला माखून घेतला आहे! एखाद्या निष्काळजी नोकरानें पिठाची टोपली उपडी करावी, त्याप्रमाणें बर्फाचें पांढरें शुभ्र पीठ सर्वत्र सांडलेलें दिसत होतें.

एका लहानशा स्टेशनवर एक छोकरा कॉफी विकण्यास घेऊन आला. ती कडवट कॉफी त्या वेळीं अमृताप्रमाणें आम्हांला गोड वाटली. कॉफी पिणें व रेंगाळणें हे दोन महत्त्वाचे स्वभावविशेष ऑस्ट्रियन लोकांत आहेत व ते त्यांनीं सतराव्या शतकांत तुर्कांपासून उचलले.

हा बर्फाळ टापू टाकून जेव्हां आम्ही व्हिएन्नाच्या जवळ जवळ येऊं लागलों तेव्हां खिडकींतून दिसणाऱ्या नयनरम्य देखाव्यानें माझ्या मनाचा सारा शीणभाग नाहींसा केला. हवेमध्यें पण खूप बदल झाला होता. सूर्याचीं गव्हाळीं किरणें सर्वत्र पसरलीं होतीं. द्राक्षें, ऑलिव्ह वगैरेंच्या बागा मनाला आनंद देत होत्या. मधून मधून दिसणाऱ्या व्हिलांच्या आसपास कॅमॅलिआझचीं झाडें मोहरून निघालेलीं दिसत होतीं. गुलाबाच्या फुलां-प्रमाणें दिसणारीं हीं छोटीं फुलें गडद हिरव्या उभट पानांच्या संभाराला अवर्णनीय शोभा देत होतीं. हा देखावा पहात असतां माझ्या मनांत आलें— "किती उदार आहे हा निसर्ग!"

आमची गाडी व्हिएन्नाला सकाळीं नऊच्या सुमाराला पोंचली. स्टेशनवर बरेच भारतीय विद्यार्थी, वकिलातींतील श्री. रामस्वामी वगैरे मंडळी व कांहीं विद्यार्थी उपस्थित होते. आम्हां भारतीय भगिनींना पाहून विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला. येथें पुष्पगुच्छ देण्याचा व फोटो काढण्याचा यथोचित समारंभ होऊन आम्ही आमच्या 'गोल्डन लाम (Golden Lamm)' नांवाच्या नियोजित पथिकाश्रमांत जाऊन पोहोंचलों. येथील भारतीय विद्यार्थ्यांनीं येथें एक विद्यार्थी मंडळ स्थापन केलें आहे. या सर्व विद्यार्थ्यांत एकहि महाराष्ट्रीय विद्यार्थी नसावा, याबद्दल मला जरा विषाद वाटला.

इतक्यांत त्यांच्यापैकीं एका गोरटेल्या विद्यार्थ्यानें मला इंग्रजींत प्रश्न केला, "आपण बंगाली आहांत ना सौ. गुप्ता?" मीं त्याला हंसून उत्तर दिलें, "छे, छे, मी महाराष्ट्रीय आहें व माझें नांव गुप्ता नसून गुप्ते आहे." त्याबरोबर तो चटकन् शुद्ध मराठींत म्हणाला, "हो का, मी पण महाराष्ट्रीय ब्राह्मण आहें. माझें घर दादरला आहे, कित्येक दिवसांनीं मला आज मराठींत बोलावयास मिळत आहे." व मग त्यानें माझ्याबरोबर खूप गप्पा मारल्या. तो गेलीं चार वर्षें व्हिएन्नाला असून कांहीं वैद्यकीय संशोधन करीत आहे. पुढील आठवड्यांत तो जर्मनीला जाणार आहे. या सर्व विद्यार्थ्यांनीं आमच्यासाठीं दुपारीं चार वाजतां एक चहापार्टी करण्याचें ठरविलें व त्या पार्टीचें आम्हां सर्वांना मोठ्या अगत्यानें आमंत्रण दिलें.

विद्यार्थी मंडळी निघून गेल्यानंतर आम्हीं आपापल्या खोल्यांत सामान ठेवलें व कपडे बदलून शहर पहाण्यासाठीं व पैसे बदलून घेण्यासाठीं बाहेर पडलों. व्हिएन्ना हें शहर अति सुंदर असून तें डान्यूबच्या खोऱ्यांत आहे. या शहराचें जुनें वैभव आज राहिलेलें नाहीं. काप गेले व भोंकें राहिलीं अशा परिस्थितींत असलेल्या या शहरांतील लोकांचा मूळचा आनंदी स्वभाव व आतिथ्यशील वागणूक हीं पूर्वीप्रमाणेंच कायम राहिलीं आहेत. रस्त्यावरून हिंडतांना अनेक स्त्रीपुरुष आमच्याकडे आपुलकीनें पाहात होते व आम्हांला "नमस्ते" ग्रुसगॉट ( Gruess Gott ) करीत होते. रस्त्यावर चांगल्या दिसणाऱ्या एका उपाहारगृहांत आम्हीं दुपारचें जेवण उरकून घेतलें व स्पेशल बस करून सबंध गांव झटपट नजरेखालीं घातला.

हें शहर चार राष्ट्रांत विभागलें गेलें आहे. त्यांतल्या त्यांत रशियन विभाग व उरलेले तीन विभाग यांत फारसा स्नेहसंबंध दिसला नाहीं. शहरांतील कांहीं मुख्य इमारती, स्टेट ऑपेरा हाऊसची पुनर्रचित इमारत, कांहीं धर्ममंदिरें वगैरे पाहून झाल्यावर आम्ही रशियन विभागांत गेलों. या भागावर सोव्हिएत रशियाच्या नव्या तत्त्वज्ञानाची सर्वत्र मोहर उमटलेली आम्हांला दिसली. तो भाग सोडून आम्ही ग्रिनझिंग ( Grinzing ) नांवाचें उपनगर पाहण्यास गेलों. हा भाग द्राक्षांबद्दल फार प्रसिद्ध आहे. ठिकठिकाणीं मद्यपानगृहें आहेत. परंतु येथें मला एक गंमतीची प्रथा आढळली. मद्यपानगृहांवर

नांव वगैरे नसून एक द्राक्षांची फांदी लटकावून दिलेली असते. विशिष्ट संकेतानें आंतील मालाची कल्पना करूं देण्याची ही पद्धत मला तरी फार अभिनव वाटली.

यानंतर आम्ही एका टेकडीवर चढून शहराची शोभा पाहूं लागलों. शहराच्या एका अंगाला नागिणीप्रमाणें विळखा घालणारी ती डान्यूब नदी, तिच्या कांठावरील मोझेइक पद्धतीनें नांगरलेलीं शेतें व पिवळ्या–निळ्या पॉपीच्या इवल्याशा फुलांनीं बहरलेलीं गवताचीं मैदानें यांनीं या भागाला एक प्रकारची अभूतपूर्व शोभा आली होती.

चार वाजतां विद्यार्थी मंडळाचा चहाचा समारंभ मोठ्या थाटानें साजरा झाला. त्या वेळीं वकिलातींतील बरेच स्त्रीपुरुष हजर होते. बेत इतका सुंदर जमला होता कीं, आतां आम्हांला रात्रीचें जेवण एखाद्या उपाहार-गृहांत जाऊन घेण्याची बिलकूल इच्छा राहिली नव्हती. वेळ घालवण्या-साठीं व व्हिएन्ना शहराची सायंकाळची शोभा पाहण्याच्या इच्छेनें कोणत्याहि वाहनाचा आश्रय न घेतां आम्हीं आमच्या पथिकाश्रमापर्यंत पायींच जाण्याचें ठरविलें. येथील दुकानें संध्याकाळीं सहाच्या सुमारास बंद होतात व त्यामुळें कोणत्या दुकानांत जाऊन आम्हांला तेथील वस्तू खरेदी करणें शक्य नव्हतें. तथापि दुकानांतील शो केसमधील विविध व बहुरंगी पदार्थ आमचीं मनें आकर्षीत होते. व्हिएन्ना येथें बनावट खड्यांचे अलंकार व भरतकाम अति सुंदर केलें जातें. युरोपांतील इतर मोठ्या शहरांपेक्षां व्हिएन्नाचें स्वरूप वेगळेंच भासतें. चार बड्या राष्ट्रांत झालेल्या विभागणीमुळें या शहराचा सलंगपणा बिघडून गेला आहे.

हॉटेलांत परत जाण्यास आम्हांला दहा वाजले. अंथरुणावर पडल्या पडल्या हें पत्र मी पुरें करीत आहें. उद्यां सकाळीं आम्ही मॉस्कोला जावयास निघणार! कुठून तरी ऑस्ट्रियन संगीताचे भावमधुर स्वर माझ्या कानांवर पडत आहेत. संगीताच्या त्या गोड स्वरलहरींवर रेंगाळणारें माझें मन मॉस्कोचीं कल्पनेनेंच चित्रें रंगवीत आहे. हळूंहळूं निद्रादेवी मला खुणावीतहि आहे. तेव्हां पत्र पुरें करतें!

---

# पत्र तिसरें

**मॉस्कोच्या मार्गावर**
दिनांक २८ एप्रिल १९५४

प्रिय शांता,

आज सकाळीं साडेपांच वाजतां आम्ही आमच्या हॉटेलांतून रशियन विमानतळाकडे जावयास निघालों. रशियन वकिलातींतील कांहीं मंडळी, आमच्यासाठीं एक स्टेशन वॅगन घेऊन आली होती. शिवाय आपल्या वकिलातींतून श्री. रामस्वामी यांची गाडी पण आली होती. अर्धवट जाग्या झालेल्या व्हिएन्ना शहराचा निरोप घेऊन आम्ही मोटारींत जाऊन बसलों. आज सकाळीं थंडी खूपच पडली होती. मोटारीच्या बरोबरच आंत शिरणाऱ्या वाऱ्याच्या थंड झुळकी अंगाला झोंबत होत्या व आम्ही आमचे ओव्हरकोट अधिकच लपेटून घेत होतों.

व्हिएन्नामध्यें रशियाच्या ताब्यांत असलेल्या विमानतळावरून आमच्यासाठीं एक " खास " विमान सुटावयाचें होतें. हें विमानतळ अतिशय भव्य असेल अशी माझी कल्पना होती; परंतु प्रत्यक्षांत मात्र निराळाच अनुभव आला. एका विस्तीर्ण गवताळ मैदानाच्या मध्यभागीं एक जुनाट विमान उभें होतें. आजूबाजूला असलेला या विमानतळाचा बराच भाग गेल्या महायुद्धांत उध्वस्त होऊन गेला आहे. त्याची पुनर्रचना अद्यापि झालेली नाहीं. या ठिकाणीं कसलीच गडबड गर्दी नव्हती. वाऱ्याच्या मृदु शीळे खेरीज सबंध वातावरणानें एक प्रकारचें प्रशांत मौन धारण केलेलें दिसलें.

आम्ही विमानांत जाऊन बसलों. आपल्या ' एअर इंडिया 'च्या मानानें रशियन विमानें खूपच वेगवान् व मजबूत असतात; परंतु एअर इंडियांतील तो थाटमाट व ऐषआराम मात्र येथें दिसून येत नाहीं. आमची ' हवाई सुंदरी ' ( Air Hostess ) पण खूप धिप्पाड व मजबूत बांध्याची आहे. तिची केशभूषा व वेषभूषा अगदींच साधी असून ती मुखरंगाचा किंवा मुखचूर्णाचा उपयोग करीत नाहीं असें दिसतें.

ठीक साडेसात वाजतां आमच्या विमानानें व्हिएन्ना सोडलें. आमच्याखेरीज एक इराणी स्त्रीहि या विमानांतून मॉस्कोला जात आहे. तिच्याबरोबर तिची नऊ दहा वर्षांची एक मुलगी व चार पांच वर्षांचा एक मुलगा आहे. या दोन लहान मुलांना घेऊन ती मॉस्कोला कशासाठीं जात आहे हें एक गूढच आहे. ही इराणी स्त्री माझ्या शेजारींच बसली आहे.

साडेआठ वाजतां ' हवाई सुंदरी 'नें आमच्या हातांत कार्डबोर्डचे डबे आणून दिले. त्यांत दोन भलींभक्कम सँडविचें, चीज, संत्रीं व बरीचशीं रशियन चॉकलेटें होतीं. या न्याहरीबरोबर लिंबूची फोड टाकलेला ग्लासभर कोरा चहाहि होता.

माझ्या शेजारीं बसलेली इराणी तरुणी माझ्याबरोबर पुष्कळ बोलत होती. मींहि तिला इराणसंबंधीं बरेच प्रश्न विचारले. इराणमध्यें फक्त पांच टक्के साक्षरता असून प्राथमिक शिक्षणाची फार आबाळ आहे; दारिद्र्यामुळें लहान मुलें वयाच्या सहाव्या वर्षापासून काम करूं लागतात; बहुपत्नीकत्व असल्यामुळें स्त्री-जीवनाची दुर्दशा झालेली आहे; येथील स्त्रियांना सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय हक्क नाहींत, त्यामुळें त्यांना एक जबाबदार नागरिक म्हणून स्वतंत्र जीवन जगतां येत नाहीं; अशा अनेक गोष्टी तिनें मला ऐकविल्या.

या इराणी तरुणीबरोबर गप्पा मारतांना माझा बराच वेळ गेला. दीड वाजतां आमचें विमान ' कीव्ह ' ( Kiev ) येथें पोंचलें. तेथील विमानतळावरील उपाहारगृहांत आमच्या दुपारच्या जेवणाची व्यवस्था करण्यांत आली होती. विमानांतून उतरतांना दूर अंतरावरील कीव्ह गांव आमच्या नजरेस पडलें. हा भाग विशेष संपन्न दिसला नाहीं. हिवाळा संपण्याचा सुमार असूनहि थंडी कडाक्याची होती. आजूबाजूला असणाऱ्या डोंगरांचीं शिखरें बर्फानें आच्छादलेलीं दिसून येत होतीं. आमच्या शिष्टमंडळांतील दिल्लीची एक प्रतिनिधि म्हणाली, " आतां आपण रशियांतलें पहिलें जेवण घेणार. " मला तर दिल्लीला सर्वांनीं सांगितलें कीं " आतां व्होडकाशिवाय आपल्याला दुसरें पेय मिळणार नाहीं. " तिचे ते शब्द ऐकून आमच्या सर्वांच्या पोटांत धस्स् झालें. परंतु शेवटीं उपाहारगृहांत मात्र आमची भीति निराधार ठरली.

कारण आमचीं टेबलें निरनिराळ्या खाद्यांनीं व फराळांनीं भरलेलीं असून त्यांवर डाळिंब, द्राक्षें, मोसंबीं वगैरे ताज्या फळांच्या रसांनीं भरलेल्या सुरया ठेवलेल्या होत्या, खेरीज रशियन सोडा, लेमन वगैरे बाटल्याहि होत्या. या जेवणापैकीं गरम सूप व रशियन सलाड आम्हांला फारच आवडलें. येथें इंग्रजी कुणालाच समजत नव्हतें. आमच्या सहप्रवासिनीनें–इराणी तरुणीनें, दुभाषीचें काम केलें. त्यामुळें आमची गैरसोय झाली नाहीं. माझ्या घड्याळांत आतां पांच वाजले आहेत. मॉस्को जवळ येऊं लागलें आहे. आम्ही मॉस्को पहावयास अतिशय उतावीळ झालों आहोंत. नुकतेंच आमचें विमान, एका लष्करी टापूवरून झेपावत गेलें. तेथें हजारों लढाऊ विमानें उभीं असलेलीं आम्हांला दिसलीं.

साडेपांच वाजतां विमान मॉस्कोच्या विमानतळावर उतरूं लागलें. किती भव्य आहे हें विमानतळ! मी तर स्तिमित होऊन त्यांच्याकडे पहातच राहिलें.

विमान थांबल्याबरोबर एक उंचापुरा व धिप्पाड अधिकारी वर चढून आला व मोठ्या दाक्षिण्यानें आम्हांला अभिवादन करून त्यानें आमचे पासपोर्ट तपासले. आम्ही खालीं उतरूं लागलों. तोंच एक अद्‌भुतरम्य दृश्य आम्हांला दिसलें. विमानाच्या खालीं अनेक रशियन स्त्रिया मोठमोठे पुष्पगुच्छ घेऊन आमच्या स्वागताला उभ्या होत्या. आम्ही खालीं उतरल्याबरोबर त्यांनीं आम्हांला कडकडून मिठ्या मारल्या व आम्हांला त्या म्हणूं लागल्या, "दस्यु दानिया." ( How do you do ? ) येथें आम्ही प्रथमच हा एक रशियन शब्द शिकलों आहोंत. विमानतळावरील वेटिंग रूममध्यें परिचय-समारंभ पार पडला. (या सान्या रशियन स्त्रिया खूप धिप्पाड व अंगानें कांहींशा स्थूलच आहेत. युरोप खंडांतील इतर देशांतील स्त्रियांमध्यें आढळून येणारा नटवेपणा त्यांच्या ठिकाणीं नाहीं. मात्र या कमालीच्या चाणाक्ष आहेत. कदाचित् हें शहाणपण परिस्थितीनें त्यांना शिकविलें असावें. येथें निरनिराळ्या व्यवसायक्षेत्रांतील स्त्रिया जमल्या होत्या. आम्हांला पाहून त्यांना खूप आनंद झालेला दिसला. येथेंच आम्हांला 'उझबेक' मधील प्रसिद्ध नर्तिका तोमारहानु भेटली. मी तर तिच्या लवचिक बांध्याकडे पाहतच राहिलें. चवळीच्या शेंगेसारखी तिची सारखी हालचाल चालली होती. बोलतांना

आपल्या चेहऱ्यावरील भाव बदलण्याची कला तिला चांगलीच अवगत आहे. तेवढ्यांत तिनें हावभाव करून एक हिंदी गीतहि म्हटलें.)

आम्ही मोटारींत बसण्यासाठीं बाहेर येतों तो काय चमत्कार! हवेंत एकदम बदल झाला होता. थोड्या वेळापूर्वीं दिसणारीं केशरी प्रकाशकिरणें कुठेंच अंतर्धान पावलीं असून आकाशांत धूसर मेघांची एकच गर्दी उडाली होती. इतक्यांत आमच्यावर मोगरीच्या कळ्यांप्रमाणें दिसणाऱ्या गारांचा वर्षाव सुरू झाला. मला रघुवंशांतील एका प्रसंगाची स्मृति झाली. इंदुमतीच्या स्वयंवरास जाणाऱ्या अज राजावर नगरांतील सुवासिनींनीं पांढऱ्याशुभ्र लाह्यांचा मंगल वर्षाव केला होता. मॉस्कोच्या वेशीवर निसर्गानें आमच्या ह्या पहिल्याच सांस्कृतिक महिला शिष्टमंडळाचें हें स्वागतच केलें म्हणावयाचें!

गारांचा वर्षाव क्षणमात्रच टिकला व आमच्या मोटारी मॉस्को शहराच्या दिशेनें धांवूं लागल्या. विमानतळापासून मॉस्को शहर सुमारें दहा मैल दूर आहे. वाटेंत रस्त्याच्या दुतर्फा मैल न् मैल दूरवर पसरलेलीं शेतें दिसून येत होतीं. झिमझिमणाऱ्या पावसामुळें मैदानें अंकुरलीं होतीं. मधून मधून दिसणारीं बर्च, चेस्टनट व आसब्रेनचीं झाडें निष्पर्णावस्थेंत उभीं होतीं. सफरचंदाच्या ठेंगण्या ठुसक्या झाडांवर शेंदरी शिडकावाला नुकतीच सुरुवात होत होती. मनुष्य परंपराप्रिय आहे! कविसंकेताप्रमाणें, साऱ्या सौंदर्याचें वरदान वसंताला मिळालें आहे खरें; पण त्याबरोबरच 'वर्षा'चें उदार वैभव किंवा हेमंताचें करुणखिन्न सौंदर्य तितकेंच लोभस आहे, याकडे आपलें दुर्लक्ष होतें, नाहीं का? आतांच पहा.

'रम्याणां विकृतिरपि श्रियं तनोति' या वचनाप्रमाणें हिमपतनाच्या विकृतीमुळेंहि येथील निसर्गशोभा किती रमणीय दिसते आहे!

शहर जसजसें जवळ येऊं लागलें, तसतसा आम्हांला सर्वत्र एक प्रकारचा नवा जोम आढळून येऊं लागला. शहराच्या प्रथमदर्शनींच मॉस्को विद्यापीठाची पांढऱ्याशुभ्र संगमरवरी दगडांनीं बांधलेली प्रचंड इमारत आहे. तिच्या माथ्यावर सोव्हिएत रशियाचा रक्तरंगित भाग्यतारा चमकतांना दिसतो. त्यानंतर एकामागून एक इमारतीचें दर्शन होऊन सोव्हिएत भूमींतील रचनेची भव्यता निदर्शनास येते. लौकरच क्रेमलिनच्या लाल भिंती व भव्य मनोरे, माणसाचें मन एक प्रकारच्या अनामिक भावनेनें भारावून टाकतात.

आमची राहण्याची व्यवस्था ‘ मॉस्को ’ हॉटेलमध्यें केली आहे. हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळ लोकांचा बराचसा समुदाय मोठ्या उत्सुकतेनें आम्हांला पहावयास जमला होता. त्या सर्वांना ‘ दस्यु दानिया ’ करीत आम्हीं मोठ्या मुष्किलीनें मार्ग काढला व हॉटेलांत प्रवेश केला.

मॉस्को हॉटेल, क्रेमलिनच्या परिसरांतच आहे. प्रसिद्ध लाल चौक ( Red Square ) व लेनिन–स्टॅलिनचीं थडगीं ( Mausoleum ) येथून पांच मिनिटांच्या अंतरावर आहेत. हॉटेलची इमारत चौदा मजली असून, तें सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोईंनीं सुसज्ज आहे.

आमच्या खोल्या तिसऱ्या मजल्यावर आहेत. वर जाण्यासाठीं विजेचे अनेक पाळणे आहेत. हॉटेलचा आंतला भाग एखाद्या राजमहालसारखा सुंदर आहे. मला व श्रीमती पौर्णिमा पकासा यांना अकरा नंबरची खोली मिळाली आहे. ही खोली रस्त्यावर असून नानाप्रकारच्या आधुनिक साधनांनीं शृंगारलेली आहे. जमिनीवर मौल्यवान् गालिचे पसरले असून खिडक्यांना सुंदर मखमली पडदे लटकले आहेत. बिछान्यावरील आच्छादनें रेशमीं आहेत. खोलींत रेडिओ, टेलिफोन वगैरेची व्यवस्था आहे. खोलीला लागूनच एक प्रशस्त न्हाणीघर असून तेथें थंड व उष्ण पाण्याच्या नळाची सोय आहे.

आमचें सामान वगैरे व्यवस्थित ठेवून आम्हीं स्नान केलें व साडेआठच्या सुमारास जेवणासाठीं पहिल्या मजल्यावरील जेवणघरांत गेलों. जेवणाचा हा हॉल अतिशय मोठा असून, तेथील मांडणी व दिव्यांचा लखलखाट अवर्णनीय आहे. आमच्या शिष्टमंडळाव्यतिरिक्त इतर ऐंशी देशांतील शिष्टमंडळें यावेळीं मॉस्कोमध्यें आहेत. त्यांपैकीं कांहीं शिष्टमंडळांची सोय याच हॉटेलांत केली आहे व त्यामुळें हा हॉल माणसांनीं भरून गेला होता. आम्ही हॉटेल-मध्यें प्रवेश केल्याबरोबर या प्रतिनिधींनीं टाळ्यांच्या गजरांत आमचें स्वागत केलें. आमची जेवणाची खास व्यवस्था या हॉटेलला लागूनच असणाऱ्या दुसऱ्या एका छोट्या खोलींत केली होती.

आमच्यासाठीं जेवणाचा स्पेशल बेत होता. नानाप्रकारच्या खाद्यपदार्थांनीं आमचें टेबल भरून गेलें होतें. त्यांत कॅव्हिआर व रशियन सलाड हीं रशियाचीं दोन ‘ विशेष पक्वान्नें ’ आहेत. कॅव्हिआर हा पदार्थ, माशाच्या

अंड्यांचा बनविलेला असतो व त्याला ओशट वास येतो. पण या पदार्थांचा रशियन लोकांना मोठा अभिमान वाटतो. पाहुण्यांना त्याचा खूप आग्रह करण्यांत येतो. येथले वाढपी मात्र संथपणें काम करतात. त्यामुळें जेवण तासन्तास रेंगाळतें.

दहाच्या सुमारास आम्ही जेवण आटपून वर गेलों. तों मला शोधीत 'मॉस्को यूथ' नांवाच्या वृत्तपत्राचा एक प्रतिनिधि तेथें आला होता. 'मॉस्को यूथ' या दैनिकांत विद्यार्थ्यांसंबंधीं बरीच माहिती असते. मी एका कॉलेजांत शिकवितें ही माझ्याबद्दलची माहिती ऐकून, आपल्या देशांतील विद्यार्थ्यांसंबंधीं कांहीं प्रश्न विचारण्यासाठीं तो माझ्याकडे आला होता. थोडा वेळ आपल्याकडील विद्यार्थ्यांच्यासंबंधीं त्याच्याशीं बोलून मी त्याला कमलादेवींची मुलाखत घेण्यास सांगितलें. या लोकांची ही चौकस बुद्धि व कार्यतत्परता पाहून मला अतोनात आश्चर्य वाटलें.

आतां रात्रीचे साडेअकरा वाजले आहेत. सबंध मॉस्को शहर दिव्यांच्या चकचकाटांत न्हाऊन निघालें आहे. उद्यांपासून आमच्या भरगच्च कार्यक्रमाला सुरुवात होईल व मग विश्रांति घ्यावयास अवकाश मिळणार नाहीं. तेव्हां आतां हें पत्र मी इथेंच पुरें करतें. पुढील पत्रांत सविस्तर लिहीनच.

तुझी

**सौ. चारुशीला**

---

## पत्र चौथें

**हॉटेल मॉस्को**

दिनांक ३० एप्रिल १९५४

प्रिय शांता,

गेले दोन दिवस फारच गडबडीचे गेले. त्यामुळें पत्र लिहिण्यास वेळच मिळाला नाहीं. माझ्या मागच्या पत्रांत मीं तुला माझ्या या खोलीचें वर्णन

लिहिलेंच आहे. या खोलीच्यासमोर एक प्रचंड इमारत असून तीवर कॉमरेड लेनिन व कॉमरेड स्टॅलिन या रशियाच्या दोन महापुरुषांच्या भव्य तसबिरी लावलेल्या आहेत. केव्हांही पहा. त्या आमच्याकडे भेदक नजरेनें पाहतात. मॉस्कोमध्यें 'जलीं, स्थलीं, काष्ठीं, पाषाणीं' लेनिन व स्टॅलिन आढळून येतात. 'जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती' या उक्तीप्रमाणें कुठेंहि जा, या दोघांचे फोटो व पुतळे आहेतच !

आमची मोलकरीण ( Maid servant ) म्हातारी आहे, पण मोठी प्रेमळ आहे. तिचें नांव ॲना आहे. खारकेसारखी सुकलेली असूनहि ती दिवसभर खपत असते. तिला इंग्रजी येत नाहीं; परंतु खाणांखुणांनीं ती दुसऱ्याचें मनोगत समजून घेण्यांत पटाईत आहे. तिला मधून मधून एक भला मोठा 'स्पासीबा' ( Thanks ) ठोकून मी तिच्याकडून माझीं कामें करून घेतें.

पांच रशियन तरुणी, आम्हांला दुभाषी म्हणून दिल्या आहेत. त्यांचीं नांवें, मीरा, गॅलीना, ल्युसिया, नीना व नीनोव्हाया अशीं आहेत. त्यांच्यापैकीं मीरा सफाईदार इंग्रजी बोलते. नीनाला इंग्रजी अगदींच थोडें येतें. एकादा शब्द आठवला नाहीं म्हणजे ती 'Why' म्हणून वेळ मारून नेते; पण मला सर्वांत तीच अधिक आवडली आहे. या सर्व तरुणी अतिशय चाणाक्ष, वस्ताद व आपापल्या कामांत तरबेज आहेत. सोव्हिएत रशियासंबंधीं अगदीं बारीक सारीक तपशीलांचीसुद्धां त्यांना माहिती आहे. आमच्यासाठीं ठरविलेल्या कार्यक्रमांत एक तसूभर फरक न करण्याची त्या दक्षता घेतात. त्या अबोल नाहींत, तथापि मोजकेंच बोलतात व त्यांच्या सर्व हालचालींतून शिस्तीचा व संयमाचा प्रत्यय येतो.

येथील न्याहरी म्हणजे एक मोठें जेवणच असतें. रशियन लोक खूपसें खातात असें दिसतें ! न्याहरीसाठीं अनेक खाद्यपदार्थ, पेयें व फळें आमच्या टेबलावर असतात. त्यांपैकीं मला केकसारखा गोड व लुसलुसीत असलेला 'बुलाचकी' हा पदार्थ फार आवडला आहे. न्याहरीबरोबर एक ग्लास भरून दहीं खाण्याची पण येथें पद्धत आहे. मात्र इथले केक व बिस्किटें इतर युरोपियन देशांतल्याप्रमाणें खुमासदार नसतात.

रशियामध्यें आम्ही एक महिना राहणार आहोंत. एक महिन्याच्या या मुक्कामांत, जितकें पाहतां येईल तितकें आम्ही पाहून घेणार आहोंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८८७८ वि: विदेश
क्रमांक १५८५४ नों. दि: ४-१०-२०१५



काल आम्हांला व्होक्समध्यें लहानशी चहापार्टी होती. व्होक्स (Voks) ही आंतरराष्ट्रीय स्नेहसंबंध जोडणारी रशियांतील एक सांस्कृतिक संस्था आहे. निरनिराळ्या देशांतील शिष्टमंडळांना हीच संस्था आमंत्रण देत असते. आमच्या रशियांतील मुक्कामाची सर्व व्यवस्था ही संस्थाच पाहात आहे.

'व्होक्स' मधून सुमारें दहा साडेदहा वाजतां आम्ही मॉस्कोंतील सुप्रसिद्ध मेट्रो—भूगर्भ रेल्वे पाहावयास गेलों. मी अशा ट्यूब रेल्वे इंग्लंड व फ्रान्समध्यें पाहिल्या आहेत. परंतु मॉस्कोंतील मेट्रो हें एक अद्‌भुतरम्य दृश्य आहे! जमिनीच्या खालून ९६० मैल लांबीचा रस्ता बांधला असून या रेल्वेचीं एकंदर बेचाळीस स्टेशनें आहेत. प्रत्येक स्टेशन उत्कृष्ट शिल्पकलेचा एक नमुना आहे. उरल पर्वतांत सांपडणाऱ्या हिरव्या, पिवळ्या, गुलाबी, सफेद व काळसर संगमरवरी दगडांनीं हीं स्टेशनें बांधलीं असून प्लॅटफॉर्मवर सुंदर व तऱ्हेतऱ्हेचें मोझेइक काम केलेलें आहे. दिव्यांच्या मंद पण आल्हादक प्रकाशकिरणांमुळें प्रत्येक स्टेशनाला एक वेगळीच शोभा दिसते. १९१७ च्या राज्यक्रांतीसारख्या महत्त्वपूर्ण घटना, ठिकठिकाणीं तैलरंगानें भिंतीवर चितारल्या आहेत. प्रत्येक छतावरील वेलबुट्टी, विविध आकारांचे स्तूप व कामगारांचे व्यवसाय दर्शविणारे पुतळे, हीं या मेट्रोचीं मुख्य आकर्षणें आहेत. येथें आम्हांला कुठेंहि एकजिनसीपणा आढळून आला नाहीं. सगळेंच वेगळें व सगळेंच चित्रविचित्र! एक धिप्पाड शरीराची स्त्री या मेट्रोची मुख्य अधिकारी असून तिच्या हालचालींत अधिकाराचा रुबाब दिसून येतो. मॉस्कोंतील लोकांना या रेल्वेबद्दल वाटणारा अभिमान अगदीं साहजिकच आहे. जवळजवळ दोन तास जमिनीखालील या यक्षनगरींत संचार करून जेव्हां आम्ही वर आलों, तेव्हां आम्ही, एखाद्या सुंदर स्वप्नांतून जागृत तर झालों नाहीं ना, असा भास झाला!

मेट्रो पाहून झाल्यावर आम्ही दुपारचें जेवण घेण्यासाठीं आमच्या हॉटेलांत परत आलों. शिवाय पांच वाजतां आपल्या वकिलातींत आम्हांला चहाला आमंत्रण होतें. तेथें आम्ही पांचाच्या सुमारास पोहोंचलों. आपल्या वकिलातीची इमारत चांगली प्रशस्त असून तिच्या भोंवतीं एक ऐसपैस आवार आहे. येथें आम्हांला बरीच भारतीय मंडळी भेटली. श्रीयुत व

सौ. मेनन यांनीं आमचें स्वागत केलें व तेथें जमलेल्या अनेक प्रतिष्ठित नागरिक स्त्रीपुरुषांबरोबर आमची ओळख करून दिली. उभयतां मेनन पतिपत्नी अतिशय प्रेमळ व आतिथ्यशील आहेत. सातच्या सुमारास आम्हीं त्यांचा निरोप घेतला.

साडेसात वाजतां मॉस्कोंतील प्रसिद्ध बॉलशाय नाट्यगृहांत Itswan Lane ही संगीतिका पहाण्यास आम्ही गेलों. झारच्या जुन्या जमान्यांतील सतराव्या शतकांतील हें नाट्यगृह अतिशय भव्य व प्रेक्षणीय आहे. याच्या अंतर्भागांत आतां अद्ययावत् सुधारणा केल्या आहेत. येथील थाटमाट, ऐषआराम पाहून मन थक्क होतें. नाट्यगृहांत प्रेक्षकांची खूपच गर्दी होती. पण सर्वांचा पोषाख मात्र एकजात सारखा. त्यांत भडकपणा किंवा छान-छोकीचा मागमूसहि नव्हता. नाट्यगृहाच्या त्या लखलखीत व रंगीत पार्श्वभूमीवर वावरणारे हे गबाळग्रंथी प्रेक्षक विलक्षण दिसत होते. रंगपीठ विस्तृत असून संघनृत्यासाठीं एकाच वेळीं दीडशें दोनशें मंडळी तेथें जेव्हां उपस्थित होत, तेव्हां तो देखावा अति भव्य दिसत असे. हंसनृत्य करणाऱ्या नर्तिकांची हालचाल एखाद्या हलक्या व नाजूक पिसाप्रमाणें भासत होती. दुधासारखे पांढरेशुभ्र झगे घातलेल्या त्या हंसकन्या जेव्हां रंगपीठावर येत, तेव्हां तो देखावा नेत्रदीपक असे. वादळाचा व पुराचा देखावा हुबेहूब होता. देखाव्यांतील बदल, प्रकाशयोजना व नेपथ्यरचना या साऱ्या गोष्टी येथें प्रचंड यंत्राच्या साहाय्यानें करण्यांत येतात. रशियांतील नृत्य व नाट्य या दोन कलांचा दर्जा खूपच उंचावला आहे.

'बॉलशाय' नाट्यगृहांतून आम्ही रात्रीं बाराच्या सुमारास पायींच परत आलों. रात्रीं मॉस्को शहरांत इतके दिवे लावलेले असतात कीं सबंध शहर सूर्यप्रकाशांतच न्हाऊन निघाल्यासारखें भासतें. रस्त्यावर लोकांचे थवेच्या थवे रेंगाळत होते. ठिकठिकाणीं मे दिनाची तयारी चालली होती. आम्ही सबंध दिवसभर खूप हिंडलों होतों, त्या दगदगीमुळें झोंपहि आली होती. त्यामुळें जेवण लवकर आटोपून आम्ही झोंपावयास गेलों.

सकाळीं न्याहरीनंतर मॉस्कोंतील एका दुय्यम शाळेला भेट दिली. पुण्यांतील म्युनिसिपल शाळा जशा नंबरांवरून ओळखल्या जातात तशाच

रशियांतील प्राथमिक व दुय्यम शाळांना नंबर असतात. शाळेच्या मुख्याध्यापिकेनें आम्हांला रशियाच्या दुय्यम शिक्षणाबद्दल बरीच माहिती दिली व नंतर शाळेंतील वेगवेगळे वर्ग दाखविले. ही फक्त मुलींची शाळा होती. प्रत्येक वर्गांत पूर्ण शांतता असून विद्यार्थिनी आपापले धडे शिकण्यांत दंग होत्या. त्यांना आम्हीं जे कांहीं प्रश्न विचारले त्यावरून आमच्या लक्षांत आलें कीं येथील विद्यार्थीवर्गाचें प्रत्येक विषयासंबंधींचें ज्ञान सखोल असतें. त्यांच्यापैकीं कांहीं मुलींनीं आम्हांला भारताविषयीं अनेक प्रश्न विचारले. ह्या सर्व मुली शरिरानें सुदृढ व मनानें निकोप दिसत होत्या. या शाळेंतील ग्रंथालयहि बरेंच समृद्ध दिसलें. तेथें मुलींनीं टॉल्स्टॉयच्या साहित्याचें प्रदर्शन भरविलें होतें. या प्रसिद्ध लेखकाचीं सारीं पुस्तकें, त्या पुस्तकांतील सुभाषितांचे सुवाच्य लिहिलेले फलक, त्याचे वेगवेगळे फोटो अशा अनेक गोष्टी विद्यार्थिनींनीं जमा करून तेथें मांडून ठेवल्या होत्या. याखेरीज त्यांनीं 'टॉल्स्टॉय विशेषांक'हि काढला होता. हें हस्तलिखित वेगवेगळ्या लेखांनीं व टॉल्स्टॉयच्या दुर्मिळ फोटोंनीं सजविलें होतें. आमच्या विद्यार्थ्यांनीं-सुद्धां अशा तऱ्हेनें आपल्याकडील हरी नारायण आपटे, राम गणेश गडकरी वगैरेसारख्या विख्यात लेखकांच्या साहित्याचें प्रदर्शन भरविण्यास सुरुवात केली पाहिजे. कारण त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं चांगल्या साहित्या-संबंधीं अभिरुचि निर्माण होऊन त्यांच्या संग्राहक वृत्तीची वाढ होईल.

ह्या शाळेंतून परत आल्यावर आम्हीं थोडा वेळ विश्रांति घेतली व नंतर जेवण आटोपलें. संध्याकाळीं चार वाजतां उपशिक्षणमंत्री मॅडम ड्युब्रोव्हिना यांना आम्ही भेटावयास गेलों. त्यांनीं आम्हांला प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठांतील शिक्षणापर्यंतची सर्व माहिती दिली. गेल्या पस्तीस वर्षांत सोव्हिएत रशियांतील साक्षरतेचा विकास तीन टक्क्यांपासून ते ऱ्याऐंशी टक्क्यां-पर्यंत कसा झाला त्याचें शब्दचित्रच त्या बाईनीं आमच्यासमोर ठेविलें. मॅडम ड्युब्रोव्हिना ह्या बऱ्याच वयस्क असून त्यांचा स्वभाव सौम्य पण करारी आहे. त्यांचा पेहेरावहि अगदीं साधा असतो. रशियांतील शिक्षणपद्धतीचा संपूर्ण इतिहास त्यांना मुखोद्‌गत आहे व तो आम्हांला सांगतांना त्यांचा चेहरा अगदीं उजाळून गेला होता. वेळोवेळीं त्या रशियांतील शिक्षणपद्धतीची अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांतील शिक्षणपद्धतींशीं जी तुलना करीत

होत्या त्यावरून त्यांचा जागतिक शिक्षणपद्धतीचा अभ्यासहि किती दांडगा आहे याची आम्हांला कल्पना आली.

संध्याकाळीं सात वाजतां कामगार ट्रेड युनियननें कामगार हॉलमध्यें आमच्यासाठीं एक सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचें ठरविलें होतें, तो पहावयास गेलों. मॉस्कोंतील अनेक कामगार स्त्रीपुरुष त्या ठिकाणीं जमले असून त्यांचा उत्साह अवर्णनीय होता. या कार्यक्रमांत कामगारांनींच बसवलेलीं अनेक संघ-नृत्यें व संघगीतें यांचा समावेश केलेला होता. त्यांपैकीं एक भांडकुदळ पत्नी व तिचा घाबरट पति या दोघांचें विनोदी द्वंद्वगीत ऐकून आमचीं पोटें हंसून हंसून दुखूं लागलीं. सोव्हिएत रशियाच्या नृत्य व संगीत या कलांचा एक वेगळाच आविष्कार आम्हांला इथें अनुभवण्यास मिळाला.

कामगार हॉलमधला कार्यक्रम आटोपून जेव्हां आम्ही आमच्या हॉटेलाकडे यावयास निघालों तेव्हां सबंध मॉस्को शहरांत एक नवें चैतन्य संचारलें आहे असें आम्हांला आढळून आलें. रस्त्यावरून हास्यविनोदांत दंग झालेल्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी जात येत होत्या. राजरस्त्यावरील दुतर्फा असलेलीं दुकानें माणसांनीं फुलून गेलीं होतीं. प्रत्येक इमारतीवर दिव्यांचा व पताकांचा शिणगार करण्याचें काम चालूं होतें. अगदीं आपल्याकडील दिवाळीच्या उत्सवाचीच तयारी! नाहींतरी ‘ मे दिन ’ हा सोव्हिएत रशियाचा दिवाळसणच आहे! असला हा महत्त्वपूर्ण उत्सव आम्हांला पाहावयास मिळणार या नुसत्या कल्पनेनेंच आम्ही खूप खूष झालों आहोंत. आमंत्रित पाहुणे या नात्यानें उद्यां त्या उत्सवानिमित्त होणाऱ्या बहुतेक सर्व कार्यक्रमांस आम्हांला हजर राहावयाचें आहे.

आज सकाळीं न्याहरी आटोपून येतांना एक गंमत झाली. मी लिफ्ट-मध्यें पाय ठेवतें तोंच माझा हात कुणींतरी हळूंच दाबला. मी चमकून मागें वळून पाहतें तों काय आश्चर्य, मॉस्कोच्या विमानांत भेटलेल्या त्या इराणी तरुणीचा छोटा मुलगा माझ्यामागें उभा होता. अद्यापि तो माझी ओळख विसरला नव्हता. एकूण आमची इराणी सहप्रवासिनी पण याच हॉटेलांत आहे म्हणावयाची. तिला एकवार भेटायला मी फार उत्सुक आहें. पाहूंया कसें काय जमेल तें!

आतां अधिक कांहींच नाहीं. पुढील पत्रांत मी तुला इथल्या या दिवाळीसंबंधीं सर्व कळवीन.

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र पांचवें

हॉटेल मॉस्को
दिनांक १ मे १९५४

प्रिय शांता,

आज सकाळीं मला जाग आली ती बँडच्या तालबद्ध सुरांच्या आवाजानेंच! मी चटकन् उठलें व आमच्या खोलींतील रेडिओ लावला. रशियन संगीताच्या मधुर स्वरलहरींनीं खोलींतील वातावरण भरून गेलें. त्या गीताचा मला अर्थ समजत नव्हता; परंतु बहुतेक क्रांतीच्या महतीचें व नव्या जीवनाच्या स्फूर्तीचें एखादें तें गीत असावें असें वाटलें. मी खिडकीचा पडदा बाजूला सारून पाहूं लागलें तों काय आश्चर्य, कालच्या मॉस्कोंत व आजच्या मॉस्कोंत जमीन-अस्मानाचा फरक झाला होता! नेहमींच्या गंभीर वातावरणाऐवजीं आज सर्वत्र गडबडघाई दिसून येत होती. सणासुदीचे कपडे घातलेले असंख्य स्त्रीपुरुष इकडे तिकडे जातयेत असलेले दिसत होते. प्रत्येक इमारतीवर रक्तरंगीत ध्वज फडकत असून, विजेच्या दिव्यांच्या व कागदी पताकांच्या रंगीबेरंगी माळांनीं त्या सर्व इमारती श्रृंगारल्या होत्या. इमारतींच्या प्रवेशद्वारांवर लावलेल्या लेनिन व स्टॅलिनच्या भव्य प्रतिकृती येणाऱ्या जाणाऱ्यांकडे रोखून पहात होत्या. भिंतीफलकांवर सोव्हिएत तत्त्वज्ञानाचीं वचनें लिहिलेलीं होतीं. मी किती वेळ तरी ही गंमत पहात उभी होतें.

न्याहरीनंतर आम्हांला 'लाल चौकां'त होणारा 'मे दिना'चा महत्त्वाचा समारंभ पाहावयास उपस्थित राहावयाचें होतें. म्हणून घाईनें स्नान वगैरे आटोपून आम्ही न्याहरी घ्यावयास खालीं गेलों. इतर वेळीं शांत असलेलें हें मॉस्को हॉटेलहि आज खूप धांदलींत दिसून येत होतें. आमच्या दुभाषांना व वाढप्यांना अभीष्ट चिंतून आम्हीं न्याहरी संपविली व लाल चौकाकडे जावयास निघालों.

रशियन लोकांच्या ठिकाणीं सर्वसाधारणपणें दिसून येणारी शिस्त व संयम येथील हवामानांत बिलकूल आढळून येत नाहीं. सगळाच लहरी कारभार! घटकेंत सूर्यकिरणांचें केशर जिकडे तिकडे पसरेल, तर घटकेंत आकाश काळवंडून रुपेरी जलधारांची शिंपण सुरू होईल. आज मात्र या उत्सवाच्या मंगलप्रसंगीं लोकांच्या ओसंडत्या उत्साहास निसर्गानेंहि साथ देण्याचें ठरविलेलें दिसलें; कारण आकाशांत नेहमींच्या काळ्या व कुरळ्या ढगांऐवजीं, पांढराशुभ्र कापूस इतस्ततः पसरला होता. लाल चौकांत दोन तीन तास उभें राहूनच कार्यक्रम पहावयाचा होता, त्यामुळें आम्हांला थंडीचा उपद्रव होईल कीं काय, अशी आमच्या दुभाषांना चिंता वाटत होती. ती चिंता आजच्या या सुंदर हवेनें निराधार ठरविली.

आमच्या हॉटेलपासून लाल चौक दहा मिनिटांच्या रस्त्यावर आहे. सर्व रस्त्यांतून सशस्त्र पोलिस शिस्तसंरक्षण करीत होते. पासपोर्ट पाहिल्याशिवाय आमच्यासारख्या परकीयांना व नागरिक-परवाने दाखविल्याखेरीज रशियन माणसांना लाल चौकांत प्रवेश करण्याचा मज्जाव होता. आम्हांला तीन पहाऱ्यांतून जावें लागलें. आमच्याबरोबर इतर शिष्टमंडळांतील मंडळीहि होतीं. या समारंभासाठीं मुद्दाम आलेल्या रशियांतील निरनिराळ्या भागांतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी लाल चौकाकडे शिस्तवारपणें लोटत होत्या. लाल चौकांत असलेल्या स्टॅलिन-लेनिनच्या थडग्यांवरील सर्वांत उंच चौथऱ्यावरून पंतप्रधान मॉलेन्कोव्ह व इतर जबाबदार अधिकारी यांचीं भाषणें व्हावयाचीं होतीं. मॉसोलियमचे दोन्ही भाग लोकांनीं फुलून गेले होते. आम्हांला मॉसोलियमच्या अगदीं जवळच जागा राखून ठेवली होती. इतकी गर्दी असूनहि जिकडे तिकडे कमालीची निःस्तब्धता होती.

बरोबर दहाच्या ठोक्याला कार्यक्रमाला सुरवात झाली. प्रथम एका उघड्या मोटारींतून संरक्षण खात्याचे मंत्री मार्शल बुल्गानिन वगैरे मंडळींची दोन वेळ फेरी झाली. मार्शल बुल्गानिन यांनीं लोकांचें स्वागत करून सर्वांचें अभीष्टचिंतन केलें. त्याच वेळीं प्रथम पस्तीस तोफांची सलामी झाली. त्यानंतर सॉलेम् परेड सुरू झाली. यांत, खास सैनिक, ड्रमर वगैरे दलें होतीं. त्यांच्यामागून टँक इंजिनियर, वैमानिक, पायदळ, फ्रॉंटियर गार्ड्स, होम सिक्युरिटी व नौकादल वगैरे अनेक दलांच्या कवायती एकामागून एक सुरू झाल्या. त्यांच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या टोप्या व गणवेष तसेंच पावलें टाकण्याचा डौल वगैरे पाहण्यासारखा होता. त्यांच्यामागोमाग 'लॉरी'ची रांग येऊं लागली. त्यांच्यामागून रणगाडे आले. नंतर रशियांतील 'कचुसा' नांवाच्या सुप्रसिद्ध तोफांच्या गाड्यांची परेड आली. इतक्यांत आकाशांत आमच्या डोक्यांवर घरघर आवाज होऊं लागला. आम्ही वर पहातों तों काय आकाशांतून असंख्य विमानांची परेड सुरू झाली होती. विशिष्ट आकृति करून दाखविणारीं तीं विमानें पाहून आम्हांला खूपच गंमत वाटली. त्यांत नव्वद जेट फायटर होतीं. तीं 'मीर' अशी आकृति करून निमिषार्धांत दिसेनाशीं झालीं.

या कार्यक्रमानंतर मार्शल मॉलेन्कॉव्ह यांचें भाषण झालें. त्यांचा पेहराव अगदीं साधा होता. मात्र या गंभीर प्रसंगाला अनुकूल अशा धीरगंभीर स्वरांत त्यांनीं आपलें भाषण केलें. रशियन भाषा आम्हांला अवगत नसल्यामुळें त्यांचें भाषण आम्हांला समजलें नाहीं; तरी त्याचा सारांश आमच्या दुभाषांनीं आम्हांला सांगितला.

यानंतर निरनिराळ्या निदर्शनांना सुरवात झाली. प्रथम 'आदर्श नागरिक' ( Best Citizen ) पुढें आले. त्यांत निरनिराळे खेळाडू, शाळेंतील मुलें व मुली, युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी व पायोनियर क्लबचीं सभासद मुलें व मुली यांचा समावेश झालेला होता. ते सर्वजण शांतता, समता व मैत्री या शब्दांचे जयघोष करीत मोठ्या आनंदानें चालले होते. त्यांच्या हातांत खऱ्या व कृत्रिम फुलांच्या फांद्या होत्या. त्यांच्यापैकीं कांहीं मंडळी आपापल्या हातांतील ध्वज व लेनिन–स्टॅलिनच्या तसबिरी उंचावीत, गाणीं गात गात जात

होतीं. त्यांचे कपडे विविध रंगांचे असून मुखचर्या देशाभिमानानें उजाळलेल्या दिसत होत्या. हिंदुस्थान, चीन व कोरिया या देशांतील शिष्टमंडळांतील प्रतिनिधींना पाहून त्यांना खूप हर्ष होत होता व ते आमच्यावर हातांतील फुलें उधळीत होते. मधून मधून कांहीं स्त्रीपुरुष आमच्याजवळ येऊन हस्तांदोलन करूनहि जात होते.

या मिरवणुकीनंतर कामगार व शेतकरी यांसारख्या श्रमजीवी लोकांच्या निदर्शनाला सुरवात झाली. त्यांनीं धान्याचीं कणसें, फुलें, फळें, ध्वज वगैरे हातांत धरले होते. त्यांच्या म्होरक्यांच्या हातांतील फलकांवर त्या त्या कारखान्याचें किंवा संघशेतीच्या विभागाचें नांव होतें. याखेरीज चालू पंचवार्षिक योजनेंतील त्यांनीं कोणता कार्यभाग पार पाडला आहे व अद्यापि किती कार्य शिल्लक आहे, याचा आढावाहि त्या फलकांवर लिहिलेला होता. त्यांच्या त्या फलकांवरून रशियासारख्या एकाकाळीं मागासलेल्या राष्ट्रानें योजनाबद्ध कार्यक्रम आंखून औद्योगिक दृष्ट्या आपली किती उन्नति करून घेतली आहे याची सहज कल्पना येत होती. या मिरवणुकींत सारीं लहानथोर माणसें सामील झालेलीं होतीं. नवजीवनाचीं ओजस्वी गीतें गायलीं जात होतीं, निरनिराळ्या रशियन वृत्तपत्रांचे वार्ताहर व फोटोग्राफर यांची इकडून तिकडे धांवपळ चालली होती.

साडेबाराच्या सुमारास आम्ही परत जाण्यास निघालों. रस्त्यावर माणसांची खूपच वर्दळ होती. त्या गर्दींतून मार्ग काढणें मोठें मुष्किलीचें काम होतें. आम्हांला पाहिल्याबरोबर अनेक स्त्रीपुरुष आमच्याकडे एकसारखे धांव घेत व आम्हांला फुलें अर्पण करीत. आम्हांपैकीं प्रत्येकीजवळ फुलांचीं ओझीं सांचलीं. शेवटीं आम्ही पण समोरून येणाऱ्या मंडळींना फुलें वांटूं लागलों. शाळेंतील मुलें व मुली आपल्याजवळील आम्हांला ' शांततापदक ' देत होतीं किंवा आमचे हात धरून आम्हांला गर्दींतून मार्ग काढून देत होतीं. तो सगळा अभूतपूर्व देखावा पाहून आम्ही अगदीं गोंधळून गेलों. आमच्या हॉटेलाच्या समोर आम्हांला पाहावयास लोकांचे थवेच्या थवे जमले होते. त्यांना अभिवादन करतां करतां आम्ही अगदीं मेटाकुटीस आलों.

इतक्यांत त्या गर्दींतून एक छोटा मुलगा माझ्याकडे धांवत आला व

त्यानें एका रबराच्या दोरीला बांधलेला एक रंगीत कापडी चेंडू मला भेट म्हणून दिला. तो मुलगा सरासरी सात आठ वर्षांचा असून थोडासा लाजाळू दिसत होता. आपली भेट मला कितपत पसंत पडेल या आशंकेनें त्याच्या, आधींच लाजवट झालेल्या चेहऱ्यावर एक गोड भाव उमटला होता. मी त्याला जेव्हां 'बॉलशाय स्पासिबा' (Many Thanks) म्हटलं तेव्हां त्याचा चेहरा आनंदानें उजळून निघाला. मी माझ्या हातांतील कांहीं फुलें व माझ्या पर्समधील प्लॅस्टिकचें एक बदक त्याला उलट भेट म्हणून देऊन त्याचा निरोप घेतला.

असे 'मे दिन' अनेक देशांत पाळले जातात. परंतु रशियांतील 'मे दिना'ची भव्यता कांहीं वेगळीच आहे. वास्तविक कामाचे तास कमी करावे म्हणून कामगारांनीं केलेली १ मे रोजींची हीं चळवळ प्रथम १८६६ मध्यें अमेरिकेंत रुजली; व त्यानंतर ग्रेटब्रिटन, जर्मनी वगैरे देशांत ती फैलावूं लागली. लेनिनसारख्या दूरदृष्टि मुत्सद्याला ही चळवळ रशियाच्या क्रांतीच्या कार्यभागांत अतिशय महत्त्वपूर्ण होईल अशी चटकन् अटकळ करतां आली आणि म्हणूनच १८९६ पासून ती रशियांतील चळवळीचा केंद्रबिंदु ठरली. दुसऱ्या महायुद्धांत मात्र कामगारांनीं हा महान् दिवस, रक्तपिपासू शत्रूंचा नायनाट करण्यासाठीं शस्त्रास्त्रें निर्माण करण्यांत घालविला. १९४५ मध्यें या भयंकर युद्धाचा शेवट झाल्यावर कामगारांचें सुखस्वप्न साकार झालें व तेव्हांपासून या दिवसाचें तक्रारीचें व गाऱ्हाण्याचें अधिष्ठान नष्ट होऊन जागतिक शांतता व सुखी जीवनाचें प्रतीक म्हणून या दिवसाला एका महत्त्वपूर्ण उत्सवाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. मे महिन्याची पहिली तारीख म्हणजे कामगारांचा विजय दिन !

आज आम्हांला आमच्या हॉटेलांत एक जंगी मेजवानी होती. आमच्या पंक्तीला कांहीं रशियन पाहुण्याहि आल्या होत्या. जेवणाच्या मेजावर खाद्यपदार्थांची संख्या अनेक पटीनें वाढली होती. आमच्या नेत्या कमलादेवी यांनीं रशियासंबंधीं शुभचिंतनात्मक एक छोटेंसें भाषण केलें. इंग्रजी जाणणाऱ्या एक दोन रशियन श्रीमतींनीं भारत-रशियाचा स्नेहसंबंध दिवसेंदिवस वाढावा अशा आशयाचीं संक्षिप्त भाषणें केलीं. त्यांच्या अत्याग्रहामुळें आम्हीं गाणीं म्हटलीं. जेवणाचा कार्यक्रम सुमारें दोन तास चालला होता.

आज या ‘मे दिना’च्या निमित्तानें अतिशय महत्त्वाचें दृश्य आम्हांला पहायला मिळालें. या उत्सवाच्या रूपानें सोव्हिएत जीवनाचा एक आगळाच पैलू आमच्या प्रत्ययास आला. या जीवनांतील नवचैतन्याचे लागेबांधे खेड्यापाड्यांतील कानाकोपऱ्यांतसुद्धां कसे जाऊन पोहोंचले आहेत याचा साक्षात्कार आम्हांला आजचीं वेगवेगळीं निदर्शनें पाहून झाला. सोव्हिएत रशियांतील संरक्षणखात्याचा तो अफाट संसार पाहून आमचीं मनें आश्चर्यचकित झालीं. शस्त्रास्त्रसामुग्रीच्या पार्श्वभूमीवरील त्या शांततेच्या आणि आंतरराष्ट्रीय स्नेहसंबंधाच्या घोषणा माझ्या कानांत अद्यापि निनादत आहेत. या उत्सवानिमित्त येथें दोन दिवस सर्वत्र सुट्टी आहे. आतां रात्रींचे बारा वाजून गेले आहेत. तथापि येथील लोक उत्सवांत अजूनहि दंग आहेत. निरनिराळ्या वाद्यांतून निघालेले मधुर पण प्रक्षोभक संगीताचे सूर ऐकूं येत आहेत. उद्यां आम्हांला येथील क्रेमलिन राजवाड्यांत सरकारी मेजवानी आहे. शिवाय उद्यां रात्रीं ‘मे दिना’बद्दल दारूकामहि उडविण्यांत येणार आहे. त्याची मौज मी माझ्या पुढील पत्रांत लिहीन. कळावें.

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र सहावें

हॉटेल मॉस्को
दिनांक २ मे १९५४

प्रिय शांता,

माझ्या कालच्या पत्रांत मी येथील ‘मे दिना’संबंधींचें वर्णन लिहिलें आहेच. आज या पत्राबरोबर कालच्या परेडचें छायाचित्र पाठवीत आहे. अद्यापि येथील उत्सवाचें वातावरण निवळलें नाहीं.

ठाणें. स्थळप्रत



आज आम्ही मॉस्कोंतील एक अनाथ बालकाश्रम पहावयास गेलों होतों. हें अनाथगृह एका लहानशा इमारतींत आहे. गेल्या महायुद्धांत पोरकीं झालेलीं सुमारें दोनशें मुलेंमुली यांत ठेविलेलीं आहेत. मुलांसाठीं स्वतंत्र विभाग आहे. येथें सात ते सोळा या वयाचीं मुलें आहेत. येथें फक्त वसतिगृह असून येथून दररोज मुलेंमुली शाळेसाठीं बाहेर जातात. या संस्थेची वृद्ध मुख्याधिकारी बाई आम्हांला फारच प्रेमळ व सुस्वभावी आढळल्या. त्यांनीं आम्हांला संस्थेसंबंधीं सर्व माहिती दिली. रशियामध्यें प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीची तपशीलवार माहिती तोंडपाठ असते. जणूं काय ग्रामोफोनची फिरती तबकडीच ! या बाईनें आम्हांला सर्व संस्था दाखविली. मुलींच्या विभागांतच आम्ही होतों. त्यांच्या अभ्यासिका व शयनगृहें अतिशय व्यवस्थित होतीं. येथील वातावरण, मुलींच्या अंगीं असलेली टापटीप व शिस्त दर्शवीत होतें. मोठ्या मुली लहान मुलींना हरएक बाबतींत साहाय्य करीत होत्या. शिवण, हस्तव्यवसाय, गायन, नृत्य व व्यायाम या विषयांसाठीं स्वतंत्र दालनें होतीं. त्यानंतर आम्हीं मुलींचें स्वयंपाकगृह पाहिलें. तेथें अजस्र शेगड्या असून स्वयंपाकासाठीं आधुनिक साधनें दिसलीं. येथें मुलींना पाकशास्त्राचें शिक्षण दिलें जातें. संस्थेंतील सर्व मुली, आम्हांला भेटण्यासाठीं मुख्य दालनांत जमा झाल्या होत्या. तेथें मुलांमुलींनीं आमच्या करमणुकीसाठीं नृत्यगायनाचे कार्यक्रम करून दाखविले. संगीताचें दिग्दर्शन सहाव्या इयत्तेंतील लुबाकुलकोव्हा नांवाच्या एका चौदा वर्षांच्या मुलीनें केलें होतें. सोळा सतरा वर्षांच्या मुलांमुलींनीं रंगीबेरंगी कपडे घालून 'कालिनका' नांवाचें लोकनृत्य करून दाखविलें. चार मुली व एक मुलगा याप्रमाणें संघ बनवून केलेलें 'शृंखलानृत्य' बहारदार होतें. नृत्यासाठीं घातलेले झगे त्या मुलींनींच शिवून तयार केले होते. त्यांचें 'होयेता' नांवाचें स्पॅनिश नृत्य मला फारच पसंत पडलें. साशी नांवाच्या एका आठ वर्षांच्या मुलानें मॉस्कोवर्णनपर एक कविता साभिनय म्हटली. तसेंच मिरा नांवाच्या मुलीनें सोव्हिएत रशियाचें ध्वजगीत गाऊन दाखविलें. शेवटीं राष्ट्रीय नृत्य झालें व मग त्यांचा कार्यक्रम संपला. त्या मुलांच्या आग्रहावरून आमच्या गुर्जर भगिनींनीं गरबा नृत्य केलें व नंतर आम्हीं सर्वांनीं राष्ट्रगीत म्हटलें. तीं सर्व मुलें भारतांतील मुलांची ओळख करून घेण्यास अतिशय उत्सुक आहेत व

त्यासाठीं त्यांनीं आम्हांला अनेक प्रश्न विचारले. अशीं अनेक अनाथालयें रशियांत आहेत. सोव्हिएत सरकार या मुलांचें अत्यंत ममतेनें संगोपन करीत आहे खरें, तथापि अकालींच मातापित्यांच्या प्रेमळ आधाराला मुकलेल्या या सर्व मुलांच्या चेहऱ्यावर जें एक प्रकारचें कारुण्य दिसून येतें तें पाहून त्यांच्याविषयीं कोणाच्याहि मनांत कौतुकाबरोबरच करुणा निर्माण होते. यांतील छोटीं मुलें तर आम्हांला बिलगलीं होतीं. एका लहान मुलीनें पेपरमिंटच्या वडीच्या आकाराचें एक सुंदर आणि अगदीं छोटें आल्बम् मला स्मृतिचिन्ह म्हणून दिलें. त्यांत मॉस्को शहरांतील मुख्य ठिकाणांचे फोटो आहेत. त्यामुळें या इवल्याशा पुस्तकांत सबंध मॉस्को शहरच सामावलें आहे. त्या आल्बम्च्या रूपानें त्या पोरक्या व छोट्या मुलीचें निर्व्याज प्रेम मला मिळालें आहे, या कल्पनेनें माझ्या मनांत एक अनिर्वाच्य असा भाव निर्माण झाला.

दुपारीं आम्हांला आपल्या वकिलातींत ‘ लंच ’ होती. मेनन पतिपत्नींनीं जेवणाचा बेत उत्कृष्ट ठेवला होता. विशेषतः त्यांत इडलीसांबार व पुलाव हे उल्लेखनीय प्रकार होते. बरेच दिवसांनंतर आपल्या इकडील ते प्रकार पाहून आम्हांला आनंद झाला. श्रीयुत व सौ. मेनन हीं दोघेंहि फारच सुस्वभावी व आतिथ्यशील आहेत. त्यांना बोलावयास बरेंच हवें. श्री. मेनन माझ्या टेबलावरच जेवावयास बसले होते; त्यामुळें मी त्यांना रशियासंबंधीं बरेच प्रश्न विचारूं शकलें.

हॉटेलांत परत आल्यावर आम्ही मात्र नंतर कुठेंच गेलों नाहीं; कारण आम्हांला पांच वाजतां क्रेमलिन राजवाड्यांत सरकारी मेजवानी होती. मॉस्कोमध्यें पाय ठेवल्यापासून क्रेमलिन पहाण्याची उत्कंठा आमच्या मनांत निर्माण झाली होती, ती आज पुरी होणार होती. मला तर तो क्रेमलिन राजवाडा ‘ अलिबाबा आणि चाळीस चोर ’ या कथेंतील गुहेप्रमाणें अद्‌भुतरम्य वाटला. त्याच्या त्या प्रचंड लाल भडक भिंतींच्या मागें असलेली दृष्टीआडची सृष्टि केव्हां पहावयास मिळेल असा एक उतावीळ विचार मनांत वारंवार येऊं लागला.

‘ क्रेमलिन ’मध्यें जावयाचें असल्यामुळें आम्हीं सर्वांनीं झकपक पोषाख केले होते व त्यामुळें रस्त्यावरून जातांना आम्हां सोळाजणींची एक रंगीत

परेडच होऊं लागली. नेहमीं अतिशय साधा पोषाख करणाऱ्या आमच्या दुभाषांनींसुद्धां आज खूपच सुंदर पेहराव केला होता. क्रेमलिनच्या प्रवेश-द्वाराजवळ निमंत्रणपत्रिका व पासपोर्ट दाखविल्यानंतर आम्हांला आंत प्रवेश करतां आला. एकूण 'तिळा–' एवढें म्हणून कांहीं ही गुहा उघडणारी नाहीं तर, असा एक गमतीचा विचार माझ्या मनांत आला.

'क्रेमलिन' अतिशय प्रचंड व पुरातन आहे. येथें वेगवेगळया कालांत बरेंच राजकारण शिजलेलें आहे. आम्ही सबंध राजवाडा पहावयास पुन्हां येथें येणारच आहोंत. त्यावेळीं मी त्याचें वर्णन तुला लिहीन.

आमचे ओव्हरकोट काढून ठेवून आम्हीं पहिल्या मजल्यावरील एका प्रशस्त दालनांत गेलों. येथें जवळ जवळ हजार दीड हजार पाहुणे उपस्थित होते. सध्यां मॉस्कोंत असलेल्या निरनिराळ्या देशांतील शिष्टमंडळांना आज आमंत्रणें होतीं. दालनाच्या एका अंगाला एक छोटेसें व्यासपीठ उभारलें असून तेथें नृत्य, संगीत व तंतुवाद्यांचे कार्यक्रम सुरू होते. मेजवानीचीं टेबलें अनेकविध खाद्यप्रकारांनीं व पेयांनीं खच्चून भरलीं होतीं. स्टेट फोटोग्राफरांची इकडून तिकडून धांवपळ चालूंच होती. नंतर भाषणांना सुरुवात झाली. प्रथम सोव्हिएत रशियातर्फें सर्व शिष्टमंडळांचें स्वागत करण्यांत आलें व नंतर प्रत्येक शिष्टमंडळाच्या नेत्याचें भाषण झालें. मधून मधून चीन व कोरीया या देशांतील प्रतिनिधी चमत्कारिक आवाजांत गाणींहि म्हणत होते. प्रचंड आवाजांत प्रत्येक वक्ता खालीं बसत होता. जेवणानंतर नृत्य होतें. आम्हांला नृत्यांत भाग घेण्यासाठीं खूप आग्रह करण्यांत आला; पण ती विनंति आम्हीं सौजन्यपूर्वक नाकारली. तथापि, या निमित्तानें अनेक देशांतील प्रतिनिधींबरोबर ओळख होण्याची संधि मात्र आम्हांला मिळाली.

आम्ही परत जाण्यास निघालों तों काय, निसर्गाची मिजास एकदम बिघडली होती! आकाशांत पिवळ्या नागिणी सळसळत होत्या. मधून मधून घनगंभीर आवाज ऐकूं येत होता अन् घों घों पावसाला सुरुवात झाली होती. कसेबसे कपडे सांवरीत आम्ही मोटारींत बसून सुमारें साडे-नऊ वाजतां आमच्या हॉटेलांत परत आलों. भव्य, तथापि निगूढ पार्श्वभूमि

असलेल्या या क्रेमलिनमधली ही मेजवानी म्हणजे आमच्या प्रवासांतील एक अविस्मरणीय प्रसंगच समजला पाहिजे.

रात्रीं साडेदहा वाजतां आम्ही आमच्या हॉटेलाच्या सर्वांत वरच्या मजल्यावर दारूकाम पहाण्यास गेलों.

आतां पाऊस थांबला होता. मात्र आज थंडी खूप होती. शिवाय रात्रीनें धुक्याचा झिरझिरीत बुरखाहि घेतला होता. या अशा धूसर वातावरणांत मॉस्को शहरांतील दिव्यांचा उजाळा मोठा रम्य दिसत होता. आमच्या हॉटेलासमोरील भव्य चव्हाट्यावरच हें दारूकाम उडावयाचें होतें. चारी बाजूला भव्य इमारती खड्या होत्या. दूरवर दिसणारी, पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडानें बांधलेली मॉस्को विद्यापीठाची उंच इमारत व तिच्या माथ्यावरील तो सोव्हिएत रशियाचा लाल तारा, या साऱ्या रम्यतेंत भर घालीत होता. रस्त्यांत असंख्य मंडळी जमली होती. कांहीं वेळानें दारूकामाला सुरुवात झाली. आपल्या इकडील नळे चंद्रज्योती वगैरेसारखे अनेक प्रकार त्यांत होते. त्यांच्या रंगीबेरंगी शिखा आकाशांत उंच जात व त्यांतून प्रकाशकणांचा सडा खालीं पडे. जणूं काय मोती–माणिक–पाच यांचे सर ओघळून त्यांतले असंख्य मणी खालीं घरंगळून येत होते. कांहीं नळ्यांच्या प्रचंड शिखा प्रथम वेगानें वर चढत व नंतर त्यांच्या टपोऱ्या ठिणग्यांतून फवाऱ्यांसारख्या उपशिखा बाहेर पडून त्या कणाकणांनीं खालीं जमिनीवर पखरण करीत होत्या. कांहींच्या ज्योतींतून 'मीर' (शांतता), 'स्नेहभाव' वगैरेसारख्या शब्दसंहती बाहेर दृश्यमान होत होत्या; तर कांहींतून लेनिन-स्टालिनच्या प्रतिकृती प्रगट होत होत्या. 'सूंसूं' शब्द करीत अंतराळांत घुसणाऱ्या बाणांतून असंख्य लाल तारे, हंसत खिदळत जमिनीकडे धांवत येत होते.

या सगळ्या कार्यक्रमाच्या वेळीं टांचणी पडली तरी आवाज ऐकूं येईल इतकी जिकडे तिकडे निःस्तब्धता होती. चहूंबाजूंच्या उंच व पांढऱ्या शुभ्र इमारती, प्रकाशझोतांचीं रंगीबेरंगी वस्त्रें पांघरलेल्या मूकचित्राप्रमाणें (टॅब्लो) दिसत होत्या. या कृत्रिम झगमगाटानें आकाशांतील वास्तव रोषणाई आज फिकी पडली होती. आज स्वप्नांतसुद्धां माझ्या डोळ्यांसमोर हे प्रकाशकिरण तरंगतील असें मला वाटतें.

दिनांक ३ मे १९५४

आज सकाळीं आम्ही जरा उशीरानेंच झोंपून उठलों. त्यामुळें न्याहरी वगैरे गडबडीनें आटोपून घ्यावी लागली; कारण दहा वाजतां आम्हांला मॉस्कोचें सरस्वती विद्यापीठ पाहावयास जावयाचें होतें. आज याखेरीज दुसरा कार्यक्रम नव्हता. कारण आज रात्रींच्या गाडीनें आम्हांला लेनिनग्राडला जावयाचें आहे. तेथें कांहीं दिवस राहून आम्ही मॉस्कोला परत येऊं व नंतर उझबेकिस्थान पाहाण्यास जाऊं.

मॉस्को विद्यापीठाची इमारत मुख्य शहरापासून दूर आहे; मात्र मॉस्को शहरांतील कोणत्याहि भागांतून या अत्युच्च इमारतीचें, अस्पष्ट का होईना, दर्शन झाल्याशिवाय राहात नाहीं. मुख्य इमारत तेहतीस मजली असून एखाद्या राजप्रासादाप्रमाणें भव्य व आकर्षक आहे. तिला संलग्न असलेल्या सत्तेचाळीस छोट्यामोठ्या इमारतींतून मुलांचें वसतिगृह, प्रयोगशाळा, व्यायामशाळा, पोहण्याची जागा, नृत्यशाळा व प्राध्यापकांचीं निवासस्थानें आहेत. या सबंध विस्तारांत सत्तेचाळीस दालनें आहेत. जुनें मॉस्को विद्यापीठ १७५५ मध्यें लॅमोनसॉव्ह नांवाच्या शास्त्रज्ञानें स्थापन केलें. तिथें फक्त साडेतीन हजार विद्यार्थ्यांचीच सोय आहे. या नव्या इमारतीची कल्पना १९४८ मध्यें सुचली व १९५३ मध्यें ही प्रासादतुल्य इमारत बांधून पूर्ण झाली. येथें सध्यां तेवीस हजार विद्यार्थी असून पैकीं पंधरा हजार पोस्ट ग्रॅज्युएटस् आहेत. त्यांच्या मार्गदर्शनासाठीं पांच हजार प्राध्यापक आहेत. शास्त्राचें डॉक्टरेट घेतलेल्या प्राध्यापकांना दरमहा सहा हजार रूबेल्स वेतन मिळतें. पण सायन्सचें डॉक्टरेट न घेतलेल्या प्राध्यापकांना फक्त बाराशें रूबेल्स मिळतात. चीन, कोरीया व जर्मनी या देशांतूनहि येथें विद्यार्थी येतात. पांच वर्षांच्या अभ्यासक्रमासाठीं त्यांना फक्त चारशें ते सातशें रूबेल्स भरावे लागतात. हॉस्टेलमध्यें राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा दोनशे-पन्नास रूबेल्स खर्च येतो; परंतु त्यापैकीं विद्यार्थ्यांना फक्त पंचवीस रूबेल्स भरावे लागतात. बाकीचा खर्च सरकार करतें. विद्यार्थ्यांना लागणारीं पुस्तकेंहि त्यांना मोफत देतात. रशियांतील पांच टक्के विद्यार्थी विद्यापीठांत येतात; बाकीचे तंत्रशाळेंत जातात. या पांच टक्के विद्यार्थ्यांपैकीं एकावन्न टक्के

विद्यार्थिनी असतात. या विद्यार्थ्यांपैकीं नव्वद टक्के विद्यार्थ्यांना सरकारकडून शिष्यवृत्त्या व स्टायपेंड मिळतें. विद्यार्थ्यांची किमान वयोमर्यादा पस्तीस वर्षें आहे. मॉस्को विद्यापीठांत शिक्षणाचें माध्यम रशियन भाषा आहे; पण याखेरीज जगांतील निरनिराळ्या दोनशें भाषांचा अभ्यासहि तेथें केला जातो. येथें संस्कृत भाषेचा अभ्यासहि आस्थेनें करतात असें आम्हांला आढळलें.

या इमारतींत एकशें चाळीस लिफ्ट्स आहेत, त्यामुळें पुष्कळ वेळां चक्रव्यूहांत सांपडल्याप्रमाणें गोंधळून गेल्यासारखें वाटतें. एकाच वेळीं दोन हजार विद्यार्थी बसूं शकतील असा मोठा कॉनव्होकेशन हॉल आहे. या हॉलमध्यें अतिशय कोरीव काम केलें असून प्रकाशयोजनाहि चतुराईनें केलेली आहे.

मुलींचें वसतिगृह दहाव्या मजल्यावर आहे. मुलींच्यावर देखरेख ठेवण्यासाठीं वॉर्डन नाहीं. मुलींना रात्रीं अकरा वाजल्यानंतर वसतिगृहाच्या बाहेर राहतां येत नाहीं. वसतिगृहांत टेलिफोन, रेडिओ, वगैरे सर्व आधुनिक सुखसाधनें आहेत. तळमजल्यावर विद्यार्थ्यांचें को-ऑपरेटिव्ह स्टोअर व चारशें विद्यार्थी एकाच वेळीं बसूं शकतील असें एक सुंदर व स्वच्छ उपाहारगृह आहे. मायक्रोफोनिंग मशिन्स वगैरे अद्ययावत् साधनांनीं परिपूर्ण असलेलें येथील भव्य ग्रंथालय पाहून मला फारच आनंद झाला. निरनिराळ्या देशांतील व भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथांचा येथें संग्रह केलेला आहे. इमारतींतील प्रत्येक दालनांतून व घळींतून मोठमोठ्या शास्त्रज्ञांच्या, लेखकांच्या व लेनिन-स्टालिनच्या भव्य तसबिरी व पुतळे आहेत. प्रवेशद्वारासमोरील उद्यानांत मध्यवर्ती इमारतीकडे कौतुकानें पहाणारा रशियन विद्यापीठाचा आद्य संस्थापक लॅमोनसॉव्ह याचा भव्य पुतळा प्रथमदर्शनींच मन वेधून घेतो.

येथें आम्हांला अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी भेटल्या. ही सर्व विद्यार्थी मंडळी अत्यंत आनंदी व उत्साही दिसली. येथील विद्यार्थी हे आपल्या क्षेत्रांत तर रस घेतातच, परंतु त्याबरोबरच देशांतील इतर सर्व चळवळीं-संबंधीं त्यांना सर्व माहिती असते. तसेंच त्यांच्या ठिकाणीं असलेली नम्रता व शिस्तही वाखाणण्यासारखी आहे. आमच्याबरोबर हस्तांदोलन करून त्यांनीं आम्हांला आमच्याकडील शिक्षणपद्धतीसंबंधीं अनेक प्रश्न विचारले.

दुपारीं घरीं परत आल्यावर आम्हीं रात्रीच्या प्रवासाची तयारी केली. आमची गाडी साडेअकरा वाजतां आहे. त्यामुळें बराच वेळ शिल्लक असल्यामुळें तुला हें पत्र मीं लिहिलें. आतां उद्यां किंवा परवां लेनिनग्राडहून मी पुढील पत्र लिहीन. सध्यां विशेष कांहींच नाहीं.

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र सातवें

हॉटेल ॲस्टोरिया
लेनिनग्राड
दिनांक ५ मे १९५४

प्रिय शांता,

परवां एवढ्या रात्रीं जरी आम्ही स्टेशनवर जाण्यास निघालों तरी माणसांची वर्दळ चालूच होती. हे रशियन लोक विश्रांति तरी केव्हां घेतात असा एक गंमतीदार विचार माझ्या मनांत येऊन मला हंसू आलें.

इटलींतील ‘ रॅपिडो ’पेक्षां रशियन रेल्वेमध्यें अधिक सुखसोयी असतात. रशियन रेल्वेंत वर्गवारी नसेल असें प्रथम आम्हांला वाटलें होतें. परंतु येथेंहि तिसऱ्या वर्गासारखा एक वर्ग होता व त्यांत बसल्या बसल्या झोपेच्या डुलक्या घेणारे प्रवासीहि आम्हांला आढळले. प्रत्येक स्टेशनवर ग्रंथालयाची व्यवस्था असते व उतारूंना गाडी येईपर्यंतचा वेळ घालविण्यासाठीं तेथून पुस्तकें वाचावयास घेतां येतात. याखेरीज आगगाडीच्या डब्यांतूनहि वर्तमानपत्रें किंवा मासिकें मिळूं शकतात. छोट्या मुलांना घेऊन प्रवास करणाऱ्या मातां-साठीं प्रत्येक स्टेशनवर एक स्वतंत्र खोली असून आगगाडींतहि स्वतंत्र सोय

असते. त्यांत लहान मुलाला झोंपण्यासाठीं वगैरे खास व्यवस्था केलेली असते. चीनखेरीज अशी व्यवस्था इतरत्र कुठेंच नाहीं.

माझ्या कंपार्टमेंटचा पांच नंबर होता. यांत मी, पौर्णिमा, सुचेता कृपलानी व मोलिना दत्त अशा चौघीजणी बसलों होतों. पौर्णिमाची तब्येत नादुरुस्त होती व सुचेता व मोलिना लगेच झोंपीं गेल्यामुळें प्रवासांत फारशी गंमत वाटली नाहीं. आणि मग थोडा वेळ वाचन केल्यानंतर मीं पण यथेच्छ ताणून दिली.

सकाळीं मला खूपच लवकर जाग आली. रात्रीं खिडकींतून अंधाराखेरीज कांहीं दिसत नव्हतें; पण सकाळीं मात्र रशियांतील निसर्गाचें भव्य व सुबक स्वरूप मला पहावयास मिळालें. बर्फाचे शुभ्र पांघरलेले छोटेमोठे पर्वत आणि आकाशाकडे माना उंचावून पहाणारे पाईन वृक्ष आमच्या आगगाडीबरोबर धांवण्याची शर्यत खेळत होते. मधून मधून रशियांतील टुमदार खेडीं हळूंच डोकावून पहात होतीं. रशियन सामुदायिक शेतीचे समृद्ध संघहि वारंवार दृष्टीस पडत होते.

आमच्या दुभाषांनीं दिलेल्या न्याहारीच्या पाकिटांचा समाचार घेतल्यानंतर आम्हीं सर्वांनीं खूप गप्पा मारल्या व नंतर पोषाख व वेणीफणी करावयास सुरुवात केली; कारण लेनिनग्राड स्टेशनावर गाडी दहा वाजतां पोंचणार होती.

बरोबर दहा वाजतां गाडी स्टेशनामध्यें शिरली. स्टेशनावर लेनिनग्राडमधील अनेक संस्थांच्या स्त्रीप्रतिनिधी पुष्पगुच्छासहित आमचें स्वागत करावयास हजर होत्या. आमच्याबरोबर मॉस्कोहून आलेल्या ॲंटिफासिस्ट स्त्रीसंघटनेच्या उपाध्यक्ष मॅडम परफ्युनोव्हा यांनीं आम्हां सर्वांची या प्रतिनिधींबरोबर ओळख करून दिली व नंतर आम्ही ॲस्टोरिया हॉटेलकडे जाण्यास निघालों.

लेनिनग्राड हें अतिशय सुंदर शहर आहे. हें शहर प्रथम 'पीटर-द-ग्रेट' यानें दोनशें पन्नास वर्षांपूर्वीं वसविलें. या शहराला स्वतःचें नांव वारंवार बदलण्याचें वेडच आहे असें वाटतें. कारण प्रथम याचें नांव होतें पिटर्सबर्ग. नंतर १९१७ च्या क्रांतीनंतर त्याला पेट्रोग्राड हें नांव मिळालें. लेनिनच्या मृत्यूनंतर त्यानें आपलें नांव चटकन् बदलून स्वतःला लेनिनग्राड म्हणावयाला

सुरुवात केली. आतां भविष्यकाळांत या शहराला आणखी एखादें नवें नांवहि मिळेल, कुणीं सांगावें ? प्रथम हें शहर रशियाची राजधानी होतें; परंतु नंतर तो मान मॉस्कोला देण्यांत आला. हें मानाचें पान जरी या शहरापासून हिरावून घेण्यांत आलें असलें तरी त्यामुळें त्याच्या भव्यतेंत, सौंदर्यांत व रुबाबांत कोणताच बदल झालेला नाहीं, असें आम्हांला दिसून आलें. गेल्या महायुद्धांत या शहराला अतिशय कष्टमय अवस्थेंतून जावें लागलें. कारण या शहरावर जमीन, समुद्र व आकाश अशा तिन्ही मार्गांनीं हल्ले झाले. हे मार्ग शत्रूंनीं रोखून धरल्यामुळें अनेक भूकबळी पडले. बॉम्बच्या हल्लयामुळें अनेक दुर्दैवी माणसांचा चक्काचूर उडाला. या शहरानें भोगलेल्या दुर्दैवाच्या दशावतारांच्या खुणा अद्यापिहि कुठें कुठें आढळून येतात. मात्र येथें फार झपाट्यानें पुनर्रचना झाली आहे. त्यामुळें नवें व जुनें लेनिनग्राड असे या शहराचे दोन विभाग पडले आहेत. नवा भाग आधुनिक नियोजनपद्धतीनें बांधला असल्यामुळें त्यांत एक प्रकारची सफाई दिसते, तर जुना भाग आपल्या भव्यतेनें पहाणाराचें मन आकृष्ट करतो. या शहराच्या एका अंगाला नीलवर्ण बाल्टिक समुद्र असून दुसऱ्या बाजूला शहराला बिलगून वाहणारी 'नीवा' नदी आहे. नीवा नदीच्या पृष्ठभागावर राजहंसाप्रमाणें दिसणारे हिमखंड नेहमींच तरंगतांना आढळून येतात.

मोटारींतून या शहरांत आम्हीं काल दोन तास चक्कर मारली. आमचा तरुण वाटाड्या जेकब खूप आनंदी व चलाख असून तो बऱ्यापैकीं इंग्रजी बोलत होता. प्रत्येक ठिकाणीं मोटार उभी करून तो आम्हांला त्या त्या ठिकाणाची थोडक्यांत माहिती देत होता. त्यामुळें अवघ्या दोन तासांतच लेनिनग्राड शहराबरोबर आमचा बराच परिचय झाला. याखेरीज आमच्या-बरोबर दोन खास स्टेट फोटोग्राफर होते.

नीवा नदीच्या एका अंगाला पिटरपॉफोट्स नांवाचा १७८० मध्यें बांधलेला एक जुना किल्ला उभा आहे. पूर्वीं त्यावर तीनशें तोफा असत. क्रांतीच्या धामधुमींत याचें रूपांतर तुरुंगांत होऊन तेथें राजकैदी ठेवण्यांत येऊं लागले. मॅक्सिम गॉर्कीला येथेंच अटक करून ठेवण्यांत आलें होतें. सध्यां येथें सरकारी कचेऱ्या आहेत.

शहरांतून हिंडतांना आम्हांला अनेक प्राचीन व भव्य इमारती, मशिदी, देवळें व पदार्थसंग्रहालयें दिसलीं. यांतील कांहीं ठिकाणें आम्ही पहाणार आहोंत. या सर्व पुरातन गोष्टींची रशियन सरकार अतिशय आस्थापूर्वक व्यवस्था करतें व त्यासाठीं बरीच मोठी रक्कम दरवर्षी खर्च होते. युद्ध-कालांतहि या इमारतींचें प्राणापलीकडे संरक्षण करण्यांत आलें.

'सेंट ऐझॅक कॅथेड्रल' नांवाचें प्रार्थनामंदिर अतिशय प्रेक्षणीय आहे. याच्या दर्शनी भागासमोर मोठ्या डौलांत घोड्यावर बसलेल्या पहिल्या पिटरचा एक भव्य पुतळा आहे. हा पुतळा ब्रॉंझ धातूचा असून तो १८५९ मध्यें येथें उभारला. याचें वैशिष्ट्य म्हणजे तो कलाशिल्प व पदार्थशास्त्र यांतील कांहीं तत्त्वांचा एक अद्‌भुत आविष्कार आहे. कारण हा एवढा मोठा भव्य पुतळा घोड्याच्या मागील दोन खुरांवर व त्याच्या पुच्छाच्या केंसाळ टोंकावर आधारित आहे. हें मंदिर १८५८ मध्यें बांधलें. याची उंची १२५ मीटर असून याचें बांधकाम ४००० मजुरांनीं केलें आहे. यांत ११२ स्तंभ आहेत. गेल्या महायुद्धांत या मंदिराचें थोडेंबहुत नुकसान झालें आहे; पण तो भाग आतां दुरुस्त केला आहे. तरी पण या जुन्या कलाकृतीला तें ठिगळ लागल्यासारखें वाटतें. 'रशियन ॲकॅडमी ऑफ सायन्स' व स्टेट युनिव्हर्सिटीची जुनी इमारत या दोन इमारती प्रेक्षणीय आहेत. लेनिनग्राड हें रशियांतील एक मोठें व्यापारी व त्याचप्रमाणें सांस्कृतिक केंद्र असल्यामुळें येथें नाट्यगृहें, वस्तुसंग्रहालयें, शाळा वगैरेंची संख्या बरीच आहे. तेथें तेरा भव्य नाट्यगृहें व ८९ क्लब आहेत. एकट्या लेनिनग्राड शहरांत १७१९ ग्रंथालयें असून ५२ शाळा आहेत. मुंबईएवढी या शहराची लोकसंख्या आहे.

येथें आम्हांला एका धर्ममंदिराला विलक्षण नांव दिलेलें आढळलें व तें म्हणजे 'खुनी मंदिर' (Church of Blood). पुण्याच्या खुन्या मुरली-धराप्रमाणेंच या मंदिरामागें एक आख्यायिका आहे; कारण येथें दुसऱ्या ॲलेक्झांडरचा खून झाला. मात्र हें खुनाच्या रक्तानें रंगलेलें प्रार्थनामंदिर अतिशय सुंदर आहे. विशेषतः त्याच्या माथ्यावरील सहा घुमट वास्तु-कलेचा एक रम्य नमुना आहेत.

या मंदिरावरून पुढें जात असतांना आम्हांला हरणाचा एक अतिशय सुंदर पुतळा दिसला व त्यामागें एक भव्य प्रासाद दिसला व त्या बाबतींत आम्हीं आमच्या वाटाड्याला विचारलें तेव्हां त्यानें सांगितलें कीं, त्या प्रासादाचें नांव पिटरहॉफ असून तेथें पीटर राजा उन्हाळ्यांत रहात असे. या राजवाड्याच्या आंवतींभोंवतीं एक विस्तृत उद्यान असून त्यांत रंगीबेरंगी ट्युलिप्स फुलांचे ताटवे व गवताळ जागा गालिचाप्रमाणें शोभतात. या उद्यानांत १८८ कारंजे आहेत. मला तर हें उद्यान पाहून पुराणांतील मयसभेची स्मृति झाली. कारण येथें एल फसवा कारंजा ( Mushroom Fountain ) आहे. सकृद्दर्शनीं पहाणाऱ्यास तो एखाद्या रम्य कुंजाप्रमाणें दिसतो. पण तेथील शिलाखंडावर बसावयास जावें तों पायाच्या दाबानें चोहोंबाजूनें पाण्याचे उंच फवारे उडूं लागतात व माणूस भिजून चिंब होतो. त्याचप्रमाणें तेथें असलेल्या दुसऱ्या एका कारंजाची पण गंमत आहे. एका सुंदर वृक्षाभोंवतीं रंगीबेरंगी ट्युलिप फुलांचें आळें केलें आहे. पण त्याच्याजवळ जावें तों काय, त्या झाडांतून व प्रत्येक ट्युलिपांतून शुभ्र जलांचे तुषार नाचूं, उडूं, बागडूं लागतात. याखेरीज येथें 'ॲडम व ईव्ह' यांचा कारंजा, 'सनडायल कारंजा' वगैरे अनेक गंमतीदार कारंजे आहेत. पहिल्या पिटरच्या ठिकाणीं बरीच रसिकता व विनोदवृत्ति होती म्हणायची! गेल्या महायुद्धांत जर्मन लोकांनीं या सुंदर स्थळांची खूपच नासधूस केली होती; परंतु त्यानंतर मात्र याची पुनर्रचना करून १९४८ मध्यें तें पूर्ववत् केलें गेलें.

लेनिनग्राड नगरपालिकेची इमारत पण फार भव्य असून तिच्यावर रशियन रिपब्लिकचें एक मोठें निशाण फडकत असतें. ही इमारत पूर्वीं मारिन्सको नांवाचा राजवाडा म्हणून प्रसिद्ध होती. लेनिनग्राडच्या इमारतींचें एक वैशिष्ट्य माझ्या नजरेस आलें व तें म्हणजे येथील इमारतींच्या उंचीपेक्षां लांबी अधिक आहे.

संध्याकाळीं हॉटेलांत परत आल्यावर हॉटेलांतील 'हेअर ड्रेसिंग' विभागांत जाऊन आम्हीं आमचे केंस धुऊन घेतले. धुतलेले केंस विजेच्या साहाय्यानें दोन मिनिटांत वाळतात. येथें काम करणाऱ्या साऱ्या रशियन स्त्रिया अतिशय चलाख आहेत. रशियन स्त्रियांचे केंसहि आपल्यासारखेच काळे व लांबसडक

असतात. त्यामुळें आमचे केंस पाहून त्यांना आमच्याबद्दल खूप आत्मीयता वाटूं लागली. माझे केंस धुऊन झाल्यावर मला मदत करणाऱ्या तेथील एका स्त्रीनें माझा रशियन पद्धतीचा आंबाडा बांधून दिला. ही आंबाड्याची पद्धत फारच सोपी व आकर्षक आहे. मी हिंदुस्थानांत परत आल्यावर तसा आंबाडा कसा घालावा हें तुला दाखवीन.

आमचें हें हॉटेल ॲस्टोरिया बरेंच मोठें आहे; पण मॉस्को हॉटेलएवढें मात्र नाहीं. बाकी व्यवस्था सर्व मॉस्को हॉटेलप्रमाणेंच आहे. हॉटेलच्या समोर सोनेरी कळसाचें एक सुंदर प्रार्थनामंदिर आहे व जवळच 'पहिल्या निकोलस'चा एक भव्य पुतळा आहे. हॉटेलच्या दुसऱ्या बाजूला साधारण मोठा असा एक पार्क आहे. तेथें अनेक स्त्रीपुरुष व मुलें हवा खाण्यासाठीं येऊन बसतात. हीं छोटीं बालकें गुबगुबीत असून त्यांचा वर्ण गुलाबी आहे. त्यांच्या अंगांत लालभडक फरचे केंसाळ कोट घातलेले असतात व डोक्याला पण तशीच थंडीपासून संरक्षण करणारी लाल रंगाची व उभट आकाराची टोपी असते. हीं मुलें या पार्कमधल्या हिरव्या गवतावर जेव्हां खेळत असतात, तेव्हां त्या हिरव्या पार्श्वभूमीवर लाल डेलियाचीं टपोरीं फुलेंच फुललीं आहेत कीं काय, असा दुरून पहाणाराला भास होतो. लेनिनग्राडमध्यें असे पार्क जागोजागीं असून ते अतिशय स्वच्छ व सुव्यवस्थित ठेविलेले आहेत.

लेनिनग्राडच्या या हॉटेलांत आम्हांला स्वादिष्ट व खमंग जेवण मिळतें. मॉस्को हॉटेलांतील स्वैपाक्यांपेक्षां येथील स्वैपाकी निःसंशय अधिक कुशल आहेत. येथें पुरुष वाढपी नसून स्त्री वाढपी आहेत. येथील जेवणघरांत आमच्यासाठीं एक स्वतंत्र टेबल आहे. आमच्या दिमतीला 'गार्गा' नांवाची एक खास स्त्री वाढपी आहे. ही तरुणी अतिशय सालस, नम्र व हुशार आहे. वाढपाचें काम ती जलद करते. आम्हांला प्रत्येक पदार्थ ती आग्रह करून वाढते व त्या आग्रहाला मान दिला नाहीं तर तिचा चेहरा गोरामोरा होतो. ती दिवसपाळीलाच असते. रात्रीं ती घरीं परत जाते; कारण तिला दोन लहान मुलें आहेत.

रात्रीं आम्हीं येथील एका प्रसिद्ध नाट्यगृहांत 'ब्रॉंझ हॉर्समन' नांवाचें नृत्यनाट्य (बॅले) पाहिलें. हें नृत्यनाट्य या पत्रांतच वर्णन केलेल्या पहिल्या पिटरच्या पुतळ्यावर आधारलें आहे. या बॅलेमध्यें या पुतळ्याच्या नजीक

चढलेली प्रेमकहाणी गोंविलेली होती. अत्यंत हृदयस्पर्शी अशी ही शोक-कथा, नृत्य करणाऱ्या त्या कलावंतांनीं अभिनयाच्या द्वारें फारच उत्तम वठविली. कथेला प्रारंभ या पुतळ्यानजीक होतो व शोककारक शेवटहि तिथेंच होतो. त्यामुळें या पुतळ्याचा उपयोग 'प्रतीक' म्हणून केलेला आहे.

रात्रीं उशिरांच हॉटेलमध्यें परत आलों. येथें रात्र होतच नाहीं म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण आपल्याकडे संध्याकाळीं सातच्या सुमारास जसा संधिकालाचा प्रकाश असतो तसाच तेथें रात्रभर होता. पहांटे चाराच्या सुमारास तर फटफटीत उजाडलें. आपण किती वेळ झोपलों असें वाटून मी ओशाळल्यागत चटकन् उठलें तों काय आश्चर्य, घड्याळांत फक्त चारच वाजले होते. सूर्यभूमीच म्हणायची ही! आणि म्हणूनच या शहराला 'City of Eternal Day' असें म्हणतात.

आजहि आम्हीं बरींच महत्त्वपूर्ण स्थळें पाहिलीं. त्याच्याबद्दल सविस्तर माहिती मी माझ्या पुढील पत्रांत लिहीन.

तुझी

**सौ. चारुशीला**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८८५८ विः [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]

## पत्र आठवें

**हॉटेल ॲस्टोरिया**
**लेनिनग्राड**
दिनांक ७ मे १९५४

प्रिय शांता,

मला लेनिनग्राड हें शहर अतिशय आवडलें आहे. मॉस्कोप्रमाणेंच या शहराला भव्यता असूनहि तेथें दिसून येणाऱ्या गडबडघाईपासून हें अलिप्त

आहे. येथील वातावरण शांत, सौम्य व प्रसन्न भासतें. कदाचित् अनेक वर्षे 'राजधानी' होण्याचा बहुमान अनुभवल्यामुळें कीं काय, हा खानदानी भारदस्तपणा या शहराच्या अंगीं रुळलेला असावा !

या दोन तीन दिवसांत आम्हीं या शहरांतील अनेक ठिकाणांना व संस्थांना भेट दिली. रशियांत पाऊल टाकल्यापासून आमच्या पायांना अक्षरशः चाकें बांधल्यागत झालें आहे. सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत आम्ही सारख्या हिंडत आहोंत. मात्र थंड हवेमुळें थकवा मुळींच येत नाहीं.

काल सकाळीं येथील एक गंमतीदार संस्था पाहिली. ती म्हणजे वृद्ध कलावंतांचें अनाथालय ( Home for Old Artists ). युरोपांतील अनेक देशांत वृद्धांसाठीं सरकारकडून व्यवस्था करण्यांत आलेली आहे. तथापि, येथील वृद्धग्रहासंबंधींची व्यवस्था मला बरीच वैशिष्ट्यपूर्ण वाटली. येथें निरनिराळ्या व्यवसायांतील वृद्ध मंडळींच वर्गीकरण करून त्यांच्यासाठीं वेगवेगळीं वृद्धगृहें बांधण्यांत आलेलीं आहेत. लेनिनग्राडपासून कांहीं मैलांवर असलेल्या एका उपनगरांत आम्हीं पाहिलेलें हें वृद्ध कलावंतांचें गृह आहे. वृद्धांचें अनाथालय म्हणजे तसेंच जीर्ण असेल अशी प्रथम आमची कल्पना होती. तथापि, प्रत्यक्षांत मात्र वेगळेंच अनुभवण्यास मिळालें. आम्हीं मोटारींतून खालीं पाय ठेवल्याबरोबर एका मनोहर उद्यानांत असलेली एक सुंदर व प्रशस्त इमारत आमच्या दृष्टीस पडली. उद्यानाच्या प्रवेशद्वाराजवळ या गृहाचे ७३ वर्षांचे वृद्ध व्यवस्थापक श्री. अँड्र्यु गोल्युव्हेल्फ आम्हांला सामोरे आले. त्यांच्यामागें गृहांतील पांचपन्नास हंसतमुख वृद्ध स्त्रीपुरुष उभे होते. त्या सर्वांबरोबर हस्तांदोलन करून आम्ही मुख्य इमारतींत गेलों. हें गृह गेलीं साठ वर्षें चालू आहे. याची इमारत जुन्या पद्धतीची आहे. सध्यां येथें १७० कलावंत राहात आहेत. ही इमारत, वृद्धांच्या वाढत्या संख्येला अपुरी पडत असल्यामुळें याला संयुक्त अशी दुसरी एक प्रचंड इमारत बांधली जात आहे. हें गृह स्थापन होण्यासंबंधींचा इतिहासहि अद्भुत आहे. अशा प्रकारच्या गृहासंबंधींची कल्पना प्रथम 'सवीना' नांवाच्या एका रंगभूमीवर काम करणाऱ्या नटीच्या मनांत आली व तिनें वर्गणी गोळा करून हें गृह सुरू केलें. क्रांतिपूर्व काळांत हें लोकाश्रयावर चालत होतें. परंतु आतां मात्र

तें सर्वस्वीं सरकारी मदतीवर चाललें आहे. पूर्वी यांत फक्त ४५ लोकांच्या राहण्यापुरती सोय होती. येथें रंगभूमीशीं संबंध असलेल्या सर्व कलावंतांची सोय होते. या गृहाबाबतींत सरकार दर वर्षी एक लक्ष सहाशें हजार रूबल्स खर्च करतें. याखेरीज येथें राहाणाऱ्या प्रत्येक कलावंतास कमींत कमी २१० रूबल्स व जास्तींत जास्त ८०० रूबल्सपर्यंत पेन्शन मिळतें. परंतु खाणेंपिणें, कपडेलत्ते सर्व मोफत असल्यामुळें या पेन्शनच्या पैशाचा उपयोग ही मंडळी हातखर्चासाठीं म्हणून करतात.

या गृहांत पंचावन्नाव्या वर्षी स्त्रीला व साठाव्या वर्षी पुरुषाला आश्रय मिळतो. मात्र येथें येणारी सर्वच मंडळी निराश्रितच असतात असें नाहीं. आपल्याकडील व येथील कुटुंबव्यवस्था बरीच भिन्न असल्यामुळें, कांहीं वृद्ध मंडळी मुलेंबाळें आपल्या पायावर उभीं राहिली कीं, स्वतः होऊनच संसारांतील अंग काढून घेऊन अशा वृद्धालयांत येऊन राहतात. एक प्रकारचा वानप्रस्थाश्रमच हा! त्यांचीं मुलें, नातवंडें त्यांच्या भेटीस येतात व केव्हां केव्हां उन्हाळ्याच्या सुटींत तीं कांहीं दिवस आजोबांच्या सहवासांत तेथें राहातहि असतात.

तसें पाहिलें तर, या गृहांतील या वृद्धांचें जीवन सुखासमाधानांत व्यतीत होत असतें असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांना येथें सर्वच सवलती देण्यांत येतात. एकलकोंडें व एकाकी वाटूं नये यासाठीं त्यांच्यासाठीं एक स्वतंत्र सिनेमागृह बांधण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें मधून मधून सिनेमाला किंवा नृत्यनाट्कादि प्रयोगांना शहरांत जाण्यासाठीं त्यांच्याकरितां खास बैलगाडी ठेवलेली आहे. या गृहांत या वृद्धांच्यासाठीं सांस्कृतिक मंडळ, वाङ्मय मंडळ व उपाहार मंडळ अशीं मंडळें किंवा समित्या आहेत. त्यांत हौशी व तरुण विद्यार्थ्यांप्रमाणेंच हीं वृद्ध माणसें मोठ्या धडाडीनें भाग घेतात व हीं मंडळें तें वृद्धगृह व्यवस्थित ठेवण्यास मदत करतात. येथें कांहीं वृद्ध नाटककार आहेत. ते मधून मधून छोटीं नाटकें व संगीतिका लिहितात व त्यांचे बाहेर प्रयोग होऊन तें उत्पन्न एखाद्या उपयुक्त संस्थेस देण्यांत येतें. येथें राहणाऱ्या 'इथेनवाल्ड' नांवाच्या एका नाटककारानें लिहिलेल्या 'Tobacco Captain' नांवाच्या विनोदी नाटकाचे अशा तऱ्हेनें अनेक प्रयोग करण्यांत आले होते.

तो गेल्या वर्षीच दिवंगत झाला. हीं सारीं वृद्ध माणसें आनंदी व साधीं आहेत. आम्हांला आतां काम करण्याची जरूर नाहीं असें तीं जरी म्हणतात तरी, कांहीं ना कांहीं उद्योग केल्याशिवाय मात्र त्यांना स्वस्थ राहवत नाहीं, असें दिसतें. कारण कांहीं धर्मार्थ संस्थांच्या मदतीसाठीं म्हणून हीं एका काळीं विख्यात असलेलीं कलावंत माणसें एवढ्या वृद्ध वयांतहि मधून मधून नाट्य-प्रयोग, जलसे वगैरेसारखे सांस्कृतिक प्रयोग करून, निधि जमवून देतात. यांतील कांहीं वृद्ध, अंधशाळेंत जाऊन तेथें असणाऱ्या दुर्दैवी आंधळयांना पुस्तकें किंवा वृत्तपत्रें वाचून दाखवितात. याखेरीज बाग लावणें, लहान लहान खेळणीं तयार करणें, वाचणें, भरतकाम करणें, लोकरीचें विणकाम करणें व छोट्या छोट्या वस्तू जमविणें वगैरेसारखे व्यवसाय ही मंडळी नेहमींच करीत असतात. आम्हीं त्यांच्या स्वतंत्र खोल्या पाहिल्या. प्रत्येक खोलींत कॉलेजच्या वसतिगृहाप्रमाणें व्यवस्था होती. या खोल्या तेथें राहणाऱ्या प्रत्येक वृद्ध व्यक्तीनें आपापल्या आवडीप्रमाणें सजविलेल्या होत्या. तेथें त्यांच्या पूर्ववयांतील कर्तबगारीचे फोटो लटकत होते. नटांच्या व नटींच्या खोल्यांतून त्यांनीं तरुण वयांत केलेल्या निरनिराळ्या प्रसिद्ध भूमिकांचे फोटो होते, तर नाट्यसंगीत लिहिणाऱ्या व वाजविणाऱ्या कलावंतांच्या खोल्यांतून त्यांच्या जीवनांतील कांहीं विशिष्ट प्रसंगांचीं दृश्यें दिसून आलीं. खोलींतील प्रत्येक वस्तु वेगवेगळी अभिरुचि दर्शवीत होती. कुणाला बाहुल्या सांठविण्याचा छंद दिसला, तर कुणाला पक्षी पाळण्याची किंवा फुलझाडांच्या कुंड्या लावण्याची हौस दिसली. एका नटीनें तर एक खूप मोठी बाहुली, एखाद्या लहान मुलीप्रमाणें आपल्या बिछान्यावर पांघरूण घालून झोपविली होती. म्हातारपण व बालपण सारखेंच असतें असें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे! कारण ही नटी एका काळीं उत्तम बॅलेनर्तिका होती. सध्यां हिचें वय ७२ वर्षांचें आहे; पण तिचा बाहुलीसंबंधींचा षोक मात्र अद्यापि एखाद्या लहान बालिकेप्रमाणें आहे. मीं तिची स्वाक्षरी घेतली आहे. 'लिईकॉव्ह' नांवाच्या एका प्रसिद्ध नटानें आपल्या पूर्ववयांतील भूमिकांच्या फोटोंनीं सबंध खोली भरून टाकलेली होती. त्यांतील आपला नेपोलियनच्या वेषांतील फोटो आम्हांला त्यानें मोठ्या अभिमानानें दाखविला.

वृत्तपत्रें व पुस्तकें वाचणें, दैनंदिनी लिहिणें व बुद्धिबळें किंवा गंजिफा खेळणें हा येथील मंडळींचा दैनिक कार्यक्रम असतो. जगांतील वेगवेगळ्या घडामोडींचें ज्ञान या लोकांना व्हावें म्हणून मधून मधून तज्ज्ञांचीं व्याख्यानें येथें ठेवलीं जातात. उद्यां Atomic Energy वर येथें एक व्याख्यान व्हावयाचें आहे. हीं वृद्ध माणसें आपलीं पाळलेलीं कुत्रीं मांजरें घेऊन बागेंत फिरत असतात. परंतु ज्यांना फिरावयाची शक्ति नाहीं अशांसाठीं दर्शनी व्हरांड्यांत हवा खात बसण्यासाठीं खास व्यवस्था केली आहे. नवीन बांधली जात असलेली इमारत या व्हरांड्याला जोडण्यांत येत आहे. या इमारतींत सर्व अद्ययावत् सुखसोई करण्याची योजना आहे. येथें एक प्रशस्त Concert Hall बांधला असून त्याचा उद्घाटन समारंभ ७ नोव्हेंबर रोजीं होणार आहे. या गृहाचे व्यवस्थापक श्री. अँड्रयू हौशी व आनंदी आहेत. ते आम्हांला म्हणाले, " इतके दिवस मी ही सर्व व्यवस्था ठेवीत आहें. पण आतां दिवसेंदिवस मी म्हातारा होत चाललों. " मीं त्यांना हंसून म्हटलें, " छे छे, श्री. अँड्र्यू, उलटपक्षीं तुमचा उत्साह व आनंदी वृत्ति पाहून मला असें वाटतें कीं, तुम्ही दिवसेंदिवस तरुण होत चाललां आहांत ! " यावर श्री. अँड्रयू मनमोकळेपणानें खूप हंसूं लागले.

या सबंध गृहाचें वातावरण स्वच्छ, सुंदर व प्रसन्न होतें. मध्यवर्ति दालनांत, गृहाची मूळ संस्थापिका ' सबीना ' व तिचे पति यांच्या तसबिरी असून, बागेमध्यें दोघांचीं थडगीं आहेत. या सर्व वृद्धांना या जोडप्याबद्दल अतिशय कृतज्ञता वाटते असें दिसतें. कारण त्या थडग्यांवर कित्येक पुष्पगुच्छ वाहिलेले आम्हांला दिसले. बागेंत फिरणाऱ्या त्या सदा आनंदी व खेळकर वृद्ध स्त्रीपुरुषांबरोबर आमच्या दुभाषांच्या मार्फत थोडा वेळ बोलून, आम्हीं व्यवस्थापकांचा निरोप घेतला. अशाच प्रकारचें कलावंतगृह मॉस्को येथेंहि आहे. युक्रेनमध्येंहि सध्यां एक नवीन बांधलें जात आहे. सध्यां आपल्या इकडे रंगभूमीची एका काळीं प्रामाणिकपणें सेवा केलेले अनेक वृद्ध नट व नाटककार अर्धपोटीं जगत आहेत. अशा तऱ्हेची कांहीं योजना आपल्या सरकारनें अवश्य आंखावयास हवी. खरोखर अशा दुबळ्या कलावंत वृद्धांसाठीं अशीं गृहें बांधलीं तर त्यामुळें त्यांचें जीवन कितीतरी सुखकर होईल!

आम्हीं रशियांतील 'वेदनारहित प्रसूति' ( Painless Delivery ) संबंधीं बरेंच ऐकलें होतें. त्यामुळें येथील एका प्रसूतिगृहाला आम्हीं मुद्दाम भेट दिली. आमच्यापैकीं बहुतेकांची अशी समजूत होती कीं, रशियन वैद्यकशास्त्रज्ञांनीं या बाबतींत एखादी अद्‌भुत वल्ली शोधून काढली असावी व तिचें इंजेक्शन दिलें कीं वेदनारहित प्रसूति होत असावी व म्हणूनच आम्ही सर्वजणी प्रसूतिगृह पाहण्यासाठीं फार उत्सुक होतों. परंतु तेथें गेल्यावर या बाबतींत आमचा गैरसमज झाला होता असें आम्हांला दिसून आलें. प्रसूतिगृहाच्या मुख्य डॉक्टरांनीं वेदना उत्पन्न कां होतात यासंबंधींचें विवेचन केलें. ते म्हणाले, "वेदना या प्रामुख्यानें भीति, अज्ञान व मज्जातंतूंवरील फाजील ताण या कारणास्तव उत्पन्न होतात. वास्तविक त्या खऱ्या नसून आभासमयच असतात. त्यामुळें येथें आम्हीं प्रत्येक स्त्रीला गरोदरपणाच्या पहिल्या महिन्यापासून यासंबंधींची माहिती देतों. त्यांना आम्ही सुलभ पण उपयुक्त व्यायामहि शिकवितों. आमची 'वेदनारहित प्रसूति'ची कल्पना पावलोव्ह या शास्त्रज्ञाच्या 'मेंदूची क्रिया' या तत्त्वावर आधारलेली आहे. प्रत्येक भावी मातेला आम्ही आत्मविश्वासाचे धडे देतों. वास्तविक या बाबतींत मानसशास्त्रावरच आम्हीं अधिक भर दिलेला आहे. आमचें हें नवें तंत्र पाहण्यासाठीं अनेक देशांतून डॉक्टर मंडळी येत असतात."

हें प्रसूतिगृह अतिशय स्वच्छ असून कुठेंहि आरडाओरडा आम्हांला आढळून आला नाहीं. निरनिराळे वॉर्ड पाहण्यास जाण्यापूर्वी आम्हांला एप्रेन ( झगे ) घालावे लागले व डोक्यावरूनहि आच्छादनें घ्यावीं लागलीं. आमच्यापैकीं एक प्रतिनिधि म्हणाल्या, "या सुलभ प्रसूतींत विशेष काय आहे? आपल्याकडे तर खेडेगांवांतून शेतकरी स्त्रिया शेतांतहि प्रसूत होतात." मला खूप हंसू आलें. कारण अशा तऱ्हेनें हिंदुस्थानांतील असंख्य खेड्यांतून सेप्टिकच्या किती केसीस होतात व त्यामुळें किती बालकें व माता मृत्युमुखीं पडतात याचें स्मरण या प्रतिनिधीबाईंना नसावें असें मला वाटलें. असो, मुलांचा वॉर्ड नवीन जन्माला आलेल्या निरोगी व गुबगुबीत मुलांनीं भरलेला दिसला. सोव्हिएत रशियांत मातृत्वाला विलक्षण मान आहे. त्यामुळें गरोदरपणीं प्रत्येक स्त्रीची सरकारतर्फे अतिशय काळजी घेण्यांत येते. सर्व

८८७७

औषधोपचार मोफत आहेतच. पण याखेरीज, दूध, फळें, अंडीं वगैरेसारखा उपयुक्त आहार या काळांत प्रत्येक भावी मातेला घेणें शक्य होईल अशी तरतूद सरकारकडून केली जाते. प्रत्येक मूल जन्माला आल्यापासून त्याच्या आरोग्यासंबंधींची नोंद ठेवण्यांत येऊन त्याची उत्तम प्रकारें वाढ व्हावी म्हणून त्याच्या आईला दरमहा पन्नास रूबल्स देण्यांत येतात. याखेरीज प्रत्येक मुलाच्या जन्मानंतर त्या कुटुंबाला सरकारांत भराव्या लागणाऱ्या करां-संबंधींहि सवलती मिळतात. दहा मुलांच्या आईला 'वीरमाता' हा किताब मिळून दहा हजार रूबल्सचें 'स्टॅलिन प्राइझ' देण्यांत येतें. आपल्याकडे अशी एक म्हण आहे कीं, 'पहिली बेटी आणि रुपयाची पेटी' परंतु रशियांत तर प्रत्येक मूल जन्माला येतांना आईबापांसाठीं एक पेटाराच घेऊन येतें असें दिसतें.

काल संध्याकाळीं आम्हीं बाजारपेठेंतहि चक्कर मारली. लेनिनग्राड हें एक व्यापारी केंद्र असल्यामुळें येथील बाजारपेठ अतिशय भव्य आहे. मोठमोठीं डिपार्टमेंटल स्टोअर्स रस्त्याच्या दुतर्फा दिसून येतात. तेथें रशियांत तयार होणारा सर्व माल येतो. लेनिनग्राडमधील या दुकानांत आम्हांला रशियांत तयार होणारें अत्यंत सुबक, पण मजबूत कट् ग्लासचें कांचसामान पहावयास मिळालें. या कांचसामानाच्या बाबतींत रशियानें झेकोस्लोव्हाकियाचें अनुकरण केलेलें दिसलें. या कांचसामानापैकीं पाण्याच्या सुरया व पेले अप्रतिम होते. परंतु त्यांच्या किंमतीहि जबरदस्त होत्या. त्यामुळें त्यांच्याकडे फक्त पाहूनच समाधान मानण्यापलिकडे आम्ही कांहींच करूं शकलों नाहीं. आमच्यापैकीं कांहीं पैसेदार प्रतिनिधींनीं मात्र बरीचशी खरेदी केली.

आज सकाळीं आम्ही येथील निकोलस्की कॅथेड्रल पहावयास गेलों. हें चर्च पहिल्या पीटरच्या मुलीनें सतराव्या शतकांत बांधलें. अशीं १४ पुरातन प्रार्थनामंदिरें येथें आहेत. हें प्रार्थनामंदिर फारसें मोठें नसूनहि त्यांतील शिल्पकाम पाहण्यासारखें आहे. येथें आम्हांला अनेक जुनीं पेंटिंग्ज पाहण्यास मिळालीं. सध्यां रशियांत धर्मशिक्षण दिलें जात नाहीं. पूर्वीं तें शाळांतून दिलें जाई. त्याचप्रमाणें 'मानवतावाद' हाच खरा धर्म अशी कल्पना दृढमूल झाली असल्यामुळें प्रार्थनामंदिरांत फक्त म्हातारीं माणसें व तुरळक

तरुण स्त्रिया आम्हांला आढळल्या. या मंदिराला सरकार मदत करीत नसून आपल्या देशाप्रमाणें तें भक्तांच्या मदतीवर चालतें. प्रत्येक प्रार्थनेच्या वेळीं सुमारें २०,००० रूबल्स जमा होतात; परंतु दिवसेंदिवस लोक अश्रद्ध होत चालले आहेत असें तेथील डीन फादर अलेक्झांडर आम्हांला म्हणाले. फादर अलेक्झांडर बरेच वृद्ध आहेत. परंतु त्यांचें व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी वाटलें. त्यांची शरीरयष्टि भव्य असून पांढरी शुभ्र दाढी त्यांच्या छातीवर रुळत होती. चेहरा प्रसन्न व हंसतमुख असून बोलणें सौम्य व परिणामकारक होतें. त्यांच्या गळ्यांतील सोन्याच्या सांखळींत अडकविलेले दोन रत्नजडित क्रॉस त्यांच्या भव्यतेंत भर घालीत होते. त्यांनीं आम्हांला या मंदिरासंबंधीं बरीच माहिती दिली. ते आम्हांला आमच्या मोटारीपर्यंत पोंचविण्यास आले होते.

आज आम्हीं येथील मुलांची स्वप्ननगरी पाहिली. तिच्यासंबंधींची सारी हकीकत मी माझ्या पुढील पत्रांत तुला लिहीन. तोंपर्यंत विशेष कांहींच नाहीं. तुम्हां साऱ्यांकडून आलेलीं पत्रें माझी वाट पहात मॉस्कोंत थांबलीं असतील असें वाटतें.

तुझी

**सौ. चारुशीला**

---

## पत्र नववें

**हॉटेल ॲस्टोरिया**

**लेनिनग्राड**

दिनांक ८ मे १९५४

प्रिय शांता,

गेल्या जानेवारींत जेव्हां मी जिनिव्हा येथें आंतरराष्ट्रीय महिला संघटनेच्या अधिवेशनाला गेलें होतें, तेव्हां तेथें आलेल्या रशियन स्त्री–प्रतिनिधींकडून

रशियांतील 'पायोनियर पॅलेस 'बद्दल मीं बरीच मनोरंजक माहिती ऐकली होती. त्यामुळें पायोनियर पॅलेस हें प्रकरण काय असावें याबद्दल तेव्हांपासूनच माझ्या मनांत एक प्रकारचें तीव्र कुतूहल उत्पन्न झालें होतें व रशियांत पाय ठेवल्यापासून ही पायोनियर चळवळ पाहण्यासाठीं मी फार उत्सुक होतें.

आम्हीं पाहिलेला हा पायोनियर पॅलेस अति भव्य होता. पूर्वीं येथें झारच्या कुटुंबांतील माणसें राहात असत. हा राजवाडा २०३ वर्षांपूर्वी बांधला गेला आहे. क्रांतीनंतर १९३७ मध्यें योग्य त्या सुधारणा करून तो रशियन मुलांना बहाल करण्यांत आला. मुलांना प्रसन्नता वाटेल अशी त्याची सजावट करण्यांत रशियन स्त्रियांनीं प्रामुख्यानें भाग घेतला असून त्यांत त्यांची उत्कृष्ट सौंदर्यदृष्टि दिसून येते. अशा प्रकारचे लहान मुलांचे क्लब सबंध रशियांत सर्वत्र विखुरले आहेत. हा क्लब मात्र बराच मोठा असून याची सभासदसंख्या सात लाख आहे. सात ते सतरा वयोमर्यादेचीं मुलें याचा सभासद होऊं शकतात. रशियांतील मुलांचे आपापसांत स्नेहभाव वृद्धिंगत व्हावेत व मुलांच्या उपजत कलावृत्तीला उत्तेजन मिळावें म्हणून या क्लबांची योजना असून ती खरोखरीच यशस्वी झालेली आहे असें आम्हांला दिसून आलें. आम्ही जेव्हां हा पायोनियर पॅलेस पहावयास गेलों तेव्हां तेथें बहुसंख्य मुलें हजर होतीं.

रशियांतील यासारख्या पायोनियर पॅलेसचा सर्व खर्च सरकार करतें. त्याचे सभासद होण्यासाठीं मुलांना पैसे द्यावे लागत नाहींत व याखेरीज मुलांच्या बौद्धिक व कलात्मक विकासाला अशा संस्थांची अतिशय मदत होत असल्यामुळें रशियन पालक आपल्या मुलामुलींना मोठ्या आनंदानें 'पायोनियर' होण्याची परवानगी देतात. पायोनियरचा गणवेष घातलेल्या त्या मुलांनाहि आपण 'पायोनियर' आहोंत या जाणिवेनें अतिशय अभिमान वाटतो असें दिसतें.

अशा या संस्थांतून संगीत, नृत्य, चित्रकला, वाङ्मय, शास्त्र व क्रीडा असे अनेक विभाग असतात; व याखेरीज व्यायामशाळा, सिनेमागृह, वाचनालय वगैरेसारखे जोडविभागहि असतात. प्रत्येक सभासदास यांपैकीं कोणतेहि दोन विभाग खास अभ्यासासाठीं निवडतां येतात. प्रत्येक विभागांत तज्ज्ञ

शिक्षक असून मुलें त्यांच्या देखरेखीखालीं अभ्यास करीत असतात. आम्हीं पाहिलेल्या या एकाच क्लबांतील शिक्षकांची संख्या २२६ होती.

आम्ही तेथें जाऊन पोंचतांच अनेक पायोनियर मुलांनीं आमचें स्वागत केलें. सर्व बालकें हंसतमुख व तरतरीत दिसत होतीं. आमचे हात धरून तीं आम्हांला निरनिराळ्या दालनांतील व्यवस्था दाखवूं लागलीं. प्रथम आम्हीं क्रीडाविभाग पाहिला. तेथें मुलें अनेक प्रकारचे बैठे खेळ खेळत होतीं. त्यांतले कांहीं प्रकार आम्हांला अपरिचित होते. मला त्यांतला, अगदीं लहान मुलांसाठीं ठेवण्यांत आलेला खेळाचा प्रकार अतिशय आवडला व तो म्हणजे 'How many profiles?' लांकडाच्या लहान लहान पट्ट्या जोडून एक मानवी चेहरा तयार केला होता. त्या पट्ट्या सरकत्या होत्या. आपल्याला हव्या त्या तऱ्हेनें त्या मागेंपुढें करून अनेक प्रकारचे मानवी चेहरे तयार करतां येतात. ते खूप गंमतीदार दिसतात. त्या एका खेळण्यांतून १४८०० चेहरे तयार करतां येतात, असें आम्हांला त्यांनीं सांगितलें. याशिवाय तेथें Games of Mathematical Sequences व Law of Reflection Toy वगैरेसारखीं, मुलांच्या बुद्धीला व कल्पनेला चालना देणारीं अनेक खेळणीं मला तेथें आढळलीं. या क्रीडाविभागाला जोडून असलेल्या एका भव्य दालनांत मुलांना मिळालेल्या अनेक देशांतील देणग्या व्यवस्थित रीतीनें लावून ठेवलेल्या दिसल्या. त्यांत एका भागांत भारतीय देणग्याहि होत्या. परंतु तो भाग इतर विभागांच्या मानानें अतिशय छोटा दिसला; कारण भारतीय खेळण्यांची संख्या अल्प होती.

क्रीडाविभाग पाहिल्यानंतर आम्हीं निरनिराळे अभ्यासवर्ग पाहिले. मला त्यांचा 'परीकथाविभाग' (Room of Fairy Tales) हा विभाग फार पसंत पडला. रशियांतील लोककलेचा (Folk Arts) येथें एक वेगळाच नमुना आम्हांला पाहावयास मिळाला. दालनाच्या भिंतींना, नेत्राला आल्हाद देणारे पण सौम्य रंग दिले असून त्यावर रशियांतील परीकथांचीं सुंदर चित्रें रेखाटलीं होतीं. छतावर रमणीय वेलबुट्टी काढलेली असून मधून मधून चित्रविचित्र रंगाचीं कांचेचीं झुंबरें लटकत होतीं. गोष्टी ऐकण्यासाठीं येणाऱ्या छोट्या मुलांना बसण्यासाठीं खास तयार करण्यांत आलेल्या खुर्च्या व त्यासमोरील

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
३८८७८ वि निबंध
नों दि ९५८९



मेजेंहि अतिशय आकर्षक नमुन्याचीं होतीं. आम्ही या दालनांतील चित्रें पाहात असतांना तेथें कांहीं छोटे पायोनियर आले. एका आठ वर्षें वयाच्या 'वाजिक' नांवाच्या मुलानें मला त्याच्या गळयाला बांधलेला 'पायोनियरचा' लाल गळपट्टा भेट म्हणून दिला व तो मला म्हणाला, "तुम्हीं हिंदुस्थानांतील मुलांना आमचा पत्ता देऊन आम्हांला तुमचीं पोष्टाचीं तिकिटें पाठविण्यास सांगा." मी त्याला पोष्टाचीं तिकिटें पाठवून देण्याचें आश्वासन दिलें, तेव्हां त्याला फारच आनंद झाला.

या पॅलेसमधील तांत्रिक विभाग मात्र खरोखरीच अतिशय प्रेक्षणीय आहे. त्यांत सुतारकाम, धातुकाम, यंत्रकाम वगैरेसारखे अनेक पोटविभाग असून तेथें मुलेंमुली विविध प्रकारच्या कार्यांत गढून गेलेलीं आम्हांला दिसलीं. या विभागांतून अनेकविध यंत्रें असून त्यांच्या साहाय्यानें मुलामुलींनीं सुंदर मॉडेल्स तयार केलीं होतीं. त्या मुलांनीं बनविलेली ती इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, ग्रामोफोन, रेडिओ, रेल्वे एंजिन वगैरेसारखीं छोटीं यंत्रें पाहून आम्हांला कमालीचें आश्चर्य वाटलें. एका दालनांत मुलें छोटीं विमानें तयार करीत होतीं. एकीकडे छोटीं मुलें 'घरांत विजेचा पुरवठा कसा होतो' याचें मॉडेल मेकॅनोच्या साहाय्यानें तयार करीत होतीं; तर दुसरीकडे 'आपल्या घरांत पाणी कसें खेळतें' याचें प्रात्यक्षिक दाखविणारें एक सुंदर मॉडेल तयार करून ठेवलेलें दिसलें. लहान मुलांनीं तयार केलेल्या या मॉडेलमधील बारकावे पाहाण्यासारखे होते. लहानपणापासून मुलांना यांत्रिक बाबतींत शिक्षण देऊन त्यांत रस घेण्यास मदत करण्याचा हा रशियांतील उपक्रम अभिनव आहे असें म्हणावें लागतें !

येथें एक लहानसें नाट्यगृह असून त्याची सर्व व्यवस्था मुलेंच पाहातात. स्वतः बनविलेल्या पपेटचा एक खेळ त्या उत्साही मुलांनीं आम्हांला करून दाखविला. त्यानंतर नृत्यशाळा, व्यायामशाळा वगैरेसारखे विभाग पाहून आम्हीं त्या मुलांचा निरोप घेतला. आमच्या दोन तासांच्या येथील वास्तव्यांत माझ्याबरोबर असणाऱ्या 'नीना' नांवाच्या छोट्या पायोनियर मुलीचा निरोप घेणें मला फार जड गेलें. नीना आठ वर्षांची आहे. ती नृत्य फारच सुंदर करते. ती अतिशय निकोप व सुंदर असून तिचे भावदर्शी टपोरे डोळे

तिच्याकडे पाहाणाऱ्याचें मन आकर्षण करतात. ती खूप बोलकी आहे. आमच्या दुभाषीच्या मार्फत तिनें मला अनेक प्रश्न विचारले, स्वतःचा पत्ता दिला व माझा फोटो सुद्धां मागून घेतला. मीं दिलेल्या कांचेच्या बांगड्या तिनें मोठ्या कौतुकानें आपल्या हातांत घातल्या. मी परत जाण्यासाठीं मोटारींत बसेतोंवर ती लाघवी पोर मला बिलगून होती, व आमची मोटार सुरू झाल्याबरोबर तिच्या टपोऱ्या डोळ्यांतून दोन अश्रुबिंदू खालीं ओघळले. कधीं कधीं असे नाजूक लागेबांधे कुठें तरी अकस्मात् जुळून जातात! रशियन सरकारनें निर्माण केलेली ती मुलांची स्वप्ननगरी व त्यांत संचार करणारी निष्पाप अन् टपोऱ्या नेत्रांची ती छोटी परी—नीना यांचें विस्मरण मला कधींच होणार नाहीं.

काल येथील एक अतिशय जुनी Engineering Factory आम्हीं पाहिली. १८६५ मध्यें या कारखान्यांतून पहिलें जहाज तयार झालें. आतां-पर्यंत या कारखान्यांतून तीस हजार वर लोकोमोटिव्ह तयार झालीं आहेत. क्रांतिपूर्व काळांत येथें युद्धोपयोगी साधनें तयार करण्यांत येत असत. परंतु सध्यां शांतलेला अनुरूप अशीं प्रगतीपर यंत्रेंच तयार करावयाचीं असें ध्येय या कारखान्यानें आपल्यापुढें ठेविलेलें दिसतें. गेल्या महायुद्धांत या कार-खान्यावर अनेकवार बॉम्ब पडून बरीच नुकसानी झाली आहे. या प्रचंड कारखान्याच्या अवतींभंवतीं एक मोठें आवार असून येथें कामगारांना राहाण्यासाठीं घरें बांधलीं जात आहेत. कारखान्याला जोडूनच कामगारां-साठीं एक आरोग्यकेंद्र व त्यांच्या मुलांसाठीं बालगृह आहे. तेथें सध्यां दोनशें मुलांची सोय होते. हीं कामगारांचीं मुलें स्वच्छ व नीटनेटकीं असून या बालगृहांत मुलांच्या आरोग्याची व मानसिक विकासाची चांगल्या प्रकारें दक्षता घेतली जाते.

कामगारांच्या यांत्रिक ज्ञानांत भर पडण्यासाठीं तेथें एक Professional Engineering School आहे. त्याचे वर्ग संध्याकाळीं भरतात. येथें एकाच वेळीं एकशेंपन्नास कामगार शिक्षण घेऊं शकतात. या वर्षीं तेथें चोपन्न कामगारांना पुरेसें होईल एवढें एक लहानसें Engineering College सुध्दां उघडण्यांत आलें आहे. तेथें निरनिराळे यंत्रप्राविण्य कोर्स आहेत. अशा

तऱ्हेनें शिक्षण घेऊन वरच्या जागा मिळविलेले अनेक कामगार तेथें आम्हांला भेटले. या कारखान्याचे मुख्य डायरेक्टर श्री. टिशिन आज सत्तावीस वर्षें येथें काम करीत आहेत. त्यांनीं पण आपला अभ्यासक्रम कारखान्याला जोडून असलेल्या सायंवर्गांतूनच पुरा केला आहे. त्यांनीं या कारखान्यांत टर्नरच्या कामापासून सुरुवात केली. नंतर पंधरा वर्षें ते डिझाईनर म्हणून होते; व आतां सबंध कारखान्याचे ते डायरेक्टर झाले असून त्यांचा दर्जा फार मोठा आहे. दरमहा शंभर रूबल्सप्रमाणें कामाला सुरुवात करून सध्यां त्यांना दरमहा पांच हजार रूबल्स वेतन मिळतें. ते ट्रेड युनियन कौन्सिलचे अध्यक्ष आहेत.

या कारखान्यांत पांच हजाराच्या वर कामगार काम करीत असून त्यांना सरासरीनें दरमहा आठशें रूबल्स वेतन मिळतें. ठराविक कामापेक्षां जास्त काम केल्यास अधिक पैसे मिळूं शकतात. जुने अनुभवी कामगार नव्या कामगारांना त्यांच्या कामांत साहाय्य करीत असतात. कामाच्या प्रमाणावर व प्रगतीवर कामगारांचा उत्कर्ष अवलंबून असतो. कामगारांना बोनसबरोबरच त्यांनीं केलेल्या दीर्घ कालाच्या कामगिरीबद्दल बिदागीहि मिळते. मर्यादित वयोमानानंतर जरी त्यांना पेन्शन मिळत असलें तरी त्यांनीं कारखान्यांत काम करूं नये असा दंडक नाहीं. जर त्यांनीं तेथें काम केलें तर पेन्शनच्या पैशाबरोबरच त्या कामाबद्दलचें वेतन त्यांना मिळून त्यांच्या मिळकतींत भर पडते. वरील कामगारांचा पगार नऊशें पन्नास ते पांच हजार रूबल्सपर्यंत असतो. येथील सर्व कामगार ट्रेड युनियनचे सभासद आहेत. कारखान्यांत ट्रेड युनियनचें कौन्सिल असून ती संस्था सर्व कामगारांना एकत्रित आणते. कामगारविमा विभागणीवर त्यांची देखरेख असते. याखेरीज कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांना गरोदरपणांत देण्यांत येणाऱ्या सवलती, आजारी कामगारांना देण्यांत येणारी आर्थिक मदत वगैरे सर्व गोष्टी हें कौन्सिलच पाहात असतें. येथें आम्हांला बऱ्याच स्त्री–कामगार दिसल्या. येथें स्त्रिया पुरुषाच्या एवढेंच किंवा कधीं त्यांच्यापेक्षांहि जास्त काम करतात व त्यामुळें त्यांना वेतनहि अधिक मिळतें. कारखान्यांतून परत येते वेळीं आम्हीं बॉम्बमुळें उध्वस्त झालेला भाग पाहिला. कारखान्यांतील सर्व कामगार

सालस व आनंदी वृत्तीचे वाटले. त्यांच्यामध्यें कांहीं कोरीयन व चिनी कामगारहि होते.

त्या कामगार राज्यांतून हॉटेलकडे परत जातांना आम्ही लेनिनग्राडचा सुप्रसिद्ध स्टेडियम पाहिला. हा स्टेडियम मुंबईच्या ब्रेब्रोर्न स्टेडियमच्या तिप्पट प्रचंड असून तेथें सुमारें सव्वा लाख प्रेक्षकांची बसण्याची सोय आहे. मला वाटतें, या स्टेडियमचा जगांतील स्टेडियममध्यें दुसरा नंबर लागेल. स्टेडियम शहरापासून कांहींशा अंतरावर असून त्याच्या आजूबाजूचें वातावरण व निसर्गशोभा अवर्णनीय आहे. हिंवाळ्यांत या स्टेडियमच्या मध्यवर्ति मैदानांत 'स्केटिंग' करण्यासाठीं अनेक हौशी लोक जमतात. त्याच हिंवाळ्यांत जेव्हां येथें बर्फ सांचतें तेव्हां त्या बुळबुळीत पृष्ठभागावर टांच-नृत्य ( Tap Dancing ) करण्यासाठीं येथें रशियांतील अनेक विभागांतून व इतर कांहीं देशांतूनहि नामांकित कलावंत येतात व सबंध स्टेडियम प्रेक्षकांनीं गच्च भरून जातो.

रशियांत निरनिराळ्या खेळांना अतिशय महत्त्व देण्यांत येतें, असें दिसून येतें. क्रीडाप्रवीण लोकांना सरकारकडून योग्य तो पुरस्कार देण्यांत येतो व साहाय्य होतें. त्यामुळें सध्यां जागतिक क्रीडासामन्यांत रशियानें उच्चांक गांठलेला दिसतो. कांहीं दिवसांपूर्वीं स्वित्झर्लंडमध्यें बर्न येथें झालेल्या खेळांच्या स्पर्धेत सव्वीसांपैकीं अठरा पहिलीं बक्षिसें रशियानें पटकाविलीं. इतकेंच नव्हे तर गेलीं एकशेंएक वर्षें नौका वल्हवण्याच्या स्पर्धेत ऑक्सफर्ड किंवा केंब्रिजनें सतत मिळविलेला क्रमांकहि या वर्षीं रशियानें इंग्लंडमध्यें जाऊन मिळविला आहे. योग्य वेळीं योग्य संधि दिल्याचा हा सुपरिणाम, दुसरें काय !

विशेष कांहींच नाहीं.

तुझी

**सौ. चारुशीला**

## पत्र दहावें

हॉटेल ॲस्टोरिया
लेनिनग्राड
दिनांक ९ मे १९५४

प्रिय शांता,

आज येथील हवेंत थोडासा फेरफार झाला आहे. काल संध्याकाळपर्यंत आकाश निरभ्र असून थंडी पण बेताची होती. पण आज मात्र थंडी कडाक्याची पडली असून मधून मधून हिमवर्षावहि होत आहे. निव्हा नदीवर बर्फाचे मोठमोठे खडे तरंगूं लागले आहेत. ओव्हरकोटावरून रेनकोट पांघरून या कडक थंडींतहि इकडून तिकडे धांवपळ करणारी ती सदा उद्योगी रशियन मंडळी पाहून सकौतुक आश्चर्य वाटतें.

सकाळीं आम्ही येथील विख्यात 'विंटर पॅलेस' पहावयास गेलों होतों. माझ्या एका पत्रांत मी तुला येथील 'समर पॅलेस'चें वर्णन लिहिलें होतें, त्या उन्हाळी प्रासादाप्रमाणेंच हा 'हिंवाळी प्रासाद' झारच्या कुटुंबांतील माणसांना राहण्यासाठीं १७६२ मध्यें बांधण्यांत आला. हा प्रासाद अति भव्य असून त्यांत १०५७ विस्तृत दालनें आहेत. 'येथील भिंतींची खराबी करूं नये' असा फलक असूनहि एखाद्या प्रसिद्ध इमारतीच्या भिंतीवर कुणा व्रात्य प्रवाशांनीं आपलें नांव वेड्यावांकड्या रेघोट्यांनीं कोरावें त्याप्रमाणें शिल्पकलेच्या या सुंदर नमुन्यावर १९१७ सालच्या क्रांतीनें अनेक अदृश्य पण रक्तलांछित खुणा मागें ठेवल्या आहेत. ते प्रसंग अदृश्य आहेत, पण हा प्रासाद पाहणाऱ्यांना त्यांची स्मृति झाल्याशिवाय राहात नाहीं. हा प्रासाद युरिटस्की स्क्वेअर नांवाच्या एका मोठ्या चव्हाट्यासमोर असून येथें 'रक्तरंजित रविवार' नांवानें इतिहासांत ओळखल्या जाणाऱ्या एका रविवारीं १९१७ सालीं हजारों निरपराधी कामगारांच्या रक्ताच्या नद्या वाहिल्या. तथापि 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम्।' या संस्कृत वचनांतील दुर्जनाप्रमाणें सौंदर्याचें पांघरूण घेऊन उभ्या राहिलेल्या या साळसूद प्रासादा-

कडे पाहून क्रांतिकाळाचा तो सारा रोमांचकारी व अप्रिय इतिहास डोळयां-समोर उभा राहिल्याशिवाय राहात नाहीं.

या प्रासादाचे दोन भाग केले आहेत. एका भागांत नव्या जुन्या जग-प्रसिद्ध चित्रकारांचीं चित्रें असून या भागाला ' हर्मिटेज ' म्हणतात. दुसऱ्या भागांत वस्तुसंग्रहालय असून त्यांत क्रांतिकालांतील अनेक महत्त्वपूर्ण वस्तू मांडून ठेवलेल्या आहेत.

आमच्याबरोबर दोन प्रसिद्ध रशियन चित्रकार स्त्रियाहि होत्या. त्यामुळें प्रत्येक चित्राचे कलेच्या दृष्टीनें असणारे बारकावे त्यांनीं आम्हांला समजावून सांगितले. येथें आम्हांला ' लिओनार्डो–डा–व्हिन्सी 'सारख्या जुन्या चित्र-कारांच्या कलाकृती व ' मिनेपिकासो 'सारख्या संस्कारवादी संप्रदायांतील फ्रेंच चित्रकारांचीं चित्रें आढळलीं. किंबहुना हा हर्मिटेज पाहात असतांना युरोपांतील चित्रकला निरनिराळ्या शतकांतून कसकशी उत्क्रांत होत गेली याचा साद्यंत पण दृश्य इतिहासहि मिळतो. क्रांतिपूर्व व क्रांतीनंतरच्या रशियन चित्रकलेंत जमीनअस्मानाचा फरक झालेला आहे. आजची त्यांची चित्रकला सामान्य लोकांसाठीं असून तिनें सामान्यांतील असामान्यत्व हुडकून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि केवळ सामान्यांचींच सुखदुःखें चित्रांतून रेखाटलीं असल्यामुळें या चित्रांतून एक प्रकारचा साचेबंदपणा दिसून येतो. कारण झारशाहींत भोगलेल्या दुःखांची वेदना व लोकशाहींत अनुभवीत असलेल्या समाधानाची जाणीव याखेरीज इतर भावनांचा आविष्कार फारसा कुठेंच दिसून येत नाहीं. मात्र रशियन चित्रकारांचे Landscapes आदर्श वाटले. रेपिन् क्रॅमस्कॉय, डी बेझुग्लॉय वगैरे चित्रकारांचीं चित्रें उल्लेखनीय आहेत. मला निकोलाई रोमॅडिनचें Thiguly Pines व ॲलेक्झँडर क्युप्रिनचें Crimea Beassal Valley हीं चित्रें फार आवडलीं. इटालियन चित्रकारांच्या Madona and the Child व पोलस पॉटर नांवाच्या चित्रकाराचें विनोदी चित्र ' शिकाऱ्याची कोर्टतपासणी ' Punishment of a hunter हीं चित्रेंहि उल्लेखनीय भासलीं. शिकाऱ्याला रानांतील सर्व पशूंनीं घेरलें असून त्याच्या क्रूरतेचा जाब त्याला विचारण्यांत येत आहे. ' आतां कुठल्या तोंडानें मी उत्तर देऊं ? ' अशा प्रकारचा जो अगतिक भाव चित्रकारानें शिकाऱ्याच्या

चेहऱ्यावर दाखविला आहे, त्यांतून सुंदर विनोद निर्माण झालेला आहे. रशियन लोककलेचे ( Folk Art ) कांहीं उत्कृष्ट नमुनेहि येथें आम्हांला पांहावयास मिळाले. सोव्हिएत चित्रकारांचा कल प्रतीकात्मक चित्रें रंगविण्याकडे अधिक आहे. निसर्गाच्या पार्श्वभूमीवर मानवानें केलेले परिश्रम रंगवून कलेंत आत्यंतिक जिव्हाळा व जिवंतपणा निर्माण करण्याचें उद्दिष्ट आजच्या रशियन कलावंतांनीं स्वतःपुढें ठेविलें आहे.

या प्रासादांतील झारचें अंतर्गृह आम्हीं पाहिलें. अठराव्या शतकांतील चांदीच्या भांड्यांचे सुंदर नमुने तेथें आहेत. त्यापैकीं एक मद्य पिण्यासाठीं वापरण्यांत येणारा अतिशय मोठा चांदीचा पेला करावयास एक कारागीर एक वर्ष खपत होता. त्या पेल्यावरील नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. अठराव्या शतकांत ग्रेट ब्रिटनमध्यें तयार केलेलें एक मयूर–घड्याळ येथें आहे. मात्र ग्रेट ब्रिटनमधून रशियांत आणतांना त्याचा एक भाग मोडला आहे. तो भाग कुणीच दुरुस्त करूं शकलें नाहीं. या घड्याळाची रचनाहि खूप मजेदार आहे. त्याचे तासाचे व मिनिटाचे कांटे मशरूम्सच्या रूपानें दर्शविले असून एक मोठा मश्रूम ( Mushroom ) किल्ली देण्यासाठीं उपयोगांत आणतात. तासाचे ठोके पडतांना मात्र हे मश्रूम्स फिरतात. येथें आपल्या देशांतील साड्या, चित्रें, खंजीर, जुनीं चिलखतें वगैरे आम्हांला पहावयास मिळालीं. एका मोठ्या भव्य दालनांत भिंतीवर सोव्हिएत रशियाचा एक मोठा विस्तृत नकाशा तयार केला आहे. या नकाशाचा आराखडा मोत्यांनीं काढला असून आंतील शहरें, नद्या व पर्वत दाखविण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या रत्नांचा उपयोग केला आहे. मध्यभागीं माणकाचा रक्तरंगीत तारा असून सोव्हिएत रशियाचे १६ राष्ट्रसंघ दर्शविण्यासाठीं निरनिराळ्या रत्नांचे १६ छोटे तारे दाखविले आहेत. याखेरीज लेनिन, स्टॅलिन वगैरे वेगवेगळ्या काळांतील छायाचित्रें, दुसऱ्या ॲलेक्झांडरची तुटकी मोडकी गाडी, पहिल्या पीटरचें सिंहासन वगैरे अनेक इतिहासप्रसिद्ध वस्तू आम्हीं तेथें पाहिल्या. तसें पाहिलें तर सबंध राजवाडा पाहण्यास दोन दिवस अपुरे पडतील आणि म्हणूनच येथील ठळक गोष्टी पाहून आम्ही तेथून बॅले स्कूल पाहण्यास निघालों.

लेनिनग्राडमधील हें बॅले स्कूल अतिशय प्रसिद्ध असून येथून अनेक

कलावंत नृत्यकलेंत पारंगत होऊन बाहेर पडले आहेत. प्रथम हें फक्त लेनिनग्राडमधील विद्यार्थ्यांसाठींच होतें. परंतु आतां मात्र तेथें सोव्हिएत रशियांतील सर्व भागांतून विद्यार्थी व विद्यार्थिनी शिकावयास येतात. ही संस्था प्रथम वगानवा नांवाच्या एका नृत्यकारानें १८ व्या शतकांत सुरू केली. त्यापूर्वी मॉस्कोमध्यें नृत्यासंबंधींचें शिक्षण दिलें जात असे. तेथें ९ वर्षांचा कोर्स आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला एक खास पद्धत किंवा शाखा घ्यावी लागते व समाजांत नृत्य करतांना फक्त तीच पद्धत अंगीकारावी लागते. त्यामुळें नृत्याच्या एका विशिष्ट शाखेचा तो तज्ज्ञ बनतो. आपल्याकडे Jack of all trades and Master of None अशी जी परिस्थिति आहे तसें येथें होत नाहीं. हा नऊ वर्षांचा कोर्स पुरा केल्याखेरीज कुठल्याहि कलावंतास सार्वजनिक कार्यक्रमांत भाग घेतां येत नाहीं. येथें दहा वर्षांपासून विद्यार्थिनींना घेतात. कारण लहान वयांत मुलें अधिक प्रमाणांत संस्कारक्षम असतात. पहिल्या व दुसऱ्या वर्गांत आम्ही गेलों तेव्हां तेथें आम्हांला ताजेकिस्थानमधल्या अनेक छोट्या विद्यार्थिनी आढळल्या. नऊ वर्षांचा कोर्स पुरा झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पदवी मिळते. येथें अनेक विभाग आहेत. पहिल्या व दुसऱ्या विभागांत नृत्यकलेविषयीं सर्वसामान्य माहिती शिकविण्यांत येते. तिसऱ्या व चवथ्या विभागांत अनुक्रमें संगीत व नृत्याचे प्रत्यक्ष धडे दिले जातात. पांचव्या विभागांत बॅले नृत्याचा इतिहास अभ्यासावा लागतो. सहाव्या वर्गांत मेकअपचें ज्ञान करून देण्यांत येतें. सातव्या वर्गांत चेहऱ्यावरचे भाव कसे बदलावे याचें शिक्षण दिलें जातें व आठव्या नवव्या वर्गांत प्रत्यक्ष रंगभूमीवर कोणत्या वेळीं कोणतें संगीत व अभिनय अनुकूल होईल हें शिकवितात. या माहितीवरून तुझ्या लक्षांत आलेंच असेल कीं, उत्तम कलावंत होण्यासाठीं येथील कलावंतांना केवढे परिश्रम घ्यावे लागतात! नाहीं तर आपल्याकडे एक दोन वर्षें हौस म्हणून नृत्य शिकून त्या कलेच्यासंबंधीं सखोल ज्ञान करून न घेतांच अनेक मंडळी आपल्या नृत्याचे प्रयोग करून दाखवितात व थोड्याच दिवसांत मागें पडतात. येथें आम्ही कांहीं वर्गांत जाऊन नृत्यकलेचें शिक्षण कसें देतात हें पाहिलें. तेथें कांहीं विद्यार्थी व विद्यार्थिनी नृत्य करीत होत्या. किती तालबद्ध त्यांचीं पावलें पडत होतीं! दररोज सकाळीं त्यांना व्यायाम घ्यावा लागतो. शरीर सुटसुटीत

व बांधेसूद ठेवण्यासाठीं विशिष्ट आहार घ्यावा लागतो. रशियांत इतरत्र धिप्पाड शरीरबांध्याच्या स्त्रिया आढळत असल्या तरी रशियांतील बॅलेरिना ( नर्तिका ) मात्र बांधेसूदपणाच्या बाबतींत आदर्श आहेत. येथील नृत्य-वर्गामध्यें पांढरे शुभ्र कपडे घातलेल्या व शरीराचा सर्व तोल पायाच्या आंगठ्यावर आधारून नृत्य करणाऱ्या त्या नर्तिका व नृत्यकार यांचे संघ पाहून आम्हांला अतिशय आश्चर्य वाटलें. लेनिनग्राडमध्यें आम्ही रोज रात्रीं बॅले व ऑपेरा पाहतच आहोंत. त्यामुळें नृत्यकलेचा येथें केवढा विकास झाला आहे याची कल्पना आली. येथील मुख्याधिकारी एक म्हातारे रशियन गृहस्थ असून त्यांच्या हाताखालीं काम करणारी अधिकारी एक स्त्री आहे. तिचें नांव ॲना पावलोव्हा. ती रशियांतील एक जगविख्यात नर्तिका असून तिनें उदयशंकरबरोबर नृत्य केलेलें आहे. ती हिंदुस्थानांतहि येऊन गेली असल्या-मुळें तिच्या नृत्यकलेंतील प्राविण्याचा लाभ आपल्याकडील रसिकांना मिळालेला आहे. क्रांतीपूर्वी येथें फक्त १२० विद्यार्थी होते. आज त्यांची संख्या हजारावर गेली असून त्यांना शिकविण्यासाठीं तीनशें शिक्षक आहेत. शिक्षणासाठींहि येथें एक स्वतंत्र कोर्स आहे. एका विद्यार्थ्यामागें येथें सरकारकडून १२००० रूबेल्स खर्च करण्यांत येतात. येथें सबंध कोर्स पूर्ण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचें एक स्नेहसंमेलन होतें व मग त्या वेळीं तेथें प्रत्येक-जण आपापलें कार्यक्षेत्र पसंत करतात. रशियांत नृत्यकारांना अतिशय मान-सन्मानानें वागविण्यांत येतें. तेथील लोकांना नृत्यसंगीताचें वेडच आहे ! मात्र ही ललितकलेची त्यांची आवड फार पूर्वींपासूनची आहे. रशियाच्या प्राचीन संस्कृतीचें तें एक वैशिष्ट्य आहे. सांपत्तिक दृष्ट्याहि या कलावंतांचा दर्जा अतिशय उच्च आहे.

या पत्राचा उरलेला हा भाग मी आगगाडींतच लिहीत आहें. आतां रात्रींचे बारा वाजले आहेत. माझ्या डब्यांतील माझी सहप्रवासिनी सौ. मोलिना दत्त गाढ झोपल्या आहेत. लेनिनग्राडहून आमची गाडी १०–३० वाजतां सुटली. आम्हांला निरोप देण्यासाठीं अनेक रशियन स्त्रिया, तांबड्या गुलाबांचे गुच्छ घेऊन आल्या होत्या. लेनिनग्राड सोडतांना माझें मन विषण्ण झालें. हें शहर मला पुन्हां कांहीं पाहावयास मिळणार नाहीं ही कल्पना मनाला असह्य

कलावंत नृत्यकलेंत पारंगत होऊन बाहेर पडले आहेत. प्रथम हें फक्त लेनिनग्राडमधील विद्यार्थ्यांसाठींच होतें. परंतु आतां मात्र तेथें सोव्हिएत रशियांतील सर्व भागांतून विद्यार्थी व विद्यार्थिनी शिकावयास येतात. ही संस्था प्रथम वगानवा नांवाच्या एका नृत्यकारानें १८ व्या शतकांत सुरू केली. त्यापूर्वी मॉस्कोमध्यें नृत्यासंबंधींचें शिक्षण दिलें जात असे. तेथें ९ वर्षांचा कोर्स आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला एक खास पद्धत किंवा शाखा घ्यावी लागते व समाजांत नृत्य करतांना फक्त तीच पद्धत अंगीकारावी लागते. त्यामुळें नृत्याच्या एका विशिष्ट शाखेचा तो तज्ज्ञ बनतो. आपल्याकडे Jack of all trades and Master of None अशी जी परिस्थिति आहे तसें येथें होत नाहीं. हा नऊ वर्षांचा कोस पुरा केल्याखेरीज कुठल्याहि कलावंतास सार्वजनिक कार्यक्रमांत भाग घेतां येत नाहीं. येथें दहा वर्षांपासून विद्यार्थिनींना घेतात. कारण लहान वयांत मुलें अधिक प्रमाणांत संस्कारक्षम असतात. पहिल्या व दुसऱ्या वर्गांत आम्ही गेलों तेव्हां तेथें आम्हांला ताजेकिस्थानमधल्या अनेक छोट्या विद्यार्थिनी आढळल्या. नऊ वर्षांचा कोर्स पुरा झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पदवी मिळते. येथें अनेक विभाग आहेत. पहिल्या व दुसऱ्या विभागांत नृत्यकलेविषयीं सर्वसामान्य माहिती शिकविण्यांत येते. तिसऱ्या व चवथ्या विभागांत अनुक्रमें संगीत व नृत्याचे प्रत्यक्ष धडे दिले जातात. पांचव्या विभागांत बॅले नृत्याचा इतिहास अभ्यासावा लागतो. सहाव्या वर्गांत मेकअपचें ज्ञान करून देण्यांत येतें. सातव्या वर्गांत चेहऱ्यावरचे भाव कसे बदलावे याचें शिक्षण दिलें जातें व आठव्या नवव्या वर्गांत प्रत्यक्ष रंगभूमीवर कोणत्या वेळीं कोणतें संगीत व अभिनय अनुकूल होईल हें शिकवितात. या माहितीवरून तुझ्या लक्षांत आलेंच असेल कीं, उत्तम कलावंत होण्यासाठीं येथील कलावंतांना केवढे परिश्रम घ्यावे लागतात! नाहीं तर आपल्याकडे एक दोन वर्षें हौस म्हणून नृत्य शिकून त्या कलेच्यासंबंधीं सखोल ज्ञान करून न घेतांच अनेक मंडळी आपल्या नृत्याचे प्रयोग करून दाखवितात व थोड्याच दिवसांत मागें पडतात. येथें आम्ही कांहीं वर्गांत जाऊन नृत्यकलेचें शिक्षण कसें देतात हें पाहिलें. तेथें कांहीं विद्यार्थी व विद्यार्थिनी नृत्य करीत होत्या. किती तालबद्ध त्यांचीं पावलें पडत होतीं! दररोज सकाळीं त्यांना व्यायाम घ्यावा लागतो. शरीर सुटसुटीत

व बांधेसूद ठेवण्यासाठीं विशिष्ट आहार घ्यावा लागतो. रशियांत इतरत्र धिप्पाड शरीरबांध्याच्या स्त्रिया आढळत असल्या तरी रशियांतील बॅलेरिना (नर्तिका) मात्र बांधेसूदपणाच्या बाबतींत आदर्श आहेत. येथील नृत्य-वर्गांमध्यें पांढरे शुभ्र कपडे घातलेल्या व शरीराचा सर्व तोल पायाच्या आंगठ्यावर आधारून नृत्य करणाऱ्या त्या नर्तिका व नृत्यकार यांचे संघ पाहून आम्हांला अतिशय आश्चर्य वाटलें. लेनिनग्राडमध्यें आम्ही रोज रात्रीं बॅले व ऑपेरा पाहतच आहोंत. त्यामुळें नृत्यकलेचा येथें केवढा विकास झाला आहे याची कल्पना आली. येथील मुख्याधिकारी एक म्हातारे रशियन गृहस्थ असून त्यांच्या हाताखालीं काम करणारी अधिकारी एक स्त्री आहे. तिचें नांव ॲना पावलोव्हा. ती रशियांतील एक जगविख्यात नर्तिका असून तिनें उदयशंकरबरोबर नृत्य केलेलें आहे. ती हिंदुस्थानांतहि येऊन गेली असल्या-मुळें तिच्या नृत्यकलेंतील प्राविण्याचा लाभ आपल्याकडील रसिकांना मिळालेला आहे. क्रांतीपूर्वीं येथें फक्त १२० विद्यार्थी होते. आज त्यांची संख्या हजारावर गेली असून त्यांना शिकविण्यासाठीं तीनशें शिक्षक आहेत. शिक्षणासाठींहि येथें एक स्वतंत्र कोर्स आहे. एका विद्यार्थ्यामागें येथें सरकारकडून १२००० रूबेल्स खर्च करण्यांत येतात. येथें सबंध कोर्स पूर्ण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचें एक स्नेहसंमेलन होतें व मग त्या वेळीं तेथें प्रत्येक-जण आपापलें कार्यक्षेत्र पसंत करतात. रशियांत नृत्यकारांना अतिशय मान-सन्मानानें वागविण्यांत येतें. तेथील लोकांना नृत्यसंगीताचें वेडच आहे! मात्र ही ललितकलेची त्यांची आवड फार पूर्वींपासूनची आहे. रशियाच्या प्राचीन संस्कृतीचें तें एक वैशिष्ट्य आहे. सांपत्तिक दृष्ट्याहि या कलावंतांचा दर्जा अतिशय उच्च आहे.

या पत्राचा उरलेला हा भाग मी आगगाडींतच लिहीत आहें. आतां रात्रीचे बारा वाजले आहेत. माझ्या डब्यांतील माझी सहप्रवासिनी सौ. मोलिना दत्त गाढ झोपल्या आहेत. लेनिनग्राडहून आमची गाडी १०–३० वाजतां सुटली. आम्हांला निरोप देण्यासाठीं अनेक रशियन स्त्रिया, तांबड्या गुलाबांचे गुच्छ घेऊन आल्या होत्या. लेनिनग्राड सोडतांना माझें मन विषण्ण झालें. हें शहर मला पुन्हां कांहीं पाहावयास मिळणार नाहीं ही कल्पना मनाला असह्य

वाटली. अतिशय सुबक व सुंदर शहर आहे हें ! मागें कांहीं वर्षांपूर्वी मी ग्रेटा गार्बोनें काम केलेला 'मारी व्हालिवास्का' हा सुप्रसिद्ध इंग्रजी चित्रपट पाहिला होता. स्वीडनच्या या सुप्रसिद्ध अभिनेत्रीनें त्यांत एका कामगार स्त्रीची भूमिका केली होती. त्यांत आजचे लेनिनग्राड पेट्रोग्राड या नांवानें दाखविलें होतें. चित्रपटांत मॉस्को ते पेट्रोग्राड प्रवास तिनें ज्या आगगाडींतून केला होता त्या आगगाडीचें चित्र माझ्या डोळयांसमोर उभें राहिलें व माझें मन न कळतच, मी ज्या सुखसोयींनें युक्त अशा गाडींतून प्रवास करीत होतें तिची त्या चित्रपटांतील गाडीशीं तुलना करूं लागलें. क्रांतीनंतर कामगार जीवनांत केवढें परिवर्तन झालें आहे ! हा चित्रपट पाहतांना मात्र मी त्या पेट्रोग्राडला कधींकाळीं येईन अशी कल्पना माझ्या मनाला शिवलीसुद्धां नव्हती. खरोखरच जीवनामध्यें किती नाट्यमय योगायोग घडून येतात !

तुझी
**सौ. चारुशीला**

---

## पत्र अकरावें

**हॉटेल मॉस्को**
दिनांक १० मे १९५४

प्रिय शांता,

काल रात्रीं बारा वाजेपर्यंतचा आमचा आगगाडींतील वेळ खूपच मजेंत गेला. आमच्या गाडीनें लेनिनग्राड सोडल्यावर, मॅडम परफ्युनोव्हा व आमच्या दोन दुभाषा यांनीं निरनिराळीं रशियन संघगीतें म्हणावयास सुरुवात केली. हीं गीतें द्रुतगतीनें म्हणावयाचीं असतात व त्यांतून भावनेचा उत्कट आविष्कार होतो. थोड्याच वेळांत त्यांच्यांत व आमच्यांत गाण्यांच्या

'भेंड्याच' सुरू झाल्या. तुला ठाऊकच आहे कीं, आपल्याकडे संघगीतांची संख्या त्यांच्या मानानें अल्प आहे. या गंमतीच्या स्पर्धेत आम्ही आतां हरणार हें पाहून मी 'बंधन' चित्रपटांतील एके काळीं अत्यंत लोकप्रिय झालेलें 'चल चल रे नवजवान' हें गाणें म्हणावयास सुरुवात केली व इतर भगिनींनीं मला साथ दिली. शेवटीं तर आम्ही टाळ्या वाजवीत महात्माजींचें सुप्रसिद्ध 'रघुपति राघव राजाराम' गाऊं लागलों. कमलादेवी आपल्या केबिन-मध्यें जरा लवकरच जाऊन झोंपल्या होत्या. त्या पण उठून बाहेर आल्या व आमच्या 'रघुपति राघवां'त सामील झाल्या. अर्थ समजत नसतांनाहि त्या सर्व रशियन स्त्रियांना आमचें हें गाणें खूप पसंत पडलें. यानंतर आमच्या-पैकीं कांहींजणींनीं मराठी, बंगाली व हिंदी गाणीं म्हटलीं. सुचेता कृपलानी बंगाली गीतें फारच भावनोत्कटत्वानें म्हणतात व त्यामुळें आमची संगीताची बाजू त्यांनीं चांगल्या तऱ्हेनें सांभाळली.

काल सायंकाळीं आम्हांला लेनिनग्राड म्युनिसिपल हॉलमध्यें निरोप-मेजवानी (Farewell Party) देण्यांत आली. त्या प्रसंगीं महापौर व उपमहापौर, आरोग्य व शिक्षण या खात्यांचे उपमंत्री व अनेक प्रतिष्ठित स्त्रीपुरुष हजर होते. लेनिनग्राडची सर्वांगीण उन्नति होण्यासाठीं कोणत्या योजना उपयुक्त ठरल्या याविषयींचा साद्यंत इतिहास त्यांनीं आम्हांला ऐकविला. भारतांतील शैक्षणिक व सामाजिक बाबतींतील त्यांनीं आम्हांला विचारलेल्या अनेक प्रश्नांचीं आम्हीं त्यांना योग्य तीं उत्तरें दिलीं. शेवटीं शुभचिंतनपर भाषणें झालीं आणि त्यांनीं आम्हांला अनेक स्मृतिचिन्हें अर्पण केलीं.

सकाळीं ११–३० वाजतां आम्ही मॉस्कोला पोहोंचलों. आम्हांला उतरून घेण्यासाठीं 'व्होकस्' मधून कांहीं मंडळी आली होती. काल येथें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर 'विजय दिन' (Victory day) साजरा झाला. त्यासाठीं केलेली सजावट आम्हांला रस्त्यावर पाहावयास मिळाली. ९ मे हा दिवस येथें मोठ्या थाटानें साजरा करतात; कारण त्या दिवशीं रशियानें हिटलरवर जय मिळविला.

हॉटेलांत पोहोंचतांच आम्हीं झटपट स्नानें उरकलीं व पांढरा शुभ्र पोषाख करून लेनिन–स्टॅलिनचीं थडगीं–मॉसोलियम–पहावयास निघालों. येथील

आमचा सर्वच कार्यक्रम आंखीव व रेखीव आहे. कुठेंहि इकडे तिकडे रेसभरहि फरक होत नाहीं.

या थडग्यांवर वाहण्यासाठीं आम्हीं एक प्रचंड पुष्पगुच्छ आणला होता. तो धरण्यासाठीं आम्हां सर्वांना कमलादेवींना मधून मधून हातभार लावावा लागत होता. पांढऱ्या शुभ्र साड्या नेसून आम्ही सर्वजणी त्या पुष्पगुच्छासहित जेव्हां लाल चौकाकडे रांगेनें जाऊं लागलों, तेव्हां ही आमची मिरवणूक पाहण्यासाठीं अनेक रशियन स्त्री–पुरुष रस्त्याच्या दुतर्फा उभे राहिले.

लेनिन–स्टॅलिनचा हा मॉसोलियम लाल चौकांत असून त्याची बांधणी आधुनिक पद्धतीची आहे. विशेषतः त्याच्या मागील बाजूस असणाऱ्या क्रेमलिनच्या पार्श्वभूमीमुळें तर ही इमारत उठून दिसते. हिचें सर्व बांधकाम उरल पर्वतांत सांपडणाऱ्या गुलाबी व काळया रंगाच्या पॉरफिरी दगडाचें आहे. हिच्या माथ्यावरील चौथऱ्यावर उभे राहून रशियांतील निरनिराळी अधिकारी मंडळी कांहीं विशेष प्रसंगीं भाषणें करतात. या इमारतीच्या तळघरांत चिरनिद्रा घेत पडलेल्या लेनिन–स्टॅलिनच्या शवांचें दर्शन घेण्यासाठीं, या मॉसोलियमसमोर एक दोन मैलपर्यंत नेहमींच लोकांची रांग लागलेली असते, असें आम्हांला रशियांत येते वेळीं कळलें होतें; त्या वेळीं आम्हांला हें विधान अतिशयोक्तिपूर्ण वाटत होतें. परंतु प्रत्यक्ष पाहिल्यावर मात्र त्याची सत्यता पटली. या गर्दीकडे पाहून माझ्या मनांत आलें कीं, सोव्हिएत रशियांत मंदिरांतील प्रार्थना म्हणजे एक थोतांड आहे, असा जरी सार्वत्रिक समज असला तरी तेथें आज विभूतिपूजन मात्र फार मोठ्या प्रमाणावर होत आहे खास! शिवाय रशियांतील लोक इतके कार्यव्यग्र असतांना दररोज या जमावाला येथें जमण्यास रिकामा वेळ तरी कुठून मिळतो?

मॉसोलियमच्या प्रवेशद्वाराजवळ हातांत बंदुका घेतलेल्या शिपायांचा खडा पहारा असतो. आम्ही पाहुण्या असल्यामुळें आम्हांला चटकन् आंत प्रवेश मिळाला. येथेंच कमलादेवींनीं, या दोन थोर पुरुषांच्या स्मृतीला भारताचें आदरचिन्ह म्हणून तो प्रचंड पुष्पगुच्छ अर्पण केला. या प्रसंगाला अभावितपणेंच एक प्रकारचें गांभीर्य प्राप्त झालें होतें.

ही सबंध इमारत अंतर्बाह्य कांचेसारखी चकाकत असते. तिच्या गुळगुळीत फरशीवरून पाय एकसारखे घसरतात. त्यामुळें जपून चालावें लागतें. लेनिन–स्टॅलिनचीं शवें ठेवलेलें दालन दिसेपर्यंत अनेक पहारे व पायऱ्या ओलांडाव्या लागतात. आम्हांला तळघरांत जाण्यासाठीं दोन मजले खालीं उतरून जावें लागलें. या दालनांत नारिंगी रंगाच्या दिव्यांचा अंधुक प्रकाश असतो. दालनाच्या मध्यभागीं दोन कांचेच्या पेट्यांतून हीं मृत शरीरें ठेविलेलीं आहेत. त्या दोघांच्या अंगावर त्यांचे लष्करी गणवेष असून मृत्यूनंतरहि त्यांच्या रुबाबांत कांहींच अंतर पडलेलें दिसून येत नाहीं. हीं दोन्ही थडगीं पहात असतांना मला ताजमहालची आठवण झाली. मुमताज-सारख्या सौंदर्यसम्राज्ञीचें शव जर अशाच कांहीं शास्त्रीय करामतीनें 'रक्षण' करून ठेवलें असतें तर या प्रीतिमंदिरामागील इतिहास लोकांच्या डोळ्यांसमोर साक्षात् उभा राहिला असता.

कांचेच्या पेट्यांतील चौथऱ्यावर ठेवलेल्या लेनिन–स्टॅलिनच्या देहांवरील तजेला अद्यापिहि कायम आहे. जणूं काय दोन सजीव माणसें शांतपणें गाढ निद्रा घेत आहेत, असा पहाणारास भास होतो. मृत्यूंतील भयानकता नष्ट करणाऱ्या या रशियन शास्त्रीय संशोधकांबद्दल आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं. या दालनांतील सबंध वातावरण गंभीर व शांत असून येथील उष्णता-मान कमालीचें थंड ठेविलें आहे.

येथें सशस्त्र सैन्यांचा दिवसरात्र पहारा असतो. पहाऱ्यावरील शिपाई दर दोन तासांनीं बदलतात. दोन तास का होईना, तथापि त्या दोन मृत देहांच्या सहवासांत राहावयाचें म्हणजे त्या सैन्यांना एक दिव्यच वाटत असेल असें नाहीं का तुला वाटत ?

आज मॉसोलियमपुढें पायोनियर मुलामुलींची कवायत होती. याखेरीज दर्शनासाठीं तेथें असंख्य लोक जमा झाले होते. परंतु दोघादोघांच्या रांगा करून तीं सारीं माणसें अत्यंत शिस्तवारपणें मॉसोलियममध्यें जात येत होतीं. कुणीहि रेटारेटी करून पुढें घुसण्याचा प्रयत्न करीत नव्हतें. मॉसोलियमच्या बाहेरील बागेंत मॅक्सिम गॉर्की, लेनिनची पत्नी वगैरेसारख्या प्रसिद्ध व्यक्तींचीं व अनेक क्रांतिकारकांचीं थडगीं आहेत. तीं पाहून आम्ही दीडच्या सुमारास आमच्या हॉटेलांत परत आलों.

'लंच' घेते वेळीं, ल्युसी हातांत एक भलें मोठें पुडकें घेऊन आली व हंसून म्हणाली, "तुम्हां सर्वांना मी आनंदाची बातमी घेऊन आलें आहें. माझ्या हातांत काय आहे ओळखा पाहूं?" व मग तिनें तें पुडकें खोलून आम्हांला हिंदुस्थानांतून आलेलें आमचें टपाल दिलें. जवळ जवळ पंधरा दिवस आम्हांला तुमच्याकडील कांहींच वर्तमान कळलें नव्हतें. मला माझ्या छोट्या प्रणयाबद्दल अतिशय चिंता वाटत होती. परंतु जेव्हां ल्युसीनें मला घरून आलेलीं सात आठ पत्रें दिलीं तेव्हां मला अत्यंत हर्ष झाला. पत्रें वाचण्याची आमची ती आतुरता पाहून आमच्या दुभाषांना फारच गंमत वाटत असावी, असें दिसलें.

दुपारीं दोन वाजतां आम्ही येथील अतिशय प्रसिद्ध असें मुलांचें नाट्यगृह (The Theatre of the Young Spectators) पहावयास गेलों. मुलांचें नाट्यमंदिर म्हणजे कसें असेल असें कुतूहल आमच्या मनांत निर्माण झालें होतें. नाट्यमंदिराची इमारत फारशी अवाढव्य नाहीं. येथील सर्व कार्यभाग मोठ्यांच्या देखरेखीखालीं मुलेंच आटोपतात. येथें नाटक पाहण्यासाठीं बहुसंख्य मुलें उपस्थित झालीं होतीं. त्यांच्याबरोबर मधून मधून त्यांचे पालकहि दिसत होते. सभागृहांतील ते छोटे प्रेक्षक पाहून खूप मौज वाटली. आंखूड झगे व पिंगट केसांच्या दोन वेण्या घातलेल्या मुली व लांब इजार व अर्ध्या बाह्यांचा खमीस घातलेलीं मुलें यांनीं सबंध सभागृह गच्च फुलून गेलें होतें. कुठेंहि पहा, लहान मुलांचे स्वभावविशेष सारखेच! हीं मुलें हंसत होतीं, बडबडत होतीं व मधून मधून हातांतील लॉलीपॉप व आइस-फरुट खात होतीं. रशियांतील मुलांच्या बाबतींतील एक गोष्ट मात्र मला मुळींच आवडली नाहीं, व ती म्हणजे येथील सर्वच छोट्या मुलांचें मुंडण करतात! इतर पाश्चात्य देशांतील मुलांच्या सुदृढ प्रकृतीस त्यांचे सोनेरी कुरळे केंस केवढी तरी शोभा देतात; पण इथें मात्र हें विचित्रच वाटतें!

आजचें नाटक एका रशियन परीकथेवर आधारलेलें होतें. त्याचें नांव होतें Turnip. नाटकाच्या संविधानकांत भरपूर प्रमाणांत नाट्य होतें. एका शेतकऱ्याच्या मुलीनें एक Turnip नोलकोल आणून आपल्या झोंपडीसमोरील अंगणांत लावलें व आपल्या कामचुकार कुत्र्याला त्याच्यावर पहारा करण्यास

सांगितलें. पण तो कुत्रा आपल्या मित्राबरोबर भटकावयास गेला. ती संधि साधून जमिनींतील विघ्नसंतोषी किड्यांनीं व कीटकांनीं त्या Turnip च्या रोपावर हल्ला केला. त्यामुळें तें मलुल होऊन खालीं कोसळलें. हें जेव्हां त्या शेतकरी मुलीनें पाहिलें तेव्हां तिला फार वाईट वाटलें व मग ती एका पर्वतावरील जादूच्या झऱ्याचें पाणी आणावयास जाते. अनेक संकटांना तोंड देऊन तें पाणी ती आणते व तें झाड जगवते. त्यांतून एक सुंदर व मोठा नोलकोल त्यांना मिळतो. हें छोटें नाटक प्रतीकात्मक होतें. यांतील सर्व कामें लहान मुलांनींच केलीं असून तीं इतकीं वास्तव झालीं कीं, त्या छोट्या मुलांचें कौतुक केल्याशिवाय आम्हांला राहवेना.

लहान मुलांचें हें स्टेज 'फिरतें' (Revolving) असतें. नाटकांत लागणारे सर्व देखावे तयार करून ठेवावयाचे, व हवा तो देखावा स्टेजला एक फिरकी देऊन समोर आणावयाचा अशी योजना केलेली असते. या नाटकांत दाखविलेले रात्र, सकाळ वगैरेंचे देखावे अतिशय रमणीय होते. येथील मुलांच्या अंगीं असलेलें अभिनयकौशल्य व नाटकाची सर्व जबाबदारी पार पाडण्याची करामत पाहून आम्हांला खरोखरीच अचंबा वाटला. पण मला वाटतें, योग्य वेळीं योग्य संधि दिल्याचा हा परिणाम आहे. आपल्या देशांतहि मुलांचीं अशीं स्वतंत्र नाट्यगृहें निर्माण व्हावयास हवींत. त्यामुळें मुलांच्या अंगीं असलेल्या नैसर्गिक अभिनयकलेस योग्य तो वाव मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं.

आज रात्रीं साडेतीनच्या विमानानें आम्ही उझबेकिस्तानला जावयास निघणार होतों, म्हणून मुलांचें नाट्यमंदिर पाहिल्यानंतर आम्ही दुसरीकडे कुठेंहि न जातां हॉटेलांत पुन्हां परत आलों. श्रीमती वाडियांची प्रकृति ठीक नसल्यामुळें त्या आमच्याबरोबर उझबेकला येणार नाहींत. कारण मॉस्को ते ताश्कंद, समरकंद वगैरे ठिकाणें पाहण्यास आम्ही अतिशय उत्सुक झालों आहोंत. थोड्याच वेळांत आम्ही विमानतळाकडे जावयास निघूं. तेव्हां आतां पत्र पुरें करतें. कारण थोडीशी झोंप घेतली तर बरें असें वाटतें. कळावें.

तुझी

**सौ. चारुशीला**

## पत्र बारावें

आर्टिस्टस् रेस्ट हाऊस
ताश्कंद
दिनांक १२ मे १९५४

प्रिय शांता,

ताश्कंदला जाण्यासाठीं आम्ही मॉस्को विमानतळावर रात्रीं दीडच्या सुमारास गेलों. रस्त्यावरून जात असतां रात्रीच्या प्रशांत वेळची, मॉस्को शहराची आगळीच शोभा आम्हांला पाहावयास मिळाली. मध्यरात्र उलटून गेल्यामुळें सबंध शहर निद्रेच्या आधीन झालेलें होतें. पण मॉस्को विद्यापीठाची भव्य व शुभ्र इमारत मात्र रात्रभर प्रकाशित ठेविल्यामुळें जणूं काय जागरूक असल्यासारखी भासते.

आमच्या विमानानें बरोबर साडेतीन वाजतां मॉस्को विमानतळ सोडलें. हें विमान खास आमच्यासाठीं असल्यामुळें आम्ही व आमच्या तीन दुभाषा याखेरीज दुसरे कोणीहि उतारू यांत नव्हते.

रशियन विमानें अतिशय मजबूत व वेगवान असतात. विशेषतः उड्डाण करते वेळीं विमानांतील उतारूंना खूपच त्रास होतो. प्रत्येक विमान वेळप्रसंगीं युद्धविमान म्हणून उपयोगांत येईल अशी रचना केलेली असते. उड्डाणाच्या वेळीं उतारूंनीं बांधावयाचे चामड्याचे पट्टेहि या विमानांतून नसतात. पण त्याबद्दल रशियन पायलटना खूपच अभिमान वाटतो. कारण इतर देशांतील प्रवाशांनीं बांधावयाचे हे पट्टे रशियन विमानांत वापरांत नाहींत; कारण येथील विमानें सुरक्षिततेच्या दृष्टीनें अतिशय वरच्या दर्जाचीं आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. मॉस्को ते ताश्कंद हा फार दीर्घ प्रवास असल्यामुळें आम्ही सर्वजणी इतक्या कंटाळलों होतों कीं, झरोक्यांतून डोकावून खालीं दिसणारा देखावा पाहण्याच्या मनःस्थितींत आम्ही नव्हतों.

आमचें विमान वाटेवर फक्त आष्टुविन नांवाच्या विमानतळावर थांबलें. तेथें उतरून आम्हीं न्याहरी केली.

दुपारीं ३॥ वाजतां आम्ही तारकंदच्या विमानतळावर उतरलों. आमच्या स्वागतासाठीं शहरांतील अनेक जबाबदार स्त्रीपुरुष रंगीबेरंगी फुलांचे गुच्छ घेऊन हजर होते. येथें वृत्तपत्रांचे प्रतिनिधी व फोटोग्राफरहि आले होते. त्यांनीं आमचे बरेच फोटो घेतले.

आमच्यासाठीं आणलेल्या मोटारींतून आम्ही जेव्हां शहराकडे जावयास निघालों तेव्हां वाटेंत आढळून येणाऱ्या रम्य देखाव्यांमुळें आमचा सारा शीणभार दूर झाला. इथें आम्हांला परिचित दृश्यें दिसलीं. तारकंदचा सर्व भाग रंगीत आहे. फुलाफळांनीं भरलेल्या अनेक वनराई आम्हांला रस्त्यावरून जातांना आढळल्या. मला फुलांचें वेडच आहे, हें तुला माहीत आहेच! या रंगीबेरंगी दुनियेकडे पाहून माझी अगदीं वेड्यागत अवस्था झाली.

रस्त्यावरून जातांना आम्हांला अनेक उझबेकी स्त्रीपुरुष दिसले. या इस्लामधर्मियांवर आतां युरोपीय संस्कृतीचा पूर्ण प्रभाव झालेला दिसतो. पुरुषांचे व स्त्रियांचे पोषाख अद्यावत् युरोपीयन पद्धतीचे होते. मात्र प्रत्येकाच्या डोक्यांत आपल्याकडे बोहरी लोक घालतात, त्याप्रमाणें रेशमानें भरलेल्या मखमली टोप्या आढळल्या. एवढीच काय ती जुनी संस्कृति शिल्लक आहे म्हणायची!

आमची राहण्याची सोय 'आर्टिस्टस् रेस्ट हाऊस' नांवाच्या इमारतींत केली आहे. इमारतीच्या चारी बाजूला सुंदर बगीचा असून तो गुलाबांच्या व पॉपीच्या फुलांनीं बहरलेला आहे. याखेरीज सबंध बगीचाभोंवतीं पुसिविलोसारख्या उंच वृक्षांचें नैसर्गिक कुंपण आहे. आमच्या खोल्याहि अतिशय सुंदर आहेत. माझ्या खोलींत मी, पौर्णिमा व मोलिना दत्त अशा आम्ही तिघीजणी आहोंत. खोलींतील खिडकींतून बागेंतील शोभा अवर्णनीय भासते.

या इमारतींतील स्नानगृह म्हणजे मुसलमानी हमामखानाच आहे. हें स्नानगृह पाहून आम्हांला खूपच मौज वाटली. जेवणघर आमच्या खोल्यांपासून थोड्या अंतरावर आहे. आम्ही संध्याकाळीं सात वाजतां जेवावयास गेलों. आमच्या पंक्तीला बहुतेक सर्वच खात्यांच्या उपमंत्री स्त्रिया होत्या.

कांहीं पुरुष मंडळीहि मधून मधून दिसत होती. उझबेकिस्तानमध्यें जेवणाचा थाट मात्र अद्यापि इस्लामी पद्धतीचाच आहे. जेवणामध्यें अनेक प्रकार असतात. नाना प्रकारचे मांसाचे व मच्छीचे प्रकार व निरनिराळ्या भाज्या! या लोकांना काकड्या व मिरच्यांची भाजी फार प्रिय दिसते. येथें जेवतांना ताज्या काबुली डाळिंबाचा व द्राक्षाचा रस देतात. पाण्याच्या ऐवजीं या रसाचाच उपयोग करण्यांत येतो. मला डाळिंबाचा रस अतिशय आवडला. जेवतांना माझ्या दोन्ही बाजूंस दोन उपमंत्री स्त्रिया बसल्या होत्या. श्रीमती जहिदा या आरोग्यखात्याच्या उपमंत्री व श्रीमती जमीला या सांस्कृतिक खात्याच्या उपमंत्री आहेत. जहिदा अगदीं अबोल आहेत, पण जमीला खूपच बोलक्या आहेत. जेवतांना हिंदी भाषा शिकण्याचा त्या आटोकाट प्रयत्न करीत होत्या. आम्हीं त्यांना एक शब्द शिकविला. तो म्हणजे झिंदाबाद! व मग सारा वेळ त्या आमचीं प्रत्येकीचीं नांवें उच्चारून 'जमीला, चारुशीला झिंदाबाद' अशा प्रकारचीं वाक्यें उच्चारीत होत्या. बाकी उझबेक भाषेंत 'बेशक,' 'अलबत,' यासारखे बरेच आपल्या परिचयाचे शब्द आढळतात.

जेवण झाल्यावर रात्रीं 'उझबेकची संस्कृति' हा चित्रपट आम्हांला दाखविला. यामध्यें उझबेकिस्तानमधलीं प्रमुख शहरें, त्यांतील उद्योगधंदे, राहणी व लोक यांचें यथार्थ दर्शन केलें होतें. विशेषतः येथील निरनिराळ्या भागांतील लोकनृत्यें प्रेक्षणीय होतीं. त्याबरोबरच उझबेक स्त्रियासाठीं पूर्वीं जी गोषा-पद्धति होती, त्याच्या विरुद्ध स्त्रियांनीं केलेल्या बंडाचें सबंध चित्रण होतें. येथें पडदा झुगारून देण्यासाठीं स्त्रियांना कमालीचा छळ सोसावा लागला. कांहींजणींना तर प्राणार्पण करावें लागलें. या सगळ्या संकटांना तोंड देण्याचें या स्त्रियांनीं एक दिव्यच केलें म्हणायचें!

या चित्रपटावरून उझबेकिस्तानची आम्हांला त्रोटक माहितीहि मिळाली. रशियाचें सध्यांचें एक महत्त्वाचें Republic आहे. परंतु झारशाहीमध्यें ३६ वर्षांपूर्वीं हा भाग अत्यंत मागासलेला होता. क्रांतीपूर्वीं या देशाच्या संस्कृतीचा विचार न करतां त्यांच्यावर रशियन संस्कृति व रशियन भाषा यांची सक्ती करण्यांत आली होती. त्यामुळें हा भाग अधिकच दुबळा झाला. परंतु क्रांती-

नंतर मात्र प्रत्येक रिपब्लिकमधली प्राचीन संस्कृति, कला व वाङ्मय यांचें रक्षण करण्याचें सोव्हिएत सरकारनें ठरविल्यामुळें आज येथील नव्या जुन्या संस्कृतीचा मनोहर मिलाफ झालेला दिसून येतो. एका काळच्या अत्यंत मागासलेल्या या देशाची आजची प्रगति कौतुकास्पद आहे.

उझबेकमध्यें सहा कोटी लोकसंख्या आहे: आजुबाजूला अनेक पर्वत असून त्यांतून कित्येक नद्या उगम पावतात. भारतामध्यें मोंगल साम्राज्याची स्थापना करणाऱ्या बाबरचा फरघाना प्रान्त व त्यांतील फरघाना नदीचें सुपीक खोरेंहि या चित्रपटांत आम्हांला दाखविलें. उझबेकमध्यें अनेक खाणी असून हा भाग कापसाचें आगर आहे. एवढ्याशा ह्या छोट्या भागांत पंच्याण्णव प्रयोगशाळा असून येथें शास्त्रीय संशोधनाला खूप महत्त्व आहे. तसेंच यंत्र व इंजिनें तयार करण्याचे प्रचंड कारखाने सर्वत्र आहेत.

आज सकाळीं आम्ही सबंध शहरांतून एक फेरी मारून आलों. येथील मोठमोठ्या इमारती व मशीदी शिल्पकलेचे आदर्श आहेत. प्रत्येक इमारतीवर इस्लामी संस्कृतीची मोहर उमटली असल्यामुळें आपण दिल्ली, आग्रा वगैरे भागांतून हिंडतों आहोंत कीं काय असा आम्हांला क्षणभर भास झाला. येथें नव्याजुन्याचें गंमतीदार मिश्रण आम्हांला पाहावयास मिळालें. नवीन बांधलेल्या आधुनिक पद्धतीच्या इमारतींच्या संघांतून मधून मधून मातीचीं झोंपडीं डोकावत होतीं. तीं मातीचीं थापलेलीं घरें तर आपल्याकडील घाटावरील गरीब लोकांच्या झोंपड्यांप्रमाणेंच हुबेहुब दिसत होतीं.

आम्ही अलिशेर नोव्हाई पार्क व अलिशेर नोव्हाई नाट्यगृह पाहिलें. अलिशेर नोव्हाई हा येथील क्रांतिपूर्व कालांतील एक महान् कवि होऊन गेला. त्यानें स्फुट काव्यांबरोबरच मोठमोठीं महाकाव्यें रचिलीं. त्यांपैकीं Collection of Wisdom of People, Shirin Farhad, Seven Travellers व Wall of Alexander हीं पांच काव्यें अतिशय प्रसिद्ध आहेत. या कवीच्या काव्याचे नायक बहुधा सत्ताधारी राजे असत. या कवीची एक काव्यपरंपरा निर्माण होऊन त्यांत अनेक उझबेकी कवी सामील झाले.

शहरांतील बरेच भाग पाहून आम्हीं तेथील देल्लाशाएख नांवाची प्रसिद्ध

मशीद पहावयास गेलों. आधुनिक पिढी मशिदींत जात नाहीं, तथापि जुन्या पिढींतील व बालबोध वळणाचे स्त्रीपुरुष अद्यापिहि येथें नमाज पढावयास जमतात. या मशिदींत स्त्रियांना यावयास बंदी आहे ही गोष्ट ऐकून आम्हांला नवल वाटलें. आम्ही मात्र पाहुणे असल्यामुळें आम्हांला तेथें प्रवेश करण्यास हरकत घेतली नाहीं. मशिदींत प्रार्थना चालू असल्यामुळें मुख्य मुल्लासाहेब आंत होते. ते बाहेर येईपर्यंत आम्ही एका सफरचंदाच्या झाडाखालीं त्यांची वाट पाहात बसलों. मशिदीच्या आवारांत प्रवेश करण्याचें भाग्य आम्हांला लाभलें असें वाटून कीं काय कांहीं उझबेकी स्त्रिया दूर अंतरावरून आमच्याकडे मत्सरानें पाहात होत्या.

ही मशीद आठशें वर्षांची पुराणी आहे. हिला जोडून असणारी दुसरी एक मशीद असून ती चारशें वर्षांपूर्वीं बांधली गेली. मशिदीचे मुख्य मुल्ला एकशेंदहा वर्षांचे असून ते आज येथें उपस्थित नव्हते. परंतु जियाउद्दीन बाबाजान नांवाचे उपमुफ्ती हजर होते. त्यांनीं इंग्रजी पोषाख करून वर गुलाबी झगा घातला असून, आपल्याकडे काठेवाडी लोक बांधतात त्या पद्धतीनें पांढरा फेटा डोक्यावर घातला होता. हे मुफ्ती अतिशय गौरवर्ण असून त्यांचे डोळे खूपच मोठे व तेजस्वी आहेत. त्यांनीं सर्व मशीद आम्हांला दाखविली व त्यानंतर ते आम्हांला मुख्य मुफ्तींच्या घरीं घेऊन गेले.

मुफ्तीसाहेबांचें घर जुनेंच असून त्याची बांधणीहि खास इस्लामी पद्धतीची आहे. एकशेंदहा वर्षांचे हे मुफ्ती अद्यापि अतिशय उत्साही आहेत. छातीवर रुळणारी ती त्यांची धवलवर्ण दाढी, गौरवर्ण व सुस्वभाव पाहून आमच्या मनांत त्यांच्याविषयीं खूप आदर निर्माण झाला.

आम्हांला त्यांनीं अत्याग्रहानें जेवावयास ठेवून घेतलें. जेवण्यांत सुका मेवा, फळें, सरबतें, मांस, मासे व भाज्या यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव करण्यांत आला होता. जेवण संपल्यानंतर उझबेकिस्तानच्या खास कपबशांतून त्यांनीं आम्हांला चहा दिला.

जेवण संपल्यावर आम्हीं त्यांचें घर पाहिलें. निरोप घेतांना त्यांनीं आम्हां प्रत्येकजणीला प्रसाद म्हणून रेशमानें भरलेल्या मखमली टोप्या दिल्या. त्या

त्यांनीं आपल्या हातांनीं आमच्या डोक्यांवर घातल्या. या प्रसंगींचा फोटो मी तुला दाखवीन. तो फोटो खूपच गंमतीदार दिसतो.

आज आम्ही आणखीहि बऱ्याच गोष्टी येथें पाहिल्या. त्यासंबंधींची हकीगत मी पुढील पत्रांत लिहीन. कळावें.

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र तेरावें

आर्टिस्टस् रेस्ट हाऊस
ताश्कंद
दिनांक १३ मे १९५४

प्रिय शांता,

काल आम्ही शहरांतून पुष्कळ हिंडलों. आम्हांला पाहून येथील लोकांना खूप गंमत वाटते असें दिसतें. कारण आम्हांला पहाण्यासाठीं लोकांचे थवे रस्त्यावर थबकून राहातात. त्यांच्यापैकीं कित्येकजण आम्हांला 'उझबेकी' भाषेंत कांहीं प्रश्न विचारतात; परंतु अर्थातच भाषा येत नसल्यामुळें आम्ही त्यांना कांहींच उत्तर देऊं शकत नाहीं. कांहीं स्त्रीपुरुष आमच्याजवळ येऊन हस्तांदोलन किंवा 'सलाम अलेकुम' करून जातात.

उझबेक कापसाचें आगर असल्यामुळें येथें नातीजातीचें सुती कापड तयार होतें. या लोकांना जपानी लोकांप्रमाणेंच मोठमोठ्या वेलबुट्टीचें रंगीत कपडे पेहेरण्यास आवडतात. या लोकांच्या चेहेरेपट्टीची ठेवण मात्र अगदीं एकसारखी वाटते. चौकोनी थबकट चेहरे आणि बारीक डोळे! मात्र यांचीं नाकें तरतरीत आहेत. शहरांतून हिंडतांना एक गोष्ट प्रामुख्यानें दिसून

येते कीं, येथील मंडळींत स्वच्छता बेताबेताचीच आहे. त्यांच्या कपड्याला बरेच दिवस पाण्याचें दर्शन न झाल्यामुळें कीं काय एक प्रकारचा ओशट गंध येतो.

गेल्या तीस वर्षांतील येथील स्त्रियांची झालेली प्रगति मात्र कौतुकास्पद वाटते. विसाव्या शतकाच्या प्रारंभींच्या काळांतील भारतीय स्त्रियांच्या जीवनाची कहाणी व उझबेकिस्तानांतील स्त्रीजन्माची कहाणी यांत फारसा फरक नाहीं. आजची प्रगत परिस्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं त्यांना प्रचंड झगडा करावा लागला. आज त्यांनीं गोषा अजिबात झुगारून दिला आहे व शिक्षणाच्या बाबतींत उच्चांक गांठला आहे. बहुतेक सरकारी खात्यांत जबाबदारीच्या जागा येथील स्त्रियांनींच पटकाविल्या आहेत. स्त्रीच्या कर्तबगारीचा केवढा हा विजय!

'जमीला' व 'जहीदा' या दोन उपमंत्री स्त्रिया नेहमींच आमच्या-बरोबर असतात. या दोघींबद्दल मी माझ्या मागच्या पत्रांत ओझरता उल्लेख केलेला आहेच. जमीला खूप बोलकी आहे. सारा दिवस तिची बडबड चालूच असते. ती सांस्कृतिक खात्याची उपमंत्री ( Deputy Minister of Culture ) आहे. स्वभावानें ती खूप चांगली व मनमिळाऊ आहे. तिला इंग्रजी येतें. तिच्याजवळ विनोदवृत्ति भरपूर प्रमाणांत असल्यामुळें तिच्याशीं बोलतांना खूपच गंमत वाटते. ती बरीच बुद्धिमान् आहे. कारण आमच्या जवळून या दोन दिवसांत तिनें बरेच हिंदी शब्द शिकून घेतले. सारा वेळ तिची इकडून तिकडे लवलव चाललेलीच असते.

जहीदा ही स्वतः पेशानें डॉक्टर असून ती आरोग्य खात्याची उपमंत्री ( Deputy Minister of Health ) आहे. जहीदा कांहींशी अबोलच आहे. ती मोजकें व नेहमींच खालच्या आवाजांत बोलते. तिची व आमच्या डॉ. कमला मेननची खूप मैत्री जमली आहे. दोघीहि एकाच व्यवसायाच्या!

ताश्कंदमधील वनश्री मात्र अति रम्य आहे. सगळीकडे हिरवीगार झाडी व त्यांतून डोकावणारीं सफेद, पिवळी व गुलाबी रंगाची पुसिविलोचीं फुलें मनाला मोहित करतात. सुरूच्या वृक्षांच्या जोडीला आपल्या माथ्यावर फक्त

फुलांचेच गुच्छ घेऊन उभे राहिलेले पर्णहीन असबेन वृक्ष येथील निसर्गाला आगळीच शोभा आणतात.

काल आम्ही येथील इन्स्टिट्यूट ऑफ ओरिएंटल सायन्सेस् ही संस्था पहावयास गेलों होतों. अशीच एक संस्था मॉस्को शहरांतहि आहे. ही संस्था म्हणजे रशियांतील विद्वानांचें माहेरघरच आहे. या संस्थेच्या मुख्यानें आम्हांला संस्थेची माहिती दिली व नंतर तेथील अनेक दुर्मिळ ग्रंथ आम्हांला दाखविले.

येथें ऐंशीं हजार ग्रंथ आहेत. याखेरीज जुनीं प्राचीन हस्तलिखितें, चर्मपत्रें व ताम्रपत्रें आहेत तीं वेगळींच! हें ग्रंथालय इतिहास, ज्योतिष, खगोल, रसायन व वैद्यक वगैरे सर्व शास्त्रांसंबंधींच्या अफाट ज्ञानाचें एक भांडारच आहे! सर्व शास्त्रांसंबंधींचें अद्ययावत् संशोधन येथें करण्यांत येतें. येथील एका ग्रंथांत चरकमुनींबद्दल आम्हांला माहिती आढळली. येथें आम्हीं इ. स. १६०१ मधला एक दुर्मिळ चर्मलेख पाहिला. त्यांत प्लास्टिक सर्जरी व ब्रेन ट्युमर या उल्लेख केलेला आहे असें आम्हांला सांगण्यांत आलें. दोन महत्त्वाचे वैद्यकीय शोध पंधराव्या शतकांतच लागले होते, असें येथील विद्वानांचें म्हणणें आहे.

येथें फारशी, अरबी, ताझेक, काझेक वगैरे अनेक भाषांतील ग्रंथ आहेत. या ठिकाणीं मध्य आशियांतील वाङ्मयाची व शास्त्राची परंपरा पहावयास मिळते. निरक्षरता नष्ट झाली असल्यामुळें उझबेकिस्तानांत शास्त्र, विद्या, कला व वाङ्मय यांची अपरंपार प्रगति झालेली आहे.

ही संस्था पाहिल्यानंतर आम्हीं १९३६ मध्यें सुरू झालेल्या एका संगीत कॉलेजला भेट दिली. येथें गायन, वादन व नृत्य यांचें शास्त्रोक्त शिक्षण दिलें जातें व येथून या विषयाच्या पदव्या घेऊन अनेक विद्यार्थी बाहेर पडतात. क्रांतीच्या पूर्वी येथें या ललितकलांच्या विकासाला मुळींच वाव नव्हता; परंतु आतां सबंध उझबेक संगीतमय झाल्यासारखें वाटतें. प्रथम येथें १९२९ मध्यें एक नाट्यगृह बांधण्यांत आलें. त्यामध्यें विद्यार्थ्यांना नाट्यकलेचें शिक्षण नेरॉनॉफ नांवाचे एक रशियन तज्ज्ञ देत असत. कॉलेज सुरू झाल्यानंतर त्याचा फायदा अनेक विद्यार्थी घेऊं लागले. सध्यां येथें सुमारें

पांचशें विद्यार्थी आहेत. येथें गायन, संघसंगीत, वादन, नृत्य, गीतरचना वगैरेसारखे विभाग आहेत. याखेरीज संगीतकलेचीं मूलभूत तत्त्वें व इतिहासहि येथें शिकविला जातो. विद्यार्थ्यांना लोकसंगीत व लोकवाद्य याचा खास अभ्यास करावा लागतो. येथें सत्तर ऐंशी प्राध्यापक आहेत. गरजू विद्यार्थ्यांना फी भरण्यासाठीं कांहीं रक्कमहि दिली जाते. शिवाय त्यांना येथें शिक्षण घेत असतांना हातखर्चाला पैसे दिले जातात. येथें मध्य आशियांतील निरनिराळ्या विभागांतून विद्यार्थी येत असतात. काझेक व उझबेक विद्यार्थ्यांखेरीज बाकी सर्वांना महिन्याला दोनशें रूबलसपर्यंत फी भरावी लागते.

येथील मुख्याध्यापकांनीं आम्हांला मध्यवर्ती दालनांत नेलें. तेथें कांहीं विद्यार्थी व विद्यार्थिनी संघसंगीताची प्रॅक्टिस करीत होत्या. त्यांनीं आम्हांला निरनिराळ्या वाद्यसंघांतून गाणीं वाजवून दाखविलीं. येथें आपल्याकडील सारंगी, बीन वगैरेच्या धर्तीवर पण आकारानें व रचनेनें विलक्षण अशीं अनेक अपरिचित वाद्यें आम्हांला दिसलीं. त्यांनीं वाजविलेल्या अनेक गीतांपैकीं ॲशॉटिव्ह नांवाच्या कवीनें रचलेलें Song of Youth नांवाचें संघगीत आम्हांला फारच आवडलें. याखेरीज येथील विद्यार्थ्यांनीं एक बंगाली गाणें आम्हांला वाजवून दाखविलें. ते बंगाली भाषेंतील शुद्ध उच्चार ऐकून आम्ही आश्चर्यचकित झालों.

त्यानंतर येथून परत जाण्यापूर्वीं तेथील मंडळींच्या इच्छेवरून पौर्णिमा पक्कासा यांनीं पियानोवर एक रागदारीचें गाणें वाजविलें व सुचेता कृपलानी यांनीं एक बंगाली गीत गाऊन दाखविलें व नंतर या सगळ्या कलावंतांचें कौतुक करीत आम्हीं त्यांचा निरोप घेतला.

उद्यां आम्ही समरकंद पहावयास जाणार आहोंत. लहानपणीं शाळेमध्यें असतांना मला मोंगलांचा ऐश्वर्यशाली कालखंड फार आवडत असे. त्या वेळीं मोंगल राज्याचा संस्थापक बाबर याच्या फरघाना प्रांताचें किंवा समरकंद-सारख्या ऐतिहासिक शहराचें चित्र मी माझ्या डोळ्यासमोर कल्पनेनेंच उभें करीत असें. हा भाग कधींकाळीं मला पाहावयास मिळेल असें मला स्वप्नांतहि वाटलें नव्हतें. समरकंदमध्यें अनेक इतिहासप्रसिद्ध स्थळें असल्यामुळें तें

शहर केव्हां एकदां पहावयास मिळेल असें आम्हांला होऊन गेलें आहे. मला वाटतें तूं जर आमच्याबरोबर असतीस तर तुझ्याहि मनाची अशीच अवस्था झाली असती !

काल रात्रीं येथें खूपच मजा आली. मी तुला लिहिलेंच आहे कीं या रेस्ट हाऊसच्या अवतींभोंवतीं एक मोठा बगीचा आहे. या बगीचांत अनेक तऱ्हेचीं फुलझाडें आहेत. विशेषतः रंगीबेरंगी पॉपीचीं व शेतकऱ्याच्या गुलाबाचीं फुलझाडें खूपच आहेत. युरोप खंडांत फक्त लाल रंगाचेंच पॉपी फूल आढळतें. पण येथें मात्र आम्हांला पॉपीमध्यें अनेक रंग आढळले. शेतकरी गुलाब ( Farmer's Rose ) हें आपल्याकडील मोठ्या जास्वंदीप्रमाणें घेरेदार गुलाबी रंगाचें फूल आहे. त्याला मंद सुवास येतो व तो गुलाबाप्रमाणेंच असतो. याचें पीकहि उमाप येतें व ती एक गुलाबाची रानटी जात आहे, म्हणून कदाचित् त्याला 'शेतकऱ्याचा गुलाब' म्हणत असावेत. या बागेंत बसण्यासाठीं सुंदर शिलाखंड ठेवलेले आहेत. सध्यां टिपूर चांदणें पडत असल्यामुळें चांदण्याच्या धवल प्रकाशांत बागेची शोभा अवर्णनीय भासते.

काल रात्रीं आमचीं जेवणें झाल्यानंतर येथील एक सुप्रसिद्ध गायिका व एक विख्यात नर्तिका आम्हांला भेटावयास आली. ज्युलियामा व हलिमा अशीं त्यांचीं नांवें आहेत. त्यांनीं आम्हांला अनेक गाणीं गाऊन दाखविलीं व नृत्यहि करून दाखविलें. उझबेकी नृत्यांत व आपल्या भारतीय नृत्यांत बरेंच साम्य आहे. मात्र त्यांच्या नृत्यांत उत्तानता अधिक प्रमाणांत असून, त्यांचे हावभाव व गति अनिर्बंध असते. तथापि फारशा सुंदर नसलेल्या या नर्तिका चेहऱ्यावर वेगवेगळे भाव उमटविण्यांत मात्र कमालीच्या चतुर व निष्णात आहेत.

हलिमानें तर कमालच केली ! आमच्यापैकीं प्रत्येकीला ओढून तिनें जबरदस्तीनें आपल्याबरोबर नाचावयास भाग पाडलें. आमची हंसतां हंसतां पुरेवाट झाली ! कारण आमचें नृत्याचें ज्ञान यथातथाच होतें व त्यामुळें त्या कसलेल्या नर्तिकेबरोबर नाचतांना आमची तारांबळ उडूं लागली.

त्यानंतर हलिमानें उझबेकमधील स्त्रियांना कलेच्या क्षेत्रांत प्रवेश करतांना कोणकोणत्या दिव्यांतून जावें लागतें, याची आम्हांला साद्यंत माहिती सांगितली.

ती माहिती ऐकून पुन्हां एकवार माझ्या मनांत आलें कीं, भारतीय व उझबेक स्त्रीच्या पूर्वायुष्यांत कमालीचें साम्य आहे.

अद्यापि आम्हांला ताश्कंदमधील अनेक स्थळें पहावयाचीं आहेत. आज रात्रीं आम्हीं येथील सुप्रसिद्ध अलिशेर नोव्हाई नाट्यगृहांत 'ताहेर व जोहरा' नांवाचें नाटक पहावयास जाणार आहोंत. तें फारशी भाषेंत आहे. या कार्यक्रमासंबंधीं तुला उद्यां लिहीन.

तूर्त कांहींच अधिक नाहीं. कळावें.

तुझी

सौ. चारुशीला

---

## पत्र चौदावें

आर्टिस्टस् रेस्ट हाऊस
ताश्कंद
दिनांक १५ मे १९५४

प्रिय शांता,

परवां रात्रीं आम्हीं 'ताहेर जोहरा' नांवाची एक शोकान्तिका पाहिली. नाटकाला खूपच गर्दी होती. परंतु प्रेक्षकवर्ग आपल्याइकडील पिटांतील प्रेक्षकांप्रमाणें अगदींच सामान्य दर्जाचा होता. आम्हीं नाटकगृहांत पाऊल ठेवल्याबरोबर त्यांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. हें नाट्यगृह मात्र अगदीं सामान्य दर्जाचें व जुनाट आहे.

'ताहेर जोहरा' ही एक पर्शियन भाषेंतील लैला-मजनू पद्धतीची अस्सल प्रेमकहाणी आहे. जोहरा ही राजकन्या असते व तिच्या हातून ताहेर नांवाच्या सामान्य दर्जाच्या शिपाईगड्यावर प्रेम करण्याचा अपराध घडतो.

मग त्यांची तायातूट होते. शेवटीं ताहेरला प्राणदंडाची शिक्षा होऊन जोहरा त्या धक्क्यानें मृत्यु पावते. पर्शियन भाषा येत नसतांहि आम्हांला नाटकाचें संविधानक समजण्यास फारसे प्रयास पडले नाहींत. शिवाय त्यांतील कांहीं फारशी शब्द आम्हांला परिचित होते. रंगभूमीवरील देखावे, प्रकाशयोजना व पात्रांचा पोषाख यांत मात्र खूपच झगमगाट होता. उझबेकमधील एका ऐतिहासिक कालखंडांतील लोकांच्या राहणीचें व सामाजिक चालीरीतींचें या नाटकाच्या द्वारें आम्हांला यथार्थ दर्शन झालें. इन्सान आणि इष्क यांसाठीं झालेला तो झगडा पाहून आम्हांला खूप मौज वाटली.

काल सकाळीं ७–५० ला आम्ही समरकंदास जावयास निघालों. हा प्रवास आम्हीं विमानांतून केला. समरकंदला आम्ही ८–३० वाजतां पोहोंचलों.

समरकंद हें शहर इतिहासप्रसिद्ध असूनहि आज मात्र अगदीं मोडकळीच्या अवस्थेंत उभें आहे. याखेरीज ताश्कंदपेक्षां येथें वैराण भाग अधिक प्रमाणांत आढळतो. वातावरणांत रखरखीतपणाहि जास्त होता. आम्हांला उतरून घ्यावयास बरीच प्रतिष्ठित मंडळी आली होती. त्यांनीं आणलेल्या मोटारींतून आम्ही लगेच शहरांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें पाहण्यास निघालों. कारण आम्हांला संध्याकाळीं पुन्हां ताश्कंदला परत जावयाचें होतें. माझ्या मोटारींत इव्हान इव्हानोविच नांवाचे इतिहासाचे एक वृद्ध प्राध्यापक बसले होते. त्यामुळें त्यांच्याकडून समरकंदसंबंधीं मला बरीच सत्य माहिती ऐकावयास मिळाली.

समरकंदचें एक वैशिष्ट्य म्हणजे तेथें सर्वत्र आढळून येणाऱ्या लाल मातीच्या टेंकड्या अथवा ढिगारे. अशा या टेंकड्या गांवांतसुद्धां सर्वत्र आढळून येतात. येथील लोक अगदींच खेडवळ व मागासलेले वाटतात. मेंढ्या पाळणें हा त्यांचा महत्त्वाचा धंदा असून येथील मेंढ्या दिसावयास फारच गोजिरवाण्या दिसतात.

प्रथम आम्हीं उलुकबेगनें पंधराव्या शतकांत बांधलेली एक वेधशाळा (Observatory) पाहिली. सध्यां ती अगदींच मोडकळीच्या अवस्थेंत आहे. तिची रचना आपल्या इकडे जयपूर येथें किंवा दिल्ली येथें जी जुनी वेधशाळा आहे तिच्याप्रमाणेंच आहे. पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धांत या

भागावर उलुकबेगची सत्ता होती. उलुक हा एक मोठा खगोलशास्त्रज्ञ होऊन गेला. त्याचाच नातू तिमूरलंग. समरकंदमध्यें प्राचीन काळीं अनेक प्रख्यात ज्योतिषी होऊन गेले. त्यांनीं या शास्त्रासंबंधीं उलुकबेगच्या मनांत आवड निर्माण केली. त्यांच्या मदतीनें त्यानें इ. स. १४२८ च्या सुमारास ही वेधशाळा बांधली. उलुकबेग हा एक विद्वान व व्यासंगी राज्यकर्ता होऊन गेला. ज्योतिष व साहित्य या दोन विषयांचा त्याचा व्यासंग प्रचंड होता. सबंध रात्र तो या वेधशाळेंत बसून आकाशांतील ताऱ्यांचें व ग्रहगोलांचें निरीक्षण करीत असे. त्या काळांत दुर्बिणीचा उपयोग माहीत नसल्यामुळें त्यानें स्वतः या निरीक्षणासाठीं एक यंत्र बनविलें होते व त्या यंत्राचा तो दुर्बिणीप्रमाणें उपयोग करीत असे. १४४९ मध्यें उलुकबेग मारला गेला व मग हळूहळू या त्याच्या आवडत्या वेधशाळेलाहि कष्टमय दशा येऊं लागली. शेवटीं ही वेधशाळा मातीच्या ढिगाऱ्याखालीं गाडली गेली. नंतरच्या काळांत अनेक संशोधकांनीं ती शोधून काढण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांत त्यांना यश मिळालें नाहीं. अखेर वेटकिन ( Vetkin ) नांवाच्या उत्खनन-तज्ज्ञास १९०८ मध्यें एका प्राचीन हस्तलिखितावरून या वेधशाळेच्या निश्चित ठिकाणाचा पत्ता लागला व १९०९ मध्यें येथें उत्खनन सुरू केलें. परंतु त्यांना फक्त ज्या शास्त्रीय साधनानें उलुकबेग ताऱ्यांचें निरीक्षण करीत असे, ती दुर्बीण सांपडली. मात्र प्रयत्न सुरूच राहिले व १९४८ मध्यें त्यांना ही वेधशाळा सांपडली. हिच्या मध्यभागीं जिन्याप्रमाणें पाववर्तुळ ( Quardon ) असून त्यावर विवक्षित खुणा केलेल्या आहेत. वरच्या भागांतून एक छोटेंसें झरोकें असून त्यांतून आंत प्रकाश पडेल अशी योजना केलेली आहे. ही सबंध वेधशाळा एक प्रचंड खडक खोदून तयार केलेली दिसते. प्रथम तिचा आकार वर्तुळाप्रमाणें होता. आतां संशोधन करून काढलेला भाग या वर्तुळाचा एक चतुर्थांश आहे.

आमच्याबरोबर असणाऱ्या प्राध्यापकांना मीं जयपूरच्या वेधशाळेसंबंधीं सांगितलें; परंतु ते म्हणाले कीं, जयपूरची वेधशाळा १६ व्या शतकांतील असून उलुकबेगची वेधशाळा तत्पूर्वीची आहे. जयपूरच्या वेधशाळेची माहिती तारकंदच्या ग्रंथालयांत लिहून ठेवलेली आहे, अशीहि माहिती या प्राध्यापकांनीं आम्हांला दिली.

उलुकबेगनें आपल्या संशोधनासाठीं आणखीहि बरींच नवीन नवीन साधन तयार केलीं होतीं असें सांगतात. पण तीं सांपडलीं नाहींत. त्यानें त्या अभिनव साधनांच्या साहाय्यानें जे अनेक सिद्धांत ठरविले, त्यांपैकीं बरेच सिद्धांत शास्त्र-शुद्ध व बिनचूक आहेत हें सिद्ध झालें आहे. पृथ्वीला सूर्याच्या भोंवतीं प्रदक्षिणा करावयास ३६५ दिवस, ६ तास, १० मिनिटें व ८ सेकंद लागतात, असें त्याचें म्हणणें होतें. आपल्या इकडील जुन्या हस्तलिखितांतूनहि हा काल ३६५ दिवस, ६ तास, ९ मिनिटें व १० सेकंदचा असतो असा उल्लेख आढळतो.

उलुकबेगच्या या वेधशाळेचे मीं बरेच फोटो घेतले आहेत. ते मी तुला कधींतरी दाखवीन. सध्यां या भागांत जिकडे तिकडे दगडधोंडे व झुडुपें पसरलीं आहेत. मात्र ठिकठिकाणीं जुने अवशेष आढळून येतात.

यानंतर आम्ही येथील 'शाहीझिंदा' पहावयास गेलों. येथें अनेक थडगीं आहेत. सातव्या शतकापासून या कबरी बांधावयास सुरुवात झाली. १६ व्या शतकापर्यंतच्या अनेक प्रसिद्ध व्यक्तींच्या या ठिकाणीं कबरी असून त्यांचें बांधकाम पहाण्यासारखें आहे. येथें प्रथम महम्मूदचा चुलतभाऊ, कुसन, इब्न आब्बास यांचें थडगें बांधण्यांत आलें व त्यानंतर थोर व्यक्तींचीं थडगीं येथें बांधण्याची प्रथा पडली. येथें आम्हांला तैमूरलंग, त्यांच्या अनेक बायका, बहिणी वगैरे सर्वांचीं थडगीं पहाण्यास मिळालीं. हीं सर्व थडगीं, निळ्या मोरपिशी व सफेत रंगाच्या दगडांनीं बांधलेलीं आहेत. येथें इ. स. १३३४ मध्यें केलेलें छतावरील वेलबुट्टीचें काम व त्यांतील कलाकुसर प्रेक्षणीय आहे. एका काळीं समरकंद विद्या, कला व संपत्ति यांचें आगर होतें. परंतु चिंगिझखानाच्या स्वाऱ्या व भूकंप या दोन आपत्तींनीं या सुंदर शहराचा सत्यानाश केला आहे. या 'शाहीझिंदा' च्या मागें एक मोठी आख्यायिका आहे. धार्मिक छळाला कंटाळून शाहीझिंदा येथें आला. येथें एक मोठी टेकडी होती. ती टेकडी दुभंगून तिनें त्याला आपल्या उदरांत आश्रय दिला. ज्या ठिकाणीं टेकडी दुभंगली होती तेथें आतां एक मोठा नक्षीदार सागवानी दरवाजा या आख्यायिकेचें प्रतीक म्हणून तयार केलेला आहे.

शाहीझिंदाच्या पलिकडे बिबी खानुन् मशीद आहे. ही इमारत अतिशय उंच आहे. मला वाटतें, पुण्यांतील शनवारवाड्याच्या दुप्पट हिची उंची व व्यास असेल. इ. स. १३९९ मध्यें तैमूरलंगानें हिंदुस्थानवर स्वारी करून परत येतांना खूप जवाहीर व संपत्ति आणली व मग त्यानें ही अपूर्व इमारत बांधण्यास सुरुवात केली. १४०४ मध्यें त्याला पश्चिमेकडील स्वारीवर जावें लागलें. त्याच्या गैरहजेरींत बांधलेला भाग त्याला नापसंत होऊन त्यानें इंजिनियरचा व त्याच्या कुटुंबाचा अमानुषतेनें वध केला. नंतर स्वतःच्या देखरेखीखालीं त्यानें ही इमारत बांधून घेतली. पूर्वेकडील देशांतील मुसलमान राज्यकर्त्यांनीं बांधलेल्या सर्व इमारतींत या इमारतीचा पहिला नंबर लागतो. या इमारतींत स्फटिकांचे चारशें स्तंभ होते; पण त्यांपैकीं अनेक खांब भूकंपामुळें कोसळून जमीनदोस्त झाले आहेत. प्रवेशदरवाजा प्रचंड असून तो सप्तधातूंचा बनविला आहे.

तिमूरची पत्नी बिबी हानुम ही सौंदर्यसम्राज्ञी होती. तिच्यावर त्याचें नितांत प्रेम होतें. तो प्रत्येक स्वारीहून परत आल्यावर तिला मौल्यवान नजराणे देई. आपणहि असेंच एखादें अनपेक्षित बक्षीस आपल्या पतीला द्यावें असें ठरवून, तो एका स्वारीवर गेला असतां, तिनें त्याच्यासाठीं एक मशीद बांधावयाचें ठरविलें. तिच्याजवळ पैसा भरपूर होताच. त्यामुळें कामगार मिळावयास अडचण पडली नाहीं. इमारत बांधण्यासाठीं ज्या इंजिनियरची योजना केली होती, तो तरुण असून अतिशय देखणा होता. कामाच्या निमित्तानें त्याची व तिची अनेकवार भेट होई. त्यामुळें तो तिच्यावर प्रेम करूं लागला. इमारतीचें काम लवकर संपलें तर तिच्या सहवाससुखाला आपल्याला मुकावें लागेल म्हणून तो इमारत बांधण्यांत दिरंगाई करूं लागला. इतक्यांत तिमूर परत आला व त्याला या प्रेम-प्रकरणाचा सुगावा लागला. परंतु तो इंजिनियर पळून गेल्यामुळें त्याच्या क्रूर शिक्षेंतून बचावला. मात्र या आख्यायिकेचा इतिहासांत उल्लेख नाहीं. इतिहासांत ही बिबी साठ वर्षांची असून तिचें नांव सराई मुल्क हनिम असें होतें, असा तिच्यासंबंधींचा उल्लेख आहे.

कांहीं का असेना, समरकंद येथील या इतिहासप्रसिद्ध स्थळांमागील

अद्‌भुतरम्य आख्यायिका ऐकत असतांना त्या स्थळांचें निरीक्षण करण्यांत आम्हांला एक प्रकारच्या वेगळ्याच आनंदाचा लाभ होत होता.

यानंतर आम्हीं पाहिलेल्या स्थळांची माहिती मी माझ्या पुढील पत्रांत लिहीन. तूर्त कांहींच नाहीं.

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र पंधरावें

आर्टिस्टस् रेस्ट हाऊस
ताश्कंद
दिनांक १६ मे १९५४

प्रिय शांता,

माझं कालचं पत्र वाचून समरकंद पाहण्याची तुझ्या मनांत अगदीं प्रबळ इच्छा झाली असेल, नाहीं का ? आणि तसें होणें अगदीं साहजिक आहे. समरकंद येथें अनेक इतिहासप्रसिद्ध ठिकाणें आहेत. आम्ही सर्वजणी तीं पाहून खूष होऊन गेलों आहोंत.

तेथील हवामान मात्र फारच उष्ण व रखरखीत वाटलें. परवां आम्ही तेथें होतों तेव्हां तर हवेंत कमालीची उष्णता होती. उष्ण प्रदेशांतील असूनहि तें कडक उन्ह आम्हांला सहन होईना. आमच्यापैकीं सौ. उर्मिला मेथा यांना तर त्या उन्हामुळें चक्कर आली व मग त्यांना शेवटीं मोटारींतच बसून रहावें लागलें.

माझ्या पत्रांतील बिबी हानुम मशिदीची पूर्वपीठिका वाचून तुला गंमत

वाटली असेल! बिबी हानुमच्या प्रेमकथेवरून तुला एखादें प्रेमकाव्यहि सुचलें असेल कदाचित्!

बिबी हानुमची मशीद पाहिल्यानंतर आम्ही रेगिस्तान पहावयास गेलों. रेगी म्हणजे वाळू. हा सर्व भाग वालुकामय असल्यामुळें या भागाला रेगिस्तान म्हणण्यांत येतें. येथें अनेक उंच व प्रेक्षणीय मीनार असून त्यांतील बरेच उलुकबेगनें बांधलेले आहेत. येथें त्याच्या आदेशानुसार बांधलेलें एक ' मदरसा ' म्हणजे हायस्कूलहि आहे. त्यांत पूर्वी अनेक मुसलमान विद्यार्थी असत. राजपुत्रहि येथेंच शिक्षण घेत. मात्र या मदरसेंत मुसलमानांच्या रिवाजाप्रमाणें धर्मशास्त्राचें शिक्षण देण्यांत येत नसून उलुकबेगच्या आवडत्या विषयाचें–ज्योतिषशास्त्राचें शिक्षण मुलांना देण्यांत येई. उलुकबेग स्वतः यांतील एका मिनारांत बसून विद्यार्थ्यांना ज्योतिषशास्त्रावर व्याख्यानें देत असे. हा मनोरा आम्हीं पाहिला. तो १४२० च्या सुमारास बांधलेला असून अतिशय उंच आहे. आपल्या उंचीच्या तोऱ्यांत जगाकडे दृष्टि फेंकणारा हा मनोरा एका अंगाला किंचित् कलंडला असून तो कोसळून पडण्याची भीति येथील मंडळींना वाटत आहे. त्यामुळें तो पाडून जमीनदोस्त करण्याचा विचार चालला आहे. १९३३ मध्यें असाच एक हलूं लागलेला मनोरा पाडून टाकण्यांत आला. मदरसाच्या मुख्य इमारतीला जोडून आणखी दोन इमारती अनुक्रमें १६ व्या व १७ व्या शतकांत बांधल्या आहेत. १७ व्या शतकांतील या इमारतीवर वाघाचें एक प्रचंड मुख बसविलें असून तें कशाचें प्रतीक असावें, हें निश्चयपूर्वक सांगतां येत नाहीं. या इमारतीस लागूनच मागच्या बाजूस एक छोटी, पण अपूर्णावस्थेंतील इमारत उभी आहे. ती पण एक वेधशाळा होती असें सांगतात. तथापि, कांहींच्या मतें ती एक मशीद असावी असें आहे. ' बुखारा ' नांवाच्या शहरांतहि अशी एक ' मदरसा ' आढळते. परंतु तेथें धर्मशिक्षण दिलें जात असे.

रेगिस्तानपुढें जात असतां आम्हांला दूर अंतरावर पिरोजी दगडांनें बांधलेला एक घुमट दिसूं लागला. तो घुमट तैमूरलंगाच्या कबरीचा आहे असें आम्हांला आमच्या दुभाषांनीं सांगितलें. या कबरीमागचा इतिहासहि खूप विलक्षण आहे. किंबहुना, येथील स्थळामागें कांहीं ना कांहींतरी

रोमांचकारी अद्‌भुतकथा आहेच ! त्या कबरीचें नांव आहे 'गोरी इमीर.' इ. स. १३९९ मध्यें तैमूरलंग पश्चिमेकडील तुर्कस्तान व इराण या देशांवर स्वारीला गेला. त्याच्या गैरहजेरींत त्याचा लाडका नातू महम्मूद सुलतान त्याचें कामकाज पहात असे. इ. स. १४०१ मध्यें तैमूरनें आपल्या नातवाला पश्चिमेकडील कामगिरीवर बोलावून घेतलें. परंतु वाटेंत महम्मूद सुलतानचा अंत झाला. आपल्या लाडक्या सुलतानाच्या मृत्यूमुळें तैमूरलंगास मनस्वी दुःख झालें. त्यानें त्याचें शव समरकंदला आणून त्याची कबर बांधण्याचें ठरविलें. कोनशिला बसवून झाली व इमारतीचें बांधकामहि सुरू झालें. इ. स. १४०५ मध्यें तैमूर चीन देशावर स्वारी करण्याचे बेत रचीत असतांच एकाएकीं मरण पावला. मग त्याचें शव या इमारतींत पुरलें. अशा रीतीनें नातवाच्या नांवाऐवजीं ही कबर आजोबाच्या नांवानेंच प्रसिद्धीस आली. 'मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्र चिन्तयेत्' असें म्हणतात ते खोटें नाहीं.

मात्र ही इमारत अतिशय सुंदर आहे. हिचें बांधकाम सफेत, काळ्या व गडद हिरव्या दगडानें केलें असून त्यासाठीं चीनमध्यें सांपडणारे निफ्रीय व निलफ्रेट नांवाचे अत्यंत मौल्यवान् पाषाण वापरण्यांत आले आहेत. या इमारतीचें एक वैशिष्ट्य म्हणजे तिच्या भिंती ऑनिक्स नांवाच्या पारदर्शक स्फटिकांच्या बनविल्या आहेत. असा एकच पारदर्शक दगड आग्र्याला लाल किल्ल्यांत आहे. त्याचें आपल्याला किती तरी कौतुक वाटतें. परंतु येथें तर तसे असंख्य दगड आम्हांला पहावयास मिळाले. दर्शनी कबरीच्या खालीं तळघरांत मूळ कबरी आहेत.

समरकंद हें उझबेकिस्तानमधील केवळ अति प्राचीन शहर आहे, एवढेंच नव्हे तर मध्य आशियांतीलहि तें एक प्राचीन शहर आहे. याचा बराच भाग व इमारती जमिनींत गाडल्या गेल्या होत्या. या शहरांत अगदीं अलिकडेच उत्खननाचें काम सुरू झालें. समरकंदजवळील सुल्लादरी सुरखानदरिया नांवाच्या ठिकाणीं दोन हजार वर्षांपूर्वीचा माणसाचा सांगाडा उत्खननांत सांपडला. असेच सांगाडे चीन, मंगोलिया, तिबेट वगैरे ठिकाणीं सांपडले आहेत. अश्मयुगांतील अनेक वस्तू येथें उत्खननांत सांपडल्या आहेत.

जुन्या कागदोपत्रीं या शहराचा उल्लेख मारकंद नांवानें केलेला आढळतो. या शहराभोंवतीं प्राचीन काळीं एक प्रचंड भिंत होती. तिचे अवशेष आजहि आढळून येतात. सगळ्या ऐतिहासिक सिद्धांतांवरून हें शहर तीन साडे तीन हजार वर्षांपूर्वी वसलें असावें असा अंदाज आहे. त्यामुळेंच येथील अनेक भाग जमिनींत गाडले गेले असावेत. आम्हीं पाहिलली गोरी इमीर ही कबरीची इमारतहि अशीच जमिनींत पुरली गेली होती. ती १९४१ मध्यें झालेल्या उत्खननांत सांपडली. त्यांत तैमूरलंगाचा व त्याच्या कुटुंबियांचे सांगाडे व डोक्याच्या कवट्या सांपडल्या. तैमूरलंगाच्या सांपडलेल्या या सांगाड्यावरून, डोक्याच्या कवटीवरून, गिरसॅमोव्ह नांवाच्या प्राध्यापकानें त्याची एक तसबीर तयार केली. ही तसबीर आम्हीं मुद्दाम पाहिली. या सांगाड्याच्या पुराव्यावरून तो एका पायानें लंगडा असून त्याला अस्थिक्षय ( T. B. of Bones) झाला असावा असें अनुमान काढलें आहे. तुला आणखी एक मजा सांगायची म्हणजे मी येथील एका वस्तुसंग्रहालयांत 'बाबर'ची इतिहासप्रसिद्ध दैनंदिनी पाहिली.

समरकंदच्या आंवतींभोंवतींचें ऐतिहासिक वातावरण कायम टिकून असूनहि सध्यां या शहरांतील सुधारणा व पुनर्रचना मोठ्या झपाट्यानें होत आहे. येथील लोकसंख्येंत बऱ्याच पटीनें वाढ झाली असून सांस्कृतिक दृष्ट्याहि या शहरानें आपली प्रशंसनीय प्रगति केलेली आहे. क्रांतीपूर्वी येथें फक्त माध्यमिक शाळा होत्या; परंतु सध्यां येथें शाळांची संख्या तर वाढलीच आहे; पण याखेरीज सहा भव्य विश्वविद्यालयें व एक विद्यापीठहि स्थापन झालें आहे. विद्यापीठांत दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून तेथें इतिहास, साहित्य, गणित वगैरे अनेक विषय शिकविण्याची सोय आहे. याखेरीज शेतकी, वैद्यक व सोव्हिएत व्यापारविषयक शिक्षण वगैरेंचीं केंद्रें आहेत. तशींच द्राक्षांची व इतर फळांची लागवड, रेशमाच्या किड्यांची जोपासना व मेंढ्यांचें शास्त्रीय दृष्ट्या पालन वगैरेसाठीं संशोधनकेंद्रेंहि आहेत. निरनिराळ्या धंदेशिक्षणाचें ज्ञान करून देण्यासाठीं चाळीस शाळा असून त्यांत पंचवीस हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्या ठिकाणीं उद्योगधंद्याची नैसर्गिक व जलद वाढ कशी होते यासंबंधींचें शिक्षण देण्यांत

येतें. क्रांतीपूर्वी येथें फक्त एकच कापसाची गिरणी होती. परंतु आज मोठमोठे पंधरा कारखाने व अनेक गिरण्या येथें असलेल्या दिसून येतात. येथें व्हेटरीनरी कॉलेज, माइनिंग कॉलेज, इरिगेशन प्रॉजेक्ट स्कूल व सहकारी शिक्षण शाळा या पाहण्यासरख्या संस्था आहेत.

समरकंद शहरांतील बाजारपेठ पाहण्याची आम्हीं इच्छा प्रदर्शित केल्या-मुळें आम्हांला बाजारपेठेंत नेण्यांत आलें. बाजारांत अगदीं छोटीं दुकानें रस्त्याच्या दुतर्फा बांधलेलीं होतीं. आपल्याकडे जत्रेंत दुकानें मांडतात ना, तशीच अगदीं या दुकानांची मांडणी होती. समरकंदची स्मृति ठेवण्यासारखी एखादी वस्तु बाजारांत मिळाली तर पाहावी, या हेतूनें आम्हीं प्रत्येक दुकानांत पाहिलें; परंतु येथें तसें, सुबक व खरेदी करण्यासारखें कांहींच आढळलें नाहीं. कमावलेल्या कातड्याच्या व कैंसाळ कातड्याच्या पुष्कळ वस्तू होत्या, पण त्या मनस्वी महाग होत्या. येथें तयार केलेल्या चपात्यांचे ढीगच्या ढीग विकावयास होते. या चपात्या जाड असून त्याला पदर सुटलेले असतात. त्याला नान् म्हणतात. त्या खावयास खुसखुशीत व खमंग लागतात.

संध्याकाळीं पांच वाजतां आम्ही समरकंदहून ताश्कंदला जावयास निघालों. जातेवेळीं आम्हीं मोटारीनें थेट ताश्कंदला गेलों. समरकंदसारखें इतिहास-प्रसिद्ध स्थळ पुन्हां पाहावयास मिळणार नाहीं, या जाणिवेनें विषण्ण झालेल्या मनानें आम्हीं त्या शहराचा व तेथील मंडळींचा प्रेमानें निरोप घेतला व मोटारींत पाय ठेवला.

अधिक काय लिहूं ?

तुझी

सौ. चारुशीला

# पत्र सोळावें

आर्टिस्टस् रेस्ट हाऊस
ताश्कंद
दिनांक १७ मे १९५४

प्रिय शांता,

समरकंद ते ताश्कंद हा आमचा प्रवास अतिशय सुखकारक झाला. एक तर सायंकाळची सौम्य वेळ होती व दुसरें म्हणजे हवेमध्यें एक प्रकारचा मजेदार गारवा होता. विशेषतः समरकंदमध्यें अनुभवलेल्या रखरखीत उष्णतेची आठवण अगदीं ताजी असल्यामुळें हवेंतील हा थंडावा आम्हांला अतिशय आल्हादक वाटला.

आम्ही दिवेलागणीच्या सुमारास रेस्ट हाऊसमध्यें पोहोंचलों. चहापान वगैरे झाल्यानंतर आम्ही शहरांतील एका जुन्या नाट्यगृहांत 'अलिशेर नोव्हाई' हें नाटक पहाण्यास गेलों. माझ्या एका पत्रांत तेथील एका आधुनिक नाट्यगृहाचें वर्णन मीं तुला कळविलें आहे. त्याच्याबरोबर या नाट्यगृहाची तुलना केली तर हें अगदींच फिकें पडतें. या नाट्यगृहांचा अवतार आपल्या मुंबईतील बालीवाला थिएटरप्रमाणें आहे. बांधकाम, फर्निचर, पडदे वगैरे सर्व खूप वर्षांचें जुनें असून, भिंतीवरील रंग उडून गेलेला दिसला. रशियामध्यें मॉस्को वगैरे शहरांतील नाट्यगृहांत दिसून येणारा ऐषआराम, सजावट व डामडौल यांचा या नाट्यगृहांत मागमूसहि आढळून आला नाहीं; पण जुनें तें सोनें या न्यायानें येथील लोकांना या नाट्यगृहांबद्दल अतिशय आत्मीयता वाटते.

नाट्यगृहाच्या डायरेक्टरनें आम्हांला पाहून म्हटलें, 'खुश आमदीद' ( You are welcome ). आम्ही त्याचे आभार मानले. हे डायरेक्टर उझबेकी गृहस्थ असून बरेच वृद्ध आहेत. त्यांनीं मोठ्या सन्मानानें आम्हांला आमच्या नियोजित जागीं नेऊन बसविलें.

थोड्याच वेळांत नाटकाला सुरुवात झाली. यापूर्वी 'ताहेर जोहरा'

'गुलझारा' वगैरे पर्शियन नाटकें येथें पाहिलीं असल्यामुळें, ही पर्शियन भाषा आतां आम्हांला परिचित झाली होती. नायिकेचें काम करणारी नटी —हलिमा नासिर व नायकाचें काम करणारा पुरुषनट हीं उभयतां आपापल्या भूमिका तन्मयतेनें वठवीत होतीं. शिवाय रंगभूमीवर पंधराव्या शतकांतील मध्य आशियाच्या ऐतिहासिक वातावरणाचा यथासांग आभास निर्माण केला असल्यामुळें नाटक प्रतिक्षणीं रंगतच चाललें होतें.

हें नाटक 'अलिशेर नोव्हाई' याच्या चरित्रावर आधारलेलें असून, त्यांत त्याची कवितेसंबंधींची आसक्ति व प्रेयसीवरील प्रीति यांचें सुंदर दिग्दर्शन केलें आहे. आपल्या महालापुढील असलेल्या उद्यानांतील एका लताकुंजांत आपल्या प्रेयसीजवळ बसून काव्यरचना करणाऱ्या अलिशेरला पाहून, मला कविता, प्रेयसी अन् मदिरा यांची अविभाज्य सांगड घालणाऱ्या उमर खय्यामची स्मृति झाल्याशिवाय राहिली नाहीं.

अलिशेर हा पंधराव्या शतकांत उझबेकिस्तानमध्यें एक महान् कवि होऊन गेला. त्याचे पुतळे ताश्कंदमध्यें ठिकठिकाणीं आहेत. त्याची 'गंजा' नांवाची जन्मभूमीहि आम्हीं पाहिली. या कवीनें अनेक नामांकित महाकाव्यें व वीणाकाव्यें रचलीं. त्याची 'हमसा', 'सात प्रवासी' व 'अलेक्झँडरचा तट' हीं तीन काव्यें अतिशय प्रसिद्ध आहेत. पंधराव्या शतकांतील उझबेकिस्तानची सांस्कृतिक परंपरा दर्शविणाऱ्या पांच कविता 'हमसा'मध्यें संग्रहीत केल्या असून, 'सात प्रवासी' या काव्यांत उझबेकचा तरुण, रंगेल बादशहा बखराम व त्याची सामान्यकुलोत्पन्ना रूपवती प्रेयसी यांची प्रेमकहाणी गोंविली आहे. 'अलेक्झँडरचा तट' यांत अलेक्झँडरच्या शौर्याची कथा असून, हें काव्य वीररसपूर्ण आहे. अलिशेर नोव्हाईच्या साऱ्या नायिका अतिशय रूपसुंदर असून त्याचे नायक महाकाव्याच्या संकेताप्रमाणें धीरोदात्त, शूर व प्रामाणिक आहेत. अलिशेरच्या काव्यशैलीचा त्याचे समकालीन कवी जामी, हाफिज व रूमी वगैरेंच्या काव्यावर खूपच परिणाम झालेला दिसून येतो. इतकेंच नव्हे तर, अलिशेरच्या काव्याची एक परंपरा निर्माण होऊन, त्याच्या पुरोगामी तत्त्वप्रणालीचा प्रचार पंधराव्या शतकांतील 'निजामी' व एकोणिसाव्या शतकांतील 'मुखेमी' व 'फरीद'—

सारख्या कवींनींहि केलेला दिसून येतो. क्रांतीनंतरच्या कालांत उझबेकी वाङ्मयाचें स्वरूप बदललें असूनहि अद्यापि अलिशेरच्या परंपरेंतून तें सर्वस्वीं मुक्त झालें नाहीं.

मध्यंतराच्या वेळीं आम्ही पुन्हां डायरेक्टरच्या ऑफिसमध्यें जाऊन बसलों. तेथें थंड पेयांचा समाचार घेत असतांना ' उझबेक 'च्या रंगभूमीच्या प्रगतीविषयीं बऱ्याच गोष्टी आम्हांला ऐकावयाला मिळाल्या. इतक्यांत तेथें अलिशेर नोव्हाईचें काम करणारा नट व इतर भूमिका करणारे कलावंत आम्हांला भेटावयास आले. त्यांच्याबरोबर हस्तांदोलन करून आम्हीं त्यांच्या उत्कृष्ट अभिनयाबद्दल त्यांना धन्यवाद दिले. त्यांनीं आपल्या फोटोंचीं कार्डें आम्हांला स्मृतिचिन्हें म्हणून दिलीं व त्यावर आम्हीं त्यांच्याकडून स्वाक्षरी घेतली. आमच्यापैकीं कांहीं प्रतिनिधींना नाटक पहाण्याचा कंटाळा आला होता. कारण सबंध दिवसाचा शीण झाला होता. परंतु आम्हां बऱ्याचजणींना नाटकाची गोडी लागल्यामुळें आमच्यासाठीं त्यांनाहि नाट्यगृहांत बसावेंच लागलें. नाटक संपल्यावर सर्वांना खुदा हाफीज (Good-bye) करून आम्ही घरीं परत आलों.

काल सकाळीं आम्ही येथील बाजारपेठ पहावयास गेलों. येथेंहि डिपार्टमेन्टल स्टोअर्स आहेत. परंतु मॉस्कोमधील स्टोअर्सप्रमाणें तीं प्रचंड नाहींत. त्याचप्रमाणें मी माझ्या मागील प्रवासांत इंग्लंड व फ्रान्स येथें जीं डिपार्टमेन्टल स्टोअर्स पाहिलीं त्यांतील नीटनेटकेपणा व भव्यताहि या दुकानांत आढळून येत नाहीं. उझबेकिस्तानमध्यें तयार होणारें रंगीबेरंगी कापड, वेलबुट्टीदार कांचकाम व राष्ट्रीय पेहराव घातलेल्या तऱ्हेतऱ्हेच्या बाहुल्या हीं ह्या दुकानांतील प्रमुख आकर्षणें आम्हांला वाटलीं. आमच्याबरोबर जहिदा व जमिला होत्या. त्यांनीं आम्हांला यांतील कांहीं वस्तू मोठ्या प्रेमानें भेट म्हणून दिल्या. मीं या दुकानांतून एक सुंदर नर्तकी बाहुली विकत घेतली आहे. ती तुला फारच आवडेल.

आम्ही दुकानांत प्रवेश केल्याबरोबर तेथील उझबेकी गिऱ्हाइकांनीं आमच्याभोंवतीं इतकी गर्दी केली कीं, आम्हांला निरनिराळ्या विभागांतून वस्तूंची निवड करणेंहि अशक्यप्राय झालें. शेवटीं कशी तरी खरेदी पूर्ण करून

आम्ही आमच्या मोटारींत जाऊन बसलों. परंतु आम्हांला पहाण्यासाठीं जमलेल्या माणसांनीं पदपथ फुलून गेला होता. खरोखर कुठेंहि जा, जमावाचें मानसशास्त्र सारखेंच असतें ! मग तो आपला आतिथ्यशील भारत असो, शिस्तप्रिय रशिया असो किंवा शिष्टाचारप्रिय इंग्लंड देश असो. रस्त्यावर जमलेल्या मंडळींत अनेक वृद्ध स्त्रीपुरुषहि होते व त्यांच्याशीं हस्तांदोलन केल्याशिवाय त्यांनीं आमच्या मोटारी पुढें जाऊं दिल्या नाहींत. कित्येकांनीं तर तेवढ्यांत आम्हांला छोट्या छोट्या वस्तू, चित्रें वगैरेंच्या भेटीसुद्धां अर्पण केल्या.

काल संध्याकाळीं आम्ही येथील एका संस्मरणीय कार्यक्रमास हजर राहिलों होतों. वास्तविक काल रात्रींच आम्हांला मॉस्कोला परत जावयास परत निघायचें होतें. परंतु हा महत्त्वपूर्ण सोहळा पाहून जावा असें बऱ्याच प्रतिनिधींचें मत पडलें व त्यामुळें आमचा येथील मुक्काम एक दोन दिवसांनीं वाढला आहे.

उझबेकिस्तानच्या राष्ट्रीय संगीताचा हा तीनशेंवा वाढदिवस होता. हा सोहळा येथें बराच गाजला होता. हा कार्यक्रम तारकंदच्या स्टेडियमवर करण्यांत आला होता. हा स्टेडियम लेनिनग्राडच्या स्टेडियमपेक्षां लहान आहे. परंतु अतिशय व्यवस्थित आंखलेला असून स्टेडियमच्याभोंवतीं सर्व बाजूनें सायप्रस, तुती फिरंगी, उलुक् ( जरदाळू ), पॉप्लस वगैरे वृक्षांचें नैसर्गिक कुंपण आहे.

स्टेडियमच्या मधल्या प्रशस्त मैदानांत कार्यक्रम होणार होते. सबंध स्टेडियम हजारों स्त्रीपुरुषांनीं गच्च भरून गेला होता. 'राष्ट्रीय संगीत दिन' असल्यामुळें स्त्रीपुरुष, मुलेंबाळें हातांत राष्ट्रीय निशाणें घेऊन इकडे तिकडे हिंडत होतीं. जिकडे तिकडे संगीतमय वातावरण दिसून येत होतें. पॉप्लसच्या हिरव्यागार व उंच झाडांच्या पार्श्वभूमीवर होणारे ते नृत्यगायन-वादनाचे कार्यक्रम फारच मनोवेधक वाटत होते.

आम्हीं स्टेडियमवर पोंचल्याबरोबर उझबेकिस्तानच्या मंत्र्यांनीं आमचें स्वागत केलें व आम्हांला आमच्या जागेवर नेऊन बसविलें. आमच्याजवळच मंत्रिमंडळांतील मंडळी बसली होती. आमच्यापासून थोड्या अंतरावर

परीक्षक मंडळी बसली होती. त्यांत सहा पुरुष व चार स्त्रिया होत्या. उत्कृष्ट कार्यक्रमांना पारितोषिकें देण्यांत येणार होतीं.

येथें नृत्यगायन करण्यासाठीं ठिकठिकाणचे ताफे आले होते. कार्यक्रमांत एकसूत्रीपणा, शिस्त व संयम होता. दोन कार्यक्रमांच्या मध्यें एक मिनिटहि व्यर्थ जात नसल्यामुळें कुठेंहि गडबड गोंधळ आढळून आला नाहीं.

येथें तऱ्हेतऱ्हेच्या नृत्यगायनाचे व वादनाचे आकर्षक प्रकार आम्हांला पहावयास मिळाले. लहान मुलींनीं हातांत निशाणें व कबुतरें घेऊन नृत्यें केलीं व नृत्याच्या शेवटीं तीं पांढरीं शुभ्र कबुतरें आकाशांत उडविलीं व Mer (मीर्) म्हणजे शांतीची घोषणा केली. हा प्रकार खरोखरींच प्रेक्षणीय होता.

या नृत्याप्रमाणें दुतार नांवाचें वाद्य हातांत घेऊन झालेलें दुतार संघसंगीत उल्लेखनीय झालें. दुतार आपल्याकडील एकतारीप्रमाणें वाद्य असून त्याला दोन तारा असतात. या तारा छेडून सोळा मुली जेव्हां एकसुरांत गाऊं लागल्या, तेव्हां त्यांचें तें गीत, फारसा अर्थ समजत नसतांहि कानाला फारच मधुर वाटलें.

इथें आम्ही अनेक प्रकारचीं नृत्यें पाहिलीं व मला असें आढळून आलें कीं, आपल्याकडील नृत्यकलेंत व उझबेकी नृत्यकलेंत बरेंच साम्य आहे. तथापि, या सगळ्या लोकनृत्यांत एक प्रकारचा वेग, हालचालीची सहजता व उत्तानता दिसून येते.

जवळ जवळ दोन तास आम्ही हा कार्यक्रम पहाण्यांत तन्मय झालों होतों. इतक्यांत पॉप्लसच्या उंच व हिरव्यागार माथ्यामागून चंद्रबिंब आकाशांत दिसूं लागलें. किंचित् काळसर व तांबूस ढगाच्या पार्श्वभूमीवर विहार करणाऱ्या चंद्राबरोबर जणूं कांहीं स्पर्धा करण्यासाठीं रशियाच्या लाल निशाणावरील तारा चमचम करूं लागला. इकडे मैदानाच्या मध्यभागीं उभारलेल्या व्यासपीठावर मोठमोठे प्रकाशझोत टाकण्यांत येऊं लागले. सायंकाळच्या या प्रशांत व सौम्यकालीं होणारे ते राष्ट्रीय संगीताचे कार्यक्रम आम्हांला फार बहारदार व वैशिष्ट्यपूर्ण वाटले; आणि उझबेकिस्तानांतील संगीताची ती प्रगति पाहून आम्हांला त्या लोकांबद्दल अतिशय कौतुक वाटूं लागलें.

हा कार्यक्रम आटोपून घरीं परत जातांना आम्हीं येथील एका सार्वजनिक बगीचाला भेट दिली व तेथील एका विस्तीर्ण तलावांत थोडा वेळ नौकाविहार केला. तलावाचें पाणी निळसर व नितळ असून मधून मधून शुभ्र कमल-पुष्पें त्यांत दिसून येत होतीं. कुठें तरी एकाद्या कोंपऱ्यांत राजहंसाचे थवे संथपणें पाण्यावर झोके घेत होते. तलावाच्या त्या अथांग पृष्ठभागावर लहानसहान तरंगांखेरीज कुठलीच हालचाल दिसून येत नव्हती. तथापि आमच्या नौका मात्र वेगवान असल्यामुळें वल्ह्याचा डुबक् डुबक् आवाज या शांततेचा भंग करीत होता. त्या द्रुतगति नौकेंतून तलावाच्या पृष्ठभागावर इकडे तिकडे फिरतांना माझ्या कानांत 'रोना' नांवाच्या एका लहान मुलीनें अत्यंत सुस्वर आवाजांत म्हटलेलें 'Builders of Peace' हें गीत सारखें घुमत होतें.

अधिक काय लिहूं ?

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र सतरावें

आर्टिस्टस् रेस्ट हाऊस
ताश्कंद
दिनांक १८ मे १९५४

प्रिय शांता,

हें पत्र मी गडबडींतच लिहीत आहें. कारण आज रात्रीं ३-३० च्या विमानानें आम्ही मॉस्कोला परत जावयास निघणार आहोंत. तत्पूर्वी आम्हांला अनेक कार्यक्रम उरकावयाचे आहेत. संध्याकाळीं आठ वाजतां सांस्कृतिक

खात्याच्या मुख्य मंत्र्यांतर्फे आम्हांला मेजवानी आहे. मेजवानी संपल्यावर आम्ही विमानतळाकडे जाऊं.

हें सुंदर शहर पुन्हां पाहण्याचा योग कांहीं सहसा येणार नाहीं, या जाणिवेनें माझें मन कांहींसें विषण्ण झालें. येथील अनेक सुखदायी स्मृती आम्ही आमच्याबरोबर नेणार आहोंत. विशेषतः आम्ही रहात असलेलें हें रेस्ट हाऊस, त्याच्या आंवतींभोंवतीचें मनोहर उद्यान व त्यांतली ही पुष्पसृष्टि यांचें विस्मरण मला कधींच होणार नाहीं.

रशियांत पाऊल टाकल्यापासून आम्हां सर्व प्रतिनिधींमध्यें खरा स्नेहभावहि ताश्कंदमध्येंच निर्माण झाला. जेव्हां जेव्हां आमच्या दुभाषिणी किंवा उझबेकी भगिनी आमच्या आसपास नसतात तेव्हां आम्ही खूप हास्यविनोद करतों. मला हंसावयास पुष्कळ हवें असतें हें तुला ठाऊकच आहे. इथं माझ्या-प्रमाणेंच सौ. व्हॉयोलेट आल्वा व अलोका वकील या पण दोघी फार हंसतात. त्यामुळें एवढ्या तेवढ्या कारणास्तव ‘ हंसण्या ’बद्दल आमच्या प्रतिनिधी मंडळांत आम्ही प्रसिद्ध झालों आहोंत.

माझ्या खोलींत सौ. पौर्णिमा पक्वासा व सौ. मोलिना दत्त या दोन प्रतिनिधी आहेत. पौर्णिमेनें बरोबर आणलेल्या छोट्या पोर्टेबल हार्मोनियमवर आम्ही दोघीं पहांटेच्या प्रशांत वेळीं कबिराचीं व मिराबाईचीं भजनें म्हणतों. पहांटेच्या वेळीं आजूबाजूच्या निसर्गसौंदर्यामुळें मन आधींच प्रसन्न झालेलें असतें व त्यामुळें भजनाला रंग चढतो. आमचें भजन ऐकावयास एक श्रोता अतिशय उत्सुक असतो व तो म्हणजे ज्या लहान मुलीचा उल्लेख मीं माझ्या कालच्या पत्रांत केला आहे, ती रोना नांवाची सात आठ वर्षांची एक उझबेकी छोकरी ! ती तेथील हाऊस-कीपरची मुलगी असून रेस्ट हाऊसच्या जवळच तिचें घर आहे. तिला नृत्य व गायन या कला एवढ्या लहान वयांतच चांगल्या अवगत आहेत. परवां आम्हीं पाहिलेल्या राष्ट्रीय संगीताच्या महोत्सवांत तिनें भाग घेतला होता. कुठल्याहि प्रकारच्या संगीताचे सूर तिला मंत्रमुग्ध करतात. तिच्या साऱ्या हालचालींत एक प्रकारचा डौल आहे. वयाच्या मानानें ती बरीच चाणाक्षहि आहे.

रोनाची आई फार सालस बाई आहे. आपलें काम चोख बजाविण्यांत

तिला मनस्वी आनंद होतो. भल्या पहाटेस ती आमच्या खोलींत आमच्यासाठीं गरम चहा व दूध पाठवून देते. आमच्या पातळांना इस्त्री करवून घेतांना ती फार खबरदारी घेते. हिंदी स्त्रियांबद्दल तिला फार जिव्हाळा आहे. माझ्याजवळील एक रंगीत बटवा व कांचेच्या बांगड्या मीं जेव्हां तिला दिल्या तेव्हां त्या दोन भारतीय वस्तू पाहून तिला मनस्वी आनंद झाला. रोनाला एक छोटा गुटगुटीत भाऊहि आहे. खूप गोरा. जणूं कांहीं मऊमऊ कापूसच !

लहानपणीं शाळेंत पाठ केलेल्या—'**केल्यानें देशाटन पंडितमैत्री सभेंत संचार**—' वगैरे ओळींचा खरा अर्थ मला या प्रवासांत समजला. या प्रवासांत मला एक फार मोठा लाभ झाला आहे व तो म्हणजे मनुष्यस्वभावाचे विविध नमुने मला पहावयास मिळाले व त्यांपासून शिकावयासहि मिळाले.

आमच्या सौ. दत्त यांना कांहींजणींनीं 'ममा दूत' (Mother Dutt) असें नांव बहाल केलें आहे. सौ. दत्त सकाळीं खूप लवकर उठतात, स्नान वगैरे आटोपून त्या सगळ्या प्रतिनिधींच्या खोल्यांतून जाऊन त्यांना झोपेंतून जागें करतात, त्यांना 'सुप्रभातम्' करतात व मोठ्या आस्थेनें आमच्या खोलींत रोनाच्या आईनें पाठविलेल्या गरम चहाचा आस्वाद घ्यावयास बोलावून आणतात. ही त्यांची गडबड व कळकळ पाहूनच हें नांव त्यांना गंमतीनें देण्यांत आलें आहे. त्यांना तें ठाऊक आहे व त्याचा स्वीकारहि त्यांनीं खेळकरपणानें केला आहे. त्यांनीं आपल्या पतीबरोबर मागें इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांचा प्रवास केला आहे व मधून मधून त्या आम्हांला युरोपीय शिष्टाचारावर व्याख्यानें ऐकवितात. स्वभावानें त्या फारच मनमिळाऊ व गोड आहेत.

काल आम्ही येथील एक कापडाची गिरणी—स्टॅलिन टेक्स्टाईल मिल—पहावयास गेलों होतों. ही गिरणी बरीच मोठी असून तेथें तऱ्हेतऱ्हेचें सुती कापड तयार करण्यांत येतें. गिरणीच्या मुख्य डायरेक्टरनें प्रथम आम्हांला तिचा साद्यंत इतिहास ऐकविला. त्याचप्रमाणें तेथील कामगारांच्या कल्याण केंद्राबद्दल माहिती दिली. आठ तासांपेक्षां कामगाराला अधिक काम करावें लागत नाहीं. कामगाराचें सरासरीनें वेतन मात्र सहाशें ते आठशें रूबेल्सपर्यंत असतें. कामाच्या स्वरूपाप्रमाणें वर्षाकांठीं दोन ते आठ आठवड्यांची

भरपगारी सुट्टी प्रत्येक कामगाराला मिळत असते. त्यांच्या आरोग्यासंबंधींची येथें पूर्ण दक्षता घेण्यांत येते. या गिरणीच्या आसपास येथील कामगारांना रहाण्यासाठीं व्यवस्था केलेली आहे. त्याखेरीज त्यांच्यासाठीं रात्रीची शाळा, त्यांच्या मुलांसाठीं बालगृह, वाचनालय, आरोग्यकेंद्र वगैरे व्यवस्था आहे.

गिरणीमध्यें यंत्राच्या जवळ काम करणाऱ्या अनेक स्त्रिया आम्हीं पाहिल्या. त्या कामगारस्त्रियांच्या आरोग्यासंबंधींची खास व्यवस्था करण्यांत आली आहे. विशेषतः गरोदर स्त्रियांना, गरोदरपणांत हलकें व त्या परिस्थितींत सोपें जाईल असें काम करावयास देतात. त्यांना प्रसूतीपूर्वी व प्रसूतीनंतर योग्य प्रमाणांत भरपगारी रजा मिळते व त्यांच्या वेतनाचें प्रमाण पुरुष कामगारांच्या-प्रमाणेंच असतें.

सर्वच कामगारांना यंत्राजवळ काम देतांना आग, ॲसिड वगैरेपासून बचाव होईल असे खास कपडे देण्यांत येतात. याखेरीज अपघात झाला तर तात्कालिक उपाय कसे करावेत याचें शिक्षणहि देण्यांत येतें.

ही सगळी कामगार मंडळी अतिशय निरोगी व आनंदी होती. आम्हांला पाहून त्यांना फार आनंद झालेला दिसला. आम्हीं गिरणीच्या प्रत्येक विभागांत फिरून येथील कार्यभागाचें अवलोकन केलें.

उझबेकिस्तान हें कापसाचें आगर आहे. येथें कापसाच्या अतिशय नामांकित जाती पहावयास मिळतात. कापसाच्या सामुदायिक शेतींतून रंगीत कापूस निर्माण करण्याचे यशस्वी प्रयोगहि करण्यांत आलेले आहेत.

या गिरणींत अनेक जातींचें व तऱ्हेतऱ्हेच्या डिझाइनचें सुती कापड तयार करण्यांत येतें. तयार कापडाच्या एका डिपार्टमेंटमध्यें आम्हांला नेऊन तेथील कापड आम्हांला दाखविण्यांत आलें. आपल्याकडे मिळणाऱ्या चिटाप्रमाणेंच तें होतें. गिरणी पाहून परत जात असतां गिरणीच्या डायरेक्टरांनीं आम्हां प्रत्येकीला उझबेकी कापडाचे नमुने भेटीदाखल दिले. तें चटेरीपटेरी कापड पाहून आम्हांला खूपच गंमत वाटली. उझबेकी स्त्रीपुरुषांना रंगीबेरंगी पेहराव करण्याचा अतिशय षोक दिसून येतो.

काल दुपारीं येथील लेखक मंडळी आम्हांला भेटावयास आली होती. रशियन लेखकांची भेट घेऊन आजच्या रशियन वाङ्मयाच्या स्वरूपाबद्दल व

ध्येयाबद्दल त्यांच्याबरोबर थोडीफार चर्चा करावी अशी माझी इच्छा होती व त्याप्रमाणें मी कमलादेवींना व व्होक्स्च्या मंडळींना सांगितलें होतें. जमल्यास एखाद्या रशियन लेखकाची मुलाखतहि घेण्याचा माझा मानस होता. परंतु मॉस्कोमध्यें तें शक्य झालें नाहीं. कारण सगळे नामांकित लेखक स्टॅलिनग्राडला लेखक-परिषदेसाठीं गेले होते व आमचे कार्यक्रम इतके भरगच्च होते कीं मुलाखतीस निवांत असा वेळहि सांपडणें अशक्य होतें. तथापि, येथें उझबेकच्या लेखकांना निदान भेटण्याची आम्हांला संधि मिळाली हें पाहून मला फार आनंद झाला. आम्हांला भेटावयास आलेल्या लेखकांमध्यें गफूर गुलाम नांवाचे एक स्टॅलिन पारितोषिक मिळविलेले विख्यात लेखक असून आमच्या प्रश्नांना उत्तरें देण्याचें काम बहुतेक अंशीं तेच करीत होते. याखेरीज अबदुल्ला कदार नांवाचे कादंबरीकार, हलबेग नांवाचे कवि, याशेन नांवाचे नाटककार व आझीनॉव्ह व राशीनॉव्ह नांवाचे दोन साहित्यसमीक्षकहि होते. याखेरीज ताश्कंदमधील प्रसिद्ध कवयित्री झुलफिया त्यांच्याबरोबर आली होती.

ही सारी लेखक मंडळी मोजकेंच पण ठराविक पद्धतीनें बोलत होती. रशियन व उझबेकी वाङ्मयाचा सारा नवाजुना इतिहास त्यांना मुखोद्गत होता. स्वतःच्या मोठेपणाचा अहंकार त्यांच्या ठिकाणीं दिसून आला नाहीं किंवा आपल्या समकालीन लेखकांविषयीं अनुदारपणाचा एक शब्दहि त्यांनीं उच्चारला नाहीं. आम्हीं त्यांना अनेक प्रश्न विचारले. त्यांनीं समर्पक उत्तरें दिलीं. भारतीय वाङ्मयासंबंधीं त्यांनींहि आम्हांला अनेक प्रश्न विचारून आमच्याकडून माहिती मिळविली.

उझबेकिस्तानच्या वाङ्मयाचा धागा सातव्या शतकापर्यंत जाऊन पोंचतो. परंतु वाङ्मयाची व्यवस्थित रचना पंधराव्या शतकापासून होऊं लागली. त्याचें श्रेय अलिशेर नोव्हाई व त्याचे समकालीन जामी वगैरेसारख्या लेखकांना द्यावयास हवें. उझबेकी वाङ्मयाला १९ व्या शतकांत खरा बहर आला. या शतकांत मुखेमी व फरीर हे दोन लेखक झाले. उझबेकी वाङ्मयक्षेत्रांत 'टीकाशास्त्र' आणण्याचें कार्य मुखेमी या टीकाकारानें केलें. तो व्यासंगी लेखक असल्यामुळें त्यानें रशियन वाङ्मयाचा चांगला अभ्यास केला होता. त्यामुळें त्याच्या वाङ्मयावर रशियन वाङ्मयाची चांगलीच छाप पडलेली दिसते.

क्रांतीपूर्वी उझबेकीमध्यें नाटकें लिहिण्याची फारशी प्रथा नव्हती. हमझा हकीमजादे या कवीनें नाटक व कथा हे वाङ्मयप्रकार उझबेकी वाङ्मयांत रूढ केले. त्याच्या लिखाणावर गॉर्की, टॉल्स्टॉय व पुष्किन या रशियन लेखकांच्या शैलीचा व विचारसरणीचा खूपच परिणाम झालेला आहे.

आज येथील निरक्षरता गेली असल्यामुळें वाङ्मयाची सर्वच दृष्टीनें वाढ झालेली आहे. लोक सुशिक्षित झाल्यामुळें त्यांच्यामध्यें वाङ्मयाची गोडी निर्माण झाली आहे. कलेकरतां कला वगैरेसारखीं तत्त्वें या लेखकांनीं झुगारून दिलीं असून लोकजागृतीसाठीं कला हें महान् तत्त्व प्रत्येक लेखकानें आपल्या दृष्टीसमोर ठेवलेलें आहे. महायुद्धाच्या काळांत ललित वाङ्मयामध्यें वीररसाला प्रमुख स्थान देण्यांत येत होतें. परंतु आज मात्र सोव्हिएत रशियानें उद्-घोषित केलेल्या शांततेच्या तत्त्वाचा पुरस्कार तेथील लोकवाङ्मयाच्या द्वारें केला जात आहे. आजचीं बालकें ही राष्ट्राची भावी संपत्ति असल्या-मुळें उझबेकी लेखक बालवाङ्मयाची निर्मिति अतिशय दक्षतेनें व जिव्हाळ्यानें करतात.

लेखकांच्या भेटीनंतरचा आमचा कार्यक्रम ठरलेला असल्यामुळें आम्हांला त्यांच्याबरोबर इच्छा असूनहि अधिक चर्चा करतां आली नाहीं. त्यामुळें आम्हीं त्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला.

काल आम्ही येथील सामुदायिक शेती पहावयास गेलों होतों. त्यासंबंधींची मनोरंजक हकीकत मी माझ्या पुढील पत्रांत मॉस्कोहून कळवीन.

तुझी
सौ. चारुशीला

## पत्र अठरावें

आर्टिस्टस् रेस्ट हाऊस
ताश्कंद
दिनांक १८ मे १९५४

प्रिय शांता,

आजचें हें पत्र मी तुला विमानांतच लिहीत आहें. माझ्या कालच्या पत्रांत, मीं तुला लिहिल्याप्रमाणें आज आम्ही संध्याकाळीं आठच्या सुमारास सांस्कृतिक खात्यातर्फे आम्हांला देण्यांत येणाऱ्या मेजवानीसाठीं गेलों. मेजवानीसाठीं निश्चित केलेली जागा आमच्या रेस्ट हाऊसपासून नजीकच होती. मात्र प्रवेशद्वारापर्यंत जाण्याचा मार्ग बराच आडवळणाचा होता. आमच्या मोटारी जेव्हां तीं आडवीतिडवीं वळणें घेत जाऊं लागल्या तेव्हां मला चक्रव्यूहाची आठवण झाली.

हा नागमोडी रस्ता हिरव्यागार वनराईतून जात होता. जणूं कांहीं आपल्याकडील आंबराईच ! रस्त्याच्या दोहों बाजूंस पॉपलस्, खलुबनाय ( तुती ) व अलुक् ( जरदाळू ) वृक्ष होते. या वृक्षांच्या झुबकेदार माथ्यांवरून होणारी पानांची रेशमी सळसळ मनाला आनंद देत होती. आज थंडीहि बरीच पडली आहे.

लवकरच आम्ही मेजवानीच्या दालनाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ पोहोंचलों. ही जागा म्हणजे एक भव्य दालन व त्याच्या आजूबाजूला असलेला चौफेर व्हरांडा एवढीच आहे. हें मध्यवर्ती दालन ऐसपैस असून त्याच्या चारी बाजूला प्रशस्त व्हरांडा आहे. व्हरांड्याच्या जाळयांवरून प्रवेशद्वाराच्या कमानीवरून रंगीबेरंगी फुलांच्या मनोरम वेली सोडल्या आहेत. ताश्कंद शहरांत वेळोवेळीं होणाऱ्या मेजवान्या व संघनृत्यें याच ठिकाणीं करण्यांत येतात.

मेजवानीच्या दालनांत दोनशें ते अडीचशें मंडळी उपस्थित होती. त्यांच्यामध्यें निरनिराळ्या खात्यांचे मंत्री व उपमंत्री, डॉक्टर, इंजिनीयर व कलावंत यांचा समावेश करण्यांत आलेला होता.

आमच्यापुढें आलेल्या सुक्या मेव्याचा व फळांचा समाचार घेत घेत प्रथम आम्हीं बराच वेळ गप्पा मारल्या. सुमारें दहा वाजतां मुख्य मेजवानीस सुरुवात झाली. या मेजवानीला उझबेकची स्वरूपसुंदर व विख्यात नटी तोमार खानुम हजर होती. हिचें वर्णन मीं एका पत्रांतून केलेंच आहे. ही नटी एकवार हिंदुस्तानांतहि येऊन गेली आहे. तिला एकदोन हिंदी गाणीं येतात व तीं गाणीं जेव्हां ती अभिनयासहित म्हणते तेव्हां ऐकणारास खूपच गंमत वाटते. ती नृत्यकलेंत निष्णात असून तिचें शरीरसौष्ठव वाखाणण्यासारखें आहे. तिनें अनेक प्रकारचीं नृत्यें करून दाखविलीं. नृत्य संपल्यावर वाद्य-वादन व संगीत यांचे कार्यक्रम सुरु झाले. कार्यक्रम सुरू असतांना मधून मधून आमच्या टेबलांवर नवे नवे खाद्यपदार्थ येतच होते व त्यांतच अधूनमधून भाषणें ( Toasts ) सुरू होतीं.

नंतर संघनृत्याला ( Ball Room Dancing ) सुरुवात झाली. अशा प्रकारच्या संघनृत्यांत पाश्चात्य देशांत स्त्री व पुरुष यांच्या जोड्या नृत्य करीत असतात. पण रशियांत दोन दोन स्त्रियांच्या जोड्याहि या नृत्यांत भाग घेतात. येथील या उझबेकी भगिनींनीं आम्हां सर्वांना हातानें ओढून नेऊन नृत्य करावयास लावलें. ह्या नृत्याचे प्रकारहि विविध तऱ्हेचे आहेत. क्वचित् प्रसंगीं तर आपल्या इकडील 'फुगड्या' व 'झिम्मा' यांचाहि त्यांत समन्वय झालेला दिसून येत होता.

नृत्याचा कार्यक्रम थांबवून पुन्हां एकवार जेवणास सुरुवात झाली. उझबेकिस्तानमध्यें जेवणाच्या पंक्तींत एक खास पदार्थ सर्वत्र वाढला जातो, त्याचें नांव 'लाहामाझ.' हा पदार्थ तांदुळाच्या किंवा मक्याच्या पिठाची उकड घेऊन बनविण्यांत येतो व तो आपल्याकडील मोदक लाडवांप्रमाणेंच असतो. मात्र आपण मोदकांत गूळखोबरें भरतों तर इथें त्यांत 'खिमा' भरलेला असतो. जेवणाच्या शेवटीं येणारा पदार्थ म्हणजे मसालेदार पुलाव! परंतु तो पुढें येण्यापूर्वीं इतर पक्वान्नें खाऊन माणसाचें पोट इतकें भरून जातें कीं, या चवदार पदार्थाची नुसती चव घेणेंहि अशक्य होऊन जातें.

मेजवानीच्या शेवटीं तारकंदच्या या मंडळींनीं येथील भरतकाम केलेल्या राष्ट्रीय टोप्या व वेलबुट्टीच रंगीत रेशमी कापड आम्हांला नजर केलें.

हा सर्व कार्यक्रम आटोपेपर्यंत रात्रींचे अडीच वाजले. आम्हांला साडेतीनचें विमान गांठावयाचें असल्यामुळें आम्ही घाईघाईनें रेस्ट हाऊसमध्यें परत गेलों. आमचें सामानसुमान आम्हीं आधींच बांधून तयार ठेवलें असल्यामुळें आम्हांला लगेच विमानतळाकडे जाणें शक्य झालें. विमानतळावर आम्हांला निरोप देण्यासाठीं खूप मोठा घोळका जमा झाला होता. विमानांत पुरेशी जागा नसल्यामुळें आमच्या दोन दुभाषिणींना मागेंच रहावें लागलें आहे. ताश्कंदमधील या सर्व प्रेमळ मंडळींचा मोठ्या कष्टानें निरोप घेऊन आम्ही विमानांत जाऊन बसलों.

आमच्या प्रतिनिधिमंडळांतील बऱ्याच भगिनींना येथें थंडी व हिम-वर्षाव यामुळें त्रास झाला आहे. कित्येकजणी तर बऱ्याच आजारीहि पडल्या आहेत. ताश्कंदला असतांना सौ. व्यासना दम्याचा एक जबरदस्त झटका आला. त्यामुळें त्यांना बरींच ठिकाणें पाहावयास मिळालीं नाहींत. पौर्णिमा, अलका, कमला, मेनन वगैरे बऱ्याच जणींच्या प्रकृतीसंसंबंधींच्या किरकोळ तक्रारी चालूच होत्या. त्यामुळें आमच्या रेस्ट हाऊसमध्यें रोज डॉक्टरची फेरी होतच असे.

दोन दिवसांपूर्वीं आम्ही ताश्कंदपासून ३०–४० मैल दूर असलेलें 'शेतकी तंत्र केंद्र' ( Agriculture Technique Station of all Union–Cotton Growing Research Institute ) व त्याच्याजवळच असणारी एक सामु-दायिक शेती ( Collective Farm ) पहावयास गेलों होतों.

आम्हांला या इन्स्टिट्यूटमध्यें रशियांत कापसाची वाढ कशा प्रकारें होते व त्यासंबंधीं कोणकोणत्या प्रकारचे प्रयोग करण्यांत येतात यासंबंधींची सर्व माहिती सांगण्यांत आली. त्याचप्रमाणें उत्तम निर्मिति होण्यासाठीं नवे नवे प्रयोग यशस्वी करण्याचे कसे आटोकाट प्रयत्न चालू आहेत ते सांगितले. जवळच असलेल्या एका प्रशस्त आवारांत अनेक अवजड ट्रॅक्टर ठेवलेले होते. जमिनींची उखळण करण्यासाठीं या ट्रॅक्टरचा सर्वत्र उपयोग केला जातो. हे अजस्र ट्रॅक्टर येथील स्त्री कामगार चालवितात हें ऐकून आम्हांला मोठें नवल वाटलें.

नंतर आम्ही आमच्या मोटारींतून एक सामुदायिक शेतीचा संघ पहावयास

निघालों. या संघाचें नांव कागानोव्हिच आहे. सबंध रस्ता शेतांतून जात असून अतिशय खडकाळ होता. मोटारींना सारखे हिसके बसत होते. आजूबाजूला दूरवर अंतरावर पसरलेलीं असंख्य शेतें दिसत होतीं. मधून मधून शेतकऱ्यांचीं छोटीं छोटीं घरें व त्यांच्या आंवतींभोंवतीं असणाऱ्या छोट्या बागा नजरेच्या टप्प्यांत येत होत्या.

रशियांत या समाईक शेतीचे दोन प्रकार आहेत. शेतकऱ्यांपासून त्यांच्या जमिनी सरकार आपल्या ताब्यांत घेऊन त्यांना दरमहा ठराविक वेतन देऊन त्यांच्याकडून शेतांत काम करून घेतें, हा एक प्रकार व दुसरा म्हणजे विवक्षित ठिकाणच्या जमिनी एकत्रित करून त्यामध्यें शेतकरी ज्या मानानें श्रम करतील त्या मानानें त्यांना मोबदला देणें. या समुदायाची व्यवस्था करण्यासाठीं एक डायरेक्टर नेमलेला असतो. त्याचप्रमाणें ज्यांचीं शेतें एकत्रित झालीं असतील त्यांची एक समिति नेमण्यांत येऊन हा डायरेक्टर त्याचा अध्यक्ष म्हणून समजला जातो. शेतीच्या प्रत्येक संघांत शेतकऱ्याच्या जीवनाचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे लक्ष पुरविलेलें असतें. तेथें त्यांच्या मुलांसाठीं बालगृहें, बालमंदिरें, वाचनालयें, सिनेमागृहें, नाट्यगृहें, नृत्यगृहें व आरोग्य-केंद्रें असतात. रशियांतील समाईक शेतींत भाग घेणाऱ्या सर्व शेतकऱ्यांची एक संस्था आहे. तिचें नांव ॲग्रिकल्चरल ॲसोसिएशन. श्री. एम्. लुपा हे शेतकी खात्याचे मुख्य सल्लागार असून त्यांची संस्थेवर देखरेख असते. शेतावरील शेतकऱ्यांसाठीं बांधलेल्या इमारती, लागवडीसाठीं लागणारीं साधनें, गाईबैल, मेंढरें व खेचरें यासारखीं जनावरें वगैरे सर्व गोष्टी या संस्थेच्या ताब्यांत असून तिच्यातर्फे त्या वेगवेगळ्या समाईक शेतीसंघांना पुरविल्या जातात. त्याचप्रमाणें या सर्व साधनांच्या मदतीनें होणाऱ्या उत्पन्नावर पण या संस्थेची देखरेख असते.

आम्ही सामुदायिक शेतीच्या आवारांत पोहोंचल्याबरोबर या शेतीसंघाचा डायरेक्टर आम्हांला सामोरा आला. त्याच्याबरोबर अनेक उझबेकी शेतकरी व त्यांच्या स्त्रिया होत्या. पुरुषांनीं युरोपीय पद्धतीचा पोषाख केलेला असून उझबेकच्या राष्ट्रीयत्वाची निशाणी म्हणून वेलबुट्टीच्या टोप्या घातलेल्या होत्या. स्त्रियांनीं मुसलमानी तऱ्हेच्या रंगीत सलवारी व लेंगे घातलेले असून

जाकिटें घातलीं होतीं व डोक्यांवर भरतकाम केलेल्या टोप्या होत्या. ही सर्व मंडळी आनंदी दिसत होती.

आतां दुपारचे १२–३० वाजले होते. या शेतीवर येऊन पोहोंचेपर्यंत आम्हांला प्रवासाचा अति शीण झाला होता व चहाची तीव्रतेनें आठवण होऊं लागली होती. त्यामुळें डायरेक्टरनें जेव्हां आम्हांला पेलाभर चहा घ्यावयाचें सौजन्यपूर्वक आमंत्रण दिलें, तेव्हां आम्हीं त्या आमंत्रणाचा चटकन् स्वीकार केला.

परंतु तो कांहीं नुसता चहा नव्हता! एका भव्य मंडपांत अनेक टेबलें हारीनें ठेवलीं असून त्यावर अनेक खाद्य पदार्थ ठेवण्यांत आले होते. त्या शेतकरी लोकांनीं आमच्यासाठीं खूपच मेहनत घेतलेली दिसत होती. दुपारची वेळ होती. भूकहि लागली होती. त्यामुळें आम्हीं त्या खाद्य-पेयांचा भरपूर समाचार घेतला. खाणें चालू असतांना या शेतीसंबंधींची बरीच माहिती या डायरेक्टरनें आम्हांला सांगितली.

हा डायरेक्टर गेलीं बारा वर्षें या सामुदायिक शेतीचा डायरेक्टर म्हणून निवडून येत आहे; त्यामुळें त्याला येथील अद्ययावत् माहिती आहे. तो स्वतःची जबाबदारी फारच चांगल्या तऱ्हेनें जाणतो असें दिसतें. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला स्टॅलिन पारितोषिकहि मिळालें आहे. त्यानें आम्हांला बरीच माहिती सांगितली. येथील शेतकऱ्यांचें मासिक उत्पन्न आठशें रूबेल्सपर्यंत असतें. परंतु या डायरेक्टरला महिन्याला तीन हजार रूबेल्स मिळतात. या शेतकऱ्यांना राहावयास सरकारी घरें आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या या घरांभोंवतीं ·२५ ते १ हेक्टॅ एकर इतकी जमीन दिली जाते. तेथें ते धान्य, भाजीपाला वगैरे लावूं शकतात व त्याचें उत्पन्न ते सरकारला, को-ऑपरेटिव्ह सोसायटीला किंवा खुल्या बाजारांत (Open Market) विकूं शकतात. हे 'खुलें बाजार' म्हणजे काय प्रकरण आहे, यासंबंधीं आम्हीं विचारल्यावर त्यानें सांगितलें कीं, या खुल्या बाजारांतील भाव सोव्हिएत सरकारनें ठरविलेल्या भावांपेक्षां थोडे अधिक असतात. शेतकऱ्यानें बांधलेलें घर व त्याचीं शेतीचीं साधनें तसेंच मेंढ्या, कोंबड्या वगैरे पाळीव जनावरें यांवर त्याचाच मालकी हक्क असून तो त्या सर्व गोष्टी

आपल्या वारसाला देऊं शकतो. मात्र स्थावर वस्तु विकण्याचा त्याला अधिकार नाहीं.

या ' कागानोव्हिच ' समाईक शेती संघाच्या मालकीची एकंदर जमीन ५,६०,००० एकर असून त्यांतील ३,९९,००० एकर जमीन लागवडीस योग्य अशी आहे. याखेरीज ॲग्रिकल्चरल ॲसोसिएशननें या संघाला ८००० मेंढ्या, १००० गाई व १००० उंट, खेचरें, बैल वगैरे प्राणी बहाल केलेले आहेत. गेल्या कांहीं वर्षांत या शेती संघानें आपली चांगली प्रगति केली आहे. १९५४ मध्यें या शेतीचें ५८०० रूबेल्सचें उत्पन्न दोन कोटी रूबेल्सवर गेलें. त्यामुळें आतां येथील प्रत्येक शेतकरी कुटुंबास वर्षा-कांठीं १४००० रूबेल्स व २ टन गहूं व इतर धान्य मिळूं शकतें. त्यामुळें शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति खूप सुधारली आहे. या कागानोव्हिच समाईक शेतीची १९४५ सालीं १ कोटी ४७ लाख किंमत होती; पण आतां ती २ कोटी ५८ लाख आहे. केवढी आश्चर्यकारक सुधारणा !

चहापान झाल्यानंतर ' आपल्या गरिबाच्या घरीं दोन घांस खाऊन जा ' अशी त्या शेतकरी प्रमुखानें आम्हांला विनंति केली. त्याचें घर म्हणजे एक चंद्रमौळी ठिकाण असेल अशी आमची प्रथम समजूत होती; परंतु प्रत्यक्ष तें घर पाहतांच ती समजूत चुकीची होती असें आढळून आलें. त्याचें घर चांगलेंच ऐसपैस असून तें सजविण्यांत सौंदर्यदृष्टि वापरली होती. त्याच्या दोन मुली शाळेंत गेल्या असून थोरली मुलगी आईला स्वयंपाकांत मदत करीत होती.

जेवणघरांत एका लांबरुंद टेबलावर असंख्य पदार्थ मांडून ठेवले होते. त्यांत नान् व पुलाव हे पदार्थ प्रामुख्यानें दिसून येत होते. चहाच्या वेळीं आम्हीं बरेंच खाल्लें असल्यामुळें केवळ शेतकऱ्याच्या व त्याच्या बायकोच्या समाधानासाठीं आम्ही थोडेंबहुत जेवलों. त्याची पत्नीहि फार सुस्वभावी व उत्तम गृहिणी आहे. तिचें स्वयंपाकघर मी मुद्दाम पहावयास गेलें. इतके पदार्थ केले असूनहि स्वयंपाकघरांत कुठेंहि गोंधळ, घाण किंवा अव्यवस्थितपणा नव्हता. हें पाहून मला तिच्या कुशलतेसंबंधीं कौतुक वाटलें.

जेवणानंतर आम्हीं इतर शेतकऱ्यांचीं घरें पाहिलीं. प्रत्येक घरामध्यें तीन

खोल्या असून तेथें टापटीप दिसून येत होती. सुंदर रंगीबेरंगी गोधड्या, पडदे, भरलेले व विणलेले रुमाल, कांचेचीं आकर्षक भांडीं हीं तर प्रत्येक घरांतून आढळलीं. प्रत्येक गृहिणीनें आम्हांला चहा केक वगैरे देऊं केले; परंतु ते आम्हीं आभारपूर्वक नाकारले.

हीं सारीं घरें पाहत असतां माझ्या मनांत आपल्या हिंदुस्थानांतील शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेचे विचार एकसारखे येत होते व कुलाबा जिल्ह्यांतील ज्या खेडेगांवांत माझें बाळपण गेलें आहे, तेथील गरीब शेतकऱ्यांच्या मोडक्या तोडक्या झोंपड्यांची व येथील शेतकऱ्यांच्या या छोट्या पण रेखीव घरांची माझें मन न कळत तुलना करूं लागलें व मग मला असें वाटलें कीं, आमच्या शेतकऱ्यांचें भाग्य असें केव्हां उजळेल का ?

संध्याकाळीं या शेतकरी मंडळींनीं आम्हांला सांस्कृतिक कार्यक्रम करून दाखविले. त्यांत लोकनृत्य व लोकगीतें यांचा समावेश झाला होता.

जास्त काय लिहूं ?

तुझी

**सौ. चारुशीला**

---

## पत्र एकोणिसावें

**हॉटेल मॉस्को**

दिनांक १९ मे १९५४

प्रिय शांता,

मीं विमानांतून तुला एक पत्र पाठविलेंच आहे. आम्ही आज सकाळीं ११-३० वाजतां मॉस्कोच्या विमानतळावर उतरलों. आम्हांला उतरून

घेण्यासाठीं मादम परफ्युनोव्हा, ल्युसि व आणखी कांहीं इतर मंडळी आली होती.

विमानतळावरून हॉटेलकडे जात असतांना आम्हांला अद्‌भुत देखावा दिसला. कारण आम्ही ताश्कंदला गेल्यापासूनच्या एका आठवड्यांत यक्षिणीनें कांडी फिरविल्याप्रमाणें येथील निसर्गानें आपलें स्वरूप आमूलाग्र पालटून टाकलेलें दिसून येत होतें. एखाद्या चतुर गृहिणीनें पाहुण्यांची चाहुल लागतांच झटकन् जुनेर सोडून झुळझुळीत वस्त्र पेहरावें त्याप्रमाणें सृष्टीनें रेशमी हिरवळ धारण केली होती. कॅशिओ, ट्युलिप वगैरेसारख्या अनेक फुलझाडांवरून अर्धोन्मीलित नजरेनें आमच्याकडे पाहणारीं असंख्य फुलें इतस्ततः दिसून येत होतीं. मधून मधून पीच, सफरचंद व ऑलिव्ह यांचीं ठेंगणीं ठुसकीं झाडें फिकट गुलाबी रंगाचा शिडकावी शेला माथ्यावर पांघरून उभीं होतीं. आजूबाजूच्या लहानमोठ्या पर्वतांनीं आपले बर्फाळ डगले कधींच काढून ठेवलेले दिसत होते. त्यांच्या माथ्यावर पडलेल्या कातरलेल्या सूर्यकिरणांमुळें त्यांच्या धवलतेला एक आगळीच शोभा आलेली दिसून येत होती.

मी तर एकसारखी अनिमिष नजरेनें मोटारीच्या खिडकींतून ही शोभा पाहण्यांत तल्लीन झालें होतें. इतक्यांत ब्रेक दाबण्याच्या कर्णकठोर आवाजानें मी एकदम भानावर आलें. तों काय, ' व्होडका ' झोकून झिंगलेला एक मद्यपी आमच्या गाडीच्या समोर आला होता व त्याला वांचविण्यासाठीं आमच्या ड्रायव्हरनें ब्रेक दाबला होता. एकूण मॉस्कोंत सुद्धां झिंगलेले लोक आहेत म्हणायचे ! तथापि असा एखादाच अपवाद येथें दिसून येतो. सर्व-साधारणपणें मनावर शिक्षणाचे सुसंस्कार झाले असल्यामुळें लोक आपोआपच या व्यसनाचा तिटकारा करूं लागले आहेत. लोकशिक्षणाचा वाढता प्रसार हें दारूबंदीच्या बाबतींत एकच प्रभावी साधन आहे असें मला तरी वाटतें. मनाची खरी सुधारणा झाल्याशिवाय नैतिक मूल्यांची किंमत मनुष्याला कळणें अशक्यच असतें.

हॉटेलांत पोहोंचल्याबरोबर आम्हांला सौ. वाडिया सामोऱ्या आल्या. त्यांची प्रकृति आतां ठीक दिसत होती. ताश्कंदला गेल्यानंतर त्यांनीं इथल्या

डॉक्टरांकडे आपली प्रकृति संपूर्णतया तपासून घेतली आहे. त्यांनीं एक दोन गीतनृत्येंहि पाहिलीं. एकूण त्यांचा येथील वेळ ठीक गेला ! परंतु आम्हीं ताश्कंद–समरकंदसारख्या ठिकाणीं जें जें पाहिलें त्याचा फायदा मात्र त्यांना मिळाला नाहीं.

खोलीमध्यें गेल्याबरोबर मला घरून आलेलीं बरींच पत्रें मिळालीं. विशेषतः प्रणयचें पत्र वाचून मला खूपच गंमत वाटली. त्यानें मला लिहिलें आहे, " ममी, तूं परत येण्याची घाई करूं नको. दुसऱ्या देशांतहि जा व सगळं पाहून ये आणि मला खूप गंमती सांग. तसेंच मला खेळणीं आणावयास विसरूं नको. " त्यानें मला त्याच्या वाढदिवसाच्या दिवशीं घेतलेले फोटोहि पाठविले आहेत. तूं मात्र मला पत्र पाठविलेलें दिसत नाहीं. बरेच दिवसांनंतर पौर्णिमेला पण तिच्या घरून पत्र आलें असल्यामुळें ती फार खुषींत आहे.

आम्हीं आमचीं जेवणें जलदीनें उरकून घेतलीं; कारण आज रात्रीं पुन्हां आम्हांला विमानानें 'जॉर्जिया' प्रांतांतील 'सोची' या गांवीं जावयास निघावयाचें आहे. सोचीला आम्ही आठ दिवस राहाणार आहोंत. मात्र प्रवासाचा अतिशय त्रास झाला असल्यामुळें कमलादेवी आमच्याबरोबर येणार नाहींत.

जेवण झाल्यावर दोन वाजतां आम्ही येथील सुप्रसिद्ध बालशॉय थिएटरमध्यें एक संगीतिका पहावयास गेलों. तिचें नांव होतें 'फुलपांखरूं' ( Butterfly ) व ती श्री. मारीनॉफ् नांवाच्या नाटककारानें लिहिलेली आहे. जॉर्जियामधील एका 'संघशेती' मधील शेतकऱ्यांच्या जीवनावर ती आधारलेली आहे. या गीतनाट्यांत दोन मुलींचें जीवन चितारलें आहे. एक होती कामसू मुलगी व दुसरी होती आळशी अन् कामचुकार. दुसरी मुलगी हमेशा सफरचंदाच्या झाडावर चढून बसून सफरचंद खात राही व टिवल्याबावल्या करी. शेवटीं या कामचुकार मुलीला शिकायला शहरांत पाठवितात. तेथें तिला जीवनाची गंभीर बाजू समजून येते व तिचें वर्तन एकदम पालटून जातें.

ही अगदीं साधी कहाणी परिणामकारक रीतीनें स्टेजवर दाखवून, प्रत्येकानें काम केलेंच पाहिजे हें तत्त्व प्रेक्षकांच्या ध्यानांत आणून दिलें. तसेंच

खेडेगांवांतील शेतकरी जीवन, तेथील वातावरण, पहांटेचे व रात्रीचे देखावे इतके हुबेहूब होते कीं, आम्हांला ते पाहून मनस्वी कौतुक वाटलें. जरी नाटकांतील बारकावे भाषेच्या अडचणीमुळें आम्हांला समजणें कठीण जात होतें तरी सर्वसाधारण कथासूत्र लक्षांत यावयास फारशी अडचण भासली नाहीं. मधून मधून ती कामचुकार मुलगी आपल्या आजीला हांक मारी. ‘ बाबुश्का, बाबुश्का, ’ तेव्हां बाबुश्का म्हणजे आजी हा एक नवीन रशियन शब्द आम्ही शिकलों व मग आल्वाबाईंना ‘ बाबुश्का ’ नांवानें हांका मारून आम्ही त्यांची खूप गंमत करूं लागलों.

थिएटरमधून घरीं परत आल्यावर आम्हांला भेटावयास रशियन रेडिओ-कडून कांहीं मंडळी आली होती, त्यांची भेट घेतली. आमच्यापैकीं ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं रेडिओवर भाषणें करावींत अशी त्यांनीं कमलादेवींकडे विनंति केली. परंतु हीं भाषणें सोचीहून परत आल्यानंतर होणार आहेत.

रेडिओच्या मंडळीप्रमाणें प्रवासी कंपनीची कांहीं मंडळी तेथें आली होती. त्यांच्याकडून आम्हांला आमच्या परत जाण्यासंबंधींची माहिती मिळवावयाची होती. कारण रशियन मंडळी आम्हांला व्हिएन्ना किंवा प्राग इथपर्यंतच पोंचविणार आहे. त्यानंतर आम्हांला स्वतःचा कार्यक्रम ठरवावयाचा आहे. त्यांच्याकडून जरूर ती माहिती आम्हीं टिपून घेतली व नंतर चहापानास गेलों.

चार वाजतां आम्ही मॉस्कोच्या दुकानांना भेट देण्यास गेलों. यावेळीं मात्र आम्हांला दोघीतिघींचा संघ करूनच जावें लागलें. आम्ही मॉस्को शहरांतील दुकानें पाहण्यास फार उत्सुक होतों. मात्र ही उत्सुकता तेथील वस्तू खरेदी करण्याबद्दलची नसून, सोव्हिएत सरकारनें सर्व दुकानें आपल्या ताब्यांत घेतलीं असल्यामुळें तेथें कसा काय कारभार चालतो हें पाहण्या-संबंधींची होती.

सोव्हिएत रशियांत स्वतंत्र व्यापार करण्याचें स्वातंत्र्य नाहीं. अगदीं एखादें लहानसें दुकानसुद्धां कुणाच्या मालकीचें असत नाहीं. त्यामुळें सगळीकडे मालाचा भाव हा एकच असतो. मग तुम्ही एखादी वस्तु तुमच्या घराजवळील छोट्याशा दुकानांत खरीदा किंवा मोठ्या थोरल्या

रस्त्यावरील एखाद्या अवाढव्य डिपार्टमेन्ट स्टोअरमध्यें घ्या, दरामध्यें बिलकूल फरक आढळून येत नाहीं. परंतु त्यामुळें मला तरी असें वाटलें कीं, इतर देशांत बाजारपेठांतून दिसून येणारी गडबडघाई, गोंधळ यांत जें एक मजेदार वातावरण दिसतें तें येथें आढळून येत नाहीं. सर्वच संथपणें आणि ठराविक तऱ्हेनें चाललेलें !

आम्ही येथें निरनिराळ्या दुकानांत गेलों. रशियामध्यें लांकूड काम व संगमरवरी दगडाचें काम अप्रतिम करतात. लांकडाच्या निरनिराळ्या प्रकारच्या बाहुल्यांचे सेट आम्हांला दिसले. 'पुडांत पुड' असावें त्याप्रमाणें एका बाहुलीच्या पोटांत दुसरी बाहुली, दुसरीच्या तिसरी याप्रमाणें बाहुल्यांचे सेट होते. पुष्पदाण्या पण मनोवेधक होत्या. लांकडाचे निरनिराळ्या आकाराचे डबे व डब्या पाहून सावंतवाडीच्या लांकूड सामानाची आठवण आली. संगमरवरी दगडाचीं जनावरें फारच सुंदर केलेलीं होतीं. तसेंच सोव्हिएत रशियाच्या निरनिराळ्या राष्ट्रसंघांतील राष्ट्रीय पोषाख घातलेल्या बाहुल्यांचेहि सेट होते.

कांहीं दुकानांतून उरल पर्वतांत सांपडणाऱ्या रंगीबेरंगी दगडाचे नमुने अति सुंदरतेनें एका स्टँडवर कोरून ठेविलेले होते. रशियांत 'अंबर' खूप सांपडतो. त्यामुळें अंबर मण्याच्या माळा व अंबरपासून केलेल्या साडीपिना हें येथील वैशिष्ट्य दिसतें. परंतु सर्व वस्तूंच्या किंमती मात्र अतिशय असतात. एवढ्या महागऱ्या वस्तू विकत घेणें आम्हांला परवडण्यासारखें नव्हतें; तरीसुद्धां अत्तर ठेवण्याच्या कांचेच्या कांहीं सुंदर कुप्या, सिगारेट केसेस, बाहुल्या व टायपिन्स् वगैरे स्मृतिचिन्हें मीं खरीदलीं आहेत.

मला येथील 'रेड मॉस्को' नांवाचा सेंट विकत घ्यावयाचा होता. फ्रान्स-मध्यें ज्याप्रमाणें शॅनेल, पोर्तुगालमध्यें ज्याप्रमाणें पॉपिआ, त्याचप्रमाणें रशियामध्यें रेड मॉस्को हा एक प्रसिद्ध सेंट आहे. यांतहि निरनिराळ्या प्रती असून त्यांच्या नंबराप्रमाणें त्याचा सुवास असतो. 'लाल रंग' हा रंग कम्युनिझमचें प्रतीक समजला जातो, त्यामुळें साम्राज्यवादी देशांत खूप हेटाळणी करण्यांत येते. आपल्याकडे पण 'लाल' म्हणजे 'धोका' असेंच आपण समजतों. पण रशियन भाषेंत लाल ( Red ) या शब्दाचा अर्थ 'सुंदर' असा होतो. या अत्तराचा वास मात्र खरोखरीच मधुर आहे.

तसेंच आम्हांला रशियन गाण्यांच्या ध्वनिमुद्रिकाहि घ्यावयाच्या होत्या. मीं दोन तीन ध्वनिमुद्रिका घेतल्या आहेत. त्यांचे सूर तुला अतिशय आवडतील.

बाजारपेठेंत आम्हांला सर्व व्यवहार घांदलीनेंच उरकावा लागला; कारण हॉटेलमध्यें परत जाऊन रात्रीच्या प्रवासाची सर्व तयारी करावयाची होती.

सोचीला जावयाची आम्हांला अतीव उत्कंठा लागली आहे. रशियानें कामगारांसाठीं जीं अनेक आरोग्यकेंद्रें उघडलीं आहेत, त्यांपैकीं एक महत्त्वपूर्ण आरोग्यकेंद्र सोची येथें आहे. शिवाय काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर असलेलें हें गांव निसर्गशोभेविषयीं फार प्रसिद्ध आहे. त्यामुळें तेथें आठ दिवस घालवायला मिळणार ही कल्पना माझ्या मनाला उल्हसित करीत आहे. सामानाची आवराआवर केल्यावर हें पत्र मी तुला लिहावयास बसलें आहें खरी, परंतु माझें सारें लक्ष 'सोची'च्या मार्गाकडे लागलें आहे. माझें पुढील पत्र मी तुला तेथूनच लिहून तेथील गंमती तुला कळवीन.

तुझी

**सौ. चारुशीला**

---

## पत्र विसावें

**सोची**

दिनांक २२ मे १९५४

प्रिय शांता,

आम्ही मॉस्कोहून दिनांक १९ रोजीं रात्रौ निघून सोचीला दिनांक २० रोजीं सायंकाळीं पांच वाजतां पोहोंचलों.

मॉस्को ते सोची हें अंतर अतिशय दीर्घ असल्यामुळें प्रवास अतिशय कंटाळवाणा झाला. वाटेंत फक्त एकदांच आमचें विमान एका छोट्याशा विमानतळावर थांबलें होतें. हें विमानतळ इतकें रखरखीत दिसलें कीं कांहीं विचारूं नकोस. तेथें आम्हीं दुपारचें जेवण घेतलें. सकाळीं न्याहरी विमानांतच घेतली होती.

विमानांत पाय ठेवल्यापासून माझ्या अंगांत कधीं नाहीं तो ताप भरावयास सुरुवात झाली. दुपारपर्यंत तापाचें मान खूपच वाढलें. सौ. कृपलानींच्या अंगांतहि ताप भरत होता. त्यामुळें हा लांबलचक प्रवास केव्हां एकदां संपतो असें आम्हांला होऊन गेलें होतें. तापाची गुंगी डोळ्यांवर असल्यामुळें विमानांतील झरोक्यांतून खालीं दिसणारा देखावा पाहण्याच्या मनःस्थितींत आम्ही दोघी नव्हतों.

परंतु जसजसें सोचीचें विमानतळ जवळ येऊं लागलें, तसतसें तेथील दृश्य विमानांतून कसें दिसतें हें पाहण्याविषयीं माझ्या मनांत अनिवार उत्कंठा निर्माण होऊं लागली व मीं झरोक्यांतून खालीं नजर फेकली. किती रम्य दिसत होता सारा प्रदेश म्हणून सांगूं! अथांग काळा समुद्र दूरवर पसरला असून त्यावर इतस्ततः फिरणाऱ्या पांढऱ्या शुभ्र नावा ( Motor Boats ) मासे पकडणाऱ्या जलपृष्ठावरील पक्ष्यांप्रमाणें भासत होत्या. या समुद्राला काळा समुद्र असें अरसिक नांव कुणीं दिलें, कुणास ठाऊक! वास्तविक ह्याचें पाणी अतिशय नितळ अन् नीलवर्णी आहे. त्याच्या दोन्ही बाजूंच्या किनाऱ्यांवर लहानमोठ्या वृक्षांनीं आच्छादित असलेले अनेक उंचसखल भाग असून या घनदाट वृक्षराईतून मधून मधून पांढरीं शुभ्र छोटींमोठीं घरें दृष्टीस पडतात.

विमानतळावर आम्हांला उतरून घेण्यासाठीं सॅनेटोरियममधून अनेक स्त्रीपुरुष डॉक्टर मंडळी आली होती. सोची हें गांव विमानतळापासून बावीस तेवीस मैल दूर आहे. हा सर्व मार्ग वळणावळणाचा असून त्यांत चढउतार बरेच आहेत. या मार्गावरून आमच्या मोटारी वळणें घेत जात असतां मला दार्जीलिंगच्या घाटांची आठवण झाली. अगदीं तशीच येथें नागमोडी चढण व एका बाजूला पहाड आणि दुसऱ्या बाजूस दरीखोरीं आहेत. प्रत्येक

वळणावर कामगारांच्या सांस्कृतिक जीवनाची प्रगति दाखविणारे प्लास्टरचे मोठमोठे भव्य पुतळे उभारलेले दिसून येतात. रस्त्यांवर मधून मधून छोटीं-मोठीं शुभ्र रंगाचीं घरें डौलानें उभीं राहून जणूं काय येणाऱ्या जाणाऱ्यांकडे कौतुकमिश्र नज़रेनें पाहात असतांना आढळतात. त्यांपैकीं कांहींचें बांधकाम अद्ययावत् शिल्पपद्धतीवर केलेलें आढळलें. परंतु कांहीं घरांच्यावर मात्र झारशाहींतील भव्यतेचा ठसा स्पष्ट उमटलेला दिसून येत होता. प्रत्येक घराच्या आंवतींभोंवतीं मनोहर उद्यानें असून त्यांत बॅडमिंटन कोर्टें वगैरे आधुनिक सोयी केलेल्या आढळतात.

झारशाहीमध्यें 'सोची' हें गांव अगदींच मागासलेलें होतें. समुद्र-किनाऱ्यावर कांहीं रंगेल सरदारांनीं आपल्या षौकाखातर कांहीं प्रासाद बांधले होते एवढेंच या गांवचें वैभव! पंचवीस तीस वर्षांपूर्वीं कॉ. स्टॅलिन या छोट्या मच्छीमारी गांवीं कांहीं कामासाठीं आला होता. येथील अप्रतिम निसर्गशोभा पाहून त्याला कमालीचें आश्चर्य वाटलेंच. पण त्याबरोबरच त्याच्या व्यवहारी व चतुर दृष्टीला दुसरी एक गोष्ट येथें प्रामुख्यानें आढळून आली, व ती म्हणजे सोचीच्या आसपास असणारे गंधकाचे अपरंपार झरे! तेव्हां निसर्गानें या गांवाला दिलेल्या या दोन महान् देणग्यांचा कामगार-जीवनासाठीं उपयोग करून घेण्याची योजना त्यानें ठरविली व येथें अनेक आरोग्यकेंद्रें बांधण्यांत आलीं. तसेंच पूर्वींच्या काळीं सरदारांनीं बांधलेले भव्य प्रासादहि या कामासाठींच उपयोगांत आणण्यांत येऊं लागले. आतां येथें साठ सत्तर आरोग्यालयें असून तेथें वर्षातून नेहमीं दीड दोन लाख कामगार आपल्या सुट्टीचा काळ घालविण्यासाठीं येत असतात. येथें अनेक सुंदर नाट्यगृहें, सिनेमागृहें असून एक Open air थिएटरहि बांधण्यांत आलें आहे.

आमची राहण्याची सोय रेड ऑक्टोबर सॅनेटोरियम् नांवाच्या आरोग्य-केंद्रांत केली होती. हें आरोग्यकेंद्र म्हणजे एक भव्य प्रासाद असून त्याच्या आंवतींभोंवतीं दहा बारा मैल मोठी वनराई आहे. या वनराईत अनेक छोटीं घरें पण बांधलीं असून त्यांचा उपयोगहि सुट्टी घालविण्यासाठीं येणाऱ्या कामगारांना राहण्यासाठींच केला जातो. मुख्य इमारतीच्या आजूबाजूला एक मनोहर उद्यान असून तें पांढऱ्या शुभ्र सुगंधी मॅग्नोलिया, पांढऱ्या पिवळ्या आयरिस व पियॉनीच्या गुलाबी फुलांनीं डवरून गेलेलें आहे.

आमचें स्वागत करण्यासाठीं वेलींनीं आच्छादित असलेल्या त्या आरोग्य-केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ अनेक मंडळी उभी होती. त्यांच्या स्वागताचा स्वीकार करीत आम्ही पहिल्या मजल्यावर गेलों. येथें मात्र माझ्या अंगांतील तापामुळें मी खुर्चीवरून कोलमडून खालीं पडलें. तेथून आम्हांला आमच्या खोलींत वगैरे केव्हां नेलें याची त्या गुंगींत मला कल्पनाच आली नाहीं. रात्रीं अकरा वाजतां मात्र एक स्निग्ध चेहऱ्याची स्त्री मला इंजेक्शन देत असतांनाच त्या गुंगींतून मला जाग आली.

मला औषधोपचार करणाऱ्या डॉक्टरीणबाई स्वभावानें अतिशय सौम्य व गोड आहेत. माझ्या तापामुळें त्या अतिशय चिंतातुर झालेल्या दिसल्या. अंथरुणावरून दोन दिवस मुळींच उठावयाचें नाहीं असा त्यांनीं मला सल्ला दिला. आज मात्र माझ्या अंगांत मुळींच ताप नाहीं. सौ. कृपलानींचा ताप अद्याप निघाला नाहीं. एकूण आरोग्यकेंद्राचा खरा पाहुणचार आम्ही दोघीच घेत आहोंत तर !

आजारी असल्यामुळें मला बाकीच्या मंडळींबरोबर सोची गांव पहावयास जायला मिळालें नाहीं. परंतु बागेंत मात्र मी बराच वेळ जाऊन बसलें होतें.

आमच्या ह्या आरोग्यकेंद्राच्या एका अंगाला विस्तीर्ण असा काळा समुद्र पसरला असून त्याच्या किनाऱ्यावर कामगारांसाठीं स्विमिंग पूल व बोटिंग केंद्रें बांधलेलीं आहेत. वर्षांतून भरपगारी मिळणाऱ्या दोन महिन्यांच्या सुट्टींत कामगार मंडळी आपल्या कुटुंबासहित येथें येऊन रहातात. त्यांची रहाण्याची सोय मोफत होते. खाण्यापिण्यासाठीं त्यांना फारच थोडा पैसा द्यावा लागतो व त्यांच्या आरोग्याची संपूर्णतया परीक्षा मोफत घेतली जाते.

या आरोग्यालयाचे मुख्य अधिकारी डॉक्टर वृद्ध व अत्यंत प्रेमळ स्वभावाचे आहेत. भारताबद्दल त्यांच्या मनांत अतोनात कुतूहल असून ते वारंवार आम्हांला आपल्या इकडील अनेक बाबतींतील माहिती विचारीत असतात. त्यांच्या हाताखालीं मदतनीस म्हणून काम करणाऱ्या डॉक्टरीणबाई आहेत. त्याच माझ्या व सुचेताबाईंच्या प्रकृतीवर इलाज करीत आहेत. त्या वयानें पस्तिशीच्या आंत आहेत. त्यांचे भावदर्शी निळे डोळे व त्यांच्या चेहऱ्या-वरील स्निग्धता मला फार आवडते. त्या एका पायानें लंगडत चालतात. त्यांना

फुलांचें मनस्वी वेड आहे. मला दिवसांतून तीन वेळां तपासण्यासाठीं येते वेळीं त्या माझ्यासाठीं नेहमींच पुष्पगुच्छ घेऊन येतात व तो माझ्या बिछान्या-जवळील टेबलावर ठेवून देतात.

रशियन औषधें बरींच परिणामकारक आहेत असें वाटतें. कारण मला व सुचेताबाईंना आलेला हा ताप दोन तीन दिवसांत पार पळून गेला. आम्हीं सर्वांनीं असें ठरविलें आहे कीं, येथें गंमतीनें आमच्या काना, नाका डोळ्यांची सर्व तपासणी करून घ्यावयाची व रशियन वैद्यांनीं या क्षेत्रांत कोणते आश्चर्य-कारक शोध लावले आहेत याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावयाचा. असो.

या सॅनेटोरियमची जेवणाची खोली खूप मोठी व प्रशस्त आहे. परंतु मी आजारी असल्यामुळें माझें जेवण मला खोलींतच देण्यांत येतें. मला चहा वगैरे आणून देणारी परिचारिका 'इमा' जवळ जवळ पन्नास पंचावन्न वर्षांची आहे. ती अतिशय प्रेमळ व सहनशील दिसते. संध्याकाळीं इतर भगिनी बोटिंगला गेल्या कीं मी माझ्या खोलींत एकटी असतें. तेव्हां ती चार घटका माझ्याजवळ येऊन बसते. तिच्याकडून मी अनेक रशियन शब्द शिकलें आहे. त्यांपैकीं 'मुशी' म्हणजे पुरुष हा शब्द मला फार गंमतीदार वाटला. विशेषतः मुशी हा शब्द पति या अर्थीं वापरण्यांत येतो. या 'इमा'नें काल मात्र एक चमत्कारिक प्रकार केला. तिनें मला माझ्या कुंकवाबद्दल विचारलें, तेव्हां मी तिला आम्ही भारतीय स्त्रिया कुंकू कां लावतों याचें कारण समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिनें मला सांगितलें, गेल्या महायुद्धांत तिचा पति व दोन मुलगे युद्धाच्या कामीं आले व आतां या जगांत तिला कोणीच नाहीं असें सांगून ती वृद्ध स्त्री एकदम ओक्साबोक्शीं रडूं लागली. मला तिच्याबद्दल फार वाईट वाटलें. मी शक्य तोंवर तिची समजूत घातली. एवढ्या वृद्ध वयांत निराधार असल्यामुळें तिला आज हे कष्ट करावे लागत आहेत या विचारानें तिच्याबद्दल मला फार सहानुभूति वाटूं लागली. आज मात्र 'इमा'ची ड्यूटी माझ्या खोलींत नसल्यामुळें ती सबंध दिवस मला भेटली नाहीं.

आज सायंकाळीं समुद्रकांठीं जाऊन बसलें असतांना लक्तरें झालेले कपडे घातलेलीं दोन नऊ दहा वर्षांचीं रशियन मुलें माझ्याजवळ येऊन रशियन

भाषेंत खूप बडबड करूं लागलीं. मला त्याचा अर्थ समजेना. थोड्या वेळानें मी माझ्या जागेवरून उठून सॅनेटोरियमकडे जावयास निघालें. तर तीं मुलें माझा पाठलाग करूं लागलीं. मला वाटतें त्यांना माझ्याकडून कांहीं बक्षीस हवें होतें. तेथें बाकावर बसलेल्या कांहीं रशियन मंडळींनीं त्या दोघांना हांकलून लावलें.

उद्यांपासून मला बाहेर हिंडावयास जाण्याची परवानगी देण्यांत आली आहे. मग मला सोचीच्या साऱ्या सृष्टिसौंदर्याचें दर्शन घेतां येईल. इथलें हें शांत सौम्य वातावरण इतकें प्रसन्न आहे कीं, येथें निदान महिनाभर तरी राहावें असें आम्हांला वाटूं लागलें आहे.

सोचीसंबंधींची अधिक हकीकत माझ्या पुढील पत्रांत लिहीन.

तूर्त येथेंच थांबतें.

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र एकविसावें

सोची
दिनांक २४ मे १९५४

प्रिय शांता,

माझी प्रकृति अगदीं साफ सुधारली आहे. या गांवची हवा इतकी प्रसन्न आहे कीं, अशीं किरकोळ दुखणीं अधिक दिवस तळ ठोकून राहणें शक्यच नाहीं.

सोची हें एक अगदीं छोटें गांव आहे. जिकडे पहावें तिकडे हिरवीगार सृष्टि आणि तिच्याकडे आपल्या टपोऱ्या निळ्या डोळ्यांनीं लोभसपणें पाहणारे

जलाशय! परंतु आजूबाजूचा परिसर इतका रमणीय आहे कीं, आम्हांला येथें बरेच दिवस राहावेंसें वाटत आहे. परंतु तितका अवधि आम्हांला नाहीं.

काल आम्हीं येथील दोन आरोग्यकेन्द्रें पाहिलीं. येथें असलेल्या गंधकाच्या झऱ्यांच्या पाण्याचा, शास्त्रीय दृष्ट्या संशोधन करून ह्या आरोग्यकेंद्रांतून अनेक रोगांवर इलाज करण्यांत येतो. पोटाचे विकार, स्त्रियांचे रोग, कान, त्वचा, केसांची वाढ खुंटणें वगैरे सर्व विकार येथें गंधकाचा विविध तऱ्हेनें उपयोग करून बरे करण्यांत येतात.

या दोन आरोग्यकेंद्रांपैकीं एक केंद्र सर्वच कामगारांसाठीं असून दुसरें फक्त कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या कामगारांसाठींच होतें.

पहिल्या आरोग्यकेंद्राला जोडून असणाऱ्या गंधकाच्या स्नानगृहाची आम्हीं पाहणी केली. हें स्नानगृह अतिशय भव्य असून दुमजली होतें. त्यांत निरनिराळ्या दालनांत वेगवेगळ्या रोगांवर इलाज म्हणून रोग्यांना गंधकाचें 'स्नान' (Baths) देण्यांत येतात. ही ट्रीटमेंट सर्व तऱ्हेच्या रोगांवर उपयुक्त ठरली आहे. फक्त काळजाचे किंवा मूत्राशयाचे विकार असलेल्या रोग्यांना व गुल्मरोग झालेल्या माणसास हें 'स्नान' देत नाहींत. हा इलाज रोग्याला ६ पासून १५ मिनिटें देतात. या स्नानगृहांत एकाच वेळीं २२० रोगी हा उपचार करून घेऊं शकतात इतकें हें स्नानगृह मोठें आहे. तसेंच येथें रोज ९०० रोगी इलाज करून घेण्यासाठीं येतात. या स्नानगृहाचे मुख्य डॉक्टर लिमिन्हॉव यांनीं आम्हांला प्रथम सर्व माहिती सांगून नंतर सबंध 'गृह' दाखविलें. २०० पासून २००० मीटरपर्यंत खोल असलेल्या झऱ्यांचें पाणी रोगावर इलाज करण्यास अधिक गुणकारी ठरतें. झऱ्यांत सांपडणारें पाणी प्रथम अतिशय गरम असतें. परंतु तें थंड करून त्याचा उपचार हातापायांच्या रोगांवर करतात. डोकेंदुखीवर या उष्ण पाण्याचा फवारा (Spray) देतात. या एका स्नानगृहांत चौदा डॉक्टर व पन्नास परिचारिका आहेत. येथील ही सर्वच मंडळी प्रसन्न, हंसतमुख व मायाळू दिसत होती.

स्नानगृहाच्या एका अंगाला दुसरी एक प्रशस्त इमारत असून तेथें 'Mud Baths' ओल्या मातीचा इलाज देण्यांत येतो. हें गृह पाहण्याची

मला फार उत्सुकता होती. येथें मोठमोठ्या प्रचंड टाक्या असून त्यांत काळ्याभोर मातीचा चिखल सांठविलेला आहे. त्याला जोडून असलेल्या अनेक यंत्रांच्या द्वारें या चिखलावर कांहीं रासायनिक क्रिया केली जाते. त्यानंतर हा चिखल गरम केलेल्या डांबराप्रमाणें नितळ दिसतो. रासायनिक प्रयोगानंतर हा चिखल मोठमोठ्या लोखंडी कढयांतून भरतात व त्याला कमजास्त उष्णता देतात व नंतर त्याचा उपयोग वेगवेगळ्या रोगांवर करण्यांत येतो.

या गृहामध्यें पन्नासएक रोगी होते. कांहींच्या नुसत्या तोंडावर तर कांहींच्या सबंध अंगाला हा चिखल माखून ठेवला होता. रक्तदाबाचा विकार व संधिवात या रोगांवर ही ट्रीटमेंट फारच गुणकारी ठरली आहे असें आम्हांला सांगण्यांत आलें. परंतु तुला ठाऊकच असेल कीं, रशियाचा हा शोध आपल्याला अगदींच अपरिचित नाहीं. आपल्या इकडेहि खेडे-गांवांतून हा इलाज केला जातो. कांहीं दिवसांपूर्वी रक्तदाबाच्या विकारावर शेतांतील काळी माती आणून ती टाळूवर थापावी म्हणजे मस्तकांत उसळ-लेल्या रक्ताचा प्रवाह पूर्ववत् व्यवस्थित होतो असें माझ्या एका ओळखीच्या वैद्यानें सांगितलें होतें त्याची मला स्मृति झाली. याखेरीज आपल्या इकडे खेड्यांतून बारीकसारीक रोगांवरहि या काळ्या गुणकारी मातीचा उपयोग करतातच. गांधील माशीच्या घराची माती किंवा मुंग्यांच्या वारुळांतील माती दंशावर व सुजेवर उपयुक्त आहे हें तुला माहीतच आहे. तथापि येथें 'माती'च्या गुणकारकतेवर शास्त्रीय प्रयोग करून जे आश्चर्यकारक प्रयोग चालले आहेत तसें संशोधन आपल्याकडे व्हावयास हवें एवढें मात्र खरें!

नंतर आम्ही दुसरें आरोग्यकेंद्र पहावयास गेलों. हें आरोग्यगृह फक्त कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या कामगारांसाठींच आहे. खाणींत काम करणाऱ्या या कामगारांना काळ्या रंगाची अगदीं उबग येत असावी हें लक्षांत घेऊन कीं काय कोण जाणे, हें भव्य गृह पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांचें बांधलेलें आहे. एका इमारतींत रोग्यांना राहावयास सुंदर खोल्या आहेत. समुद्राकांठीं असून हें आरोग्यगृह अत्यंत प्रेक्षणीय आहे. इथल्या बागेमध्यें रंगीबेरंगी गुलाबांच्या फुलांचे ताटवे असून ते इतस्ततः पसरलेले

दिसून येतात. चालणाराला अक्षरशः ताटवे तुडवावे लागतात. आयुष्याच्या मार्गांवर गुलाबाचीं फुलें पसरलेलीं नसतील कदाचित्, पण या आरोग्यगृहाच्या मार्गावर त्यांची नुसती पखरण झालेली आहे. या लाल व पिवळ्या गुलाबांच्या फुलांवर आसपास असलेल्या कारंजाच्या पाण्याचे तुषार उडत असतांनाची शोभा मोठी अवर्णनीय दिसते. अगदीं सामान्य दर्जाच्या कामगारांना या प्रासादतुल्य इमारतींतून सुट्टीचा काळ सुखानें घालविण्याची जी सोय येथें करण्यांत आली आहे ती पाहून त्यांच्या जीवनाचा दर्जा येथें किती उंचावला आहे याचें निदान करण्यास हरकत नाहीं.

येथें असलेल्या आरोग्यालयांत मोठमोठ्या यंत्रानें घशाच्या व नाका-कानाच्या रोगांवर गंधकाचा वाफारा देतात. आम्हीं सर्वांनीं तो प्रयोग स्वतःवर करून घेतला. थंडीच्या योगानें घसा वगैरे धरला असल्यास किंवा पडसें आलेलें असल्यास त्यावर हा वाफारा तात्काळ गुणकारी होतो, असा आम्हांला प्रत्यक्ष अनुभव आला. आमच्यांतील कांहीं प्रतिनिधींना तर तेथें राहून केंसाच्या वाढीवर इलाज करून घेण्याची इच्छा झाली. परंतु केंस लांब होण्यास निदान एक महिनाभर तरी हा उपचार केला पाहिजे ही गोष्ट समजल्यानंतर त्या फारच खट्टू झाल्या.

आरोग्यालय पाहून झाल्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर बांधण्यांत आलेल्या सूर्यस्नानाच्या जागा पाहण्यास आम्ही गेलों. आरोग्यालयाच्या एका बाजूला एक दोन मैल लांबीचा बोगदा असून त्या बोगद्यांतून किनाऱ्यावर जाण्यासाठीं एक बस ठेवलेली आहे. आरोग्यालय टेंकडीवर असल्यामुळें या बसमधून उतरणीवर उतरतांना एक निराळाच सुखद अनुभव आला. किनाऱ्यावर अनेक रोगी उघड्या अंगावर सूर्यकिरणें घेत पहुडले होते. तेथून आम्ही खालीं समुद्राच्या अगदीं निकट गेलों. सोचीच्या किनाऱ्यावर पांढरे शुभ्र, चपटे व लंबगोल आकाराचे छोटे दगड खूप सांपडतात. या शुभ्र दगडांवर ( White pebbles ) येथील लोक तैल रंगानें छोटे छोटे देखावे रंगवतात व नंतर हे दगड येथील स्मृतिचिन्हें म्हणून विकण्यांत येतात. तशीं स्मृतिचिन्हें आम्हीं विकत घेतलींच आहेत. पण याखेरीज या किनाऱ्यावरील हे पांढरे शुभ्र चपटे दगडहि आम्हीं बरेच गोळा केले आहेत.

परत येते वेळीं आरोग्यालयांत तंदुरुस्तीसाठीं जमलेल्या अनेक स्त्रीपुरुष कामगारांनीं आम्हांला मोठ्या प्रेमानें चहापार्टी दिली. अगोदर या सर्व मंडळींनीं निरनिराळ्या वाद्यांवर रशियन गीतें म्हटलीं व नंतर नृत्याला प्रारंभ झाला. सोव्हिएत रशिया व त्याचे सर्व राष्ट्रसंघांतील मंडळींचा समावेश या कामगारांत झाला होता. त्यामुळें त्यांच्यांत भाषेच्या व चेहऱ्या-मोहऱ्याच्या दृष्टीनें मजेदार विविधता होती. या सर्व मंडळींनीं त्यांच्या संघनृत्यांत आम्हां सर्वांना भाग घ्यावयास लावला. हें संघनृत्य एकमेकांचा हात धरून एक वर्तुळ करावयाचें व मग वाद्य व संगीत यांच्या सुरांवर वर्तुळाकार फिरावयाचें एवढेंच! त्यांनीं दिलेल्या चहाचा व बिस्किटांचा समाचार घेऊन नंतर आम्हीं त्यांचा निरोप घेतला.

घरीं परत आल्यानंतर दुपारचें जेवण घेऊन आम्हीं विश्रांति घेतली. संध्याकाळीं काळ्या समुद्रावर नौकाविहार करण्यासाठीं आम्हांला जावयाचें होतें. आमच्यापैकीं कांहीं मंडळी घरींच राहिली. सोचीचा किनारा अत्यंत सुंदर आहे. आपल्या एका अंगाला पर्वताची रांग व दुसऱ्या बाजूस हा नीटस व रेखीव किनारा घेऊन संथपणें बसलेला हा काळा समुद्र अत्यंत मनोवेधक वाटतो. शिवाय याचें, गांवाच्या जवळ असलेल्या भागाचें पाणी कांहींसें कोमट आहे व त्यामुळें या पाण्यांत पोहणारांना फारच सुखद अनुभव येतो.

आम्ही मोटार-बोटींतून नौकाविहारास प्रारंभ केला. या बोटी फारच वेगवान असतात. समुद्राच्या मध्यभागीं गेल्यानंतर आमच्या बोटींची शर्यत सुरू झाली. बोटीच्या एवढ्या भयंकर वेगाचा अनुभव मीं तरी कधींच घेतला नव्हता. ही शर्यत चालू असतांनाच आम्ही आसपासचा देखावाहि पाहात होतों. शेवटीं बोटींचा वेग इतका वाढला कीं, आम्ही आमच्याबरोबर असणाऱ्या दुभाषिणींना तो वेग कमी करण्यास सांगितलें. आम्ही जवळ जवळ दीड तास समुद्रावर फिरत होतों.

आज रात्रीं आम्ही रहात असलेल्या आरोग्यालयांतील सर्व कामगारांनीं मिळून आमच्यासाठीं नृत्यगायनाचा कार्यक्रम ठेवला आहे. तो कार्यक्रम संपल्यानंतर सर्व डॉक्टरांतर्फे आम्हांला निरोप–मेजवानी आहे.

आज दुपारीं येथील दैनिक वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी आमची मुलाखत

च्यावयास आले होते. त्यांनीं आम्हां सर्वांना आपलें सोचीविषयीं मत देण्यास सांगितलें. मीं त्यांना एकाच वाक्यांत माझें मत स्पष्ट केलें कीं, Sochi is a great tribute from nature to Man and from Man to humanity. एकाच वाक्यांतील मीं केलेलें हें सोचीचें वर्णन त्या मंडळींना फार आवडलें; आणि खरोखरीच 'सोची' हें ठिकाण जर तूं पाहशील तर तुझेंहि माझ्याप्रमाणेंच मत झाल्याशिवाय राहाणार नाहीं. जास्त काय लिहूं !

तुझी

सौ. चारुशीला

---

## पत्र बाविसावें

हॉटेल मॉस्को

दिनांक २६ मे १९५४

प्रिय शांता,

आम्ही कालच सोचीहून इकडे परत आलों. सोचीसारखें निसर्गरम्य स्थळ सोडून येतांना आम्हांला खरोखरीच वाईट वाटलें. सोचीविषयीं विचार करतांना माझ्या मनांत येतें कीं, आपल्या इकडेहि अशाच प्रकारचीं रम्य ठिकाणें आहेत. तथापि तेथील निसर्गाच्या उदार देणगीचा चैनीपलीकडे मानवी जीवनाच्या कल्याणाखातर कांहीं उपयोग करून घेण्याची कल्पना अद्यापि कांहीं आम्हांला येत नाहीं. सोचीच्या गंधकाच्या झऱ्याकडे पाहून मुंबईजवळील 'वज्रेश्वरी'च्या अशा प्रकारच्या झऱ्यांची मला स्मृति झाली. या ठिकाणींहि कांहीं आरोग्यविषयक योजना केली तर गरीबांना किती तरी फायदा होईल, नाहीं का !

सोचीला काझेक, ताझेक, उझबेक वगैरे अनेक राष्ट्रसंघांतून आलेली कामगार मंडळी होती. त्यांनीं आम्हांला एक थाटाची मेजवानी दिली. त्या प्रसंगीं नृत्यगायनाचे विविध कार्यक्रम झाले. तेथील आरोग्यसंपन्न हवेंत सुट्टीचे चार दिवस घालवून जेव्हां ही मंडळी परत आपल्या नित्याच्या व्यवसायासाठीं जातील तेव्हां त्यांना काम करण्यास दुप्पट जोम व उत्साह येईल, नाहीं का?

काल आम्हीं येथील प्रसिद्ध लेनिन ग्रंथालय पाहिलें. ह्या ग्रंथालयाची इमारत नऊ मजली असून तिच्या दोहों अंगांस दुसऱ्या दोन छोट्या इमारती मुख्य इमारतीस पूरक म्हणून जोडल्या आहेत. मीं कलकत्ता, बडोदा व म्हैसूर येथील मोठ्या लायब्ररी पाहिल्या, तेव्हां आपल्या देशांतील बुद्धि-वैभवाचीं चिन्हें म्हणून माझें अंतःकरण त्या वेळीं अभिमानानें फुलून निघालें होतें. परंतु कांहीं दिवसांपूर्वीं पाहिलेलें पॅरिस येथील ग्रंथालय व काल येथें पाहिलेलें हें लेनिनचें प्रचंड ग्रंथालय पाहिल्यानंतर तो अभिमान कुठल्या कुठेंच उडून गेला.

ह्या ग्रंथालयाची स्थापना १८६२ मध्यें झाली. मॉस्कोंतीलच नव्हे तर रशियांतील हें पहिलें सार्वजनिक वाचनालय होय. यांत प्रथम दहा हजार ग्रंथ व हस्तलिखितांचा संग्रह होता. याखेरीज येथें अनेक लेखक व राज-कारणी पुरुष महत्त्वाच्या चर्चा करण्यासाठीं जमत असत. १८९३ ते १८९७ च्या काळांत लेनिन येथें आपलें लेखन करीत असे व म्हणूनच १९२५ मध्यें या वाचनालयाला त्याचें नांव देण्यांत आलें व त्याची झपाट्यानें वाढ होऊं लागली. आज येथील ग्रंथसंख्या सतरा कोटी आहे. अमेरिकेंतील वॉशिंग्टन लायब्ररीचा पहिला नंबर व पॅरिसच्या लायब्ररीचा दुसरा नंबर लागतो असें म्हणतात. परंतु अमेरिकेंतील लायब्ररींत १४ कोटी व पॅरिसच्या लायब्ररींत ९ कोटीच ग्रंथसंख्या आहे. या वाचनालयांत रोज दोन हजार मासिकें व वृत्तपत्रें येतात असें आम्हांला सांगण्यांत आलें. रशिया व त्याच्याशीं स्नेहसंबंध असलेल्या अनेक देशांतून नव्यानें प्रसिद्ध झालेलें प्रत्येक पुस्तक येथें भेट म्हणून येतें. वेगवेगळ्या दोनशें भाषांतील पुस्तकें येथें आहेत. रोज १,६०,००० वाचक या वाचनालयाचा फायदा घेतात.

जेव्हां १८६२ मध्यें हें वाचनालय सुरू झालें तेव्हां वाचकांसाठीं फक्त

एकच खोली येथें होती. परंतु आज येथें मोठमोठालीं १४ दालनें आहेत व तीं वाचकवर्गासाठीं सकाळीं ९ ते रात्रीं १२ वाजेपर्यंत उघडीं असतात. हें वाचनालय मोफत असून घरीं वाचावयास नेण्यांत येणाऱ्या पुस्तकांबद्दल अनामत रक्कम ठेवावी लागत नाहीं हें ऐकून मला आश्चर्य वाटलें व पुस्तकांची खराबी झाल्यास काय इलाज करतात असा मीं प्रश्न तेथील मुख्य अधिकाऱ्यास केला. तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं रशियन वाचकवर्ग पुस्तकांना अतिशय जपतो. हजारांत एखादा असा वाचक निघाला तर तो त्या पुस्तकाचें नुकसान आपणहूनच भरून देतो; व शिवाय एकेका ग्रंथाच्या किमान पक्षीं दहा प्रती तरी वाचनालयांत असल्यामुळें क्वचित् एखादें पुस्तक हरवलें तर इतर वाचकांचें नुकसान होत नाहीं. तेथील वाचकांची पुस्तकांसंबंधींची कर्तव्यनिष्ठा पाहून मला मोठें कौतुक वाटलें.

तूं जर येथें असतीस तर, एका दालनांतून दुसऱ्या दालनांत लगबगीनें पुस्तकें वाहून नेणारी छोटी विजेवर चालणारी गाडी पाहून तुला खूपच मौज वाटली असती. याखेरीज मध्यवर्ती चौकांत पाळण्यासारखी एक यंत्रयोजना असून त्यांतून हव्या त्या दालनांतून व मजल्यावरून दोन सेकंदांत आपल्याला हवें तें पुस्तक मिळूं शकतें.

या वाचनालयाचा एक स्वतंत्र छापखाना असून तेथें बुलेटिन व कांहीं ग्रंथ छापले जातात. वाचकांसाठीं व येथें काम करणाऱ्या नोकरवर्गासाठीं 'ग्रंथविशारदाचे' स्वतंत्र कोर्स उघडण्यांत आले आहेत. या विभागांतून पदव्या दिल्या जातात.

संदर्भ विभागांत पुस्तकाचें नांव, लेखक व प्रसिद्धीचा सन वगैरेबद्दल सर्व माहिती मिळूं शकते. येथें ५०० वर्षांपूर्वींचे जुने दुर्मिळ ग्रंथ, चर्मपत्रें व ताम्रपत्रें असून अभ्यासू मंडळीची सोय व्हावी म्हणून येथें Myrcho-Proning Dept. उघडलें आहे. यांत या प्राचीन दुर्मिळ ग्रंथांची छोटी फिल्म काढतां येते.

मध्यवर्ती इमारतीच्या तळाशीं एक विस्तृत प्रयोगशाळा असून तेथें नवे-जुने दुर्मिळ ग्रंथ शास्त्रीय पद्धतीनें कसे सुरक्षित ठेवावे याचे प्रयोग केले जातात. मी व श्रीमती लिली पांड्या ही प्रयोगशाळा पाहावयास मुद्दाम गेलों. या

प्रयोगशाळेची मुख्य अधिकारी एक स्त्रीच असून येथील रसायन विभागांतहि अनेक स्त्रियाच काम करतात. या मुख्य बाईनें आम्हांला वेगवेगळे विभाग दाखवून शास्त्रीय पद्धतीनें पुस्तकाचें रक्षण कसें केलें जातें हें दाखविलें. पुस्तकांना कधीं शीतमान ( Air Condition ) तर कधीं माफक उष्णतामान द्यावें लागतें. पुस्तकावर शिंपडण्यासाठीं रासायनिक फवारा ( Spray ) कशा तऱ्हेनें करण्यांत येतो असा आम्हीं प्रश्न विचारल्यावरून ती कृति (Formula) तुम्हांला मागाहून पाठवून देऊं असें तिनें आम्हांला उत्तर दिलें.

या वाचनालयासंबंधीं एका गोष्टीचें तुला खूपच नवल वाटेल व तें म्हणजे येथें हस्तलिखित जुनी नलदमयंती आख्यानाची एक प्रत आहे. याखेरीज भगवद्‌गीता, महाभारत, कालिदासाचीं नाटकें वगैरे अनेक मराठी व संस्कृत पुस्तकें आहेत. तथापि, अर्वाचीन मराठी लेखकांचीं मात्र कोणतींच पुस्तकें येथें नाहींत. मी याबद्दल कुतूहल दाखविल्यामुळें त्यांनीं मला आपल्याकडील प्रसिद्ध लेखकांचीं नांवें देण्यास सांगितलें. खरोखरीच हरि नारायण आपटे, वा. म. जोशी, गडकरी, कोल्हटकर, अत्रे, फडके व खांडेकर यांच्यासारख्या आमच्याकडील नामांकित लेखकांच्या कलाकृती तेथें जावयास हव्यात. आपल्या देशांतील बंगाली वाङ्मयाचा मात्र येथें भरपूर संग्रह आहे. रविंद्रनाथ टागोरांची जागतिक कीर्ति हेंच याला मुख्य कारण असावें, नाहीं का ?

हिंदुस्थानांतील बारा, अमेरिकेंतील सत्तर, इंग्लंडमधील पस्तीस व फ्रान्समधील पंचवीस संस्थांची या वाचनालयाबरोबर पुस्तकांची देवघेव ( Exchange of Books ) होते. याखेरीज जगांतील छत्तीस जबाबदार देशांतील ४७० संस्थांचा या वाचनालयाशीं घनिष्ठ संबंध आहे. तुमच्या कलकत्त्याच्या National Library नें मात्र आमच्या पत्राला उत्तर पाठविलें नाहीं असें येथील मुख्य अधिकारी आम्हांला म्हणाले, तेव्हां आम्हांला चमत्कारिक वाटलें.

वाचकांना व अभ्यासकांना बसण्यासाठीं केलेल्या दालनांत कमालीची शांतता होती. डोळ्याचें आरोग्य चांगलें रहावें यासाठीं दिव्यांच्या प्रकाशाची योग्य ती रचना केली होती. प्रत्येकाच्या टेबलावर मायक्रोफिल्मिंग मशीन

होतें. हा ज्ञानसंग्रह पाहिल्यानंतर अचंबा करीत आम्ही आमच्या हॉटेल-कडे परतलों.

अशा मोठ्याछोट्या ग्रंथालयांचें एक जाळेंच सोव्हिएत रशियांत पसरलें आहे. स्टेशनवर, सार्वजनिक उद्यानांतून, कारखान्यांतून जिकडे पहावें तिकडे छोट्यामोठ्या लायब्ररी आहेतच. जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती—त्याप्रमाणें, येथें, तुम्ही जिकडे जाल तिकडे ग्रंथ तुमचा पाठलाग करीत येतात. पूर्वी सोव्हिएत रशियांत फक्त १२,६०० ग्रंथालयें होतीं; आज येथें दहा लाखाच्या वर ग्रंथालयें असून त्यांत ८६ कोटींच्या वर ग्रंथसंपत्ति आहे. पूर्वेकडील उझबेक, ताझेक वगैरेसारख्या राष्ट्रसंघांतून शहरांतहि पूर्वी वाचनालयें होतीं. तीं आज खेडोपाडीं दिसून येतात. मानवनिर्मित सर्व साहित्याचा परिचय करून घेतल्याशिवाय मनाची खरी सुधारणा होणार नाहीं असें लेनिन नेहमीं म्हणत असे व त्यामुळें त्यानें लायब्ररीच्या चळवळीस प्रारंभ केला. ‘ आम्हांला आमच्या सर्व कामगारांना व कृषीवलांना सुसंस्कृत व सुशिक्षित करावयाचें आहे, ’ अशा निर्धारानें स्टॅलिननें ग्रंथसंपत्तीची वाढ करून विद्येचें लोण समाजांतील सर्वसामान्य थरापर्यंत नेऊन पोहोंचविलें.

सोव्हिएत रशियानें ग्रंथसंग्रहाच्या बाबतींत केलेली प्रगति पाहून या देशां-तील लोकशिक्षणाचें महत्त्व कुणाच्याहि चटकन् ध्यानांत आल्याशिवाय राहात नाहीं. आपल्याइकडील साक्षरतेच्या मोहिमेंत अशा योजनेचा अंतर्भाव अवश्य व्हावयास पाहिजे. सुंदर, सचित्र व उत्कृष्ट छपाईचीं पुस्तकें आंवतीं-भोंवतीं पाहिल्यानंतर प्रत्येक अडाणी खेडुतास तीं वाचण्यासाठीं तरी आपण शिकलें पाहिजेच असें वाटूं लागेल.

काल आम्हीं ही ज्ञानगंगा पाहिल्यानंतर येथील सुप्रसिद्ध पपेट शो पाहिला. त्याविषयीं माहिती माझ्या पुढील पत्रांत लिहीन. आजहि आमचे येथील अनेक कार्यक्रम मोठ्या झपाट्यानें आम्हांला उरकावयाचे आहेत. कारण आज रात्रीं आम्हांला मॉस्कोचा निरोप घ्यावयाचा आहे. त्यामुळें आतां मला जलदीनें न्याहारीस जावयास हवें. जास्त पुढील पत्रीं.

तुझी

**सौ. चारुशीला**

# पत्र तेविसावें

हॉटेल मॉस्को
दिनांक २६ मे १९५४

प्रिय शांता,

एक पत्र आजच सकाळीं न्याहारीपूर्वी लिहिलें. सध्यां तासभराचा अवसर असल्यामुळें हें दुसरें पत्र तुला लिहीत आहें.

मॉस्को सोडण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली आहे तसतसें येथील जितकें कांहीं पाहण्यासारखें आहे तें पाहून घेण्याची प्रबल इच्छा मनांत निर्माण झाली आहे. या देशांत येण्याजाण्यासंबंधींच्या साऱ्या अवघड मर्यादा ध्यानांत घेतां, 'वारंवार कोठुनी असें दिसणार ?' असा विचार मनांत येणें अगदीं साहजिकच आहे, नाहीं का ?

काल सकाळीं येथील क्रेमलिन राजवाडा पाहण्यास गेलों होतों. माझ्या मागील एका पत्रांत या राजवाड्यांत आम्हांला दिलेल्या खास मेजवानीचें वर्णन मीं तुला लिहिलेंच होतें. तथापि त्या वेळीं कांहीं विवक्षित दालनां-खेरीज राजवाड्याचा इतर भाग पाहणें शक्य नव्हतें आणि म्हणूनच कालचा स्पेशल कार्यक्रम आंखण्यांत आला होता.

हा प्रासाद अत्यंत भव्य असून त्याच्या आंवतींभोंवतीं विस्तृत आवार आहे. प्रासादाच्या चारी बाजूनें लाल भिंतींचा तट असून तो बराच प्राचीन आहे. या प्रासादाच्या बाहेरील रस्त्याला लाल चौक ( Red Square ) असें नांव असून राजकीय दृष्ट्या त्या रस्त्याला अत्यंत महत्त्व आहे. झारशाहींतील साऱ्या वैभवाचीं चिन्हें अद्यापि तेथें आढळून येतात. रशियांत एक गोष्ट मुख्यत्वेंकरून आमच्या लक्षांत आली व ती म्हणजे उन्मत्त सत्तेला उध्वस्त करतांना, प्राचीन वैभवाचें व संस्कृतीचें निदर्शक असें जें कांहीं असेल त्याची मात्र काळजीपूर्वक जपणूक करण्यांत आली आहे. सोव्हिएत रशिय[illegible] मंदिरें प्रार्थनेच्या दृष्टीनें जवळ जवळ जरी ओस पडलेलीं असलीं तरी [illegible]क-ठिकाणीं असलेले हे प्राचीन शिल्पकलेचे व वास्तुकलेचे नमुने अत्यंत

होतें. हा ज्ञानसंग्रह पाहिल्यानंतर अचंबा करीत आम्ही आमच्या हॉटेल-कडे परतलों.

अशा मोठ्याछोट्या ग्रंथालयांचें एक जाळेंच सोव्हिएत रशियांत पसरलें आहे. स्टेशनवर, सार्वजनिक उद्यानांतून, कारखान्यांतून जिकडे पहावें तिकडे छोट्यामोठ्या लायब्ररी आहेतच. जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती—त्याप्रमाणें, येथें, तुम्ही जिकडे जाल तिकडे ग्रंथ तुमचा पाठलाग करीत येतात. पूर्वी सोव्हिएत रशियांत फक्त १२,६०० ग्रंथालयें होतीं; आज येथें दहा लाखाच्या वर ग्रंथालयें असून त्यांत ८६ कोटींच्या वर ग्रंथसंपत्ति आहे. पूर्वेकडील उझबेक, ताझेक वगैरेसारख्या राष्ट्रसंघांतून शहरांतहि पूर्वी वाचनालयें होतीं. तीं आज खेडोपाडीं दिसून येतात. मानवनिर्मित सर्व साहित्याचा परिचय करून घेतल्याशिवाय मनाची खरी सुधारणा होणार नाहीं असें लेनिन नेहमीं म्हणत असे व त्यामुळें त्यानें लायब्ररीच्या चळवळीस प्रारंभ केला. ‘ आम्हांला आमच्या सर्व कामगारांना व कृषीवलांना सुसंस्कृत व सुशिक्षित करावयाचें आहे, ’ अशा निर्धारानें स्टॅलिननें ग्रंथसंपत्तीची वाढ करून विद्येचें लोण समाजांतील सर्वसामान्य थरापर्यंत नेऊन पोहोंचविलें.

सोव्हिएत रशियानें ग्रंथसंग्रहाच्या बाबतींत केलेली प्रगति पाहून या देशां-तील लोकशिक्षणाचें महत्त्व कुणाच्याहि चटकन् ध्यानांत आल्याशिवाय राहात नाहीं. आपल्याइकडील साक्षरतेच्या मोहिमेंत अशा योजनेचा अंतर्भाव अवश्य व्हावयास पाहिजे. सुंदर, सचित्र व उत्कृष्ट छपाईचीं पुस्तकें आंवतीं-भोंवतीं पाहिल्यानंतर प्रत्येक अडाणी खेडुतास तीं वाचण्यासाठीं तरी आपण शिकलें पाहिजेच असें वाटूं लागेल.

काल आम्हीं ही ज्ञानगंगा पाहिल्यानंतर येथील सुप्रसिद्ध पपेट शो पाहिला. त्याविषयीं माहिती माझ्या पुढील पत्रांत लिहीन. आजहि आमचे येथील अनेक कार्यक्रम मोठ्या झपाट्यानें आम्हांला उरकावयाचे आहेत. कारण आज रात्रीं आम्हांला मॉस्कोचा निरोप घ्यावयाचा आहे. त्यामुळें आतां मला जलदीनें न्याहारीस जावयास हवें. जास्त पुढील पत्रीं.

तुझी

सौ. चारुशीला

# पत्र तेविसावें

हॉटेल मॉस्को
दिनांक २६ मे १९५४

प्रिय शांता,

एक पत्र आजच सकाळीं न्याहारीपूर्वी लिहिलें. सध्यां तासभराचा अवसर असल्यामुळें हें दुसरें पत्र तुला लिहीत आहें.

मॉस्को सोडण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली आहे तसतसें येथील जितकें कांहीं पाहण्यासारखें आहे तें पाहून घेण्याची प्रबल इच्छा मनांत निर्माण झाली आहे. या देशांत येण्याजाण्यासंबंधींच्या साऱ्या अवघड मर्यादा ध्यानांत घेतां, ' वारंवार कोठुनी असें दिसणार ? ' असा विचार मनांत येणें अगदीं साहजिकच आहे, नाहीं का ?

काल सकाळीं येथील क्रेमलिन राजवाडा पाहण्यास गेलों होतों. माझ्या मागील एका पत्रांत या राजवाड्यांत आम्हांला दिलेल्या खास मेजवानीचें वर्णन मीं तुला लिहिलेंच होतें. तथापि त्या वेळीं कांहीं विवक्षित दालनां-खेरीज राजवाड्याचा इतर भाग पाहणें शक्य नव्हतें आणि म्हणूनच कालचा स्पेशल कार्यक्रम आंखण्यांत आला होता.

हा प्रासाद अत्यंत भव्य असून त्याच्या आंवतींभोंवतीं विस्तृत आवार आहे. प्रासादाच्या चारी बाजूनें लाल भिंतींचा तट असून तो बराच प्राचीन आहे. या प्रासादाच्या बाहेरील रस्त्याला लाल चौक ( Red Square ) असें नांव असून राजकीय दृष्ट्या त्या रस्त्याला अत्यंत महत्त्व आहे. झारशाहींतील साऱ्या वैभवाचीं चिन्हें अद्यापि तेथें आढळून येतात. रशियांत एक गोष्ट मुख्यत्वेंकरून आमच्या लक्षांत आली व ती म्हणजे उन्मत्त सत्तेला उध्वस्त करतांना, प्राचीन वैभवाचें व संस्कृतीचें निदर्शक असें जें कांहीं असेल त्याची मात्र काळजीपूर्वक जपणूक करण्यांत आली आहे. सोव्हिएत रशियांतील मंदिरें प्रार्थनेच्या दृष्टीनें जवळ जवळ जरी ओस पडलेलीं असलीं तरी ठिक-ठिकाणीं असलेले हे प्राचीन शिल्पकलेचे व वास्तुकलेचे नमुने अत्यंत

काळजीपूर्वक रक्षिले जात आहेत. क्रेमलिनच्या आवारांत झारशाहींतील चार देवळें आम्हीं पाहिलीं. झार, त्याची पत्नी, मुलें व इतर कुटुंबियांचीं तीं प्रार्थनामंदिरें म्हणजे क्रेमलिनचें वैभव आहे. क्रेमलिनचा बराचसा भाग सरकारी दप्तरें ठेवण्यास व सरकारी कचेरी म्हणून उपयोगांत आणला जातो. कांहीं दालनांचा वस्तुसंग्रहालयासाठीं उपयोग करण्यांत आला आहे.

आम्ही जेव्हां क्रेमलिन पाहावयास गेलों तेव्हां सारें आवार ट्युलिपच्या रंगीबेरंगी फुलांनीं बहरून गेलें होतें. या आवारांत प्रवेश केल्यानंतर प्रथमदर्शनीं एक मोठी तोफ व एका लहानशा टेकडीच्या आकाराएवढी असलेली एक प्रचंड घंटा दिसून येतात. एवढी मोठी घंटा आम्हीं केव्हांच पाहिली नव्हती. या नारो शंकराच्या घंटेचा एक कोपरा तुटला आहे. हे दोन प्राचीन अवशेष क्रेमलिनच्या अद्‌भुतरम्यतेंत अधिकच भर घालतात.

आम्ही येथील वस्तुसंग्रहालय पाहण्यास अत्यंत उत्सुक झालों होतों व म्हणून हा सर्व भाग जरा घाईनेंच पाहून आम्ही पहिल्या मजल्यावरील दालनांत गेलों. रशियांत आम्ही ठिकठिकाणचीं जीं पदार्थसंग्रहालयें व ‘ चित्रसंग्रह ’ पाहिले त्या मानानें क्रेमलिनमधील हा संग्रह छोटा आहे. परंतु या देशाचें सारें पुरातन वैभव आम्हांला तेथें आढळलें. तऱ्हतऱ्हेचीं रत्नें, नाणीं, अलंकार, वस्त्रें, भांडींकुंडीं, रथ वगैरे अनेक प्रेक्षणीय वस्तूंचा तो संग्रह पाहून झारच्या वैभवाची आम्हांला खरी कल्पना आली. याखेरीज ठिकठिकाणच्या मंदिरांतील ( Church ) सांठवून ठेवलेलें जवाहीर पण येथेंच आणून ठेवलें आहे. केवळ धर्माच्या नांवाखालीं जमवून, कुठल्याहि प्रकारें उपयोग न करतां संचित केलेला तो द्रव्यसंग्रह पाहिला कीं मनांत सात्त्विक संताप उत्पन्न होतो. याखेरीज तऱ्हतऱ्हेच्या कलेचे अत्यंत रमणीय व रम्य नमुने आम्हीं येथें पाहिले. या सर्वांचे फोटो आम्हीं घेतले आहेत. ते पाहिल्यानंतर या वैभवागाराची तुला खरी कल्पना येईल.

त्यानंतर झारचीं शयनगृहें, बैठकीच्या खोल्या वगैरे पाहून झाल्यावर तळमजल्यावर असलेल्या सोव्हिएत रशियाच्या ‘ सुप्रीम सोव्हिएत ’च्या भव्य दालनाकडे आम्ही वळलों.

कांहीं महिन्यांपूर्वी लंडनला असतांना पार्लमेंट हाऊसमध्यें मी गेलें होतें,

त्या वेळीं श्री. अॅटली भाषण करीत होते. मधून मधून त्यांच्या कांहीं वाक्यां-मुळें सारें सभागृह टाळ्यांच्या गजरांत निनादून जाई. सुप्रीम सोव्हिएत पाहिल्यावर माझें मन न कळतच इंग्लंडच्या पार्लमेंट हाऊसबरोबर त्याची तुलना करूं लागलें. सुप्रीम सोव्हिएतमध्यें अर्थात् शुकशुकाट होता. सगळें सभागृह रिकामें होतें. तथापि त्या निःस्तब्धतेंतच एक प्रकारचा गूढ अर्थ प्रतीत होत होता असें मनाला वाटूं लागलें. येथें कितीतरी प्रकारचीं राजकारणें शिजलीं असतील, कित्येक उलाढालींच्या आराखड्यांचा उगम येथेंच होत असेल असें वाटून या सभागृहाचें वातावरण मला अद्भुत वाटूं लागलें आणि तेथल्या रिकाम्या खुर्च्यांवर बसून आम्ही अभावितपणेंच त्या अद्भुतरम्यतेचा अनुभव घेऊं लागलों.

इंग्लंडचें पार्लमेंट हाऊस, सुप्रीम सोव्हिएतपेक्षां कितीतरी पटीनें भव्य व विस्तृत असून तें प्राचीन असल्यामुळें त्याचा डौलदारपणा व घाट वेगळाच वाटतो. सुप्रीम सोव्हिएतचें सभागृह आधुनिक असून ती आधुनिकता क्षणो-क्षणीं प्रत्ययाला येते. विशेषतः क्रेमलिन राजवाड्याच्या प्राचीन पार्श्वभूमीमुळें तर हें नाविन्य अधिकच जाणवतें. सद्यःकालांतील सोव्हिएत रशियांत सार्वत्रिक आढळणारा सारा ऐषआराम व रुबाब या सभागृहामध्येंहि पाहावयास मिळतो.

क्रेमलिनचें तें सारें नवें जुनें वैभव पाहून बाहेर पडल्यावर 'अलिबाबा चाळीस चोर' या गोष्टींतील अलिबाबानें पाहिलेल्या गुहेची आम्हांला आठवण झाली. या गुहेंत प्रवेश करणें पण तितकेंच कठीण आहे, नाहीं का?

काल दुपारीं येथील प्रसिद्ध स्टेट सेंट्रल पपेट थिएटरमध्यें एक पपेट शो पाहावयास गेलों. या पपेट गृहाचे सर्व अधिकार मि. सरगेयी ऑब्रेस्टॉव्ह (Mr. Sergei Obraztsov) यांच्याकडे असून त्यांनीं निरनिराळ्या चाळीस देशांत आपली पपेट घेऊन प्रवास केलेला आहे. त्यांच्या साऱ्या पपेट जगप्रसिद्ध आहेत. ह्या थिएटरमध्यें कलावंत, मूर्तिकार व गायक वगैरे मिळून हजारों मंडळी काम करतात. गेलीं तीस वर्षें श्री. ऑब्रेस्टॉव्ह हें थिएटर चालवीत आहेत.

स्टेजवर काम करणाऱ्या मंडळींचे दोन प्रकार आहेत. स्टेजवर नाचणाऱ्या बाहुल्या व त्यांना नाचविणारे, त्यांचीं भाषणें म्हणणारे व त्यांच्या बदली

गाणारे कलावंत. परंतु नाट्यगृहांत बसलेल्या प्रेक्षकांना मात्र या सजीव कलावंतांची चुकूनसुद्धां जाणीव होत नाहीं. इतर देशांत या बाहुल्या त्यांच्या डोक्याला बांधलेल्या सूक्ष्म दोऱ्यांच्या साहाय्यानें नाचविल्या जातात. परंतु येथें त्यांच्या पायांच्या बाजूनेंच त्यांच्या हालचाली करविल्या जातात हें एक वैशिष्ट्य आहे.

दुपारीं या थिएटरमध्यें लहान मुलांसाठीं खास प्रयोग होतात. मैत्री, भलाई, आज्ञाधारकपणा, कर्तव्यतत्परता वगैरेसारख्या गुणांचा उत्कर्ष साधलेल्या परीकथा या पपेटच्या साहाय्यानें जेव्हां येथें दाखविल्या जातात तेव्हां हे छोटे प्रेक्षक समोरील प्रयोगाबरोबर अगदीं तन्मय झालेले दिसतात. तसेंच ज्या वेळीं अस्वलें, माकडें, निरनिराळे पक्षी त्यांच्यासमोर नाचूं गाऊं लागतात तेव्हां हास्यकल्लोळानें सबंध थिएटर निनादून जातें. मग थोडा वेळ पपेट शो बंद करून मुलांना स्टेजवर बोलवितात व थोड्या वेळापूर्वीं पाहिलेल्या दृश्यांचीं त्यांतील कांहीं मुलें हुबेहुब नक्कल करतात.

आतांपर्यंत या थिएटरनें लहान मुलांसाठीं ३२, प्रौढांसाठीं ११ नाटकें पुढें आणलीं आहेत व तीं अत्यंत लोकप्रिय झालीं आहेत. आम्हीं स्पेरन्स्कीनें लिहिलेल्या Fairest Fair नांवाच्या नाटकावर आधारलेला पपेट शो पाहिला व तो आम्हांला अतिशय आवडला. ही पण एक परीकथाच आहे. एका देशाच्या राजाराणीला आपल्या मुलाच्या विवाहाची चिंता लागलेली असते. त्याला अनेक उपवर राजकन्या सांगून येतात. परंतु त्यांना तो नापसंत करून एका राक्षसानें बंदिस्त करून ठेवलेल्या राजकन्येच्या शोधार्थ जातो. रस्त्यावर अनेक संकटांना तोंड देऊन शेवटीं तें ठिकाण तो शोधून काढतो, त्या राक्षसाला क्लृप्तीनें ठार करतो व त्या राजकन्येला सोडवून तिच्याबरोबर लग्न करतो.

हा प्रयोग इतका सुंदर वठला कीं तो पाहण्यांत आम्ही अगदीं तन्मय झालों होतों. खेळ संपल्यानंतर आम्हांला सर्व स्टुडिओ दाखविला. तेथील तीं असंख्य चित्रविचित्र बाहुलीं पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें.

मि. ऑब्रेस्टॉव्ह व त्यांच्या पत्नी हीं उभयतां आम्हांला तेथें भेटलीं. त्यांनीं इतर मंडळींबरोबर आमचा परिचय करून दिला. मि. ऑब्रेस्टॉव्ह हे जातिवंत कलावंत आहेत. त्यांच्या पत्नी या पण आपल्या पतीला शोभेशा

आहेत. त्या उत्तम प्रकारें पियानो वाजवितात. प्रत्येक प्रयोगाच्या वेळीं पियानो वाजविण्याचें काम त्याच करतात.

त्या उभयतांकडे सायंकाळीं आम्हांला चहापार्टीचें आमंत्रण होतें. एका कलावंताचें घर पाहावयास मिळणार या जाणिवेनें आम्हांला खूपच आनंद झाला होता. त्यांच्या घराचें वर्णन मी माझ्या पुढील पत्रांत करीन.

सध्यां अधिक कांहींच नाहीं. कळावें.

तुझी
सौ. चारुशीला

---

## पत्र चोविसावें

हॉटेल मॉस्को
दिनांक २७ मे १९५४

प्रिय शांता,

इथें आम्हांला काल एक अतिशय महत्त्वाचें काम करावयाचें होतें. आमच्यापैकीं बऱ्याच जणींना येथून हिंदुस्थानांत परत जाण्यापूर्वी कांहीं युरोपीय देशांना भेटी द्यावयाच्या होत्या व त्यासाठीं कांहीं वकिलातींत जाऊन त्याबद्दल ' व्हिसा ' घ्यावयाचे होते. नेहमींप्रमाणें आमच्या दुभाषिणी आमच्याबरोबर येतील अशी आमची कल्पना होती. परंतु त्यांनीं आमच्याबरोबर येण्यास सौजन्यपूर्वक नकार दिला. ही मंडळी कुठल्याच वकिलातींत येण्यास तयार नसतात असें दिसतें; कारण दोन तीन वेळां आपल्या वकिलातींत आम्ही जेव्हां गेलों तेव्हांहि आमच्याबरोबर त्या आल्या नव्हत्या.

शेवटीं आम्ही पांचजणी मोटारींतून निघालों. प्रथम आम्हांला ' झेक '

वकिलातींत जावयाचें होतें. ड्रायव्हरलाहि इंग्रजी येत नव्हतें. परंतु त्याला कुठें जावयाचें आहे याची आगाऊ सूचना मिळाली असल्यामुळें त्यानें निमूटपणें आमची गाडी 'झेक' वकिलातीच्या इमारतीसमोर आणून उभी केली. आम्ही आंत गेलों तेव्हां कचेरींत एक मध्यम वयस्क तिरसट वृत्तीचा झेक गृहस्थ व एक तरुण टायपिस्ट एवढीच मंडळी तेथें आम्हांला दिसली. त्यांना अभिवादन करून आम्ही आमचे पासपोर्ट बाहेर काढूं लागलों. परंतु भाषेच्या अभावीं मोठीच अडचण निर्माण झाली! शेवटीं पासपोर्ट दाखवून खुणेनें कसें तरी आमचें मनोगत आम्हीं त्याला समजावून सांगितलें व आमचे 'व्हिसा' तयार करण्याचें काम सुरू झालें! परंतु आम्ही सुटकेचा निःश्वास टाकतों न टाकतों तोंच दुसरें संकट दत्त म्हणून पुढें उभें राहिलें. श्रीमती शीला यांचा पासपोर्ट वेगवेगळ्या 'व्हिसा'नीं एवढा भरून गेला होता कीं, आतां नवीन व्हिसा लिहिण्यास त्यांत एकहि रिकामें पृष्ठ शिल्लक नव्हतें. तो गृहस्थ तर इतका कांहीं हटवादी कीं विचारूंच नकोस! शेवटीं शीलानें आपल्या वकिलातींत फोन केला व तेथून पिल्ले यांनीं एक कारकून आमच्या मदतीसाठीं पाठविला व मग झेक मनुष्यानें एका स्वतंत्र कागदावर तो व्हिसा लिहून शीलाच्या पासपोर्टवर चिकटविला.

इथलं हें काम आटोपल्यावर मी, अलोका व शांता अशा आम्ही तिघी-जणी डॅनिश व इटालियन वकिलातींत जावयास निघालों. कारण आम्हां तिघींनाच फक्त हे व्हिसा घ्यावयाचे होते. बाकीच्यांना हॉटेलांत सोडून आम्ही डॅनिश वकिलातींत गेलों. तेथें अर्थात् कांहींच अडचण न येतां आमचें ताबडतोब काम झालें. कारण बहुतेक सगळ्या डॅनिश लोकांना इंग्रजी बऱ्यापैकीं येतें. झेक वकिलातींत आमचा फारच वेळ मोडला असल्यामुळें व दुपारच्या जेवणाची वेळ जवळ आली असल्यामुळें इटालियन वकिलातींतील काम पूर्ण होतें किंवा नाहीं याची मला चिंता पडली होती; व शेवटीं तसेंच झालें! इटालियन वकिलातीची कचेरी उघडी होती, पण 'लंच टाईम' असल्यामुळें दोन वाजेपर्यंत कामकाज तहकूब होतें. दुपारीं परत तेथें येऊन काम करून घ्यायचें म्हणजे एका महत्त्वाच्या कार्यक्रमाला मुकावें लागेल या विचारानें मला अतिशय वाईट वाटूं लागलें. कारण दुपारीं

तीन वाजतां आम्हांला सुविख्यात रशियन लेखक टॉलस्टॉय याचें मॉस्कोंतील निवासस्थान व त्याचा म्युझियम पहावयास जावयाचें होतें. दुपारीं दोन वाजतां इटालियन वकिलातींत यावयाचें म्हटलें म्हणजे यापैकीं निदान एका तरी कार्यक्रमास मुकावें लागणारच होतें. पण त्याला कांहीं इलाज नव्हता ! आम्हांला ‘ व्हिसा ’ घेणें तर भागच होतें !

दुपारीं बरोबर दोन वाजतां आम्ही तिघी पुन्हां इटालियन वकिलातींत गेलों. प्रवेशद्वारावरील बेल दाबल्याबरोबर एक जाडगेलासा इटालियन नौकर पुढें आला. त्यानें दार उघडून आम्हांला आंत घेतलें व दुसऱ्या एका कारकुनाकडे नेलें. या दोघांनाहि इंग्रजी येत नसल्यामुळें इथें एक खूप गंमतीदार प्रकार घडला म्हणून हें सर्व सविस्तर तुला लिहीत आहें. या कारकुनास शक्य तोंवर समजावें या रीतीनें आमच्या ‘ व्हिसा ’संबंधीं आम्हीं सांगितलें. त्यानें पण मान डोलावून आपल्याला सर्व कांहीं समजलें असा आव आणला व आम्हांला घेऊन तो जिन्यावर जिने खालीं उतरूं लागला. वकिलातीचे ऑफिसर या इमारतीच्या तळघरांत आहेत कीं काय असें आश्चर्य करीत आम्ही पण एक एक पायरी त्याच्याबरोबर उतरूं लागलों. शेवटीं त्यानें आम्हांला न्हाणीघरासमोर नेऊन उभें केलें. आमची हंसतां हंसतां मुरकुंडी उडाली ! आम्हांला तेथें जावयाचें आहे असा त्याचा समज कां झाला कुणास ठाऊक ! सरतेशेवटीं वारंवार येणाऱ्या हास्याच्या उकळ्या मोठ्या प्रयासानें आंवरून आम्हीं पुन्हां एकवार पासपोर्ट बाहेर काढले व त्यावर लिहिण्याचा आविर्भाव केला तेव्हां कुठें त्याच्या डोक्यांत प्रकाश पडला व वरच्या मजल्यावरील ऑफिसांत तो आम्हांला घेऊन गेला. खरो-खरच शांता, युरोपांत प्रवासाला जावयाचें म्हणजे फ्रेंच भाषा अवश्य यावयास हवी. युरोपांतील बहुतेक देशांत इंग्रजीपेक्षांसुद्धां ती अधिक बोलली जाते. मी तर मनाशीं एक पक्का निश्चय केला आहे कीं, तेथें परत आल्या-वर कसेंहि करून व वेळांत वेळ काढून फ्रेंच भाषेचा अभ्यास करावयाचाच !

इटालियन परवान्याचें काम झाल्यावर आम्ही परत हॉटेलांत गेलों व तेथून टॉलस्टॉयच्या म्युझियमकडे वळलों. तुझ्यासारख्या लेखिकेला तेथें आम्हीं काय काय पाहिलें असावें हें जाणून घेण्याची प्रबळ इच्छा होईल; पण

त्यासंबंधींची हकीगत मी माझ्या नंतरच्या पत्रांत लिहिणार आहें. या पत्रांतून मी माझ्या मागील पत्रांत ज्यांचा निर्देश केला होता त्या मि. सरगेयी ऑब्रेस्टॉव्ह यांच्या घराचें वर्णन मी तुला आज लिहिणार आहें. तें तुला बरेंच मनोरंजक वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

सोव्हिएत रशियासंबंधीं चर्चा करतांना नेहमींच एक मुद्दा प्रामुख्यानें पुढें मांडला जातो कीं, तेथील सामुदायिक जीवनाची खूपच प्रगति झाली आहे; पण खासगी सुखदुःखाला व्यापक समाजहिताची मुरड घातल्यामुळें तेथील व्यक्तिगत जीवनाचा व पर्यायानें कौटुंबिक जीवनाचा संकोच झालेला असावा. खरें कीं खोटें तें आम्हांला प्रत्यक्ष पाहण्याची संधि मिळणार म्हणून अतिशय आनंद झाला व मि. ऑब्रेस्टॉव्ह यांचें आमंत्रण आलें ती गोष्ट इष्टच झाली आहे असें वाटूं लागलें. आम्हांला काल एका डॉक्टरांच्या घरींहि बोलावलें होतें. त्यामुळें आमच्यापैकीं कांहींजणी तेथें गेल्या व श्रीमती कमलादेवी, मी व आणखी तिघी चौघीजणींनीं मि. ऑब्रेस्टॉव्ह यांच्या घरींच जायच ठरविलें.

बरोबर सहाच्या ठोक्याला आमच्या मोटारी त्यांच्या घरासमोर उभ्या राहिल्या. आम्ही जिना चढून वर गेलों. दरवाजांत आमच्या स्वागतासाठीं उभयता ऑब्रेस्टॉव्ह पतिपत्नी उभीं होतीं. आम्हांला पाहून अत्यंत हर्षानें त्यांनीं आमच्याबरोबर हस्तांदोलन केलें आणि आम्हांला सन्मान-पूर्वक आंत नेलें. मि. ऑब्रेस्टॉव्ह हे साठीच्या सुमाराचे गृहस्थ असून त्यांचें भव्य कपाळ व तीक्ष्ण अणकुचीदार नाक त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेची साक्ष पटवितात. त्यांचे डोळे घारे असून त्यांत मिस्किल विनोदाची झांक मारते, त्यामुळें त्यांच्या विनोदी व मनमोकळ्या स्वभावाची कल्पना करतां येते. 'पपेट' ( कठपुतळ्या ) करण्याचा नाद त्यांना अगदीं लहानपणा-पासून आहे. वास्तविक त्यांचें सर्व घराणें डॉक्टरांचें. आजोबा, वडील, बंधु वगैरे सर्व या व्यवसायांत पुढें आलेले. पण यांनीं मात्र वडिलांचा रोष पत्करून या कलेला स्वतःला आजन्म वाहून घेतलें आहे.

सौ. ऑब्रेस्टॉव्ह अतिशय सालस व सुस्वभावी आहेत. आपल्या पतीच्या मानानें त्या अबोल आहेत; शिवाय त्यांना इंग्रजी भाषाहि फारशी येत नाहीं. त्यामुळें आमचें संभाषण चालू असतांना मधून मधून स्मित हास्य करण्याची

कामगिरीच त्या फक्त करीत होत्या. तथापि त्या गृहिणी असल्यामुळें त्यांनीं आपलें सबंध गृहराज्य आम्हांला दाखविलें. बैठकीच्या खोलीपासून ते स्वयंपाकघरापर्यंत सर्व ठिकाणीं त्यांच्या असाधारण कलात्मकतेचा व सौंदर्य-दृष्टीचा प्रत्यय आम्हांला आला. श्री. ऑब्रेस्टॉव्हसारख्या कलावंताच्या अहोरात्र सान्निध्याचा हा परिणाम असेंच आम्हांला वाटलें. त्यांच्या पतीला त्यांच्याबद्दल अतिशय आदर व अभिमान वाटतो. आम्ही चहा घेत असतांना टेबलावर मांडलेल्या प्रत्येक पदार्थाचें ते मनसोक्त वर्णन करून आपली पत्नी हे खाद्य पदार्थ तयार करतांना किती परिश्रम घेते याची आम्हांला कल्पना करून देत होते; आणि खरोखरच श्रीमती आब्रेस्टॉव्ह यांनीं केलेले केक, पुडिंग, जेली वगैरे पदार्थ फारच उत्कृष्ट होते. आपल्या इकडील गृहिणी-प्रमाणेंच त्या प्रत्येक पदार्थ अत्यंत आग्रह करून आम्हांला खावयास घालीत होत्या.

त्यानंतर गाण्याचा कार्यक्रम सुरू झाला. स्वतः मि. ऑब्रेस्टॉव्ह उत्तम गायकहि आहेत. त्यांच्या घरीं एक रेकॉर्डिंग यंत्र असल्यामुळें गंमत म्हणून त्यांनीं आम्हांला कांहीं वाक्यें म्हणावयास सांगितलीं व त्यांचें रेकॉर्डिंग केलें. त्याचप्रमाणें आमच्यापैकीं कांहींनीं म्हटलेल्या हिंदी गाण्यांचें रेकॉर्ड घेतलें.

मि. ऑब्रेस्टॉव्ह यांचा कुत्रा लुना आमच्याजवळ आला, तेव्हां त्याला पाहून आम्हांला भीति वाटली; परंतु हा कुत्रा पण आपल्या मालकाप्रमाणें सुस्वभावी आहे, असें आम्हांला लवकरच आढळून आलें. त्याला साखरेचे तुकडे ( Cubes ) फार आवडतात व त्यासाठीं तो सलाम करून तो मिळवितो ही गंमत ! त्याचा मालक त्याला म्हणे “ Luna, beg ! ” कीं तो ताबडतोब सलाम करी. रशियांत भिकारी नाहींत असें म्हणतात; पण बिचाऱ्या जना-वरांच्या नशिबाची याचना अद्यापि गेली नाहीं म्हणावयाची !

मि. ऑब्रेस्टॉव्ह यांचें घर म्हणजे एक वस्तुसंग्रहालयच आहे. ते निरनिराळ्या चाळीस देशांत फिरून आलेले असल्यामुळें प्रत्येक देशांतून त्यांनीं अनेक विलक्षण व चित्रविचित्र वस्तू जमा केलेल्या आहेत. तुला ठाऊकच आहे कीं, मला चिमुकल्या वस्तूंचें वेड आहे. त्यामुळें त्यांच्या कपाटांतील तीं निरनिराळ्या देशांतील खेळणीं पाहून मला अत्यंत आनंद

झाला. एका कांचेच्या लहान कपाटांत असलेला माकडांचा ऑर्केस्ट्रा तर फारच मजेदार आहे. निरनिराळीं वाद्यें हातांत घेतलेल्या माकडांचा हा संघ चावी दिल्याबरोबर आपापलीं वाद्यें वाजवूं लागतो व मग संगीताचे मधुर स्वर निघूं लागतात. झाडावर बसलेला एक गाणारा पक्षी चावी दिल्याबरोबर मधुर गाणें म्हणूं लागतो व त्याच्याबरोबर कांहीं चमत्कारिक करामत साधून केलेला, त्याच्या मागील टेकडीवरून एक पाण्याचा प्रवाह वाहतो आहे असा आभास निर्माण होतो. अशा एक ना अनेक मजेदार वस्तू या कलावंतानें संग्रहित केलेल्या आहेत.

ही सर्व मजा पाहत असतांना नऊ वाजण्याचा सुमार झाला त्यामुळें आम्हांला त्यांचा निरोप घ्यावा लागला.

परत जाते वेळीं माझ्या मनांत अनेक विचार घोळूं लागले. आपल्या कलेवर निस्सीम निष्ठा असणाऱ्या त्या कलावंताबद्दल माझ्या मनांत नितांत आदरभाव निर्माण झाला. त्याचबरोबर मला असेंहि वाटूं लागलें कीं, त्यांच्या या कलाप्रेमाला श्रीमती ऑब्रेस्टॉव्ह यांच्या प्रेमसहकार्याची जोड नसती, तर हा कलेचा आविष्कार आला असता का ? रशियांतील कौटुंबिक जीवनाबद्दल इतरांच्या कांहींहि कल्पना व तर्कवितर्क असूं देत, पण मला तरी तें कुटुंब अत्यंत आनंदी व सुखी असलेलें आढळून आलें व या पतिपत्नीच्या एकतानतेंतच ऑब्रेस्टॉव्हच्या कलेचें खरें रहस्य आहे असें माझें स्पष्ट मत झालें.

अधिक काय लिहूं ?

तुझी

**सौ. चारुशीला**

# पत्र पंचविसावें

हॉटेल मॉस्को
दिनांक २७ मे १९५४

प्रिय शांता,

माझीं सर्व पत्रें तुला मिळालींच असतील. याखेरीज मीं पाठविलेलीं चित्र-पत्रें पाहून तुला त्यांत दर्शविलेलीं स्थळें पाहण्याची फारच उत्कंठा लागली असेल, नाहीं का ? माझ्या पत्रांतील वर्णनानें ती अंशतः तरी पुरी झाली असेल असें मला वाटतें. तुझ्याकडून मात्र मला फक्त दोनच पत्रें आलीं. तथापि त्याबद्दल मी तुला दोष देत नाहीं; कारण आमचें येथें एकसारखें परिभ्रमण चाललें असल्यामुळें मी कुणालाच माझ्या पत्राचें नियमित प्रत्युत्तर पाठविण्याचा आग्रह करीत नाहीं. शिवाय किसनच्या पत्रांत तुझा उल्लेख असतोच. तुझ्या पत्रांत येथील सुप्रसिद्ध वृत्तपत्र 'प्रावदा'चा तूं उल्लेख केला होतास त्या प्रावदाची कचेरी परवां आम्ही पहावयास गेलों होतों.

आपल्या टाईम्स ऑफ इंडियाच्या कचेरीच्या मानानें ही प्रावदाची कचेरी अनेक पटीनें भव्य असून तिची टोलेजंग इमारत पहाणाराच्या चटकन् डोळयांत भरते. असें म्हणतात कीं, जगांतील वृत्तपत्रांच्या सर्व कचेरींत या प्रावदाच्या कचेरीचा पहिला नंबर लागतो. प्रावदेच्या लक्षावधि प्रती रोज छापल्या जातात व त्या अंकाचा खपहि तितकाच दांडगा आहे. 'प्रावदा' खेरीज येथें Woman's World, Peasant Woman, Soviet World वगैरे अनेक मासिकें व पाक्षिकेंहि छापतात. 'प्रावदा' या रशियन शब्दाचा अर्थ 'सत्य' (Truth) असा आहे. वृत्तपत्र म्हणजे जनतेचा आवाज ! येथील जनतेला आपला आवाज उंचावून, आपलीं मतें या वृत्तपत्राच्या द्वारें स्पष्टपणें उच्चारितां येतात हा अर्थ या नांवांत अभिप्रेत आहे. तथापि सरकारी मालकी असलेल्या या वृत्तपत्राच्या द्वारें हें कार्य प्रामाणिकपणें होत असेल का असा एक विचार आपल्या मनाला स्पर्श करून जातो. येथील मंडळीं-बरोबर कांहीं विषयांची चर्चा करतांना हा प्रश्न आम्हीं जेव्हां त्यांना विचारला तेव्हां त्यांनीं आम्हांला असें सांगितलें कीं, प्रावदेंतून प्रामाणिकपणें

सत्याचा पुरस्कार केला जातोच, शिवाय सोव्हिएत सरकार जनतेच्या हित-संबंधांची इतकी कांहीं जपणूक करीत आहे कीं, असे विरोधाचे प्रसंग सहसा येतच नाहींत. हें उत्तर ऐकून प्रावदेच्या १९५० च्या जानेवारी ५ व मार्च २१ च्या अंकांतील काळा बाजार व लांचलुचपत या बाबतींत उल्लेख आले होते व ज्यांचा परामर्ष आपल्याकडील वृत्तपत्रांनीं घेतला होता त्याची आठवण झाली.

प्रावदेच्या कार्यालयांत अनेक खातीं आहेत. त्या तांत्रिक खात्यांसंबंधीं अधिक लिहिण्यासारखें नाहीं. सगळीकडे आम्हांला प्रचंड सामुग्री व अजस्र यंत्रें दिसून आलीं. परंतु येथील एक खातें आम्हांस उल्लेखनीय वाटलें व तें म्हणजे लेखनखातें. येथें वार्ताहर व वेगवेगळ्या तऱ्हेचे लेखन करणारे लेखक एकत्रित जमून विचारविनिमय करतात व मग प्रावदेच्या तर्फे कांहीं 'उपयुक्त प्रकाशन' करण्यांत येतें.

या वृत्तपत्राच्या नियामक बोर्डावर तीनचतुर्थांश स्त्रियाच आहेत हें एक वैशिष्ट्य म्हणावयास हवें! सर्व विभाग पाहून झाल्यानंतर शेवटीं एका मोठ्या विस्तृत दालनांत आम्हांला चहापार्टी देण्यांत आली. त्या वेळीं तेथें अनेक सोव्हिएत लेखक, लेखिका व वार्ताहर मंडळी आली होती. त्यांनीं आम्हांला भारतीय लेखक व भारतांतील वृत्तपत्र संस्था यावर अनेक प्रश्न विचारले.

आतांपर्यंत रशियांतील अनेक स्त्रियांशीं आमचा परिचय झाला आहे. इतकेंच नव्हे तर त्यांचें दैनंदिन जीवन जवळून पाहण्याची एखाद दुसरी संधीहि आम्हांला मिळाली आहे. परंतु येथील महिला संघटना कशा तऱ्हेनें कार्यभाग करते हें जाणून घेण्याविषयीं आम्ही फार उत्सुक होतों; आणि म्हणूनच जेव्हां येथील सुप्रसिद्ध महिलासंस्था 'फॅसिस्ट विरोधक सोव्हिएत स्त्री मंडळ' (Anti Fascist Soviet Women's Association) या संस्थे-कडून आम्हांला आमंत्रण आलें तेव्हां आम्हांला अत्यंत आनंद झाला.

कांहीं महिन्यांपूर्वी मी जिनिव्हा येथें 'आंतरराष्ट्रीय लोकशाही महिला संघटना' या युरोपांतील संस्थेच्या कार्यकारिणीला हजर होतें. त्या वेळीं या सोव्हिएत स्त्रीमंडळांतील बऱ्याच स्त्रियांचा व माझा परिचय झाला होताच.

विशेषतः या संघटनेच्या कर्तबगार अध्यक्ष श्रीमती नीना पोपॉव्हा यांची भेट घ्यावयास मी फार उत्सुक होतें. परंतु त्या कांहीं कामासाठीं मॉस्कोबाहेर गेल्या आहेत हें ऐकून माझी फारच निराशा झाली.

या संस्थेच्या कार्यालयांत आम्ही रात्रीं नऊ वाजतां गेलों. प्रवेशद्वाराजवळ संस्थेच्या उपाध्यक्ष श्रीमती नादिया परफ्युनोव्हा आम्हांला भेटल्या. त्यांनीं आमचें हार्दिक स्वागत केलें व आम्हांला संस्थेच्या कार्यालयांत नेलें. जिनिव्हा येथें मला भेटलेल्या एक दोन भगिनीहि तेथें होत्या. मला पाहून त्यांनीं अत्यंत हर्षभरानें माझ्याशीं हस्तांदोलन केलें व मग आम्ही बऱ्याच विषयांवर बोलत राहिलों. खरोखर एकदां झालेली ओळख कालत्रयीं विसरावयाची नाहीं हा युरोपियन लोकांचा स्वभावविशेष आपण शिकून घेतला पाहिजे.

ही संस्था स्त्रिया व बालकें यांचें जीवन संरक्षित व समृद्ध करण्यासाठीं अतोनात प्रयत्न करते. त्याचप्रमाणें जगांत साम्राज्यवादी राष्ट्रांकडून निर्माण होणाऱ्या विध्वंसक शस्त्रास्त्रसंभाराच्या वाढीचा निषेध करून जागतिक शांततेचा प्रचार करीत आहे. अर्थात् या संस्थेचें कार्य प्रत्यक्ष पाहावयास आम्हांला मिळालें नाहीं; परंतु या भगिनींनीं आम्हांला येथें जी साद्यंत माहिती दिली, त्यावरून ही संस्था खरोखरीच कांहीं तरी उपयुक्त व भरींव स्वरूपाचें कार्य करीत आहे याची जाणीव आम्हांला झाली. इतकेंच नव्हे तर आपल्या-कडील स्त्रीसंस्थांना या संस्थेकडून बरेंच शिकण्यासारखें आहे असाहि एक विचार माझ्या मनांत आला. एवढें मात्र खरें कीं, समाजकार्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या अशा संस्था राजकारणापासून अलिप्त असाव्यात. परंतु सध्यां पाश्चात्य देशांतील लोकांचें जीवन व राजकारण यांची इतकी एकरूपता झालेली आहे कीं, कोणतीच अशी संस्था राजकारणापासून अलिप्त राहूं शकत नाहीं.

रशियांत पाऊल ठेवल्यापासून टॉलस्टॉयचें निवासस्थान पाहण्यास आमच्या-पैकीं बऱ्याचजणी अधीर झाल्या होत्या. वास्तविक मॉस्कोपासून बऱ्याच अंतरावर असणाऱ्या टॉलस्टॉयची इस्टेट व वडिलार्जित घर ‘ यासनाया पॉलीयाना ’ आम्हांला पहावयाचें होतें. परंतु त्यासाठीं एक दोन दिवस

मोडतील असें जेव्हां आम्हांला कळलें तेव्हां तो विचार रद्द करावा लागला व मॉस्कोमध्यें असलेलें त्यांचें घर व वस्तुसंग्रहालय पाहण्याचें आम्हीं ठरविलें.

काऊंट टॉलस्टॉय या रशियन लेखकाचें जीवन अत्यंत रोमांचकारी व विविध प्रकारच्या अनुभूतीनें समृद्ध झालेलें होतें, याचें प्रत्यंतर त्याचें घर व वस्तुसंग्रहालय पाहतांना आलें. सरदार घराण्यांतील असल्यामुळें श्रीमंतीच्या अनुषंगानें लाभणाऱ्या उन्मादक अनुभवांतूनच पुढें चिंतनशील टॉलस्टॉय कसा पुढें आला याचें प्रत्यक्ष चित्र या निवासस्थानांतील त्याच्या अनेक स्मृतिचिन्हांतून पहावयास मिळतें.

टॉलस्टॉयचें निवासस्थान छोटेसें असून त्याच्याभोंवतीं एक छोटासा बगीचा आहे. या निवासस्थानांतील त्याची अभ्यासिका, शयनगृह, भोजनगृह वगैरे सर्व आम्हीं पाहिलें. त्यानें वापरलेल्या सर्व वस्तू काळजीपूर्वक जतन करून ठेविल्या आहेत. त्याची लेखणी, टेबल, खुर्ची, पंखा, पाईप वगैरे वस्तू व्यवस्थित तऱ्हेनें मांडून ठेवलेल्या आढळतात.

वस्तुसंग्रहालयांत त्याचे सर्व ग्रंथ व त्याचीं निरनिराळ्या भाषेंत झालेलीं भाषांतरें ठेविलीं आहेत. तेथें 'ॲना कॅरेनिना' व 'युद्ध व शांती' या पुस्तकांचीं बंगाली व तामिळी भाषांतरें आहेत. तेथें टॉलस्टॉयच्या कुटुंबियांच्या तसबिरी आहेत. अत्यंत रुबाबदार दिसणाऱ्या त्याच्या मातापित्यांची एक तसबीर प्रथमदर्शनींच दिसते. या दोघांच्यावरून 'युद्ध व शांती' (War and Peace) या कादंबरींतील निकोलस रोसटॉव्ह व प्रिन्सेस मारिया हीं दोन स्वभावचित्रें या लेखकानें रंगविलीं आहेत. टॉलस्टॉयची आई मृत्यु पावल्यावर त्याचें संगोपन त्याच्या मावशीनें—ॲंट मिली हिनें—केलें. तिच्यावरील प्रेमामुळें कीं काय तिला 'सोनियाच्या' रूपानें 'युद्ध व शांती' या कादंबरींत त्यानें अजरामर केलें आहे.

वयाच्या ३४ व्या वर्षी टॉलस्टॉयनें विवाह केला. आपण फार वयस्क व ओंगळ आहोंत अशी एक भ्रामक कल्पना त्याच्यापुढें असल्यामुळें तो कुठल्याहि मुलीला मागणी घालावयास कचरत असे; पण शेवटीं सोफिया ॲंड्रीयिन या मुलीनें त्याच्या मनावर मोहिनी घातली. तो तिच्याशीं विवाहबद्ध झाला. त्याच्या वयाच्या मानानें ती खूपच लहान होती. त्यामुळें

तिच्या मनाला आपल्या इच्छेप्रमाणें घडण देणें त्याला शक्य झालें. तिच्या निस्सीम प्रेमामुळें त्याच्या जीवनाला स्थैर्य आलें. प्रीतीपेक्षां तिच्या अंतः-करणांत त्याच्याविषयीं भक्तिभाव अधिक होता असें म्हणणेंच योग्य होईल. त्याच्या लिखाणाच्या नकला करण्यापासून ती सर्व प्रकारें त्याला मदत करीत असे. War and Peace या कादंबरीच्या तिनें सात वेळां नकला लिहून काढल्या. त्या थोर लेखकाच्या जीवनप्रवाहाला योग्य दिशेनें वळण लावणाऱ्या या अद्वितीय स्त्रीचा फोटो पाहून आम्हांला अत्यंत आदर वाटला. असें सांगतात कीं, ॲना कॅरेनिना या कादंबरीची नायिका ॲना हिचें चित्रणहि टॉलस्टॉयनें आपल्या एका मित्राच्या मुलीकडे पाहून केलें. या मुलीचा फोटो पण आम्हांला दिसला.

टॉलस्टॉयच्या निवासस्थानांतून परत येतांना मला असें वाटलें कीं, आम्ही आमच्या लेखकांची किती उपेक्षा करतों! आपल्याकडील आपटे, गडकरी, बालकवि, आगरकर वगैरे अनेक युगप्रवर्तक लेखकांच्या निवासस्थानांची, त्यांच्या ग्रंथांची व त्यांनीं वापरांत आणलेल्या सर्व वस्तूंची अशी निगा ठेवली तर तीं निवासस्थानें निश्चितपणें तरुण पिढीला स्फूर्तिदायक झाल्याशिवाय राहणार नाहींत.

आतां बहुतेक रशियांतून पाठविलेलें माझें हें शेवटचेंच पत्र आहे. कारण आतां परत निघण्याच्या धांदलींत तुला पत्र लिहिण्यास सवड मिळेल किंवा नाहीं कोण जाणे!

तुझी

सौ. चारुशीला

## पत्र सव्विसावें

हॉटेल मॉस्को
दिनांक २८ मे १९५४

प्रिय शांता,

माझें हें मॉस्कोहून पाठविलेलें आणखी एक पत्र पाहून कदाचित् तुला आश्चर्य वाटेल. कारण मी माझ्या मागील पत्रांत, मॉस्कोहून पाठविलेलें अखेरचेंच पत्र असा त्याचा उल्लेख केला होता. तें जरी खरें असलें तरीसुद्धां थोडासा अवसर मिळाल्याबरोबर येथून एखादें छोटेसें पत्र लिहिण्याचा मोह कांहीं मनाला आवरत नाहीं !

आज रात्रीं आम्ही येथून विमानानें परत येण्यासाठीं निघणार आहोंत. आमच्या शिष्टमंडळापैकीं श्रीमती कमलादेवी, श्रीमती वाडिया व आणखी दोघी हिंदुस्थानांत परत येणार आहेत. आम्ही बाकीच्या मात्र युरोपांतील निरनिराळ्या देशांत जाणार आहोंत. भारताकडे परत येणारी मंडळी व्हिएन्नाला जातील व आम्ही प्रागला जाऊन मग तेथून पुढें जाणार आहोंत. त्यामुळें आमच्या शिष्टमंडळाचे आज रात्रीं दोन निरनिराळे भाग होतील.

आज परत जावयाचें असल्यामुळें आम्हा सर्वांची सामानाची आवरा-आवर करण्याची एकच गडबड उडाली आहे. सामान आवरण्यापेक्षां तें पसरण्यांतच जास्त मौज असतें, असें तूं नेहमीं म्हणत असतेस ह्याची मला आतां आठवण झाली. कांहीं अंशीं तुझें म्हणणें खरेंहि आहे. सामान सोडतांना ज्या नवीन स्थळीं आपण गेलेलों असतों तेथील नव्या परिसरांतील अननुभूत अनुभूति घ्यावयास आपलें मन उत्कंठित झालेलें असतें. पण सामानाचा आवर घेतांना तें परिसर आपण आतां सोडून जात आहोंत याची तीव्र जाणीव मनाला तापदायक होत असते. तथापि, अशा वेळीं, विशेषतः आपला मायदेश सोडून जेव्हां आपण हजारों मैल दूर जातों तेव्हां आपल्या नेहमींच्या परिचित वातावरणाच्या व व्यक्तींच्या पुनर्भेटीच्या कल्पनेचा आनंद या हुरहुरींत गोडवा निर्माण करतो असें मला नेहमींच वाटतें.

मानवी स्वभावाचे बहुविध नमुने आमच्या या प्रवासांत मला पहावयास मिळाले. मानवी स्वभावांत हें वैचित्र्य जरी असलें तरीसुद्धां पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि पहा, त्याचे स्थायीभाव सारखेच असतात. आतांच बघ ना! आमच्या दिमतीस दिलेली ही आमची मोलकरीण ( Maid ) मी व पौर्णिमा आज जाणार म्हणून ओक्साबोक्सीं रडत आहे. आपल्याकडे असेंच दृश्य दिसतें, नाहीं का? या आमच्या ॲनाचें, माझ्या मागील एका पत्रांत एक ओझरतें स्वभावचित्र मीं रेखाटलें होतें तें तुझ्या स्मरणांत असेलच. खरोखरीच तिच्याइतकी कष्टाळू व कामसू बाई फारच क्वचित् पहावयास मिळते. इतक्या वृद्ध वयांत तिला हे कष्ट उपसतांना पाहून मला आपल्याकडील खेडेगांवांतील, जुन्या पिढींतील कष्टाळू वृद्ध बायांची आठवण होते. सबंध दिवसभर हिची आपली हालचाल चालूच असते. आज तिच्या साऱ्या भावना उफाळून आल्या आहेत. मात्र भाषा येत नसल्यामुळें त्या भावनांना ती व्यक्त स्वरूप देऊं शकत नाहीं. साराच खुणांचा कारभार! अगदीं मुक्या माणसासारखें इथें कधीं कधीं करावें लागतें.

मुक्या माणसाच्या या उल्लेखानें मला आम्हीं येथें पाहिलेल्या बहिऱ्यांच्या शाळेची आठवण झाली. येथें इतक्या अनंत गोष्टी पाहिल्या कीं, तुला पत्र लिहीत असतांना अभावितपणेंच एखादी संस्था अगर स्थळ चटकन् निसटून जातें व त्यासंबंधीं लिहावयाचें तसेंच राहून मागाहून माझ्या मनांत एक प्रकारची चुटपुट लागते.

मीं आंधळ्यांच्या शाळा बऱ्याच पाहिल्या आहेत. लहानपणीं एकदां एक मुक्यांची संस्था पाहण्याचाहि योग आला होता. त्या वेळीं त्या बिचाऱ्या मुक्यांची, विचारांना, शब्दांना व्यक्त स्वरूप देण्याची जी केविलवाणी धडपड चालली होती ती पाहून माझ्या मनाला अत्यंत क्लेश झाले होते. पण बहिऱ्यांना कशा तऱ्हेनें शिकवितात हें पाहण्याचा कांहीं अद्यापि योग आला नव्हता, तो या देशांत आला.

आम्हीं पाहिलेली संस्था बरीच मोठी होती. सध्यां येथें ६५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांचे एकंदर ५४ वर्ग असून त्यांच्यासाठीं ९८ शिक्षक नेमलेले आहेत. याखेरीज कामगारांसाठीं एका स्वतंत्र वर्गाचीहि

योजना करण्यांत आली आहे. येथें मुलें व मुली एकत्रित शिक्षण घेतात. दुय्यम शिक्षणाचा इतरत्र पुरा होणारा १० वर्षांचा कोर्स येथें १२ वर्षांत पुरा केला जातो. इतर शाळांप्रमाणेंच दरवर्षी सुमारें येथील ३९० मुलांचा पायोनियर कॅंप उन्हाळ्याच्या सुटींत कुठें तरी मोकळ्या वातावरणांत नेण्यांत येतो. प्रत्येक मुलामागें या संस्थेंत ६०० रूबल्स खर्च येतो. त्यापैकीं ७ रूबल्सपासून १८० रूबल्सपर्यंत पालक खर्च करतात व बाकीचा खर्च ट्रेड युनियन करते. अनाथ मुलांसाठीं व दूर अंतरावर येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं ७५ मुलें राहूं शकतील एवढें एक वसतिगृह आहे. त्यांत सध्यां २५ अनाथ बालकें राहात आहेत. सध्यां सरकारकडून २०० मुलांना राहण्यास पुरेल एवढें मोठें एक वसतिगृह बांधलें जात आहे. तें मार्च अखेरीपर्यंत पूर्ण होईल असा अंदाज आहे. या शाळेंत शिक्षणक्रम पुरा करून नंतर उच्च शिक्षण घेतलेले असे अनेक पदवीधर निरनिराळ्या क्षेत्रांत सध्यां काम करीत आहेत. उच्च शिक्षणासाठीं त्यांना सरकारकडून ५०% स्टायपेंड मिळतें. या विद्यार्थ्यांना विश्वविद्यालयांतील बौद्धिकें ऐकणें व लक्षांत घेणें अत्यंत जड जातें. अशा वेळीं इतर विद्यार्थी या बहिऱ्या विद्यार्थ्यांना मदत करतात हें लक्षांत घेण्यासारखें आहे. बॉंबच्या आवाजानें ज्याचें कर्णेंद्रिय बधिर झालें अशा एका विद्यार्थ्याचा फोटो आम्हीं पाहिला. त्यानें नुकतीच शास्त्राची पदवी घेतली असून प्राविण्याबद्दल त्यानें सुवर्णपदक मिळविलें आहे. मात्र सगळेच विद्यार्थी उच्च शिक्षणासाठीं विद्यापीठांत जात नाहींत. येथें धंदे-शिक्षणहि देतात. त्यांत तज्ज्ञ होऊन त्यांना आपला चरितार्थ चांगल्या प्रकारें चालवितां येतो.

या संस्थेंतील सर्वच विद्यार्थी निरोगी व आनंदी आहेत. त्यांना नृत्याची खूपच आवड दिसते. त्यांच्यासाठीं २ नाट्यगृहें व १२ सिनेमागृहें बांधलीं आहेत. त्यांत त्यांचें बहिरेपण लक्षांत घेऊन कांहीं नवीन यंत्रयोजना केल्या असल्यामुळें त्यांना त्यांच्या समोर होणारा कार्यक्रम सहज ऐकणें शक्य होतें. नवीन बांधल्या जाणाऱ्या इमारतींत तर अनेक आश्चर्यकारक साधनें पुरविण्यांत येणार आहेत. या दुर्दैवी मुलांना जेवढें सुख व समाधान आम्हांला देतां येईल तेवढें आम्ही देत आहोंत असें येथील मुख्य अधिकारी आम्हांला म्हणाले.

या मुलांसाठीं केलेले खास वर्ग आम्हांला अत्यंत नमुनेदार आढळले. व्यासपीठावर शिक्षकांसाठीं मायक्रोफोन असून त्याची स्वतंत्र लाईन मुलांच्या कानावर असलेल्या इअरफोनला जोडलेली असते. या कानाच्या यंत्रांतील आवाज लहानमोठा करतां येतो. हीं यंत्रें रशियांतच तयार होतात. मुलांनीं हावभावानें बोलूं नये याबद्दल अत्यंत दक्षता घेतात. या विद्यार्थ्यांसाठीं २०,००० ग्रंथ असलेलें एक ग्रंथालयहि येथें आहे. या ग्रंथालयांत अद्ययावत् नवीन ग्रंथ असून तेथें नामवंत लेखकांचे फोटो भिंतीवरून लटकविलेले दिसले. याखेरीज वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल, इतिहास वगैरे विषय, गायन, नृत्य, शिवण, चित्र वगैरेसारख्या कला यांचें येथें शिक्षण दिलें जातें. बहिऱ्या मुलांसाठीं वापरण्यांत येणारी लॉगॉरीफोन व स्लूख् हीं दोन गंमतीदार पण उपयुक्त साधनें आम्हीं येथें पाहिलीं.

या विद्यार्थ्यांसाठीं शिक्षक निवडतांना अत्यंत काळजी घेतली जाते. इथें वृद्ध व तरुण शिक्षक व शिक्षिका आहेत. शिक्षकाला जेव्हां प्रथम भेटीस (Interview) बोलावितात तेव्हां त्याच्या शिक्षणशास्त्रांतील पदव्यांपेक्षां त्याच्या ओंठांवरून त्याचें महत्त्व ठरविण्यांत येतें. साधारण पातळ व सुंदर ओंठ असलेले शिक्षक–शिक्षिकाच बहिऱ्यांना शिकविण्याच्या बाबतींत अधिक यशस्वी होतात हें ऐकून मला मोठी मौज वाटली. याखेरीज शिक्षकवर्ग प्रेमळ हंसतमुख असला पाहिजे, हा दुसरा दंडक आहेच. इतर शिक्षणसंस्थेंतील शिक्षकांपेक्षां येथील शिक्षकांना २५ टक्के अधिक वेतन मिळतें. कारण बहिऱ्या मुलांना शिकविणें ही अत्यंत कष्टदायक गोष्ट आहे याची येथील मंडळींना जाणीव आहे. या शिक्षकांसाठीं या Defectalogy चा स्वतंत्र अभ्यास करण्यासाठीं खास शिक्षणकेंद्रें मॉस्को व लेनिनग्राड या ठिकाणीं आहेत.

रशियामध्यें एक वैशिष्ट्य आम्हांला आढळलें तें हें कीं, कुठलीहि शिक्षण-संस्था असो, तेथें सरकार व शिक्षक यांना पालकांकडून भरपूर प्रमाणांत सहकार्य मिळतें. आपल्याकडे बरेच पालक सामान्यतः अशा रीतीनें आपलें सहकार्य शिक्षणसंस्थेला देत नाहींत. या संस्थेंतील विद्यार्थ्यांचे पालक दर पंधरवड्यांतून एकदां शाळेला भेट देतात, तेथें शिक्षक व पालक यांच्या सभा भरून पालकांनीं आपल्या बहिऱ्या मुलांबरोबर त्यांच्या कर्णेंद्रियाचा दोष ध्यानांत घेऊन कशा तऱ्हेनें व्यवहार करावा याबद्दल व्याख्यानांच्या रूपानें

त्यांना मार्गदर्शन केलें जातें. त्यामुळें या दुर्दैवी मुलांचें जीवन शाळेप्रमाणें घरींहि स्वास्थ्यपूर्ण होण्यास मदत होते.

या संस्थेलाच जोडून मुलांचें एक बालमंदिरहि ( Kinder Garten School ) आहे. येथें या मुलांची वैद्यकीय परीक्षा घेण्यांत येते व मुलाच्या कर्णेंद्रियाच्या शक्तीचा अंदाज घेण्यांत येऊन मग त्याच्या शिक्षणाची दिशा ठरविण्यांत येते.

या संस्थेची एक प्रयोगशाळा असून तेथें लहान मुलांच्या कानांवर प्रयोग केले जातात. यांपकीं कांहीं मुलांची श्रवणशक्ति सुधारलीहि जाते. बॉम्बचा आवाज, मेंदूरोग व आनुवंशिकता या कारणांमुळें बहिरेपण प्राप्त झालेलीं अनेक मुलें येथें आहेत. बालमंदिरांतील कांहीं मुलांना स सारखे कांहीं 'वर्ण' चांगले उच्चारतां येत नाहींत, त्याबद्दलहि येथें स्वतंत्र उपाय करण्यांत येतो. या मुलांची ग्रहणशक्ति इतर मुलांप्रमाणेंच तीव्र असते. परंतु त्यांना श्रवणशक्ति नसते. लहान मुलांच्या कानांवर प्रकाशकिरणांची उपाययोजना करतात; कारण कधीं कधीं सदैव होणाऱ्या सर्दीच्या विकारापासूनहि बहिरेपणा येतो. येथल्या डायरेक्टरनें आम्हांला एक मजेदार सत्य सांगितलें कीं बरेच बहिरे आपल्या हाडांच्या द्वारें ऐकतात. प्रथम आमचा या विधानावर विश्वास बसला नाहीं, तेव्हां कान बंद करून त्यांचें श्रवणयंत्र त्यांनीं आम्हांला आमच्या कोणत्याहि हाडाला लावावयास सांगितलें व काय आश्चर्य सांगूं ! त्या यंत्राच्या हाडाला स्पर्श झाल्याबरोबर आम्हांला स्पष्ट ऐकूं येऊं लागलें.

येथल्या सर्व शिक्षणपद्धतींचा भर तालावर ( Rhythm ) देण्यांत येतो. सबंध सोव्हिएत रशियांत अशा ५० शाळा असून त्यांतील शिक्षकांसाठीं एक संशोधनकेंद्र आहे. सर्व शाळांतील शिक्षक जेव्हां या केंद्रांत एकत्रित जमतात तेव्हां बहिऱ्या मुलांच्या बाबतींत ते आपले अनुभव एकमेकांना सांगतात व त्यामुळें शिक्षकांच्या ज्ञानांत व अनुभवांत पुष्कळ भर पडते.

उझबेकिस्तानांत अशा तीन शाळा आहेत. ज्यांची श्रवणशक्ति कमी आहे अशा विद्यार्थ्यांसाठीं असलेल्या शाळा व ज्यांची श्रवणशक्ति अजीबातच नष्ट झाली आहे ( Stone Deaf ) अशा विद्यार्थ्यांसाठीं असलेल्या शाळा अशा दोन प्रकारच्या संस्था रशियांत आहेत.

या शाळेंतील मुलांचे बरेच फोटो मीं जमा केले आहेत. आपल्या इकडे अशीं बहिरीं माणसें किती तरी आढळतात. मला वाटतें दिल्ली येथें ५० विद्यार्थ्यांसाठीं एक अशी शाळा चालविण्यांत येते. परंतु आपल्या देशाचा विस्तार व लोकसंख्या लक्षांत घेतां प्रत्येक शहरांत निदान एक तरी अशी संस्था निघणें अवश्य आहे. ज्या लोकांच्या कोणत्या ना कोणत्या इंद्रियांत असे कांहींतरी दोष निर्माण होऊन, जे जगांतील आनंदाला मुकलेले आहेत अशा दुर्दैवी लोकांसाठीं अशी एखादी योजना आंखणें ही मानवतेची एक महान् सेवा आहे असें नाहीं का तुला वाटत ?

विशेष काय लिहूं ? यापुढील पत्र विमानांतूनच लिहीन.

तुझी

सौ. चारुशीला

---

## पत्र सत्ताविसावें

प्रागच्या वाटेवर

दिनांक २८ मे १९५४

प्रिय शांता,

आतां रात्रींचे २॥ वाजले आहेत. आमचें हें रशियन विमान द्रुतगतीनें झेकोस्लोव्हाकियाकडे चाललें आहे. त्यानें आम्हांला क्षणार्धांत मॉस्कोच्या विमानतळापासून किती तरी दूरवर आणलें आहे. माझ्या इतर सहप्रवासिनी गाढ निद्रासुख अनुभवीत आहेत. परंतु विमानांतून तुला एक पत्र लिहीन असें माझ्या मागील पत्रांत मीं तुला आश्वासन दिलें असल्यामुळें निद्रेच्या सुखद बाहुपाशाचा मोह टाळून हें पत्र मीं लिहावयास घेतलें आहे.

तुझ्या काव्यमय वृत्तीचें सारें कोड पुरवील असें सुरम्य दृश्य या वेळीं मला विमानाच्या झरोक्यांतून दिसतें आहे. सारें विश्व जणूं काय रात्रींच्या वात्सल्याच्या पदराआड निवांतपणें झोंपीं गेलें आहे. आजूबाजूच्या वातावरणांतून तृप्तीचे अन् शांतीचे बोल ऐकूं येत आहेत. दूरवर पसरलेल्या आकाशाच्या विशाल सीमा व त्यावर फुललेल्या नक्षत्रांच्या अबोल वेली विश्वाच्या उदात्ततेची जाणीव करून देत आहेत. मध्येंच भेटणाऱ्या एखाद्या मेघाच्या आड जाऊन चंद्र हळूंच आपली पापणी मिटून घेत आहे.

तथापि, इतकें सुंदर दृश्य समोर दिसत असूनहि माझ्या मनाला एक प्रकारची विलक्षण व अनामिक अशी हुरहुर लागली आहे हें वाचून तूं मला खात्रीनें हंसशीलहि. मला वाटतें मॉस्कोच्या विमानतळावर आम्हीं सर्व प्रतिनिधींनीं एकमेकांचा घेतलेला निरोप किंवा उद्यांपासून मला दुसऱ्या एका नव्या दुनियेंत एकटीनेंच कराव्या लागणाऱ्या प्रवासाची जाणीव यांपैकीं एखादें कारण या हुरहुरीमागें असूं शकेल.

मॉस्कोच्या विमानतळावर येण्यासाठीं आम्ही मॉस्को हॉटेलमधून आज रात्रीं १२–३० च्या सुमारास निघालों. रशियांत पाऊल टाकतांना येथील नवीन जीवनाचे निरनिराळे पैलू पहाण्यास आमचीं मनें किती उत्कंठित झालीं होतीं याचें मला सारखें स्मरण होत होतें. आज रशिया सोडून जातांना, या नव्या समाजरचनेंतील किती तरी भाग अद्यापि पहावयाचा राहिला आहे. या जाणिवेंतून होणारा खेद व पुन्हां एकवार पहाण्याची संधि मिळेलहि अशा दुबळ्या आशावादापासून निर्माण होणारा आनंद, अशा परस्परविरोधी भावना आमच्या मनांत उफाळून येत होत्या. खरोखर 'आशा' हा ईश्वरानें एक फार मोठा अनुग्रह माणसावर केला आहे व त्यामुळेंच साऱ्या आनंदाचें रहस्य अपूर्णतेंतच सामावलेलें आहे. जेथें पूर्णत्व मिळालें तेथें आनंद संपलाच !

आज येथील विमानतळावरून आमच्यासाठीं दोन खास विमानें सोडण्यांत आलीं. ज्या भगिनी भारतांत परतावयाच्या होत्या त्यांना व्हिएन्ना येथें जाऊन मग आगगाडीनें रोमला जावयाचें होतें. मी डेन्मार्कला जाणार होतें व इतरांना दुसऱ्या कांहीं देशांत जावयाचें असल्यामुळें आम्ही प्रागला जाऊन नंतर पुढें जाणार आहोंत. आमचें विमान १॥ वाजतां सुटणार होतें

व व्हिएन्नाला जाणाऱ्या मंडळींचें विमान २ वाजतां सुटावयाचें होतें. विमानतळावर आम्हांला निरोप देण्यासाठीं बरीच रशियन स्त्रीपुरुष मंडळी जमली होती. मोठमोठ्या फुलांच्या तुऱ्यांचा वेटिंग रूममध्यें खच पडत होता. याखेरीज निरनिराळीं स्मृतिचिन्हेंहि आम्हांला या वेळीं देण्यांत आलीं. आमच्या दुभाषिणींना आमच्या वियोगाचें दुःख झालेलें दिसलें. रशियन लोकांची सुखदुःखाची संस्कारक्षमता बोथटली आहे असा जो त्यांच्याविषयीं एक आक्षेप घेतला जातो त्यांत मला तरी तथ्य वाटत नाहीं. तसें पाहिलें तर सुख आणि दुःख या मानवी मनाच्या सहजात प्रवृत्ती आहेत. त्याला रशियन लोक अपवाद कसे असतील? एवढें मात्र खरें कीं, येथील लोक आपल्या भावनाक्षमतेचे फाजील चोजले करत नाहींत. आतांच पहा ना, या सगळ्या सोव्हिएत भगिनींना आम्ही जाणार म्हणून वाईट वाटत होतें. त्या दुःखाचें प्रदर्शन त्यांनीं अत्यंत संयमित रीतीनें केलें.

आमच्या विमानाची सुटावयाची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतसें आमच्या प्रतिनिधी भगिनींमध्यें एकमेकींचा निरोप घेण्याची गडबड उडाली. श्रीमती कमलादेवींनीं अत्यंत ममतेनें सर्वांची विचारपूस करून सर्वांना निरोप दिला. मी आमच्या सर्व प्रतिनिधी भगिनींच्या स्वाक्षऱ्या घेतल्या. भारतांतून निरनिराळ्या प्रांतांतून आलेल्या आम्ही सर्वजणी पुन्हां एकत्रित येऊं किंवा नाहीं हा प्रश्नच आहे. रशियांतील एक महिन्याच्या काळांत प्रांत व भाषा यांतील भिन्नता आम्ही विसरून गेलों होतों. एकमेकींच्या सहवासांत हास्य-विनोदांत आम्हीं जे सुखद क्षण घालविले त्याचें विस्मरण, मला वाटतें, आम्हांला कदापि होणार नाहीं. विमानांत बसल्यावर आपल्यापैकीं कांहीं भगिनी आपणाबरोबर आतां नाहींत या कल्पनेनें मन विषण्ण होऊन कांहींतरी चुकल्याचुकल्यासारखें वाटत होतें.

हें पत्र लिहीत असतांना मॉस्कोंतील आज पार पडलेल्या दोन कार्यक्रमांची मला आठवण झाली व त्याबद्दलच मी तुला आतां लिहिणार आहें.

आज दुपारीं ४ वाजतां मॉस्कोच्या रेडिओवरून आमचीं भाषणें ध्वनि-क्षेपित करण्यांत आलीं. आजच मॉस्को सोडावयाचें असल्यामुळें हा कार्यक्रम बराच घाईनें उरकून घ्यावा लागला; व त्यामुळें भाषणांना पांच मिनिटांपेक्षां

अधिक वेळ मिळाला नाहीं. भाषणाचा विषय अर्थात् 'आम्हीं पाहिलेलें सोव्हिएत रशियाचें जीवन' हाच होता. रशियांतील लोकांच्याविषयीं मीं माझें मत माझ्या भाषणांतून व्यक्त केलें. येथें रेडिओच्या पांच मिनिटांच्या भाषणाला १९५ रूबल्स म्हणजे सुमारें २२५ रुपये देतात. श्रीमती कमला-देवींनीं पंधरा मिनिटें भाषण करून रशियांतील सांस्कृतिक प्रगतीसंबंधींचें आपलें मत व्यक्त केलें.

आज प्रथम आम्हांला 'व्होकुस्'च्या कचेरींत एक अनौपचारिक चहा-पार्टी देण्यांत आली. त्या वेळीं त्यांतील सभासदांनीं आमच्या भेटीसंबंधीं आनंद प्रदर्शित करून, कांहीं भुलचूक झाली असल्यास विसरून जाण्यास सांगितलें. 'व्होकुस्' ही सोव्हिएत रशियाचे व इतर देशांचे सांस्कृतिक स्नेहसंबंध जोडणारी एक संस्था असून तिचे व आपल्याकडील इंडो-सोव्हिएत कल्चरल असोसिएशनचे घनिष्ठ संबंध आहेत. निरनिराळ्या देशांतून रशियाला भेट देणारीं सांस्कृतिक व अन्य शिष्टमंडळें या संस्थेच्या आमंत्रणानें येथें येतात व या संस्थेकडूनच त्यांचें आगतस्वागत प्रायः होत असतें. या संस्थेसंबंधीं माहिती मीं एका पत्रांत तुला लिहिली आहेच. भारत व रशिया या दोन देशांतील स्नेहसंबंध वाढण्यास कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे असें त्यांनीं आम्हांस विचारलें. तेव्हां आम्हीं त्यांना सांगितलें कीं, भारता-संबंधीं यापेक्षां अधिक माहिती रशियन जनतेला व्हावयास हवी. आमच्या-कडील संगीत, कला, संस्कृति यासंबंधीं वास्तव ज्ञान येथें व्हावयास हवें. आमच्याकडील माहितीपट ( Documentary Films ) येथें दाखविल्या जातील तर ही गोष्ट त्वरित साध्य होईल. त्यांनीं आम्हांला सांगितलें कीं, इंडो–सोव्हिएत कल्चरल संस्थेच्या सहकार्यानें या गोष्टी साधण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. रशियन लोकांना भारतांतील निसर्गसौंदर्य अतिशय प्रिय वाटतें. याखेरीज भारतासंबंधींच्या अद्भुतरम्य गोष्टी ऐकून त्यांना एक प्रकारचें विलक्षण कुतूहल वाटतें. मेजवानीच्या शेवटीं, आमच्यासाठीं या संस्थेनें घेतलेल्या परिश्रमांबद्दल आम्हीं त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

हा कार्यक्रम दुपारीं चार वाजतां पार पडल्यावर याच संस्थेनें आम्हांला एक सार्वजनिकरीत्या निरोप देण्याचा समारंभ घडवून आणला होता.

व्होकूस्च्या इमारतींतील दोन तीन प्रशस्त दिवाणखाने या समारंभासाठीं सुसज्जित केले होते. शहरांतील प्रमुख व प्रतिष्ठित मंडळी येथें उपस्थित होती. त्याचप्रमाणें आपल्या वकिलातींतूनहि बरीच मंडळी आली होती. श्री. मेनन मॉस्कोच्या बाहेर कांहीं कामाकरितां गेले असल्यामुळें ते या समारंभास हजर राहूं शकले नाहींत. प्रथम गायनवादनाच्या कार्यक्रमानें समारंभास सुरुवात झाली. या वेळीं काझेकिस्तानमधील एक अल्पवयी गायिका येथें आली होती. तिनें ताझेकी भाषेंतील दोन गाणीं इतक्या मधुर आवाजांत म्हटलीं कीं, आम्हांला ती भाषा अवगत नसतांनाहि आम्ही तिच्या नुसत्या आवाजाच्या मोहिनीनें भारावून गेलों. या गाण्याच्या ध्वनिमुद्रिका मीं विकत घेतल्या आहेत. त्या जेव्हां तूं ऐकशील तेव्हां माझ्या बोलण्याचा तुला प्रत्यय येईल. यानंतर श्रीमती ऑबरेस्टॉव्ह यांचें पियानो वादन झालें. त्यांचीं बोटें जेव्हां अत्यंत सफाईदारपणें सुरांवरून फिरूं लागलीं तेव्हां सारें सभागृह मंत्रमुग्ध होऊन गेले. त्या उत्तम तऱ्हेनें पियानो वाजवितात एवढें आम्हीं ऐकलें होतें. परंतु त्यांची या वाद्यासंबंधींची जी प्रगति आहे त्याचा परिचय आजच आम्हांला झाला.

त्यानंतर श्रीयुत ऑबरेस्टॉव्ह यांनीं आपल्या कठपुतळ्यांचे कांहीं कार्यक्रम करून दाखविले. त्यांच्यासंबंधीं मीं तुला सविस्तर कळविलें आहेच. त्यांच्या सर्व कठपुतळ्यांमध्यें त्यांची एक अत्यंत आवडती बाहुली आहे. तिचें नांव त्यापा ( Tyapa ) आहे. त्यापा हें एक अतिशय रडवें मूल आहे. तें अंगानें रोडकें आहे. पण त्याचा चेहरा मात्र खूप गुबगुबीत असून त्याच्या डोक्यावर एक लहानशी शेंडी आहे. या बाहुल्याला श्रीयुत ऑबरेस्टॉव्ह आपल्या बोटांत अडकवून बोटांच्या हालचालीनें नाचवितात व त्याचबरोबर त्याच्या रडण्याचे वगैरे हुबेहुब आवाज ते स्वतः काढतात. ते स्वतःकडे त्या लहान, रडक्या मुलाच्या आईची भूमिका घेतात. हें रडवें मूल झोंपीं जात नाहीं म्हणून ही आई अंगाई गीत म्हणते, त्याला दूध पाजते, हातांवर नाचविते आणि नाना प्रयत्न करते; परंतु हें गुणीबाळ कांहीं रडावयाचें थांबत नाहीं व झोंपींहि जात नाहीं. त्या वेळीं श्रीयुत ऑबरेस्टॉव्ह इतका सुंदर अभिनय करीत होते कीं, साऱ्या मंडळींची हंसून हंसून मुरकुंडी वळली. सरते शेवटीं

आई रागावते व मुलाला दोन चापट्या मारते; त्याबरोबर त्यापा रडावयाचा थांबतो व झोंपीं जातो. शेवटीं लकडीशिवाय मकडी वठणीवर येत नाहीं हेंच खरें म्हणायचें ! त्यानंतर त्यांनीं आपल्या दोन हाताच्या बोटांवर दोन चेंडू घेऊन एक प्रेमगीत म्हणावयास सुरुवात केली. या चेंडूंना त्यांनीं एका तरुण जोडप्याचें स्वरूप दिलें असून या तरुण-तरुणीनें त्यांच्या प्रेमगीतांतील नायक-नायिकेची भूमिका पार पाडली. आम्हांला हे प्रयोग अतिशय आवडले व टाळ्यांच्या गजरांत श्रीयुत ऑबरेस्टॉव्ह खालीं बसले.

त्यानंतर थाटाची मेजवानी होऊन भाषणांचे वगैरे कार्यक्रम झाले. सरते शेवटीं नृत्याचा कार्यक्रम झाला व त्यांत आम्हां सर्वांना भाग घ्यावा लागला. हें नृत्य फारच गंमतीदार होतें. प्रत्येकानें हातांत हात गुंतवून सर्व मंडळीची एक लांबलचक सांखळी तयार करावयाची व मग संगीताच्या तालावर एका दिवाणखान्यांतून दुसऱ्यांत व दुसऱ्यांतून तिसऱ्यांत वर्तुळाकार फिरावयाचें ! नृत्यसमारंभ आटोपल्यावर रात्रीं ९ च्या सुमारास आम्ही आमच्या हॉटेलांत परत आलों.

सोव्हिएत रशियांतील माझा एक महिन्याचा मुक्काम अनेक दृष्टींनीं अत्यंत संस्मरणीय झाला. येथें मला एक विलक्षण जोमदार असा नवीन जीवनप्रवाह पहाण्याची संधि मिळाली. या नव्या जीवनप्रवाहाचें थोड्या शास्त्रीय दृष्ट्या निरीक्षण केलें असतां असें दिसून येतें कीं, येथील जनतेची सुदृढ शरीरसंपत्ति व शिक्षणांतील प्रगति हे या नव्या जीवनाचे दोन महत्त्वपूर्ण पैलू आहेत. या नव्या समाजरचनेंतील बहुसंख्य जनतेच्या जीवनांत शांततेसंबंधींची निष्ठा एकरूप झाली आहे. व्यक्तिगत जीवन जगत असतांनाच राष्ट्रीय ध्येयदृष्टीशीं समरस व्हायचें ही ह्या मंडळींची अभिनव मनोरचना पाहून मला मोठा विस्मय वाटला. पढीव दृष्टिकोनांतून विचार न करतां निर्विकार नजरेनें या समाजव्यवस्थेकडे पाहून असें म्हणावेसें वाटतें कीं, कांहीं क्षेत्रांत सोव्हिएट रशियानें स्वतःची अद्‌भुत प्रगति करून घेतली आहे. अंधानुकरणाची बाब सोडून दिल्यास कोणत्याहि उगवत्या राष्ट्रानें स्वतःच्या संस्कृतीस रुचेल व पचेल अशा तऱ्हेनें येथील चांगल्या उपक्रमांचा प्रयोग करून पहाण्यास हरकत नाहीं, असें कोणत्याहि समंजस व्यक्तीस वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
जिल्हा वाचनालय

आमचें विमान आकाशांत उंच उड्डाण करीपर्यंत रशियन स्त्रीपुरुष मंडळी हात उंचावून आम्हांला निरोप देत होती. हळूहळू विमान दूर जाऊं लागलें. सोव्हिएत रशियाच्या विशाल जीवनाच्या खाणाखुणा जरी मागें पडूं लागल्या तरी आम्ही आमचे नेत्र विस्फारून मागें वळून पाहण्याचा प्रयत्न करीत होतों. शेवटीं गर्द अंधकाराखेरीज दुसरें कांहींच दिसेनासें झालें. मॉस्को विद्यापीठावर प्रकाशणारा लाल तारा मात्र बराच वेळपर्यंत हंसत हंसत आम्हांला निरोप देतच होता.

आतां बहुतेक साऱ्या प्रतिनिधी झोंपीं गेल्या आहेत. मधून मधून विमानाच्या घरघरीबरोबर ऐकूं येणारी वाऱ्याची शीळ आजूबाजूला पसरलेल्या प्रशांत मौनाचा क्वचित् प्रसंगीं भंग करीत आहे. मला ती नीरव शांतता असह्य झाली म्हणून मीं झरोक्यांतून बाहेर दृष्टि टाकली. बाहेरील सगळें वातावरण कसें भरल्या अंतःकरणानें हेलावल्याप्रमाणें दिसत होतें. इतक्यांत माझ्या अंगावर आलेल्या वाऱ्याच्या एका अति थंडगार झुळकीमुळें माझें अंग शहारून गेलें व मन एका विलक्षण गूढरम्य भावनेनें व्याकुळ झालें. मी माझी गरम शाल अंगाभोंवतीं लपेटून घेतली.

आतां अधिक काय लिहूं ? उद्यां मी प्रागहून कोपेनहेगनला जाईन. तेथून तुला पत्र लिहीनच; आणि विशेष सर्व कांहीं भेटीअंतीं.

तुझी
सौ. चारुशीला

REFBK-0008877
८८७७